
जानेवारी १९८८

संशोधक

राजवाडे मंडळ हीरक महोत्सव अंक



संस्थेची इमारत

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

ग. वि. चांदवर
आगळकडून भेट
२६।११।८०

५
११
८०-८१

ग. वि. चावरे यांजकडून सप्रेम भेट

८६२

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने पुरस्कृत केलेले
इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळाचे त्रैमासिक

सं शो ध क

(राजवाडे संशोधन मंडळ–हीरक-महोत्सव विशेषांक)

वर्ष ५५ ● अंक १, २, ३ व ४ (समाविष्ट)
मार्च / जून / सप्टेंबर / डिसेंबर १९८७

संपादक

प्रा. डॉ. प्र. न. देशपांडे
प्रा. डॉ. मु. ब. शहा
प्रा. व. ग. हजिरनीस

वार्षिक वर्गणी २५ रु.] मूल्य ४५ रुपये [आजीव वर्गणी २०० रु.

आदरांजली

* कै. शालिग्रामजी भारतिया (निधन १६ ऑगस्ट १९८६)
माजी खासदार, राजवाडे संशोधन मंडळाचे आजीव सदस्य, एक उद्योगपती, धुळ्यातील नामांकित शैक्षणिक संस्थांचे अध्यक्ष.
* कै म. गो. जोशी (निधन ५ फेब्रुवारी १९८७)
राजवाडे संशोधन मंडळाचे माजी उपाध्यक्ष, राजवाडे पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे एक संस्थापक सदस्य, विधिज्ञ, शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी.
* कै. द. रा. भट – (दत्तूकाका) (निधन ९ मार्च १९८७)
राजवाडे संशोधन मंडळाचे दीर्घकालीन क्युरेटर, संशोधक त्रैमासिकाचे संपादक. मंडळातील कागदपत्रांचे जतन करणे, अप्रकाशित ऐतिहासिक साधनांवर संशोधनपर लेख लिहिणे, मूर्ती, अवशेष याबाबत टिपणे तयार करणे.
दत्तूकाका म्हणजे–राजवाडे संशोधन मंडळ आणि राजवाडे संशोधन मंडळ म्हणजे - दत्तूकाका.
* कै. भ. त्र्यं. वैद्य (भगवंतराव) (निधन २५ एप्रिल १९८७.)
धुळ्यातील ख्यातनाम आयुर्वेदाचार्य.
राजवाडे पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे अनेक वर्षे संचालक, काही वर्षे चेअरमन, मंडळाच्या कार्यकारिणीचे सदस्य.
* कै. अतुल द. जोशी (निधन ३० ऑगस्ट १९८७)
'संशोधक' त्रैमासिकाचे संपादक, मंडळाच्या वस्तुसंग्रहालय समितीचे चिटणीस, राजवाडे पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे एक संचालक, मंडळाच्या विकासार्थ झटणार एक संपर्काधिकारी, धुळ्यातील जाणकार पत्रकार.
* कै. सु. गो. मदाने (भाई) (निधन २८ नोव्हेंबर १९८७)
धुळ्यातील झुंजार पत्रकार, मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष, धुळ्यातील नानाविध सामाजिक चळवळींचे प्रवर्तक, मंडळाचे क्रियाशील हितचिंतक, मंडळाच्या प्रसिद्धीस दैनिक 'आपला महाराष्ट्र'चे योगदान.
* कै. अजित शहा – धुळ्यातील धडाडीचे उद्योजक, मंडळाचे देणगीदार.

प्रकाशक : डॉ. प्र. न. देशपांडे, वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे
मुखपृष्ठ : सुधीर चोपडे / मुद्रक : चिं. स. लाटकर, कल्पना मुद्रणालय, ४६१/४ सदाशिव पेठ टिळक रस्ता, पुणे ४११० ३०

संपादकीय

प्र. न. देशपांडे

मुख्य चिटणीस

'संशोधक' त्रैमासिकाचा हा 'इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ-हीरक महोत्सव अंक' अभ्यासकांच्या आणि जिज्ञासू वाचकांच्या हाती देताना आम्हाला आनंद होत आहे. या अंकाची रचना करताना आम्ही दोन संकल्प केले होते: एक म्हणजे इतिहासाचार्य राजवाडे यांच्या जीवनकार्यावर संशोधनपूर्ण वा अभ्यासपूर्ण लेख मंडळाच्या हीरकमहोत्सवानिमित्त प्रकाशित करणे आणि दुसरा संकल्प म्हणजे इतिहासाला उपयुक्त ठरणारी अप्रकाशित साधने प्रसिद्ध करणे. हे दोन्ही संकल्प अल्प प्रमाणात आज सिद्धीस जात आहेत याचे समाधान वाटते. इतिहासाचार्य राजवाडे यांच्या कार्याचा सांगोपांग आणि समग्र अभ्यास होण्याची आवश्यकता आहे. वेगवेगळ्या क्षेत्रांत इतिहासाचार्यांनी मूलगामी संशोधन करून स्वतःचे असे अनेक सिद्धान्त मांडले आहेत. इतिहासाचार्यांचे बुद्धिवैभव आणि कल्पनाशक्ती अफाट होती. त्यांनी मांडलेल्या अनेक सिद्धान्तांचा प्रत्यय आज अनेक अभ्यासकांना संशोधनांती येतो. इतिहास, संस्कृती, भूगोल, मानववंशशास्त्र, आरोग्य, भाषा, व्याकरण, खगोलशास्त्र, पुरातत्त्व, राज्यशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी विविध अभ्यासशाखांत इतिहासाचार्यांनी नवी प्रमेये मांडली, नवे सिद्धान्त सांगितले. इ. राजवाड्यांच्या अभ्यासपद्धतीचा विशेष हा होता की, विविध विद्याशाखांच्या व्यासंगात गर्क असतानाही प्रचलित राजकारणाकडे त्यांचे बारकाईने लक्ष होते. विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात राष्ट्रीय आंदोलनाला लो. टिळक आणि त्यानंतर म. गांधी यांनी वेगळे परिणामकारक आणि व्यापक वळण दिले. त्या काळात इ. राजवाड्यांनी प्रचलित राजकारणावर सडेतोड आणि निर्भीड विचार मांडलेले आढळतात. ललित साहित्य, काव्य, कादंबरी इत्यादी प्रांगणांतही इतिहासाचार्यांनी काही मूलगामी विचार मांडले आहेत. इ. राजवाड्यांनी मांडलेली प्रमेये आणि सिद्धान्त

पूर्णतः अचूक आहेत असे मानणे सयुक्तिक नाही. तथापि त्यांनी संशोधनक्षेत्रातील अनेक वाटा धुंडाळलेल्या असल्यामुळे त्यांच्या संशोधनाची दखल घेणे आणि त्यांच्या कार्याचा मागोवा घेणे विद्यमान संशोधकांना आणि अभ्यासकांना क्रमप्राप्तच ठरते. त्या दृष्टीनेच इ. राजवाड्यांच्या कार्यावर संशोधनपूर्ण आणि अभ्यासपूर्ण लेख या अंकात प्रसिद्ध करण्याचे आम्ही ठरविले.

इतिहासाची अप्रकाशित साधने प्रसिद्ध करण्यास संशोधकाने नेहमीच अग्रक्रम दिलेला आहे. राजवाडे संशोधन मंडळाच्या संग्रही असलेल्या अप्रकाशित कागदपत्रांचे आणि हस्तलिखिताचे संपादन व प्रकाशन 'संशोधकातून' सातत्याने होत असते. अन्यत्र उपलब्ध होणाऱ्या अप्रकाशित साधनांनाही 'संशोधका'मध्ये आवर्जून स्थान दिले जाते. मंडळाच्या हीरकमहोत्सवी वर्षानिमित्त प्रसिद्ध होणाऱ्या या अंकात 'अप्रकाशित साधने' अधिक प्रमाणात प्रसिद्ध करण्याचे आम्ही ठरविले. त्या दृष्टीने अंकाची तयारी सुरू केली. नामवंत अभ्यासकांनी आमच्या विनंतीला मान देऊन वेळेवर साहित्य पाठविले, म्हणूनच हा अंक अपेक्षेप्रमाणे परिपूर्ण करणे शक्य झाले.

या अंकासाठी सर्वश्री पूज्य शिवाजीराव भावे, डॉ. अ. रा. कुलकर्णी, डॉ. मु. श्री कानडे, डॉ. यू. म. पठाण, डॉ. कृ. ना. चिटणीस, डॉ. य. दि फडके, डॉ. रवीन्द्र रामदास, डॉ. चिं. त्र्यं. परचुरे, डॉ. मा. रा. कंटक, डॉ. टी. टी. महाजन, डॉ. जी. बी शहा, डॉ. बी. जी. तामसकर, डॉ. रमेश अवलगावकर, डॉ. यशवंत पाठक, प्रा. का. धों. देशपांडे, प्रा. एस. एम. लोकडे या साऱ्यांनीच परिश्रमपूर्वक लेख तयार करून पाठविले, याबद्दल ऋण व्यक्त करतो.

अंक परिपूर्ण करण्यासाठी मंडळाच्या संशोधन विभागाचे क्युरेटर प्रा. व. ग. हजिरनीस, संशोधन-सहायक सौ. विजया देशपांडे, प्रा. कु. सुनंदा अहिरे, तसेच श्री. पळशीकर, श्री. नीतिन भागवत आदींनी खूप परिश्रम घेतले. त्याबद्दल धन्यवाद!

'संशोधक' सर्वांगसुंदर, असला पाहिजे (म्हणजे अंक) असा आमचे स्नेही श्री. अण्णासाहेब लाटकर यांचा आग्रह तर असतोच, परंतु त्यासाठी ते खूप परिश्रम घेत असतात. हा अंकही सर्वार्थाने सुंदर व सुबक निघावा यासाठी त्यांनी परिश्रम घेतले; एवढेच नव्हे तर अल्पावधीत हा अंक छापून दिला. याबद्दल श्री. अण्णासाहेब लाटकर आणि कल्पना मुद्रणालयाचे कर्मचारी यांना धन्यवाद.

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळाच्या कार्यकारिणीचे सदस्य, मंडळाचे हितचिंतक, तसेच 'संशोधकाचे' वर्गणीदार, अभ्यासक, जाहिरातदार या साऱ्यांचाच अंक सजावटीला हातभार लागला आहे, त्याबद्दल त्यांचे आभार!

अंकाविषयी आपली मते कळविल्यास आभारी होईन!

चुकीची दुरुस्ती : पृष्ठ २, ३ री ओळ To him like ऐवजी To him unlike असे वाचावे.

अनुक्रमणिका

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळाचे पदाधिकारी व कार्यकारिणीचे सदस्य १९८७-१९९०

अध्यक्ष : पू. श्री. शिवाजीराव भावे

उपाध्यक्ष : खासदार बॅ. विठ्ठलराव गाडगीळ / श्री. र. नि. भट
श्री. वि. नि. इंगळे चेअरमन, राजवाडे पीपल्स को· ऑप बँक, धुळे

पदाधिकारी

(१) कार्याध्यक्ष श्री. बा. वि. मुंदडे, (२) कार्योपाध्यक्ष श्री. अ. ल. ओगले, (३) मुख्य चिटणीस प्रा. डॉ. प्र. न. देशपांडे, (४) चिटणीस (संशोधक त्रैमासिक) प्रा. डॉ. मु. ब. शहा, (५) चिटणीस (वस्तुसंग्रहालय) कै. अतुल द जोशी (निधन ३० ऑगस्ट १९८७), (६) चिटणीस (ग्रंथालय) डॉ. वि. गुं. पुराणिक, (७) खजिनदार श्री. ज. शं. अग्रवाल, (८) क्युरेक्टर (पदसिद्ध) प्रा. व. गं. हजिरनीस.

कार्यकारिणी सदस्य

(१) श्री. लो. गो. माळी, (२) श्री. जुगलशेट शिंदोडिया, (३) श्री. वि. बा. रणसिंग, (४) श्री. र. श्री. मुंदडे, (५) श्री. म. गि. अग्रवाल, (६) श्री. कां. मो. गुजराती (निमंत्रित)

बँक सदस्य

(१) चेअरमन, राजवाडे पीपल्स को. ऑपरेटिव्ह बँक, धुळे, (श्री. वि. नि. इंगळे १९८७-८८), (२) श्री. शं. गो. पाटील (नवनिर्वाचित).

ग्रंथालय समिती

(१) डॉ. वि. गुं. पुराणिक, चेअरमन, (२) श्री. वि. वि. पाताळे, सदस्य, (३) श्री. ना. शं. कुलकर्णी, सदस्य, (४) श्री. म. ज्ञा. विभुते, सदस्य, (५) श्री. म. गि. अग्रवाल, सदस्य.

वस्तुसंग्रहालय समिती (३०।८।१९८७ पर्यंत)

(१) कै. अतुल जोशी, चेअरमन, (१) श्री. अ. ल. ओगले, प्रभारी चेअरमन, (२) श्री. सुरेश अ. मेहता, सदस्य, (३) श्री. म. भा. येवलेकर, सदस्य, (४) श्री. चं. ब. साळुंखे सदस्य, (५) श्री. वा. स. देशपांडे सदस्य.

कै. भा. वा. भट स्मारक समिती

(१) श्री. बा. वि. मुंदडे, चेअरमन, (२) श्री. ज. शं अग्रवाल, सदस्य (३) श्री. अ. ल. ओगले, सदस्य, (४) श्री. जुगलकिशोर गिंदोडिया सदस्य.

सेवक वृंद

(१) सौ. विजया देशपांडे (सहाय्यिका संशोधन प्रकाशन विभाग•)
(२) प्रा. कु. सुनंदा अहिरे (")
(१) श्री. ज. वा. पळशीकर, (२) श्री. गं. कों शिंपी, (३) श्री. श्री. ना. देव (ग्रंथपाल), (४) श्री. सु. तु. कार्ले, (५) श्री. नि. आ. भागवत.



मा. कलेक्टरसाहेब यांची राजवाडे म्युझियमला भेट
डावीकडून- १) श्री अ. ल. ओगले २) जिल्हाधिकारी श्री. अभय बोरवणकर ३) श्री वामनराव मिस्तरी ४) श्री बाळासाहेब मुंदडा

कविवर्य बोरकरांची
इतिहासाचार्यांना श्रद्धांजली




इतिहासाचार्य राजवाडे यांची आठवण होऊन—

नाना सुविध जीवने वेंचावी ।
तेढीं कुवाडी उकलावी ।
आपुली पूर्वरूपें न्याहाळावीं । दिव्य दृष्टि ॥
ऐसें तुम्ही ठेविलें जी धन ।
शोधका नित्य नूतन संजीवन ।
प्रतिभेसि निरंत आवाहन । होत जावो ॥

३ सप्टेंबर १९७८

कै. बा. भ. बोरकर
(राजवाडे संशोधन मंडळाच्या अभिप्राय-पुस्तिकेतून)

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे



शिवाजीराव नरहर भावे

अध्यक्ष


इतिहासाचार्य वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे




बॅ. विठ्ठलराव गाडगीळ
उपाध्यक्ष



श्री वि. नि. इंगळे
उपाध्यक्ष




श्री र. नि. भट
उपाध्यक्ष



राजवाडे संशोधन मंडळ, धुळे : कार्यकारिणी व सेवकवृंद

खुर्चीवर बसलेले (डावीकडून) : सर्वश्री म. गि. अग्रवाल, वि. वा. रणसिंग, शं. गो. पाटील, अ. ल. ओगले, बा. बि. मुंदडे, वि. नि. इंगळे, प्र. न. देशपांडे, लो. गो. माळी, ज. शं. अग्रवाल, उभे (डावीकडून) : श्री. श्री. ना. देव, ज. वा. पळशीकर, कु. सुनंदा अहिरे, सौ. विजया देशपांडे, नि. आ. भागवत, सु. तु. कार्ले



राजवाडे पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक, धुळे : संचालक-मंडळ

(डावीकडून) : सर्वश्री. सु. ह. सोळुंकी, पु. मि. खिंवसरा, चं. ब. साळुंखे, वा. बि. मुंदडे, वि. नि. इंगळे—अध्यक्ष, श्री. ना. देव—उपाध्यक्ष, लो. गो. माळी, ना. कृ. गायकवाड, ज. शं. अग्रवाल—जनरल मॅनेजर.



मा. हंगामी राज्यपाल न्या. श. कृ. देसाई
ताम्रपट व चित्रे यांची पाहणी करताना
उजवीकडून : राज्यपाल देसाई, श्री. बाळासाहेब मुंदडे, श्री. इंगळे,
प्रा. व. ग. हजिरनीस, प्रा. डॉ. प्र. न. देशपांडे



मा. हंगामी राज्यपाल न्या. श. कृ. देसाई कागदपत्रांची पाहणी करताना
उजवीकडून : प्रा. डॉ. प्र. न. देशपांडे, राज्यपाल देसाई, न्या. विजयराव कोतवाल,
सौ. विजया देशपांडे, प्रा. कु. सुनंदा अहिरे

स्मृतिशलाका

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंदिर उभारण्याचा प्रकल्प

रविवार दि. ९ जानेवारी १९३२ रोजी धुळे येथील नागरिकांची लोकमान्य-उद्यानात कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांच्या आकस्मिक निधनामुळे झालेले दुःख व्यक्त करण्यासाठी आणि त्यांची असामान्य योग्यता लक्षात घेऊन स्मारकाची योजना करण्यासाठी जाहीर सभा भरली होती.

आपल्या समतोल बुद्धीने व कार्यतत्परतेने सर्वांना प्रिय झालेले येथील वकील रा. विनायक नरहर बरवे यांनी अध्यक्षस्थान स्वीकारले होते. सभेत श्रोते व वक्ते यांच्यात प्रसंगाच्या महत्त्वाने उत्पन्न झालेला निर्धार स्पष्ट व्यक्त होत होता. प्रास्ताविकानंतर अध्यक्षांनी धुळे येथील समर्थ वाग्देवता मंदिर व सत्कार्योत्तेजक सभेचे संस्थापक श्री. शं. श्री. देव त्यांना संकल्परूपी ठराव मांडावयास सांगितले.

संकल्परूपी ठराव

श्री

" मराठे, पेशवे, महाराष्ट्र, भरतखंड, आर्यसंस्कृती इत्यादिकांविषयी निस्सीम अभिमान, इतिहास संशोधनकार्याला स्वतःस सर्वस्वी वाहून घेऊन प्रकट केलेला स्वार्थत्याग, अलौकिक निःस्पृहता, संशोधनादी व्यवसायात कोणालाही सर्वतोपरी साहाय्य करण्याची तत्परता, मराठी भाषेच्या एकनिष्ठ सेवेने व्यक्त झालेले भाषा-प्रेम, पाणिनी, भास्कराचार्य-लोकमान्य यांच्या तोलाची अचाट बुद्धी, कार्यैकनिष्ठा, संन्यस्तवृत्ती, इत्यादी आपल्या अंगच्या अनेक गुणांनी ज्यांनी महाराष्ट्राला भूषविले ते पुरातत्त्वभूषण

विश्वनाथ काशीनाथ राजवाडे

ध्यानी मनी नसता शके १८४८ मार्गशीर्ष वद्य १२ शुक्रवारी, धुळे शहरी आपला देह ठेवून एकाएकी चालते झाले; यामुळे होत असलेल्या दुःखात धुळ्याचे नागरिक पौष शुद्ध ६ रोजी जाहीर सभेत असा निर्धार करतात की,

' धुळे शहरी राजवाडे यांचा असलेला अफाट संग्रह सुरक्षित राहावा,

यथावकाश प्रकाशन व्हावे,

त्यांनी लिहून ठेवलेला प्रचंड मराठी धातुकोश व इतर पूर्णापूर्ण टाचणे प्रकाशित व्हावी,

एकवार प्रकाशित पण हल्ली दुर्मिळ झालेल्या त्यांच्या लेखांचे विषयवारीने खंडशः पुनर्मुद्रण व्हावे. '

इत्यादी त्यांची कार्ये पुढे चालावी व त्यांचे मनोरथ पूर्ण व्हावे, यासाठी त्यांचे स्मारक म्हणून

इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

या संस्थेची आज स्थापना करून बृहन्महाराष्ट्राच्या मदतीने धुळ्यास राजवाडे संशोधन मंदिर त्वरित उभारण्याच्या उद्योगास लागावे. "

अनुमोदन : सदर सूचनेस रा. बाळुभाई मेहता यांनी अनुमोदन देताना सांगितले,

" सुमारे वीस दिवसांपूर्वी कै. राजवाडे यांच्या संग्रहातील सुमारे दोनतीन हजार संस्कृत पोथ्यांची विषयवारीने यादी करण्याचे काम राजवाडे यांनी आपणास सांगितले असता त्यांच्या सहवासात त्यांच्या अलौकिक बुद्धिमत्तेची आपणास कल्पना आली. संग्रहाच्या स्वरूपाचे आविष्करण झाले. "

अध्यक्षांनी ठराव सभेपुढे मांडताना श्रोत्यांना पुन्हा बजावले की कार्य चांगले आहे म्हणूनच केवळ ' हो ' म्हणू नका, पण उत्साहाने आणि निर्धाराने ठरावास संमती द्यावयाची असल्यास द्या.

त्यावर टाळ्यांचा प्रचंड गजर करून श्रोत्यांनी आपला उत्साह व निर्धार जाणविला. रा. भास्कर वामन भट ह्यांनी राजवाडे संशोधन मंडळाच्या काही सभासदांची नावे जाहीर केली.

अध्यक्षांनी पुन्हा प्रोत्साहनपर भाषण करून सभा बरखास्त केली. ठरावाच्या समर्थनार्थ रा. शं. श्री. देव म्हणाले,

" ...एक मत असेही आहे की, पुण्यासारख्या शहरी भारत इतिहास संशोधक

मंडळासारखी मध्यवर्ती संस्था असता तिच्या हवाली हा संग्रह न करणे योग्य होणार नाही. पण हे म्हणणे मला पटत नाही.

पुण्याचे भारत इतिहास संशोधक मंडळ ही तर संशोधकांची आद्य गादी आहे. मला हे कबूल आहे. याबद्दल कोणालाही संशय नाही. पण पूर्व काळी पुणे-साताऱ्यास मराठ्यांची आणि पेशव्यांची मुख्य गादी असून आपल्या साम्राज्याचा विस्तार भरतखंडभर होऊन ज्याप्रमाणे प्रांतोप्रांती आपण आपली ठाणी वसविली होती, व त्याचप्रमाणे हल्लीच्या काळी सुद्धा आपल्या संशोधनसाम्राज्याचा विस्तार करून दक्षिणेस तंजावरपासून उत्तरेस ग्वाल्हेर-झाशीपर्यंत सारा मुलूख आपण व्यापला पाहिजे. कै. राजवाडे यांची तरी हीच इच्छा होती. ठिकठिकाणी संशोधन मंडळे स्थापली जावी, असे त्यांना फार वाटे व तसे त्यांचे प्रयत्नही होते... तेव्हा संशोधन-कार्याच्या विस्ताराच्या दृष्टीने आपले धुळे शहर एक पाऊल पुढे टाकण्यास तयार झालेले पाहून पुण्यातील आणि बृहन्महाराष्ट्रातील विद्वान लोक तुमचे कौतुकच करतील याबद्दल मला शंका नाही. "

दुखवट्याच्या सभेत वाचून दाखवलेले प्रमुख शोक संदेश

(१) इतिहासचार्य राजवाडे यांचे वडीलबंधू **प्रो. वैजनाथ काशीनाथ राजवाडे.**

" महाराष्ट्रातील एक महापुरुष नाहीसा झाला, हे देशाचे मोठे दुर्दैव आहे.... विसुभाऊ राजवाडे हे राष्ट्रपुरुष होते. म्हणून संपूर्ण राष्ट्र त्यांच्या संपत्तीचे वारस आहे. त्यांच्या पश्चात त्यांची ग्रंथसंपत्ती फार मोठी आहे; एक त्यांनी स्वतः निर्माण केलेली व दुसरी त्यांनी सर्व आयुष्यभर जमवलेली. विशेषतः ते हल्ली तयार करत असलेल्या कोशाचे हस्तलिखित व इतर किरकोळ लहान मोठे निबंधवजा पुष्कळ लेख छापावयाचे आहेत. याशिवाय पत्रे, पोथ्या वगैरे ग्रंथांचा व ऐतिहासिक वस्तूंचा मोठा संग्रह धुळ्यासच आहे. त्यासंबंधी व्यवस्था करण्यास एखादी कमिटी वगैरे करावी लागेल...त्या कामी मदत लागेल ती आनंदाने करावयास मी तयार आहे. "

(२) **रिसायतकार गोविंदराव सरदेसाई** लिहितात :

" इतिहासाचा जीवनकर्ता गेला. शिवछत्रपतींपासून पेशवाईअखेर मराठी इतिहासातील प्रत्येक व्यक्ती अंधारमय गर्तेतून वर आणून राजवाड्यांनी सजीव करून आमच्यापुढे वर्तावयास लावली, हे केवढे महत्कार्य. एवढा प्रचंड उद्योग, एवढा स्वार्थत्याग, एवढी अचाट कल्पनाबुद्धी अलीकडच्या चारदोनशे वर्षांत एकाच व्यक्तीच्या ठिकाणी एकवटलेली बहुधा आढळत नाही..."

(३) पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाचे त्या वेळचे चिटणीस **महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार** लिहितात :

" विसुभाऊ गेले याने सर्व महाराष्ट्राची नव्हे—जगताची भयंकर हानी झाली आहे यात तिळमात्र संशय नाही...एवढा कर्मयोगी महापुरुष एखाद्या राष्ट्राच्या वाट्याला त्याच्या पूर्वपुण्याईनेच येतो...धुळ्यास प्रचंड संशोधन मंदिर उभारा, तेथे त्यांचा लिखित संग्रह, पुतळा, चरित्रग्रंथ, संग्रह ठेवा आणि जोराने पितृपूजेचा डांगोरा पिटा...या महापुरुषाने जो संप्रदाय—जागता संप्रदाय स्थापन केला तो चढता वाढता करण्याचा कोणताही रस्ता स्वीकारा, त्यात कोठेतरी प्रेक्षक म्हणून तरी मजला उभा राहण्यास परवानगी द्या म्हणजे झाले. "

(४) **रा. कृ. पां. कुलकर्णी**, सातारा येथील दुखवट्याच्या सभेतील ठरावाद्वारे कळवतात :

" मराठी भाषेची, इतिहासाची, भाषाशास्त्राची अपरिमित हानी झाली आहे... स्मारकाची काही योजना लवकरच प्रसिद्ध कराल अशी विनंती करतो. "

मंडळाच्या पहिल्याच प्रोसीडिंग नोंदीवरून

राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

थोरामोठ्यांचे अभिप्राय

साहित्यसम्राट नरसिंह चिंतामण केळकर

श्री

माघ शु ॥ ११ शके १८५४

ता. ६ सोमवार माहे फेब्रु. १९३३

परवा राजवाडे स्मारक मंदिर संस्था पुन्हा पाहिली. पूर्वी पाहिली त्या वेळी तिचे बांधकाम चालू होते. आता ते पुरे झाले असून...विद्यार्थी, संशोधक व अभ्यासक यांचे उपयोगाकरिता इमारतही पुरी झाली आहे....अशा रीतीने हे इतिहासाच्या अभ्यासाचे एक नवे केंद्र नमुनेदार व टुमदार झालेले पाहून फार आनंद झाला.

कै. राजवाडे यांनी आपला देह व आपला ग्रंथसंग्रह–लेखसंग्रह व पत्रसंग्रह धुळ्यास ठेवला. पैकी देहाने स्वाभाविक गती घेतली परंतु इतर गोष्टी त्यांचे मागे राहण्याची योग्य व्यवस्था त्यांच्या धुळेकर भक्तांनी उत्तम रीतीने ठेवली.

...प्रत्यक्ष कार्यासंबंधाने माझी सूचना अशी आहे की, राजवाडे यांनी लिहून ठेवलेला मराठी धातुकोशाचा ग्रंथ छापण्यास तावडेतोब हाती घ्यावा....संस्कृत व मराठी भाषांना व्याकरणदृष्ट्या जोडणारा हा ग्रंथ चालू व भावी विद्यापीठांतून त्याची प्रसिद्धी होताच मान्यता पावेल ! (मूळ मोडी लिपीत)

श्रीमज्जगद्गुरु श्रीशंकराचार्य

संस्थान मठ संकेश्वर करवीर

मिति माघ शु ॥ १ शके १८५९ ता. १ माहे फेब्रु. १९३८

राजवाडे संशोधन मंदिरातील पुरातन हस्तलिखित प्रति व ऐतिहासिक थोर पुरुषांची सुंदर चित्रे पाहून श्रींना संतोष झाला. प्राचीन ग्रंथांचा संग्रह व्यवस्थित असल्याने आपल्या धर्मनिष्ठ पूर्वजांचे स्फूर्तिदायक भाषण होऊन तेच आपल्या ऐहिक व पारलौकिक उत्कर्षास कारणीभूत होणारे आहे असे श्रींचे मत आहे. संस्थेचा अशाच तऱ्हेने उत्तरोत्तर उत्कर्ष होऊन संस्थेकडून ग्रंथद्वारा धर्मरक्षण होवो असा श्रींचा संस्थेस आशीर्वाद आहे.

श्री आज्ञेवरून

Dr. B. R. Ambedkar

Dhule, 18-6-38

As who has spent some six or seven years in the various libraries of Europe and America I was indeed greatly pleased to go round the collection of manuscripts and paintings of the Rajwade Sanshodhan Mandal. As compared with European libraries this of course is indeed a very small place. The responsibility for this however does not lie on those who have given birth to this institution. It is to be hoped that the new government will pay adequate attention to such institutions and see that Raj. grew into big library. I wish the institution every success.

M. C. Chagla

Chief Justice

High Court, Bombay
11th Nov. 1948

I was very happy to visit the Rajwade Sanshodhan Mandal. It is a fitting testimonial to the splendid work done by Mr. Rajwade in historical research. Every nation deserves its history to be written from the point of view of enshrining its past glories and traditions both as a matter of historical record and as an impetus for future effort. The Mandal can become a nucleus for research and scholarship. I wish it every success and hope that its activities will increase and it wtll succeed in attracting more and more scholars to take the benefit of the very fine facilities it provides for historical work.

श्री. प्रकाश
मुंबई राज्यपाल

१० अप्रैल १९५९

राजवाडे संशोधन मण्डल में आज जाकर और वहांके विद्वान् कर्मठ अधिकारियों मिलकर बडा ही आनंद हुआ। उन्होंने जिस प्रेमसे मेरा स्वागत किया और मण्डल में भिन्न भिन्न विभागों का कार्य दिखलाया और समझाया, इसके लिए मैं हृदय से अनुग्रहीत हूं। यह बडा ही सुंदर संग्रहालय है और पाण्डुलिपियों और ऐतिहासिक वस्तुओं की यहाँ अनुपम सामग्री है। मेरी शुभकामना है इस सुंदर और उपयोगी संस्था की दिन प्रतिदिन उन्नति हो और जनसाधारण इस से लाभ उठा सके और प्राचीन समयकी अपनी गाथापर समुचित गर्व करे। यह प्रयास सब भी ही समुचित सहायता में योग्य है और मुझे आशा है कि यह इसे मिलेगी जिस से इसका कार्यक्षेत्र और विस्तृत हो सके और इसकी उपयोगिता भी बढे।

गो. नी. दांडेकर

इ. स. १९६२

राजवाडे संशोधन मंडळाची इमारत आणि तिच्यातील संग्रह ही तो अमर तीर्थक्षेत्रे ! इतिहासाच्या विद्यार्थ्यांची ही काशी. फ्लॉरेन्स नाइटिंगेलच्या हस्तलिखित पत्रापासून तो सुमारे तेराशे वर्षांपूर्वीच्या ताम्रपटापर्यंत इथे जे जे ते सर्वच जपून ठेवण्याजोगे, प्राणांपलीकडे सांभाळण्याजोगे...डोळे उघडे ठेवून सगळे सगळे पाहिले पाहिजे.

नरहर कुरुंदकर

ता. ११–१०–१९६७

महाराष्ट्रीय इतिहास संशोधनाचे युगप्रवर्तक आचार्य वि. का. राजवाडे यांच्या स्मृतीस अभिवादन करण्यासाठी मंडळाला भेट देणे माझे नैतिक कर्तव्यच होते. मंडळातील चित्रे, कागदपत्रे पाहून थोडी तरी धन्यता वाटलीच. मंडळाचे कार्य व हस्तलिखित संग्रह जपून ठेवण्याचे कार्य समाधानकारक दिसले. हे ऋण मराठी अभ्यासकावर कायम राहील. मी या सर्व कार्यास नम्र शुभेच्छा व्यक्त करतो.

Stewart N. Gordon
University of Michigan

Jan. 13. 1976

With thanks and apprecciation for the assistance in research for our project of the history of Khandesh, 1680–1760.

Dr. J. F. Richards
Associate Professor of History
and South Asian Studies
University of Wisconsia, U. S. A.

... ... The collection of documents here is one that is matched in few other places. I sincerely hope that other historical scholars will continue to make use of and support the facilities.

वि. वि. चिपळूणकर

ता. ९–१२–१९७७

ऐतिहासिक साधनांचा संग्रह करण्याचे व तो संग्रह सतत वाढता ठेवून त्याचे जतन करण्याचे कार्य परिश्रमपूर्वक येथे चालल्याचे पाहून आनंद झाला. कै. राजवाडे यांच्या भव्य कार्यापासून प्रेरणा घेऊन येथील कार्यकर्ते विशिष्ट ध्येयवादाने व जिद्दीने या कार्यात मग्न झालेले दिसतात. हा ध्यास व हे वेड भावी पिढीला आपला इतिहास जाणण्याचे दृष्टीने निश्चित उपयुक्त ठरेल व उगवत्या तरुण पिढीत त्याबद्दल सार्थ अभिमान जागा करू शकेल. इतिहासाबद्दल आदर असणारी प्रत्येक व्यक्ती या कार्याला आपल्या परीने हातभार लावीलच. या कार्याची उत्तरोत्तर प्रगती होत राहो ही शुभेच्छा.

यू. म. पठाण

प्रमुख, मराठी विभाग, मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद.

८ जानेवारी १९८३

राजवाडे संशोधन मंडळाच्या ५७ व्या वर्धापनानिमित्त येण्याचा सुयोग लाभला. मंडळात जे नवचैतन्य आल्याचे जाणवले, त्याचा येथे कृतज्ञतापूर्वक निर्देश करणे मी माझे कर्तव्य समजतो. मंडळातील हस्तलिखितांचे अत्यंत काळजीपूर्वक जतन करून त्यांची सूची करण्याचे महत्कार्य मंडळाचे कार्यकर्ते करत आहेत. यातून किती तरी अप्रकाशित ग्रंथांवर, साधनांवर प्रकाश पडेल असा विश्वास वाटतो. 'संशोधक' या त्रैमासिकाला जे नवे रूप देण्यात आले आहे ते स्वागतार्ह आहे. मंडळाने हाती घेतलेली प्रकाशन योजना ही लक्षणीय आहे. प्रा. डॉ. मु. ब. शहा, प्रा. डॉ. प्र. न. देशपांडे, श्री. द. रा. भट यांनी संपादलेल्या सामग्रीचे स्वागतच संशोधनजगतात होईल.

मंडळास राज्य सरकार, केंद्र सरकार, म. रा. साहित्य संस्कृती मंडळ व अन्य संस्था यांचे उदार आर्थिक सहकार्य लाभावयास हवे, तरच मंडळ उत्तरोत्तर अधिक चांगले कार्य करू शकेल. मंडळाच्या कार्यकर्त्यांना हार्दिक धन्यवाद ! !


श. कृ. देसाई

Ag. Governor of Maharashtra

19 Oct. 1987

I am very happy to have visited the museum maintained by the Rajwade Sanshodhan Mandal. I saw for myself the large collection of beautiful artefacts, miniature paintings and rare manuscripts. All these form part of our rich cultural heritage. They also constitute the original source material for historical research. I am confident that the Mandal will do whatever is possible to preserve these treasures for the benefit of future.

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ
६० वर्षांची वाटचाल



संकल्प

९ जानेवारी १९२७—इतिहासाचार्य राजवाडे स्मारक उभारणे. अदाह्य इमारत स्वरूपात

प्रवर्तक

कै. भास्कर वामन तथा तात्यासाहेब भट, धुळे.

कै. शंकर श्रीकृष्ण तथा नानासाहेब देव, धुळे.

स्मारकासाठी जमीन दान

सहाय्यक : कै. सर श्री. जनार्दन आत्माराम मदन मुंबई सरकार (धुळे जिल्हाधिकारी १९२७)

२. जमीन १००'×५०' —टॉवर बागेजवळ

३. इमारत कोनशिला डिसेंबर १९२९ हस्ते—भारताचार्य चिंतामणराव वैद्य

४. मान्यवरांची उपस्थिती—सर जदुनाथ सरकार, रावबहाद्दूर सरदेसाई

द्रव्यसहाय्य

इंदूरच्या महाराणी इंदिराबाई माँसाहेब होळकर

इमारत वैशिष्ट्ये

भक्कम व देखणी इमारत धुळ्यात प्रथमच

१. इंग्लंडमधील क्रिटॉल कंपनीच्या लोखंडी दारेखिडक्या

२. सिमेंट कॉंक्रीट

उद्घाटन समारंभ

५ जानेवारी १९३२

(राजवाड्यांचा ५ वा पुण्यस्मृतिदिन)

उद्घाटक

कै. श्री. महाराणी इंदिराबाई होळकर

अध्यक्ष

कै. पू. विनोबाजी भावे

महाराणींचे आगळे स्वागत

जायी नदी किनारी दमाशी गावी

विशेष—राजवाड्यांच्या हस्तलिखितांचा कागदपत्रांचा संग्रह मंडळात दाखल

राजवाड्यांचा अर्धपुतळा

अनावरण समारंभ—२४ डिसेंबर १९३२

अध्यक्ष—श्रीमंत सरदार रावबहादुर माधवराव विनायकराव किबे

शिल्पकार—श्री. हरी केशव फडके, मुंबई

राजवाडे संशोधन मंडळ ग्रंथालय

सहाय्यक संस्था व व्यक्ती

१. इकॉनॉमिक लायब्ररी, धुळे
२. इतिहासाचार्य राजवाडे यांचे ग्रंथ
३. बडोदे संस्थान—
   गायकवाड ओरिएण्टल सिरिज
४. कश्मीर संस्थान—शैव तंत्राबाबतचे ग्रंथ (कश्मीर सिरिज)
५. कलकत्ता विश्वविद्यालय—'जर्नल ऑफ दी डिपार्टमेंट ऑफ लेटर' अंक
६. तत्कालीन हिंदुस्थान सरकार
   फॉना ऑफ ब्रिटिश इंडिया—पुस्तके

अन्य सहाय्यक

कै. म. व. जोशी, कै. मो. ह. आपटे, कै. श्री. आ. भट, कै. रा. गो. चांदोरकर, कै. वि. वा. ओक, कै. ह. वि. पासलकर, श्रीमती बुरकुले, श्री. अरविंद पाठक, श्री. झारे, श्री. जोग, श्री. वि. वा. रणसिंग

ऐतिहासिक संदर्भ ग्रंथसंपदा

ऐतिहासिक जर्नल्स (इंग्रजी)	३४
ऐतिहासिक साधने (लेखरूपी)	४५२
इतिहासविषयक	१८७
ऐतिहासिक निबंध प्रबंध	१६०
इतिहास कुलवृत्तान्त	१४
बखर	४७
अर्कॉलॉजी	१२६
नाणकशास्त्र	७
कोश	२५१
कला	१०
स्थळ वर्णने	८२
चरित्रे	१०२
मानुभव (महानुभव)	१३४
शिवसाहित्य	७५
भाषाविषयक	६१
स्मारके	४४
वेदवाङ्मय	८१
उपनिषदे	६२
स्मृतीग्रंथ	१६
गीतावाङ्मय	९३

(कै. भा. वा. भट संदर्भ ग्रंथालय)

हस्तलिखिते/कागदपत्रे

मोडी	२७,२३४
मराठी	९४५
संस्कृत	२५५२
फार्सी	१८२
ताम्रपट	१०
शिलालेख (मूर्तीसह)	१०

राजवाडे मंडळ पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि., धुळे

प्रारंभ–१ एप्रिल १९३३

मंडळास आर्थिक साह्य तरतूद

राजवाडे मंडळ वस्तुसंग्रहालय

जागा–मुंबई सरकारकडून रेव्हेन्यू फी ग्रॅन्ट १००'×८०'

प्राप्ती–१६–१–१९४१

कोनशिला समारंभ–३ऑक्टो. १९४१

नामदार न. वि. तथा काकासाहेब गाडगीळ

इमारत पूर्ण–१९७७

'संशोधक' त्रैमासिक

प्रारंभ–चैत्र शु. प्रतिपदा शके १८५४ (सन १९३२)

उद्देश–संशोधनपर लेख प्रकाशन

वृत्त विशेष प्रकाशन

विद्वानांची व्याख्याने

उत्सव–विशेष कार्यक्रम आयोजन

प्रकाशन

राजवाडे चरित्र

धातुकोश

नामादिव्युत्पत्ती कोश

भोसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या

राजस्थान महाराष्ट्र संघर्ष

शिवाजी व समर्थ रामदास–अन्योन्य संबंध

समर्थ रामदासस्वामी आणि त्यांच्या सांप्रदायांचे अभिनव दर्शन

ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायाचे संस्कृत भाषांतर

विवेकसिंधु व मनन ग्रंथ

पंचीकरण

मराठ्यांच्या इतिहासाची साधने

आज्ञापत्र

योगचिंतामणि

ज्ञानेश्वरी पदकोश

१०९ कलमी बखर

वेडिया नागेश

नवरस रागमाला

सुवर्ण महोत्सवी विशेषांक

स्मरणिका १९७७

काँग्रेस शतब्दि विशेषांक

विशेष उपक्रम

महाराष्ट्र इतिहास परिषद अधिवेशन १९८०

खानदेशचा इतिहास परिसंवाद १९८५

थाळनेर उत्खनन प्रकल्प १९८६

पाक्षिक/मासिक सभा

ग्रामदेवता प्रकल्प

पी.एच. डी./एम. फिल. अभ्यासकांना शैक्षणिक साह्य/मार्गदर्शन

वस्तुसंग्रहालय मांडणी १९८७

वस्तुरूप नोंदणी

पाषाणमूर्ती	९१
नाणी–सुमारे	४,०००
हत्यारे तोफा, तलवारी, बंदुका, धनुष्य	४४
देवांच्या मूर्ती	६६
देवांची उपकरणी	२८
लहानमोठी भांडी	८५
पितळी प्राणी	४८ + १०
वनवासी दागिने	१७७
ठसे	६३
उत्खनन चिजा	१०५
चित्रसंग्रह	८५

नव्या वास्तू

वासुदेवाश्रम (अतिथीगृह) पूर्ण—१९८७
संशोधन प्रकाशन विभागासाठी स्वतंत्र
इमारत—जागाखरेदी १९८५

प्रमुख देणगीदार

(५००० रु. पेक्षा अधिक रक्कम)

१. भारत शासन
२. महाराष्ट्र राज्य शासन
३. धुळे जिल्हा परिषद
४. जळगाव जिल्हा परिषद
५. दि मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक लि., धुळे
६. महाराष्ट्र व्हेजिटेबल प्रॉडक्टस्
महाराष्ट्र ऑइल इंडस्ट्रिज, धुळे
७. धुळे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, धुळे
८. श्री. गो. म. वापट-स्वातंत्र्य सैनिक, धुळे
९. नगर परिषद, धुळे
१०. राजवाडे मंडळ
पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि., धुळे

रु. १००० ते रु. ३१०० पर्यंत देणगी देणाऱ्यांची संख्या ७५

विशेष अनुदान (१९८७–८८)

महाराष्ट्र शासन, धुळे जिल्हा
बचत योजना विभाग रु. ३,००,०००



इतिहासाचार्य राजवाड्यांच्या आठवणी

(१) राजवाड्यांना मी पाहिले नाही पण त्यांचे बुद्धि आणि गुण त्याचप्रमाणे नामादि कोष, धातुकोष हे ग्रंथ कै. तात्यासाहेब भट यांच्या कृपेमुळे मी पाहू शकलो. पण सदर कोष राजवाड्यांवर दुर्दैवाने मृत्यूने घाला घातल्यामुळे पूर्ण होऊ शकले नाहीत.

(२) राजवाड्यांसारखा तपस्वी मनस्वी इतिहासाचार्य उभ्या महाराष्ट्रात पुन्हा झाला नाही. कन्याकुमारी ते केंद्दा त्यांनी पायी प्रवास केला. त्यांनी कागदपत्रे ऐतिहासिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक किती प्रकारची मिळवली व त्यांतली शिल्लक किती राहिली हे सांगणे कठीण आहे.

(३) एकदा विसूभाऊ राजवाडे व अप्पासाहेब रणदिवे ३० मैलांवर असलेल्या एका खेड्यात गेले. तेथे एक महत्त्वाची पोथी आहे असा त्यांना सुगावा लागला होता. ते एक आडवळणी गाव होते. लगेच एक पोथीचा भाग राजवाडे उतरू लागले व दुसरा रणदिवे. २ तास वेळ गेला. रणदिव्यांच्या पोटात कावळे कोकलू लागले. पण राजवाड्यांपुढे बोलण्याची छाती झाली नाही.

(४) तेथे एक दुकानदार होता त्याला वाटले हे ब्राह्मण दिसतात. जेवू घातल्यास पुण्य लागेल. पण राजवाडे भलतेच संशयी. काही कमी अधिक झाले आणि विषबाधा झाली तर ?

(५) मग स्वतःच लाकडे गोळा करून त्या दुकानदाराकडून भांडे मागून घेऊन ४।५ चमचे तांदूळ व २ एक लहान पोळ्या करून दोघांनी जेवणं केली. रणदिव्यांना विश्रांती हवी होती. पण राजवाडे जराही विश्रांती न घेता धुळ्याला निघाले. म्हणजे एकूण ६० मैल चालणे झाले.

(६) अप्पासाहेब रणदिव्यांनी स्वतः मला ही गोष्ट सांगितली होती. राजवाडे नेहमीच कसल्या तरी गूढ चिंतनमननात निमग्न असत व सारखे उन्हातान्हात फिरत राहात. जेवण स्वतः करीत. मध, तूप व भात हा त्यांचा आहार असे.

(७) अतिश्रमाने त्यांना प्राण गमवावा लागला. विदेशातल्या पहिल्या प्रतीच्या विद्वानांहून त्यांची विद्वत्ता कमी नव्हती. पाणिनी कालनिर्णय हा त्यांचा प्रबंध पाहून भारताचार्यही थक्क होऊन गेले.

(८) राजवाडे मंडळाची भरभराट त्यांनी पाहिली नाही. पण त्या खेड्यातल्या ३।४ चमचे भातावरच ती उभारली आहे. हे मंडळातल्या प्रत्येक सभासदांनी समजून घेतले पाहिजे.

शिवाजी नरहर भावे
पवनार आश्रम वर्धा, महाराष्ट्र

राजवाडे संशोधन मंडळ
सुवर्ण ते हीरक महोत्सव-एक दशक

(१) वासुदेवाश्रम : हैदराबाद येथील वकील श्री. ज. वा. जोशी ह्यांनी. आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ मंडळाच्या प्रांगणात 'वासुदेवाश्रम' उभारण्यास योगदान केले. आवश्यक सुविधांनी युक्त अशा ह्या दोन खोल्यांमध्ये अभ्यासू-संशोधक व इतिहास-प्रेमी अतिथी यांची अल्प मोबदल्यात निवास-व्यवस्था होऊ शकते.

(२) कै. 'श्री. भा. भट' दालन : मंडळाचे संस्थापक कै. भा. वा. भट यांची निवासस्थानाची वास्तू त्यांचे स्मरणार्थ भट कुटुंबियांनी राजवाडे संशोधन मंडळास संशोधन प्रकाशन कार्यासाठी अत्यंत उदार मनाने अल्प किंमतीस विकत दिली. त्याही रकमेतून मंडळाचे माजी सेक्रेटरी कै. श्री. भा. तथा बाळूकाका भट ह्यांचे हिश्श्यास आलेली रक्कम रु. ९०,०००/– (रुपये नव्वद हजार मात्र) संस्थेस स्मरणार्थ देणगी म्हणून दिली व मंडळास उपकृत केले. त्यांचे ऋण व्यक्त व्हावे म्हणून मंडळाच्या वस्तुसंग्रहालयाच्या मध्य दालनास कै. "श्री. भा. भट" यांचे नाव दिले आहे.

(३) महाराष्ट्र इतिहास परिषद : मंडळाच्या वतीने दि. २२ व २३ नोव्हेंबर १९८० रोजी सदरहू परिषद फार मोठ्या उपस्थितीत संपन्न झाली. महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळाचे अध्यक्ष मा. श्री. बारलिंगे उद्घाटक, तर डॉ. अ. रा. कुलकर्णी अध्यक्ष होते. ह्या परिषदेत गटवार चर्चा संचालन कै. नरहर कुरुंदकर, श्री. देवीसिंग चौहान, डॉ. प्र. न. देशपांडे, डॉ. मु. ब. शहा आदी धुरीणानी केले.

(४) 'संशोधक' सुवर्ण महोत्सवी अंक : डिसेंबर १९८२ रोजी माजी केंद्रीय मंत्री खासदार विजय नवल पाटील ह्यांचे हस्ते प्रकाशन झाले.

त्याच वेळी इतिहासाचार्य राजवाडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रख्यात साहित्यिक श्री. पु. ल. देशपांडे ह्यांचे व्याख्यान झाले.

तसेच पु. ल. व सौ. सुनीता देशपांडे ह्यांचा नाट्यवाचनाचा कार्यक्रम झाला.

पुणे येथे भरलेल्या (जून १९८३) इतिहास परिषदेत सुवर्ण महोत्सवी अंकाविषयी अभ्यासकांनी गौरवोद्‌गार काढले.

(५) वस्तुसंग्रह सूची : दि. १३ मे १९८० रोजी केंद्रीय मंत्री नामदार श्री.वसंतराव साठे ह्यांच्या शुभहस्ते मंडळाने प्रसिद्ध केलेली, पुण्याचे डॉ. म. श्री. माटे व डॉ. उषा रानडे यांनी संपादित केलेली मंडळाच्या वस्तु-संग्रहालयातील मूर्तिशिल्प आणि चित्रे यांची वर्णनात्मक सूची प्रकाशित करण्यात आली.

(६) परिसंवाद : जानेवारी १९८३ मध्ये ' पुराणकथा, वास्तवता व इतिहास ' या विषयावर एक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी मराठवाडा विद्यापीठातील डॉ.पंढरीनाथ रानडे, पुणे येथील डेक्कन कॉलेजचे डॉ. गोरक्ष देगुलकर उपस्थित होते. धुळ्यातील एक अभ्यासक कॉ. शरद पाटील, माजी क्युरेक्टर कै. द. रा. भट, चिटणीस डॉ. मु. ब. शहा परिसंवादात सहभागी झाले होते. अध्यक्षस्थानी मंडळाचे प्रमुख चिटणीस डॉ. प्र. न. देशपांडे होते.

(७) प्रकाशन समारंभ : २० मे १९८३ रोजी डॉ. प्र. न. देशपांडे यांनी संपादित केलेल्या " श्री शिवाजी महाराजांची पत्रे " या मौलिक ग्रंथाचे प्रकाशन नामदार श्री. शिवाजीराव देशमुख ह्यांच्या शुभहस्ते झाले.

८ जानेवारी १९८४ रोजी श्रीशिवरायांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी डॉ. प्र. न. देशपांडे लिखित ' १०९ कलमी बखर ' आणि डॉ. मु. ब. शहा यांनी संपादन केलेला वेडिया नागेश कवीचा ' भावार्थ ग्रंथ ' ह्या दोन्ही पुस्तकांचा प्रकाशन समारंभ मराठवाडा विद्यापीठाचे मराठी विभागप्रमुख डॉ. यू. म. पठाण ह्यांच्या शुभहस्ते झाला.

(८) काही प्रकल्प (अ) मंडळाने नव्याने सुरू केलेल्या ' मध्ययुगीन शासकीय पदांचा कोश ' या प्रकल्पाचा शुभारंभ दि. १३-४-१९८४ रोजी माननीय श्री.जयंतराव टिळक, सभापती, महाराष्ट्र विधान परिषद याच्या हस्ते झाला. त्यांनी ह्या कार्यास रु. १०००/– देणगी देऊन शुभचिंतन व्यक्त केले.

(ब) हस्तलिखितांची सूची – मंडळामध्ये सुमारे २० हजार मोडी लिपीची कागदपत्रे आहेत. सहा हजार हस्तलिखितांमध्ये मराठी काव्ये, मराठी स्फुट काव्ये, संस्कृत हस्तलिखिते, मंत्रतंत्र विद्या, धार्मिक पोथ्या, हिंदी काव्य, औषधांचे बाड, अशी हस्तलिखिते आहेत. सौ. विजया देशपांडे व प्रा. कु. सुनंदा अहिरे ह्या दोघींनी शास्त्रशुद्धरीत्या सूची तयार केली आहे. हस्तलिखितांची एकूण ९७ दप्तरे झाली आहेत.

(क) थाळनेर उत्खनन – मंडळाने हाती घेतलेल्या थाळनेर येथील पुरातत्त्वीय उत्खननाला केंद्रीय पुरातत्त्व विभागाची संमती असून महाराष्ट्रशासनाच्या पुरातत्त्व विभागाच्या सहकार्याने उत्खननाची वाटचाल चालू आहे. अशा प्रकल्पांना संस्थेची मंजुरी देण्याचा हा पहिला मान राजवाडे संशोधन मंडळालाच आहे.

(९) खानदेश सेमिनार – १० एप्रिल १९८५ रोजी 'खानदेश इतिहास' या विषयावर एक परिसंवाद संपन्न झाला. साप्ताहिक लोकमानसचे संपादक व धुळे जिल्हा इंदिरा काँग्रेसचे अध्यक्ष मा. डॉ. हेमंत देशमुख अध्यक्षस्थानी होते. 'प्राचीन व मध्ययुगीन खानदेश' या विभागाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र राज्य पुरातत्त्व विभागाचे संचालक डॉ. अ. प्र. जामखेडकर ह्यांनी भूषविले तर 'अर्वाचीन खानदेश' या विभागाच्या अध्यक्षस्थानी पुणे विद्यापीठातील इतिहास विषयाचे प्रपाठक डॉ. अरविंद देशपांडे हे होते.

(१०) काँग्रेस शताब्दी विशेषांक – अस्सल कागदपत्रांच्या आधारे काँग्रेस आंदोलनावर संशोधनपर प्रकाश टाकणारा हा अंक आहे.

(११) पाक्षिक / कालिक / त्रैमासिक सभा वृत्तान्त. या सभांतून प्रामुख्याने निबंध-वाचन आणि चर्चा असे कार्यक्रम होत असतात.

मराठेशाहीतील 'सत्तांतर' – कै. प्रा. ना. वि. डोंगरे.

मराठी राज्याचे दुष्काळविषयक धोरण–प्रा. डॉ. टी. टी. महाजन

मराठेशाहीतील नंदुरबारचा आर्थिक इतिहास
खानदेशातील पाटीलकीचे स्थान } प्रा. डॉ. जी. बी. शहा

मराठेशाहीतील कुणबिणीची कथा – कै. द. रा. भट

ग्रामदेवता कोश – प्रा. डॉ. प्र. न. देशपांडे

खानदेशातील ग्रामदेवता – श्री. प्रकाश कानडे.

इतिहास विषयाची अध्यापनपद्धती
भारतीय संस्कृती सदीप दर्शन } प्रा. व. ग. हजिरनीस

राजवाडे मंडळ पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेच्या प्रगतीची वाटचाल १९३३–१९८७

श्री. ज. शं. अग्रवाल
सरव्यवस्थापक

कै. इतिहासाचार्य विश्वनाथ काशिनाथ राजवाडे यांचा धुळे शहराशी अतूट असा संबंध होता. १९१० सालापासून त्यांचे दरवर्षी सुमारे पाच-सहा महिने वास्तव्य धुळ्यातच असावयाचे. कै. भास्कर वामन तथा तात्यासाहेब भट, नानासाहेब देव, चांदोरकर वकील, काकासाहेब बरवे ह्या धुळेकर मंडळींशी त्यांचा घनिष्ठ स्नेह होता. इतिहासाचार्यांच्या कार्यकर्तृत्वासंबंधी या साऱ्यांना विलक्षण आस्था होती. परिणामतः इतिहास-संशोधनाच्या साधनांची जुळवाजुळव, चर्चाविमर्श, लेखन-प्रकाशनादी कार्याचे धुळे हे महत्त्वाचे केंद्र ठरले. ३१ डिसेंबर १९२६ रोजी इतिहासाचार्यांचे अचानकपणे निधन झाले आणि त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ राजवाडे संशोधन मंडळाची स्थापना १९२७ मध्ये झाली. इ. राजवाडे यांनी परिश्रमपूर्वक जतन केलेली हजारो कागदपत्रे, हस्तलिखित ग्रंथ, अप्रकाशित लेख इ. बहुमोल संपदेचा संशोधकांना उपयोग व्हावा आणि त्यांचे अपुरे राहिलेले कार्य भविष्यातही निर्वेधपणे चालावे अशी त्यांच्या अनेक सहकाऱ्यांची इच्छा होती किंबहुना तेच इतिहासाचार्यांचे खरेखुरे स्मारक ठरेल अशी त्यांची धारणा होती. संशोधन–लेखन–प्रकाशनाचे कार्य अव्याहतपणे चालविण्यासाठी भक्कम वित्तीय व्यवस्थेची आवश्यकता आहे या विचारामधून स्वतंत्र बँकेच्या उभारणीच्या कल्पनेला चालना मिळाली. इतिहासाचार्यांचे निकटचे सहकारी कै. भास्कर वामन तथा तात्यासाहेब भट हेच या कल्पनेचे मूळ जनक. बँक स्थापनेमागे तात्यासाहेबांचा पुढाकार असला तरी अनेकांचे या कामी त्यांना मनःपूर्वक सहकार्य लाभले हेही नमूद करावयास हवे.

बँकेची स्थापना

डिसेंबर १९३२ मध्ये बँकेची घटना आणि नियम तयार करून एन्. पी. भागवत, ॲडिशनल रजिस्ट्रार को-ऑपरेटिव्ह सोसायटीज, मुंबई इलाखा यांच्या सहकार्याने त्यांना मूर्त स्वरूप दिले गेले. १९३३ मध्ये रजिस्ट्रार पंजाबीसाहेब यांच्याकडून बँक स्थापनेस रीतसर संमती मिळाली. २७ मार्च, १९३३ (वर्षप्रतिपदा) या दिवशी बँकेची प्राथमिक सभा त्या वेळचे पश्चिम खानदेश जिल्ह्याचे कलेक्टर माननीय विठ्ठल शिवराम भिडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्या प्रसंगी कै. तात्यासाहेब भट यांनी केलेल्या भाषणाचे इतिवृत्त याच अंकात अन्यत्र दिले आहे. बँक नोंदविण्यासाठी सादर केलेल्या अर्जावर प्रामुख्याने विश्वनाथ गणेश जावडेकर, शंकरराव रामकृष्ण दांडेकर, मोरेश्वर हरी आपटे, व्यंकटेश रामचंद्र अमृते, गंगाधर हरी पटवर्धन, अवधूत शंकर राव, गोपाळ विश्वनाथ पळशीकर, महादेव गोविंद जोशी, त्र्यंबक सखाराम अभ्यंकर इत्यादिकांच्या सह्या होत्या. सर्व उपचार पूर्ण होऊन १ एप्रिल १९३३ रोजी बँकेच्या कामकाजाला प्रारंभ झाला.

वासुदेवाश्रम

इतिहासाचार्यांचे एक चाहते हैदराबादचे पांडुरंग वासुदेव जोशी यांनी धुळ्यातील आपली ' वासुदेवाश्रम ' ही वास्तू राजवाडे संशोधन मंडळाला देणगी म्हणून दिली. याच वास्तूमध्ये नव्याने स्थापन झालेल्या राजवाडे बँकेच्या कार्याचा श्रीगणेशा झाला. श्री. महादेव चिंतामण केळकर हे बँकेचे पहिले चेअरमन तर श्री. शंकर वासुदेव जोग हे बँकेचे पहिले मॅनेजर.

जोग यांनी व्यवस्थापकाचे काम १९५०–५१ पर्यंत म्हणजे सुमारे सतरा वर्षे पाहिले. बँकेच्या पायाभरणीचा हा काळ होता. या काळामध्ये दत्तात्रय रामचंद्र तथा दत्तूकाका भट यांनी व्यवस्थापन आणि बँकेच्या दैनंदिन कारभारामध्ये विशेष लक्ष घालून तिला नावारूपाला आणण्यात महत्त्वपूर्ण वाटा उचलला. १९५१–५२ पासून १९७४–७५ पर्यंत श्री. अ. ल. पाठक यांनीही व्यवस्थापक म्हणून काम पाहिले. त्यानंतर आजतागायत श्री. ज. शं. अग्रवाल हे बँकेचे सरव्यवस्थापक झाले आणि श्री. खिवसरा, श्री. ओमप्रकाश अग्रवाल, श्री. म. मा. पाठक या तीन शाखाधिकाऱ्यांच्या साहाय्याने ते आता बँकेची धुरा समर्थपणाने सांभाळत आहेत.

वैशिष्ट्यपूर्ण घटना

सुरुवातीच्या काळातील आणखी काही ठळक घटनांची नोंद घ्यावयास हवी. शैक्षणिक आणि संशोधनविषयक कार्यासाठी निरंतर आणि भक्कम साहाय्याची तरतूद करण्याच्या उद्देशाने राजवाडे बँकेची उभारणी केलेली असल्याने बँकेचे मॉडेल बॉयूलॉज

या उद्देशाच्या पूर्ततेला उपयुक्त ठरतील असेच बनविण्यात आले. बँकेच्या सभासदत्वाची अशी अट आहे की, त्याने घेतलेल्या भागावरील व्याज रकमेच्या १/४ पेक्षा कमी नाही आणि १/३ पेक्षा जास्त नाही इतकी रक्कम राजवाडे संशोधन मंडळाच्या कार्यासाठी द्यावी. याव्यतिरिक्त बाय लॉ ४१ (अ) (१) अन्वये बँकेला प्रतिवर्षी होणाऱ्या निव्वळ नफ्यातून रिझर्व्ह फंड वजा जाता जी रक्कम राहील त्याच्या १५ % किंवा रिझर्व्ह फंड आणि डिव्हिडंडची रक्कम वजा जाता त्याच्या ३० % याच्या दरम्यानची रक्कम बँकेने राजवाडे संशोधन मंडळाला द्यावी. शैक्षणिक उपक्रमासाठी पुरेसे आर्थिक पाठबळ कायम स्वरूपात उपलब्ध होत राहावे ही या भूमिकेमागील दूरदृष्टी, कल्पकता आणि वैचारिक झेप खरोखरच विस्मयकारक आहे. या प्रकारचे अधिष्ठान लाभलेली दुसरी एखादी वित्तीय संस्था साऱ्या भारतात कोठेही असल्याचे ऐकिवात नाही. आम्हाला हे नमूद करण्यास संतोष आणि अभिमान वाटतो की, गेल्या पंचावन्न वर्षांच्या काळामध्ये बँकेच्या व्यवस्थापकांनी, संचालकांनी, कार्यकर्त्यांनी आणि हितचिंतक भागधारकांनी हा वसा सांभाळलेला आहे.

भाग भांडवलदार

१९३३-३४ मधील बँकेच्या सभासदांची संख्या ५६२ होती आणि गोळा झालेले भागभांडवल रु. १२,००० इतके होते. ठेवींच्या रूपाने सुमारे रु. ६०,००० गोळा झाले. रु. ८५६०० इतकी कर्जे दिली गेली आणि बँकेने निव्वळ नफा रु. ९५२ मिळविला. गंगोत्रीचा हा उगम होता आणि पुढील पाच दशकांच्या काळात तिचा कार्यविस्तार प्रचंड प्रमाणात होऊन एक यशस्वी आणि नमुनेदार नागरी सहकारी बँक म्हणून ती नावारूपाला आली.

एक व्यवसाय या दृष्टीने बँकेच्या कारभारामध्ये आणि धोरणामध्ये प्रागतिक दृष्टिकोण बँकेच्या संचालकांनी आणि व्यवस्थापकांनी प्रारंभापासूनच अवलंबिलेला होता. कायम नोकरवर्गाच्या हिताच्या दृष्टीने काही किमान व्यवस्थेच्या तरतुदींचे महत्त्व ओळखून स्टाफ प्रॉव्हिडंट फंडाच्या उभारणीला अग्रक्रम मिळाला. १ जुलै १९४० पासून राजवाडे मंडळ पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेच्या कर्मचाऱ्यांना प्रॉव्हिडंट फंडाचा लाभ मिळू लागला. इतकेच नव्हे तर कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन म्हणून बोनस वाटण्याचीही तरतूद प्रारंभापासून करण्यात आली आणि त्याचा लाभ कर्मचाऱ्यांना आजतागायत सातत्याने मिळत राहिलेला आहे.

बँकेचे कर्मचारी आणि भागधारक यांच्यासाठी एक रेशनिंग दुकानही १९४५ पासून चालविण्यात येऊ लागले आणि धान्य, कापड, किराणासामान व अन्य निवडक जीवनोपयोगी वस्तू रास्त दराने उपलब्ध करून देण्याची व्यवस्था झाली. दुर्दैवाने हा उपक्रम मात्र काही वर्षांतच बंद करावा लागला.

प्रगतीचे ठळक टप्पे

१९३३-३४ ते १९३९-४० या कालखंडामध्ये बँकेच्या सभासदांची संख्या ५६२ वरून १३८९ वर गेली. ठेवी, कर्जे आणि निव्वळ नफा यामध्ये संतोषजनक प्रगती होऊ लागली. पहिल्या वर्षातील एकूण ठेवी रु. ८९७६२ होत्या तर एकूण कर्जे रु. ८५६३८ इतकी होती. हे आकडे १९३९-४० सालासाठी अनुक्रमे रु. २,०७,१३५, रु. १,७३,९८० आणि रु. ५७६१ होते.

१९४०–४१ ते ५०-५१ चा कालखंड

हे दशक बँकेच्या प्रगतीच्या दृष्टीने विशेष उत्साहजनक नव्हते. ४०-४१ मधील सभासदसंख्या १३४८ होती ती ४५-४६ मध्ये ९४० तर १९५०–५१ मध्ये ८२४ पर्यंत घसरली. ठेवींमध्ये मात्र वाढ दिसून आली. १९४०-४१ मधील एकूण ठेवी रु. १,७४,४७० होत्या त्या ४५-४६ मध्ये रु. ४,३३,६१९, तर ५०-५१ मध्ये रु. २,५७,३१७ इतक्या होत्या. याच दहा वर्षांच्या काळात कर्जे रु. १,८१,०४३ वरून १९५०-५१ मध्ये रु. २,५७,३१७ पर्यंत वाढली.

५०–५१ ते ६०–६१

या कालखंडामध्ये प्रगतीच्या चक्रांना पुन्हा हळूहळू वेग येऊ लागला. ५५–५६ मधील ११२७ ही सभासदसंख्या ६०–६१ मध्ये १२५९ पर्यंत पोहोचली. एकूण ठेवी याच काळात रु. ३,३५,७९७ वरून रु. ४,२९,५६३ पर्यंत वाढल्या तर कर्जे रु. २,७८,५९८ वरून रु. ४,५१,३१४ पर्यंत वाढली. निव्वळ नफ्याने ६०-६१ मध्ये रु. १०,००० ची मर्यादा ओलांडली आणि रिझर्व्ह फंडस् दुप्पट होऊन ते रु.४४,८४७ इतके झाले. या साऱ्या घडामोडी बँकेच्या प्रगतिपर कारभाराच्याच निदर्शक होत्या.

६०-६१ ते ७०-७१

बँकेच्या विस्तारकार्याचा वेग आणि प्रगतीचा आलेख या दशकामध्ये वाढता राहिला. सभासद संख्येमध्ये उल्लेखनीय वाढ होऊन ६५–६६ मध्ये १७८५ तर दशकाचे शेवटी म्हणजे ७०-७१ मध्ये ती २०८९ झाली. शेअर भांडवल ६५-६६ मध्ये रु. १,२५,०१० होते ते ७०-७१ मध्ये रु. १,८९,६२० झाले तर ठेवींचे प्रमाण रु. ७,९४,७२६ वरून रु. १६,८८,९६१ म्हणजे दुपटीने वाढले. एकूण कर्ज ६.५ लाखांवरून रु. १३ लाखांवर गेले, तर निव्वळ नफा रु. १४,००० वरून रु. ३२,००० पर्यंत वाढला.

दि राजवाडे मंडळ पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि., धुळे

प्रगती दाखविणारे पत्रक

	सभासदांची संख्या	शेअर भांडवल	मुदत ठेव	सेव्हिंग्ज व इतर ठेवी	रिझर्व फंड
१९७६-७७	२५७०	३८८३६०	१९९६०५०	१६८२१८०	२०५६९६
१९७७-७८	२७४८	४३३८६०	२२६७४५१	२१९७६८३	२६१८३२
१९७८-७९	२८८८	५००७४०	३०८९६०१	२३१७२६२	२९४२०४
१९७९-८०	३०४८	५९८३५०	४३३७५६२	४००३४६३	३३७९२७
१९८०-८१	३३६४	७००३००	५७११२७७	५६९०४३०	३८०४८०
१९८१-८२	३३५६	७५२८३०	७५६६०९९	७५३०२०४	४६४०२६
१९८२-८३	३३६२	७९६७९०	९५०४१००	८१५४०७१	५४३९३१
१९८३-८४	४००४	९४८१३०	११६२८९२५	१०६२४६९९	६३२९३२
१९८४-८५	४००६	१०३४४८०	१५१५२८७३	१२२८०१२७	७३१७६५
१९८५-८६	३९६७	११०५०९०	१९३०५२७४	१४८७५८१२	८४८१६५
१९८६-८७	४००६	११८०१५०	२३८८९०२०	१९२५२५०१	१०४५५७१

दि राजवाडे मंडळ पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि., धुळे

प्रगती दाखविणारे पत्रक

इतर फंड	कर्जे	एकूण कर्जाशी थकबाकीचे शेकडा प्रमाण	एकूण खेळते भांडवल	निव्वळ नफा	ऑडिट वर्ग
१८१७९५	२८१५४१४	१५·७ टक्के	४७४३९३८	११८९२८	ब
२३७२९३	२७६१२८४	१८·९ ”	६०६५३२२	११८८४०	ब
३१६७९८	३२३१६८२	१३ ”	७८८९४५८	१४३०००	ब
३८३१९१	५०९३४७८	१०·८ ”	१०५२०३१५	१६०८३९	अ
५३५३१६	८९८१६२४	८·६ ”	१४३८४३१६	३००१६६	अ
८६६००८	१२१४३८५१	१३ ”	१८९४४०३२	३०९८४८	अ
१०३१६५९	१५१७२१०९	१५·४ ”	२२४१६५६३	३०९४७७	अ
१००६९१२	१७९६५४८०	१८·९ ”	२८०५१७१८	३७१७२७	अ
१४५०७२२	२३६४६४३	२२·७ ”	३५११७६९९	४२९२२४	अ
१७९१६५९	२८८६५४९४	२१·८ ”	४४१९३२२६	६०५७०१	अ
२६३५५९१	३५२५१४१८	२०·०० ”	५६१२५०७३	६७२५६२	अ

१९७०-७१ पासूनचे दशक

बँकेच्या दृष्टीने हा कालखंड सर्वार्थाने नेत्रदीपक प्रगतीचा ठरलेला आहे. ७५-७६ मध्ये सभासद संख्या २५०७ होती तर तिने तीन हजारांचा टप्पा ओलांडून ८१-८२ मध्ये ती ३३५६ इतकी झाली. शेअरभांडवलातही साहजिकच वाढ होऊन ७५-७६ मधील सुमारे रु. ३.६ लाखांचे शेअरभांडवल १९८०-८१ मध्ये रु. ७ लाख झाले तर ८१-८२ मध्ये ७.५२ लाख इतके झाले. याच काळात ठेवी ३० लाखांवरून ११४ लाखांपर्यंत वाढल्या तर कर्जांनी रु. २२.६ लाखांवरून सुमारे ९० लाख रु. ची पातळी गाठली. निव्वळ नफा ७५-७६ मध्ये रु. ७०,००० इतका होता तर ८०-८१ मध्ये त्याने तीन लाखांची पातळी ओलांडली.

बँकेची नवी इमारत

बँकेच्या कामाचा वाढता व्याप लक्षात घेता नव्या प्रशस्त आणि आवश्यक सुविधांनी युक्त इमारतीची गरज तीव्रतेने भासू लागली. १७ नोव्हेंबर, १९७६ रोजी महाराष्ट्र राज्याचे तेव्हाचे मुख्यमंत्री नामदार शंकररावजी चव्हाण यांच्या हस्ते नव्या इमारतीचे भूमिपूजन झाले व बँकेने या नव्या वास्तूमध्ये २९ नोव्हेंबर १९७७ रोजी प्रवेश केला. हा समारंभ धुळ्यातील माजी आमदार आणि शिक्षणक्षेत्रातील एक तळमळीचे कार्यकर्ते प्राचार्य सदाशिवराव माळी यांच्या शुभहस्ते आणि माजी चेअरमन म. गो. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. १९७७ मध्ये महाराष्ट्रातील नागरी बँकांचे अधिवेशन धुळे येथे भरविण्यामध्ये बँकेने पुढाकार घेतला. नागरी बँकांच्या विविध समस्यांचा ऊहापोह व्हावा आणि त्यातून मार्ग काढण्याच्या दृष्टीने संघटितपणाने पावले उचलली जावीत ही त्या मागील भूमिका होती. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे तेव्हाचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर आणि सहकार क्षेत्रातील एक नामवंत अग्रणी श्री. चिं. द. दाते यांच्या अध्यक्षतेखाली हे अधिवेशन यशस्वीरीत्या पार पडले.

दुर्बल घटकांसाठी

समाजातील दुर्बल घटकांच्या विकासार्थ विविध योजना आज राबविल्या जात आहेत. अशा योजनांना प्रारंभ होण्याच्याही अगोदर बँकेने धुळ्यातील दुर्बल घटकांना अर्थसाहाय्य उपलब्ध करून देण्याचा उपक्रम हाती घेतला होता. सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून बँकेने केवळ चार वर्षांच्या काळात (१९७५ ते ७९) दुर्बल घटकांना एकूण रु. ५,३९,२०७ कर्ज दिले. अशा लाभार्थींची संख्या ११५१ होती. धुळ्यातील एकमेव कापडगिरणीमधील कामगारांपैकी ६० टक्के कामगार बँकेचे भागधारक आणि ठेवीदार आहेत याचा इथे मुद्दाम उल्लेख करावयास हवा.

अधिक ठेवी आकृष्ट करून घेण्यासाठी बँकेने कसोशीने प्रयत्न चालविलेले आहेत.

मंगल ठेव योजना, कल्पतरू ठेव योजना आणि अन्य बचतीच्या/ मुदतीच्या ठेव योजना बँकेने कार्यान्वित केलेल्या असून त्याला उत्तम प्रतिसादही मिळत आहे, ही बँकेच्या चोख आणि कार्यक्षम कारभाराची पावतीच मानली पाहिजे. १९७७ पासून सेफ डिपॉझिट व्हॉल्टचीही सोय बँकेमध्ये उपलब्ध आहे.

धुळे जिल्हा नागरी बँक असोसिएशन स्थापन करण्याचा बहुमान राजवाडे बँकेलाच लाभलेला आहे. बँकेचे त्या वेळचे चेअरमन मा. बाळासाहेब मुंदडे हेच या असोसिएशनचे अध्यक्ष आहेत. राज्यपातळीवरील नागरी बँकांच्या फेडरेशनवर बँकेचे एक विद्यमान संचालक श्री. लोटन गोबजी माळी यांची यापूर्वी दोन वर्षांसाठी निवड झालेली होती. नागरी बँकेची चळवळ अधिक जोमाने चालावी यासाठी बँकेचे पदाधिकारी कटिबद्ध आहेत याचेच हे द्योतक आहे.

देवपूर शाखा

सदर शाखेची परवानगी मिळवून देण्यासाठी मा. ना. शिवाजीराव पाटील, माजी सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई व श्री. ल. शं. मराठे, चीफ ऑफिसर, अर्बन डिपार्टमेंट, महाराष्ट्र स्टेट को-ऑप बँक लि., मुंबई यांनी मोलाची मदत केली व दिनांक ६।१०।८३ रोजी देवपूर शाखेची परवानगी मिळाली.

१ डिसेंबर १९८३ रोजी मा. श्री. भाऊसाहेब थोरात त्या वेळचे चेअरमन – दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप. बँक लि., मुंबई यांच्या शुभ हस्ते व मा. दादासाहेब शिवाजीराव पाटील, चेअरमन शिरपूर साखर कारखाना यांच्या अध्यक्षतेखाली देवपूर शाखेचा उद्‌घाटन समारंभ साजरा झाला. सदर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मा. दादासाहेब–ज. दौ. राऊळ, मा. दादासाहेब–रामराव सीताराम पाटील व मा. शां. वि. बेलकर – जिल्हा उपनिबंधक, धुळे हे उपस्थित होते.

बँकेच्या प्लॅनप्रमाणे अपूर्ण राहिलेली इमारत पूर्ण झाल्याने दि. १६।२।१९८४ रोजी या विस्तारित इमारतीचा उद्‌घाटन समारंभ मा. खासदार बाळासाहेब विखे पाटील, चेअरमन प्रवरा सहकारी साखर कारखाना लि., प्रवरानगर यांच्या शुभ हस्ते व मा. आमदार केशवरावजी पाटील, चेअरमन, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., सातारा यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून माजी खासदार व जिल्ह्याचे लोकप्रिय नेते श्री. अण्णासाहेब चुडामण पाटील हे उपस्थित होते.

सुवर्ण महोत्सव

बँकेचे सभासद, ठेवीदार व हितचिंतकांच्या सहकार्याने धुळे शहराच्या सेवेची ५० वर्षे पूर्ण केली म्हणून मागील वार्षिक साधारण सभेत सुवर्ण महोत्सव उत्तम रीतीने साजरा

करावयाचे ठरविले होते व त्याप्रमाणे बँकेने आपला सुवर्ण महोत्सव ५ जुलै १९८४ रोजी अत्यंत उत्साहाने व आनंदाने साजरा केला.

सुवर्ण महोत्सवाच्या उद्घाटनासाठी उद्घाटक म्हणून धुळे जिल्ह्यातील प्रसिद्ध उद्योगपती व दानशूर दाते श्री. काशिनाथ शेट अग्रवाल यांना आमंत्रित करण्यात आले होते. तसेच माजी आमदार सौ. कमलाबाई अजमेरा यांना समारंभाच्या अध्यक्षा म्हणून व माननीय दादासाहेब शिवाजीराव पाटील, माजी सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य व विद्यमान चेअरमन, शिरपूर सहकारी साखर कारखाना मर्यादित शिरपूर व माननीय दादासाहेब राऊळ, विद्यमान संचालक दि महाराष्ट्र स्टेट को. ऑप. बँक. लि., मुंबई व माननीय स. ना. भालेराव, माजी नगराध्यक्ष, जळगाव नगर परिषद, जळगाव व विद्यमान राज्यमंत्री नामदार श्री. रोहिदास चुडामण पाटील यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते.

वरील मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम पार पाडण्यात आले. सुरुवातीस प्रसिद्ध उद्योगपती व सामाजिक कार्यकर्ते सन्माननीय काशिनाथजी पन्नालालजी अग्रवाल यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलित करून समारंभाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर बँकेचे आद्य संस्थापक कै. तात्यासाहेब भास्कर वामन भट यांच्या तैलचित्राचे अनावरण विद्यमान आमदार व चेअरमन कृषी उत्पन्न बाजार समिती धुळे श्री. रोहिदास चुडामण पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. त्यानंतर जळगावचे माजी नगराध्यक्ष व कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते स. ना. भालेराव यांच्या शुभहस्ते बँकेच्या हयात असणाऱ्या सर्व माजी चेअरमन व विद्यमान संचालक मंडळ सदस्यांचा शाल व श्रीफळ देऊन व भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला. तसेच बँकेचे माजी मॅनेजर व सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचाही शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार करण्यात आला.

ज्याप्रमाणे बँकेच्या आज झालेल्या प्रगतीत संचालक मंडळ व कर्मचाऱ्यांचा सिंहाचा वाटा आहे त्याचप्रमाणे बँकेच्या प्रगतीत सभासदांचाही फार मोठा वाटा आहे म्हणून या प्रसंगी बँकेने सर्व सभासदांना स्टीलच्या ६ भांड्यांचा एक सेट भेट म्हणून देण्याचे जाहीर केले व समारंभ प्रसंगी बँकेच्या जुन्या पाच सभासदांना माननीय शिवाजीराव पाटील, माजी सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते वाटप करून शुभारंभ करण्यात आला.

घटना घडत असतात कालांतराने विस्मृतही होतात, क्षण, स्मृती क्षण टिपलेले असले, लिपिबद्ध करून व्यवस्थित असले तर पुन्हा दृष्टोत्पत्तीस येताच उजळणी होते. आठवणीद्वारे भूत-वर्तमानाचे तादात्म्य होते म्हणूनच या सुवर्ण महोत्सवी प्रसंगी स्मरणिका काढण्यात आली. सदर स्मरणिकेचे प्रकाशन महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि. मुंबईचे संचालक व प्रसिद्ध उद्योगपती दादासाहेब ज. दौ. राऊळ यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

या प्रमाणे सदर कार्यक्रम ठरल्यावेळी चांगल्या पद्धतीने व निर्धाराने पार पडला. तसेच बँकेच्या भागधारकांनी कार्यक्रम उत्साहात पार पाडण्यासाठी मोलाची मदत केली.

सदर कार्यक्रमास फार मोठ्या प्रमाणावर ठेवीदार, हितचिंतक व विविध क्षेत्रांतील मान्यवर मंडळी तसेच सामाजिक कार्यकर्ते, अन्य लोकप्रतिनिधी व असंख्य धुळेकर नागरिक, पत्रकार, सहकार क्षेत्रातील नामवंत व्यक्ती, बाहेरगावच्या तसेच गावातील असंख्य बँकेचे संचालक पदाधिकारी व अधिकारी वर्ग फार मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांच्या उपस्थितीत सकाळी १०–३० वाजल्यापासून तब्बल ३ तास हा कार्यक्रम अत्यंत शिस्तीत व अपूर्व उत्साहात झाला.

मंत्र्यांचा बडेजाव पाहण्यासाठी किंवा भाषणे ऐकण्यासाठी लोक कार्यक्रमास येत नाहीत तर कार्यक्रमाच्या प्रेमापोटीच येतात असे सदर कार्यक्रम–प्रसंगी बहुसंख्येने उपस्थित राहून लोकांनी सिद्ध करून दाखविले.

दोन अप्रसिद्ध मोडी कागद

सौ. विजया देशपांडे

इ. वि. राजवाडे संशोधन मंडळीच्या संग्रहात पुरंदरे दप्तराची नुकतीच भर पडलेली आहे. या दप्तरात अनेक विषयांवरील महत्त्वपूर्ण कागदपत्रे आहेत. विशेषतः जहागिरी वा वतने याबाबतची पत्रे दप्तरात बरीच आहेत. बापूजी सोनाजी यांची मोकासाविषयी दोन पत्रे प्रसिद्ध करीत आहे.

पत्र क्र. १ च्या प्रारंभी श्रीकार आहे, मात्र शिक्का नाही. पत्र क्र. २ वर बापूजी सोनाजी यांचा वाटोळा शिक्का आहे. पत्र क्र. १ वर पत्राच्या शेवटी शिक्का आहे. पत्र क्र. २ हे शासकीय आहे तर पत्र क्र. १ शासकीय मजकुराचे पण कुशल कळविणारे पत्र आहे. दोन्ही पत्रांचा मजकूर सारखा असून ‘ मल्हार तुकदेव ’ याचा मोकासा चालविण्याविषयी आदेश त्यात आहेत.

पत्रे इ. स. १७२० मधील असल्यामुळे अतिशय महत्त्वाची आहेत, पेशवाईच्या प्रारंभी शासनव्यवस्थेत जे परिवर्तन घडू लागले होते त्याच्या अभ्यासास अशी पत्रे उपयुक्त ठरतील.

श्री

पत्र १

अजमदुर खान नामजाद प्र॥ वराड दाममो ३

अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ बापूजी सोनाजी जमेनीस दीमत राजश्री कान्होजी भोसले सेनासाहेब सुभा रामराम वीनंती उपरी येथील क्षेम जाणून स्वकीये कुशल लीहीत जाणे यानंतर मौजे पारोळे परगणे पंचगव्हाण हा गाव राजश्री मलहार तुकदेव दीमती राजश्री पंतप्रधान याजकडे हुजरुन मुकासा दील्हा आसे येवीसी यासि त्याचे गाव मुकासा चालवणे हे अगत्य आहे याकरीतां तुम्हास लीहीले आसे तरी तुम्ही त्या गावास कोणी गोस्टीवीशी उपसर्ग लागो न देणे सुरलीत त्याचा अमल चालोन जो यैवज तेथील होईल तो मा।रनीलेस प्रवीस्ट होये ते करणे हे गोस्टीचे आम्हास कारवा सामध्ये अगत्य वाद आहे याकरीता लीहीणे जाहले तरी तुम्ही सर्व प्रकारे त्याची साह्यता करून गावीचा यैवज सुरक्षीत त्याजकडे प्रवीस्ठ होये ते करणे बहुत काय लीहीणे रा॥ छ. २६ माहे जमादीलावल हे विनंती.

मोर्तबसुद

शिक्का

श्री
भवानी चर
णी तत्पर बापू
जी सोनाजी
निरतर:

श्री

पत्र २

श्री भवानी चर णी तत्पर बापू जी सोनाजी निरंतरः

आज्ञापत्रं राजश्री बापूजी सोनाजी जमेनीस दीमती राजश्री कान्होजी भोसले सेनासाहेब सुभा ता। मुकदम मौजे पारोले परगणे पचगव्हाण सुहूर सन सबा अशरीन मया व अलफ मौजे मजकूर हुजरून राजश्री मलहार आबादे दीमती राजश्री पंत प्रधान यासि मुकासा दील्हा असे तरी तुम्ही मानीच्या कमावीसदारासी रुजुवात होऊन मुकास बाबेची यैवज होईल तो मा।रनीले कडे पाठता करणे येबाबे हुजूर न करणे जाणीजे रा। छ. २ माहे जमादीलाखर

मोर्तबसूद

सौ. विजया देशपांडे
संशोधक सहाय्यक,
इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

बाळाजी विश्वनाथाचे एक अप्रकाशित पत्र

इ. वि. का. राजवाडे मंडळाच्या संग्रहात नुकतीच पुरंदरे दफ्तराची भर पडली आहे. या दफ्तरात सर्वच पेशव्यांची शिक्के असलेली बरीच कागदपत्रे आहेत. त्यामध्ये बाळाजी विश्वनाथचे एक अस्सल पत्रही सापडले. सर्व पेशव्यांमध्ये बाळाजी विश्वनाथची पत्रे फारच कमी प्रमाणात उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे प्रस्तुत पत्राचे महत्त्व विशेष आहे. प्रस्तुत पत्रात मल्हार तुकदेव यांचा मुकासा पुढे चालू ठेवण्याविषयी आदेश दिलेला आहे. पत्राची तारीख ९ फेब्रुवारी १७२० अशी येते.

बाळाजी विश्वनाथच्या कारकीर्दीतील शेवटच्या काही महिन्यातील हे पत्र आहे.

प्रा. सुनंदा अहिरे

श्री

०० राजा शाहू न रपती हर्षनीधा न बाळाजी वीश्व नाथस्याप्र धान

आज्ञापत्र राजश्री पंतप्रधान ता। मोकदम मौजे चांदोरी बु॥ ता। नगर हवेली प्रांत कडवली सु॥ अशरैन मया व अलक ××× राजश्री मलहार तुकदेव याजकडे मुकासा आहे त्याप्रमाणे साल मजकुरी करार आसे तरी तुम्ही मशारनीलेस रुजू होऊन मुकासा बाबेचा वसूल सुरळीत घेत जाणे जाणीजे छ. ११ रबीलाखर देखील बाबतीत मुकासा बाबेचा वसुल सुरळीत घेत जाणे जाणीजे छ मजकूर आज्ञा प्रमाण

लेखन सीमा

प्रा. कु. सुनंदा अहिरे
संशोधक सहाय्यक
इ. वि. का राजवाडे संशोधन मंडळ, धुळे

लिस्बन येथील काही मराठी पत्रे

प्रा. डॉ. अ. रा. कुलकर्णी
('श्री', ९९२ / ९९३ / २३, राजेंद्रनगर, पुणे)

मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यासासाठी पोर्तुगीज साधने किती महत्त्वाची आहेत हे कै. पांडुरंगराव पिसुर्लेकर यांनी आपल्या 'पोर्तुगेज–मराठेसंबंध' या प्रसिद्ध ग्रंथान्वये मराठी अभ्यासकांस यापूर्वीच पटवून दिले आहे. इंडो-पोर्तुगीज हिस्ट्री सेमिनारच्या निमित्ताने मला लिस्बनला १९८० आणि १९८५ साली जाता आले, आणि तेथील सुप्रसिद्ध शिक्षणसंस्था 'गुलबेनकिन् फाऊंडेशन' चे प्रशासक डॉ. ब्लँको यांनी दोन्ही वेळा देऊ केलेल्या शिष्यवृत्तीमुळे, आणि दुसऱ्या खेपेस दिलेल्या प्रवासखर्चामुळे मला लिस्बन येथील मराठी कागदांचा शोध घेता आला. तेथील सुप्रसिद्ध अज्युदा ग्रंथालयाच्या (Biblioteca da Ajuda) संचालिका श्रीमती मेल्बा मारिया ऑलिव्हिया फेरेरिइरा लोप्स द कॉस्ता यांच्या सहाय्यामुळे मला दोन्ही वेळा अविलंबे मराठी-फार्सी कागदांच्या झेरॉक्स प्रती करून मिळाल्या. श्रीमती मेल्बा या मूळच्या गोव्याच्या, पण आता पोर्तुगालमध्ये स्थायिक झाल्या आहेत. डॉ. ब्लँको आणि श्रीमती मेल्बा यांच्या औदार्यामुळे आणि सहकार्यामुळे मला लिस्बन येथील मराठी कागद प्रसिद्ध करण्याची संधी मिळाली याचा येथे आवर्जून उल्लेख करावा लागेल.

१९८० साली मला जे २०–२२ मराठी कागद अज्युदा ग्रंथालयात मिळाले होते त्यासंबंधीचा विस्तृत लेख राजवाडे मंडळाच्या 'संशोधका'च्या १९८२ च्या सुवर्ण महोत्सवी अंकात दिला आहे. १९८५ साली बाळाजी बाजीरावाच्या कारकीर्दीतील ९ पत्रे लिस्बनच्या राष्ट्रीय ग्रंथालयात (Bibliotheca Nacional De Lisboa) मिळाली. याच ठिकाणी एक देवनागरीतील आणि एक मोडी लिपीतील हस्तलिखितही पाहावयास मिळाले.

अज्युदा ग्रंथालयातील पत्रे ही प्रामुख्याने १७००–१७०१ सालची, म्हणजे राजाराम

छत्रपतीच्या मृत्यूनंतरची आणि मराठ्यांच्या स्वातंत्र्यसमरासंबंधीची आहेत. कै. पांडुरंगराव यांनी या पत्रांचा कोठेही निर्देश केला नाही. आपल्या 'पोर्तुगेज–मराठे संबंध' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्यांनी लिस्बन येथील सतराव्या व आठराव्या शतकांतील मराठी कागदांच्या मायक्रोफिल्म्स् आपल्या संग्रही आहेत व त्या आपण प्रसिद्ध करणार आहोत असे म्हटले आहे. पण तसे काही घडले नाही. राष्ट्रीय ग्रंथालय आणि अज्युदा ग्रंथालय याचा मी पुरेपूर शोध घेतला, आणि जे काही मराठी कागदपत्र होते ते सर्व आणले आहेत. तिसरे 'आर्क्विव्हु हिस्टारिको उल्त्रामारीनु' (Archivo Historico Ultramarino) या पुराभिलेखसंग्रहास मी दोन्ही खेपेस भेट दिली. पोर्तुगीजांच्या सागरापलीकडील कामगिरीसंबंधीचे कागदपत्र या संग्रहालयात आहेत. १९३१ साली या दप्तरखान्याची स्थापना झाली असून १६ व्या शतकापासून ते १८३३ पर्यंतचे कागदपत्र तेथे आहेत. येथील ४१० पेटाऱ्यांतून भारतासंबंधीचे कागद (१५०९–१८३३ स.) आहेत, त्यांत तामीळ, कन्नड, कोकणी-बरोबरच काही मराठी कागद सापडण्याची शक्यता आहे. हे कागद व्यवस्थितपणे लावून न ठेवल्याने त्यांचा शोध घेणे कठीण आहे. या कचेरीचे डायरेक्टर डॉ. सँटोश (Santos) यांच्या मते मराठी कागद मिळण्याची शक्यता कमी, आणि मिळालेच तर ते मला पाठविणार आहेत. थोडक्यात, माझ्या लिस्बनच्या दोन्ही भेटीत जेवढे म्हणून ऐतिहासिक कागद मिळाले तेवढे प्रस्तुत लेखात सादर करीत आहे. पिसुर्लेकरांच्या मायक्रोफिल्मसूचा शोध लागला, अथवा डॉ. सँटोश यांच्याकडून काही प्रतिसाद मिळाला तर तेही कागद पुढे केव्हातरी प्रसिद्ध करता येतील.

प्रथम १७०१–२ सालच्या कागदपत्रांचा विचार करू. दख्खनच्या इतिहासाच्या दृष्टीने हा कालखंड अत्यंत महत्त्वाचा आहे. मुघल बादशहा औरंगजेब स्वसैन्यासह जातीनिशी दक्षिणेत संभाजीच्या काळापासून तळ ठोकून होता. दक्षिणेतील राजसत्ता नष्ट करून त्या मुघल साम्राज्यात विलीन करणे हे एकमेव ध्येय उराशी बाळगून तो लढत होता. पोर्तुगीजांची सत्ता या काळात जरी नाममात्र असली, तरी भारतीय सत्तांतील परस्परांतील संघर्षामुळे त्यांना अकारण महत्त्व प्राप्त झाले होते. मुघल, मराठे, कोकणातील देसाई त्यांचा अनुनय करीत असल्याचे प्रस्तुत संग्रहातील पत्रांवरून दिसते. पोर्तुगीजांनी प्रत्यक्ष मदत केली नाही तर चालेल, पण त्यांनी मुघल-मराठा संघर्षात तटस्थ राहावे असे या दोन्ही सत्तांना वाटत होते. कुडाळच्या सावंतांना मराठ्यांचे वर्चस्व नको होते. त्यांनी मुघलांचा पक्ष घेतला होता, आणि त्यांना पोर्तुगीजांची सहानुभूती आणि प्रसंगी आश्रय हवा होता. मुघल, मराठे, देसाई, सावंत आणि पोर्तुगीज या साऱ्यांना कोकण आपल्या हाती राहावा असे वाटत होते.

गोव्याच्या विजरईला उद्देशून लिहिलेल्या या संग्रहातील पत्रांवरून दख्खनची

राजकीय परिस्थिती आणि या विभागातील सत्तांचे परस्परांशी असलेले राजकीय, आर्थिक हितसंबंध समजावून घेण्यास मदत होईल. या पत्रांतून आलेले विषय सामान्यतः पुढीलप्रमाणे आहेत :—

(१) कुडाळ ते अंकोलापर्यंतच्या देसायासंबंधीची पोर्तुगीजांना देण्यात आलेली माहिती.

(२) पोर्तुगीजांनी पूर्वीच्या तहांची पायमल्ली करू नये, आणि औरंगजेबाच्या दक्षिणेतील वास्तव्याचा अवास्तव फायदा घेऊ नये अशी मराठ्यांची विनंतीपत्रे.

(३) जकात, परवाने यासंबंधी परस्परांमधील करार, आणि सीमेवरील तंटे.

(४) भ्रष्ट पोर्तुगीज अधिकाऱ्यांना शासन आणि शत्रूला आश्रय न देण्यासंबंधी.

(५) मराठे, सावंत आणि मुघल यांचे पोर्तुगीजांशी मैत्री करार.

(६) सावंत, पोर्तुगीजांच्या प्रदेशांतून मुघलांना, आंबे आणि मदिरा पाठवितात.

(७) काही सनदी तंटे सोडविण्याविषयी मुघल आणि मराठे यांच्याकडून पोर्तुगीजांना विनंतीपत्रे.

(८) गोव्याची नाकेबंदी–कर्नाटकाहून येणाऱ्या तांदळावर बंदी – मस्कतच्या अरबांचे पश्चिम किनाऱ्यावरील व्यापार.

(९) सैन्यासाठी मुघल गोव्यामार्फत अन्नधान्य खरेदी करतात.

(१०) गोव्याच्या विरजईला मुघलांच्या लष्करी हालचालींची माहिती देणारी बातमीपत्रे.

१९८५ च्या लिस्बनच्या दुसऱ्या भेटीत राष्ट्रीय ग्रंथागारात फक्त ९ मराठी कागद मिळाले. ते सर्व बाळाजी बाजीराव यांच्या कारकीर्दीतील असून त्यावर ‘श्री राजा शाहु नरपति हर्षनिधान। बाळाजी बाजीराव पंतप्रधान ॥’ असा शिक्का आहे, व शेवटी ‘लेखनसीमा’ हा शिक्का आहे. या पत्रांत विशेष महत्त्वाचे असे काही नाही; फक्त पोर्तुगीजांशी मैत्रीचे संबंध ठेवण्याचा प्रयत्न मराठ्यांकडून कसा केला जात असे यासंबंधीची माहिती आली आहे. ही सारी पत्रे येथे उद्धृत केली आहेत.

या ऐतिहासिक कागदपत्रांखेरीज लिस्बनच्या राष्ट्रीय ग्रंथालयातील दोन हस्तलिखितांचा येथे अल्पसा परिचय करून देणे उचित ठरावे. तेथील एका देवनागरी हस्तलिखितात (नं. Cod.7980) अनेक फुटकळ ग्रंथ किंवा प्रकरणे उतरविलेली आहेत. हे हस्तलिखित हरीभट नावाच्या कोणी ब्राह्मणाने गोमांतकातील विष्णुदास नावाच्या गृहस्थाच्या वाचनासाठी संवत् १६८०–८१ म्हणजे सन १७५८–५९ च्या सुमारास तयार केले आहे. यात एकूण १४० पृष्ठे (Folio) असून ९ प्रकरणे आली आहेत. पहिले प्रकरण संगीतासंबंधी असून पहिल्या पानावर तीन रकान्यांत निरनिराळे राग

दिले आहेत. 'समस्त रागनां नामा' या मथळ्याखाली तीन रकाने असे आहेत : प्रभातवलो की जि ॥ त्रयोरे की जे ॥ त्री जे प्र. की जि । उदाहरणार्थ तिसऱ्या रकान्यात : श्रीराग, मल्हार, कल्याण, केदार, कनड्ड, कालेरू, भैरव, मेघराग, विराडी, देवसारी इत्यादी. पहिल्यांत १०, दुसऱ्यात १२ आणि तिसऱ्यात १३ अशी ३५ रागांची नावे आहेत.

दुसरे प्रकरण हे गीतगोविंदाचे (अष्टपदी) गुजरातीत (५० पृष्ठे) केलेले भाषांतर आहे. उदाहरणार्थ :

जलितल बंग लता परीशीलन
कोमल मलय समीरे
मधुकर निकर करंबित कोकिल
कुजीत कुंज कुटीरे ॥

हे गीतगोविंदातील पद येथे आहे. शेवटी 'संसारना तापनू फेडनार छे ॥ पद । अष्टपदी । २४ ॥ संपूर्ण श्री' असा उल्लेख आहे.

तिसरे प्रकरण म्हणजे रत्नकला चरित्र. पृष्ठे १३.

चौथे प्रकरण प्रश्नोत्तरांचे असून त्याची फक्त दोन पृष्ठे (६८–७०) आहेत. राजा प्रश्न विचारतो आणि पोपट उत्तर देतो.

सुंदर स्त्रीमुळे घडलेल्या अनर्थासंबंधीचे उत्तर पाहा :–

स्त्रियार्प्येच हतो वाली । रामेण रावणो हतः ।
परग्रहे न गंतव्यं परदारा परीत्यजेत ॥ ४ ॥

पाचवे प्रकरण, 'जन्मवेळी'; सहावे प्रकरण हे प्रश्नोत्तरांचेच आहे; सातव्या प्रकरणाचे नाव 'ब्रह्मणोक्तंदेवीकवचं' असे आहे. आठव्या प्रकरणात 'ध्रुवचरित्र' आणि नवव्या प्रकरणात 'बिल्हण पंचाशिका' आहे. ऐतिहासिक दृष्ट्या हे हस्तलिखित महत्त्वाचे नसले तरी सामाजिक जीवनाच्या अभ्यासकास हे उपयुक्त ठरेल म्हणून याचा येथे ओझरता परिचय करून दिला आहे. देवनागरीत जरी लिहिले असले तरी हे अत्यंत दुर्बोध असे हस्तलिखित आहे.

राष्ट्रीय ग्रंथालयातील दुसरे हस्तलिखित म्हणजे प्रसिद्ध फार्सी ग्रंथ 'तुतीनामा' याचे मोडी लिपीतील हिंदी भाषांतर. [Cod 7921] सुरुवातीस 'ये केताब तुतीनामेकी फारशीयेसे हिंदी में लिखी आहे. हे पुस्तक तुतीनामाचे आहे' असे नमूद केले आहे. २२१ पानांच्या या हस्तलिखितात एकूण २३ 'हेकायत' आहेत, पण हे भाषांतर केव्हा आणि कोणी केले याचा उल्लेख कोठे आढळत नाही. पहिल्या हस्तलिखिताप्रमाणे हे देखील दुर्बोध आहे.

लिस्बनच्या राष्ट्रीय ग्रंथालयात मुद्रित कॅटलॉगांचा संच असून पोर्तुगालमध्ये इतरत्र

मिळणाऱ्या हस्तलिखितांच्या त्यात नोंदी आहेत. लिस्बननंतरचा दुसरा मोठा हस्तलिखितांचा संग्रह कोइंब्रा येथे आहे. तेथील ३१६० हस्तलिखितांचे एकूण २० कॅटलॉग आहेत, पण त्यांतून मराठी ऐतिहासिक कागदपत्रांचा उल्लेख आढळत नाही.

गोव्याचे एक स्वातंत्र्य सैनिक श्री. लक्ष्मीकांत व्यंकटेश प्रभु भेंब्रे यांनी ' पुर्तगाली राजवटीपूर्वीचे गोव्यातील धार्मिक वाङ्मय ' (गोमंतक मराठी भाषा परिषद, पणजी, १९७९) लिस्बनमध्ये अज्ञातवासात असताना तेथे आढळलेल्या रोमनलिपीतील मराठी धार्मिक वाङ्मयाचा सोदाहरण परिचय आपल्या ग्रंथात करून दिला आहे. वर उल्लेखिलेल्या ' विष्णुदासस्य पठनार्थ लिषित ' या हस्तलिखिताचा उल्लेख त्यांच्या ग्रंथाच्या प्रस्तावनेत आला आहे. (पृ. ४)

प्रस्तुत प्रकरणात प्रसिद्ध होत असलेली अस्सल कागदपत्रे संशोधकास उपयुक्त ठरतील अशी आशा आहे.

भाग १

[अज्युदा ग्रंथालय लिस्बन (Biblioteca da Ajuda, Lisboa) येथील क्रमांक Vol. No. 51 / V / 49-1-182 P 152 (81) – 215 – या संग्रहातील २२ मराठी कागद या भागात आहेत. प्रत्येक पत्रावर तारीख नाही. केवळ दोन पत्रांचीं तारीख मिळते ती पत्राच्या शेवटी दिली आहे. पत्रांतील आशयावरून ही सर्व पत्रे १७०० ते १७०१ अथवा १७०२ या कालखंडातील असावीत. पत्रे कालानुक्रमे लावली नसून अज्युदा ग्रंथालयात ज्या क्रमाने होती तोच क्रम येथे पाळला आहे. या दोन्ही भागांतील पत्रांत फार्सी शब्द बरेच आहेत. दोन्ही भागांच्या शेवटी शब्दकोश दिला आहे.]

१

अजम अक्रम विजरई जजीरे
गोवा दाम सादत हू

छं रफाअत दस्तगाह हिशमत व शौकत मा आलिजा महबत व मवदत दिशरकोने अतुवार— अजी परशरामपंडित प्रधान सलाम महबल मारुज आकी सलामती ईज्याइब नजर खैर जाणोन महबत शाआरा सलामती खुद जात सी उतसिफात कलमी मरकूम फर्मावणे दिगरं बुलंद नामोश भीस्त फेरोजी माहाराज — साहेबापासून महबत शाआराकडून महबत व येकलासचा राबिता चालत आला आहे व तरफैन येकजहतीचे सबबेने हमाबाब तफावत पडत नाही यावरून माहाराज राजश्री— छत्रपतिसाहेब बहुत काही राजी आहेती इनशालाताला सलामत राखो दरी अयाम ईज्यानेबांस अखबारात मालूम जाहाले की— तरफेहून अरमार येऊन बंदर किनारा लुटून जाळून बांद धरिले कितेक रयेत मारिले यैसा फसाद केली व हाली बंदर राजापूरचे नस्ताचे बर मुकाबली यासी राहोन अजार देतात यावरून अजेब वाटले दुरंदेसी न करितां कोता अंदेश करून विलायेतीस अजार दिल्हा फसादी केली हालीही करीतात हे मोहिबास वाजब जाले असेल नसेल मालूम नाही अमा— माहाराजाचा येकबाल जियादा होणे की याहून बेहतर जोरावार फसाद करणार दुतमर्द होते त्यास बवाजिबि गोशमाल देऊनू हालखूद ठेवीले हालीही वजारत माआब उमराव व शाहजादे बलकी शाहानशा दिलीचा पादशा औरंगशा खासा चालोन येऊनू जंग जलद करितो त्याचा गुमान न धरिता सजा पोहचविता पेशमानी पावला खटा जाला हे आलम मशूर जाहीराना जालाच आहे ऐसे असता अवलपासून आजीलग येखलासीचा राबिता चालीला असे त्यास तफावत पाडावी यांत काये फाईदा कितेक पालेगार देसमुख मवास व राजे लोक वजारतमाब माहाराज छत्रपतिसाहेबाचे मलाजमतेस रुजूआत धरून मजरा करून घेतात असे असता दाटून कुसूर वाढवावा हे सजावार नाही अरमार घेऊन येऊनू फसाद करितात ते समजतील जे दिलीच्या पादशाचे दराज जोर राजकारण येऊनू लागले असता फुरसत कोठे पडो पाहाते तरी यावरी नव जावे बेवफाई करितील त्यास सजा अहडावया येक पलीट लागणार नाही. माहाराजसाहेबाचा अम्र हुकूम जालियावरी मग लायेलाज होणार मुबादला मुलूक जाळून मारून तलफ करून वैरान होऊनू जाईल तेव्हा वख्त मुस्कील पडेल रदबदलही कोण्हाची चालणार नाही आजीवरी तरफैन चालीले कुसूर न जाला या पेशजी वोंम वोडराज विजरई होते त्याणी येखलासीचा राबिता रुजूआत राखोन राजी राखिले. हालीही मोहीब आकीलदाने आहेत जे गोष्टीने माबैन चालोन नामोशदराज होय ते करणे आशाहीमध्ये इतरफेचे कज्जेदार (कर्जदार) कोण्ही सरदारापासून फरक

पडली असे मालूम जाले असेली तरी बरी पसंदे करून ईज्यानेब्रास खत किताबत मरसूल करावी ते गोष्टीचा सरंजाम व बवाजिब्री ताकीद फर्मावया मुस्कील काय अमा आपलेच जागा लाहान माणसे गरजगोपणे लाफजानी करून समजावितील त्यावरून परभारेच फसादी करावी हे वाजीब नाही याउपरी मोहीबी अरमारास ताकीद फर्माऊनू माणसे धरिली कैद केली त्यास व वस्तभाव सोडून देवऊनू हालखूद आहेत ते करणे दराज लिहीणे येहतीयाजनिस्त अयाम बकाम मुस्तदाम बाद **हे किताबत.**

२

इलाही

हू

सियोर आजम विजुरई

दाम शफमत हू

छं अमारत पन्हाः— अजिदिल यखलास बिठ सेणवी सालसकर सुभेदार सलाम बादज सलाम येथील नेकी बनजर— जाणोन कारने की लेहावया कलमे इशारत फर्माविली पाहिजे महूवल मारुज मकसुंद आंकी आम्ही अमारत पन्हा :— सरदेसाई याचे भेटीस गेलो होतो माघे फौजा (?) येऊन मुलकास अजार दिला याबदल सुजाअत दस्तगाहः नाग दलवी भोसले जमावनसी पाठविले त्यावरी पंधरा रोजी आम्ही आलो येथील तजवीज पाहत लस्करामध्ये अमारत पन्हा :— बाबासाहेब अमाबिकरिता आम्ही वाडीस गेलो सर्व वर्तमान दखल करून अमारतब पन्हास घेऊन लस्करात आलो अमारत पन्हा— सरदेसाई यांही कितांबत लिहिली ती बजिनस पाठविली आहे हरयेक बाबे आपला भरोसा मानून पाठविले आहेत मोहिबास कलेल तैसी मदत केली पाहिजे दराज लिहीणे नलगे प्यार मोहबत असो दिली पाहिजे **हे किताबती.**

३

हू

सिनोर अजम अकरम विजुरई

जंजिरे गोवा दाम येकबाल हू

छं अजी खादिम विठल पुडिलीक सुबेदार नामजाद प्रा। दिचोली सलाम बादज सलाम खैर अंज्याम येथील नेकीब नजर जाणोनू आमोहिबी आपली खैरखुसी लिहावे या कलमे इशारत फर्माविले पाहिजे मोहवल मकसद अंकी मोहिबीं किताबत पाठविलीं तेथे लिहिले जे तरी पिलगाऊ व नारवे येथे रजपूत ठेविले आहेत ते हरयेक जिनसास जकात मागतात गवत लाकूडास कटकट करितात त्यास हुकूम करून मना करावे हे

बाबे मोहिबी लिहिले त्यावरून तेथील कितेक फाईदा होणार होता त्यास मना करून तरी मजकुरी रजपूत होते त्यास हुकूम केला ते कोणाचे वाटेस जाणार नाहीत मोहिबास मालूम जाले पाहिजे दिगर मागां मोहीबास कागद लिहिला होता जे रुपये गाटक्या बांधून लखोटे करून कडवाड प्रांते व कर्नाटक प्रांते कितेक खरेदी बदल दरबंदगी -- सरदेसाई साहेबी पाठवात्रेया हुकूम केला आहे येथून मिलले मिलले जमा करून रवाना करणार त्यास पासास हुकूम पाठविला पाहिजे म्हणऊनू लिहिले होते त्यास येक वेल जाऊ देणे. म्हणऊनू जबाब लिहिला तर पैके मुलकामधून काही येकच वेल येत नाहीत जमा जाले जाले येणार ते पाठवावे लागणार त्याबाबे मागुती आमोहिबास किताबत पाठविली त्यावर जाब लिहून पाठविला जे पासावरी गटक्या सोडूनू खरेखुरे करून जाऊ देणे म्हणऊनू तर आम्ही काही पैके मोहिबाचे मुलकात उदेमास पाठवीत नाही अथवा देणे आहे त्यास देत नाही जे गाटकया फोडूनू खरे लटिके पाहावे पैके करनाटक व कडवाडाकडे जाणार यास फोंडे विलायेतीचे मार्गाने पाठवावे तर त्या आमामधे बरे नाही ते वाटेने जाता न ये याबदल मोहिबाच्या मुलकामधून वाटेने जाणार त्यास खरे लटिके गाटक्या फोडून पाहावे म्हणऊनू लिहिले यावरून येक वजा दिसोनू आले आमोहिबांच्या मुलकामधून वित हे मुलकातून जात आहे व येत आहे. त्यास हे तरफेन काही अंतर नाही आणि ऐसी गोस्टी लिहिली तर याउपर मोहिबाच्या मुलकामधून आमच्या गाटक्या पैकेचे घेऊनू खरेदीस करनाटक कडवाड प्रांते जावेयास निरोप दिला पाहिजे जीयादा लिहिणे नलगे. मोहीब बडे आहेत. हे **किताबती**.

लेखन सीमा

श्रीमा न्विठल पुं डलीक स्य भा नि मुद्रा यश श्विनि

हे किताबती

४

हू

अमारत व अयालतपन्हा
अजम अकरम सियोर विजुरई
जंजिरे गोवा दामदौलत हू

छे अजिदिल येकलास विठल पुंडलीक सुभेदार प्रांत डिचोली सलाम बादज सलाम येथील नेकी बनजर जाणोनू कारने की लेहावया कलम इशारत फर्माविले पाहिजे

महुवल मुराद अंकी छ८ जिलकादी मिर बुजरुख याणे कपितपास दिवाडी यासी सुळूक करून त्याचे बलांव अगोदर येक दिवस नेऊन ते रात्रीस आणिक होडिया थोरले जुवेचे टोक त्या मार्गाने फिर्गाण तडीने लोक होडीवर व्हालावावरी कपिताच्या घालोन तोटां नजीक फिर्गाण तडीने येऊन रात्रीच्या राहिल्या आणि सकाल गोवे प्रांतीचे माणूस अलतडीस आले होते ते फिरोन जाता नदीमधून बलाव येऊन जे सावकार गोवीस जात होत त्या त्यासी दस्त करून होडी घेऊन गेले ते खबर ई मोहिबासी दखल जाहाले उपरी त्याचे माघे लोक होडेवरी चडऊन पाठ घेतली दोनच्यार होडिया खाली नेत होते ते सोडविल्या ते पलोन फोंडे तडीस उतरोन गेले. यैसे यासी मोहिबाचे हरकीन जुवेचे टोकावरी आहे त्याणीही वरगुजार केले व कपीत दिवडी याणे आपले बलाव देऊन फीर्गाण तडीने आणून यैसी गोस्ट केली तरी त्या कपिताने यैसी गोष्ट करणे हे बाजिब न्हवे त्याची सजा आम्ही द्यावी तरी मोहिबाचा व सरदेसाई साहेबाची दोस्तगी चालती तेथे आमचे तर्फेने आंतर पडो नये या करितां मोहिबासी लिहिले आहे बारकीने खबर घेऊन नतिजा द्यावया मोहिबाकडे आहेत व नदीमधून मोहिबाची हद तोडून मीर बुजरुखाने यैसी गोस्ट करून गोवेकरी लोक धरून नेले आहेत त्याविसी मोहिबासी दराज काये लिहावे. मोहीब बडे आमील आहेत. प्यार मोहबत असो देणे **हे किताबत**

लेखन सीमा

श्रीमा
न्विठल पुं
डलीक स्य भा
ति मुद्रा यश
श्विनि

५

विजुर आजम अकरम अंतोन लुईस
गोसाल काम्र येकोतीन विजुरे जंजिरे
गोवा दाम शफाकात हू

छं रफाअत व मा आलीपनाहः उम्रबत व शौकत दस्तगाः मोहिबा व मखलीसां उमेदगाः — अजी मोहिबदिल येखलास चेनबसवलिंगया सेनाधीपती मामले सांदा सलाम बादज सलाम येथील खुसी जाणऊन आमोहिबांपना आपुले खुसी व शादमानी कलमी इरकाम केले पाहिजे दरिविला चाबेफल व चेडगाऊस देसाई चंद्रवाडी याणी

दिवाणीचे मोबलग पैके देणेचे न देता उठोन गेले. यासी कुकळीकपीत याणी त्यासी आसिरा देऊन ठेऊन घेऊन ह्या बाबे उपराळा त्यासी केले त्यानी जमाऊनेसी येऊन बाळळीचे मुलूक मारून— ? कितीयेक साहुकाराचे मालमत्ता बिसात घेऊन फरगणात नेले व ती (मा) जी सेणवी नाडकर्णी वगैरे सात आठ जणांसी धरून नेऊन तासील लाविले असे आजीतागायेत यैसे चोरटे यासी आसिरा देऊन सरहदेचे लोक गनिमाई करणेचे रवेश चालीले नाही सरहदेमधे या वजने खिलाफ सुरु जाहालेवरी येखलासीमधे येक वजा दिसते कुकालीचे कपित यानी ऐसा अमल करणेचे आंमोहीबपनासी जाहीर आहे की आपखुदीने करितो की हे मालूम होत नाही पेसजी येक दोनी मजकुरांसी मोहिबापनासी लिहिले वरी तेच वख्ती येथून सरंजाम करून पाठविलेचे ते मोहिबपनासी जाहीर असेल हाली आंमोहिबपना कपित मजकुरासी ताकीद करून हरामखोरासी कैद करवाऊन जो काय बिसात व रयतेसी नेलेचे सोडून पाठवीत सारिखे करावे सहल लोकाकरिता तरफैन येगानगतमधे फर्क होऊ नये हे वरी मोहिबापना जैसे येखलासी राखून चालवाल तैसेच येथूनही चालतील हरगाः कर मोहीम असेल ते लिहावे या रजा देऊ (न) प्यार अर्जानी राखिले पाहिजे **हे किताबत.**

मोर्तब

६

अजम अकरम अंतोन लुईस गोसाल
मानमर कोडतीन विजुरै जंजिरे गोवा
दाम येकबाल हू

छ अमारत व अयालतपनाः शौकत व बिसमत दस्तगाः सआदत व माआलिज्या — अजी खेम सांवत भोसले सरदेसाई पाा कुडाल व माहालानहाये बादज तबलीग बआवा तवाफियात मारुज मेबारदर्क चंद रोज गुदरले अमा याहावरी खातीरदार नाही इलबालगाः बगाः याद शाद करून बनामे गिरामी असवार करून मसरून शादमान फर्माविले मकसूद ऊंकी बरिअयाम खुजस्ते फर्जाम खुशहलीचे खबर आईकिले जे पुरातनकाली गलिया व बसिहत व सलाम आले हे आईकोन बहुत शादमानी व खुरमी व खुशदिली हासील जाहले जे इज्यानेब अजकदीमल अयाम दोस्ती व येक दिली व येगानगी आंज्यानेब तरफेने घरीत आहो इस्तादाच्या कलमावरी दिल ज्यां सुबक ता आला नजीक खैर व सलावती मागत आहो तरी आता आंज्यानबानी आपले तरफेचे खुश-खबर कलमे मरकूम फर्माविले पाहिजे त्यावरून शादमानी व शादकामी हसील होऊनू

बहरवर होऊन अयाम बकलम मुस्तबकबाद रा। छ५ रबिलाखर सन इलीदे व मया अलफ. **सन ११११.**

७

हू

दरबंदगी सियोर अजम सियोर
विजुरवई जंजिरे गोवा दाम दौलत हू

छ अजिदिल येखलास विठक पुंडिलीक सुबेदार नामजाद प्रांत डिचोली सलाम बादज सलाम येथील खुसी बनजर जाणोनू खुद खुसी ल्याहावया कलमे इशारत फर्माविली पाहिजे दिगर रामजी राऊ देसाई तपे डिचोली याचे लोक दिवाडीत असतात काली सेनवारी प्रहरा दिवसात दिवाडीच्या पासावरून उतरोनू येऊनू मौजे नारवे येथील कुणबी गरीब चौगजण हाणून जखमा केल्या त्यातील येक जण जिवे मारिला तेथून पिलगावी येऊनू पिलगावचे कुणबी येका घरामधील चौगजण हाणून जखमा केल्या येक त्यातील मेला दोन-तीनसे अश्रफीचे बित नागऊनू घेऊनू मागती दिवाडीस पासावरून उतरोनू गेले त्याउपरी हलदोणेहून तपे बारदेस तेथून पाच जण होडी घेऊनू येऊनू मौजे सिरगाऊ येथील कुणबी गरीब याची घरे ६ सा जालीली व येक बाईको बातली च्यार बैल जोताचे जलोनू मेले याचे पारपत्य करावया साहेब बडे आकील आब येथे या मुलकात जाळून कुणबीयास हाणून मारून साहेबाच्या मुलकात जाऊन राहातात हे साहेबास मालूम असावे जाब काय ती ल्याहावया रजा फर्माविली पाहिजे व आपाजी सेणवी रामाजी रायाचा कारभारी कुबारजुवेस माणसे ठेऊनू सर्व राजकारण हे तो करीत आहे हमेशा कुबारजुवेवरी आपण बैसोनू पालत करून सारे राजकारण तो कारतो पारपत्य करावया साहेब धणी आहा रोशन होये **हे किताबती**

मोर्तब खुद

८

हू

अमारत व अयालतपन्हा येकबाल
व इजलाल हमराह असजूल बहर
विजरई अजम अकरम विजरई
जंजिरे गोवा दाम येकबालहू व
दौलतहू

छ अजि आन सेणवी सरपारपत्यगार मा। हाय प्रांत जाबोली मामले सौदे सलाम बादज सलाम महबत अंज्याम येथील नेकी बनजर इलाही जाणोन आं दौलतखांही खैर

खुसी सलामती लिहावया दुकलमा इशारत मरकुम करणे माहुवल मारूज उकी ईज्यानेब तरफेचे मुलुकामधील ता। चंद्रवाडी येथील देसाई चांदेपल व चेडगाव सवदाने देसक येथून पळून जाऊन फिरगण मुलुकामधे सरहदेस सोलदौड व पाजरखणी व कुकली येथे जाऊन राहिले आहेत त्याचे समजाविसीबदल रंगाजी सेणवी पारपत्यगार व तिमाजी सेणवी नाडकर्णी ता। चंद्रवाडी मुदा सांगोन पाठविले प्रा। कौल देऊन पाठविले होते त्यास तिमाजी सेणवी नाडकर्णी यास धरून मारामार करीत आहेत आणि पावणासे से हे तडगे आरमाराचे करून सरहदेवर फिरतात आमचे स्वारी गेलेवर आरमे घेऊन पलोन फिरंगाण मुलुकामधे जातात रात्रीचे येऊन सरहदेवरील रयेताचे नारल तोडून नेतात येक दोन घरास आग लाऊन जालीली तैसेच ता। बालली मधील हेब्रारवामधे चामाराची घरा दोन तीन जालीली यैशास सरहदेचा मुलूक दिवाणापासून जुळूम जाजती जाहालेया मुदा सांगोन पाठवावा सरंजाम करून घ्यावी आपले जागेस पावे अगर सरंजाम होये तोवर उगे असावे ते न्हवोन यैसे बदफयाल करितात हे हवाल इनेकोखाबास जाहीर जाहाले नसेल दरम्याने कुकलीचे कपितास लाच रुसवत देऊन यैसे बदफयाल करितात साहेबाचे मुलुकास अजीतलग यैसे होऊन आले नाही सहल लोकापासून बदफयाल अमल होते सरहदीचा काईदा तुटतो येबाबे ईनेको काही खबर घेऊन तंबी पोहचावणार आरीफ आहेत ईनेकोखामधे व राजे साहेबामधे येखलासी चालते त्यास दरम्याने फरक होये यैसे केले न पाहिजे हे हवाल नेकोखाबास दखल व्हावे याबदल लिहिले असे याची खबर घेऊन तंबी पोहचावणार सजा देणार नेकोखाब आदमी कामकाजाबदल येतात त्यास कुकलीचे कपित अटक करीत आहे सालाबाद साष्टी प्रांतीचे व कुकलीचे आदमी आया तरफेस सोदे सुत बसल येत जात आहेत ईजानेबाचे मुलुकामधील ते प्रांती जातत याची खबर घेऊन नतिजा देणार नेकोरवाब बडे आहेत **हे किताबत.**

९

हुवल

आतोन लुईस गोसाल कनमर कोडतीन विजुरै सिनोर जंजिरे गोवा बर मसनद मुतमकी बाशंद

छं अमारत व अयालतपना : हुकूमत व शौकत दस्तगाह साआदत व मा आलि ज्या — अंजी खेम सावत भोसले सरदेसाई पा। कुडाळ व माहाल निहाय बाआदज तबलिग दाआवत बरराई अनवरबाजेह मेगर दानदके दरिविला नामे नामी फ्रासेजा बराबर पाठवले ते खुशवख्त अवडोन शादमानी हासील जाहाले तेथे मरकुम होते जे मोगलाचे पातशाः कारणे आदे कावडी १० पाठविल्या आहेत व शराब २ पेटिया येका

फिरंगिया कारणे ऐसे हरदू जिनस सिरबारि यास हरयेक अटक न्हवता जात ऐसे केले पाहिजे म्हणौनू तरी बमोजिब मरकूम किलक इज्यानेब तरफेने जोडेकरी बराबर देऊन पादशाही लस्करास रवाना केले आज्यांनेब तरफेचे कामासी दिलज्यांसू कोसीस करावया कोताही होणार नाही अयाम दौलत मुस्तदाम बाद रा। छ१४ जिलकाद सना ११११ सुहूर सन इहिदे व मया अलफ **किताबती.**

(२१ एप्रिल, १७००)

१०

छ मकसूद उंकी मा ॥ नागोजी नाईक सरदेसाई मामले फोंडा यासी पेसजी सियादत व रफाअतपना सैद गुलाम ईभ्राईम नाईब फौजदार तलकोकण याही हकाचा निवाडा करणे बदल कैदीमधे टेविला होता त्यास निवाडा ना होता सैद लडाईमधे काम आला आईकड सियादत व रफाअतपना मिर बुजरुख फौजदार आले याकडे ईज्यानेबाने कितेक वजा रदबदल करून नाईक मशारनिलेस सोडणेचा मजकूर केला त्यास हाजीर जमान कोणी राहात नाही त्यावरी नाईक मशारनिलेने ईजानेबाकडे कितेक आपली येकिनी व सौगंद दिली त्यावरी नाईक माारनिले मातबर आदमी जबस चुकणार नाहीत यैसे समजोन ईजानेबाने नेकीचे काम करून जामीन कसबा सरकारामधे देऊन नाईक माा निलेस सोडविला त्यांनी आपला लडका मुलकाची जमे साल गु॥ प्रमाणे भरोन द्यावी आण मुलकामधे आवडाऊ होऊ देऊ नये याबदल कोटामधे ठेविला आण करार केला जे आपण आठा रोजी पैसे घेऊन येतो आण सरकारच्या कामास तन देऊन रुजू राहातो त्यास केलोसी जाऊन राहिले ते फेर फोडस आले नाही हे हकीकत परज्यात साहेबास मालूम जाहालीच आसल हाली च्यारी देसाई याचा हकाचा निवाडा करणेबदल मिर साहेबी मा॥ गोरख सेणवी यासी किताबत लिहून पाठविले आण करार केला जे जेणे प्रमाणे साहेब निवाडा करून देतील तेणेप्रमाणे येथोन हक पोहचेल यैसे यासी हाली मालूम जाहाले जे नागोजी नाईक यांसी साहेब डिचोली तर्फेस जावेयासी रजा दिली यैसेयासी साहेब ते जागाचे खावंद ईजानेबाचा जामीनकतबा सरकारमधे आहे त्याबाबे नाईक मशार-निलेस फर्माऊन ईजानेबाचा कतबा पोहचोन बाजद तो हरकोठे गेलेया काही मुजारवा नाही आमी नेकीचे काम केले आहे इमान सौगध देऊन ईजानेबास दगा दिलेया त्याची बी पेस जाणार नाही नाईक मशारनिलेस ताकीद लाऊन आमचा मुचेलका आमास पोहचे यैसे करविले पाहिजे या बाबे ईजानेबाने साहेबानजीक यावे तर तैसेच लिहिले पाहिजे ईजानेब साहेबाचे मुलाजमेतेस येऊ फोडेच्या सरदेसाई दुलबा नाईक आहे नागोजी नाईकासारिखे पाच बेटे त्याचे आहेत टिका दुलबा नाईकाचे सिरी आहे नागोजी नाईक गेलेने काही होत नाही च्यारा देसाई याचा निकाल साहेबाकडे आला असता देसाई ना

रजाबंदीने जातील हे बात मुनासिब नाही साहेबाच्या सखुना खेरिज मिरसाहेब आगर देसाई नाहीत देसाई याचा हकाचा निवाडा करून ज्याचे त्यास रास्त हक पोहचोन हालखूद राहून पादशाही मुलुक अबरबा माहामूर जाहालेया दरनामोस पादशा लंग साहेबाचा आहे येथील मनसुबी साहेबाकडे पोहचोन त्याचा गौर ना जाहालेया येक वजा दिसून येते साहेब ते जागाचे खावंद आहा साहेबाच्या सखुनासिवाई कोणी नाहीत ज्यादा काय लिहिणं याचा जबाब देणेस हुकूम केला पाहिजे **हे किताबती.**

११

विजरई अजम अकरम विजरई जंजिरे गोवा दाम दौलत हू व येकबाल हू

छं रफाअत सुज्याअत दस्तगाए येकबाल व इजलाल असदुल बहर — अजी आन सेणवी सरपारपत्यगार माहाल हाय प्रा। अष्टग्रहर सलाम माहाबत अज्याम येथील नेकी बनजर इलाही जाणोन आनेकोखाही खैर खुसी सही सलामती लिहावया रजा फर्माविली पाहिजे माहुवल मारुज उकी ई सुज्याअत दस्तगाहास पहिले ये प्रांतीचे वर्तमान लिहून पाठविले होते त्यावरून कुकलीचे कपीतास पोडतेर पाठविली ते कपीत अजमास वली पाठविले त्यास हुकूमप्रमाणे तरतूद करून बाडगे राहिले आहेत त्यास तंबी पोहोचविली नाही मागती छ मजकुरी गोविंद नायक सरदेसाई याचे आदमी रघुनाथ व सोनबा कोमबे बेगभाई व मर्तेपल व चादेपल व चेडगावस व बाजे देसाई चंद्रवाडी सें सवासे बाडगे बराबर घेऊन येऊन हेबारवाडचे पेठ नागविली हरसेटी दुकानदार याचे फर्जंद जिवे मारिले व येक दोन घरे जालीली व कुली दुकाने सावकार नागऊन तीनच्यार हजारा होनाचे वित नागऊन नेले सुकड नायेक व पुंडलीक सेणवी व वेकटे प्रभु या-खेरीज तीन जण दुकानदार यैसे साहाजण धरून सोल बोडस पाजरखणीस नेले आहेत त्यांचे लाग पाहाता कुकलीस लागतो तंबाकू व फोवे चिरमुरे हे बारवाडीस नागविले ते कुकलीचे सरहद पावेतो व पडत गेले आहेत हे हवाल कुकलीचे कपितास लिहिलेवर त्याचे तरतूद केली नाही तर हे हवाल नेकोखाही खातीरेस आणून फिरबी लोकास तंबी पोहचा।वनेर मोहबी बडे आहेत सरहदेचा मामला आजीतलग हर कोणाचे मुदती-मधे यैसे जाहाले नाही व हद तुटली नाही खबर घेऊन तंबी पोहोचवणार आसुज्याअत दस्तगा बडे आहेत हे हवाल कुली लिहिले ते झूट यैसे कोणी बदनिशा करितील तर येक आदमी कुकलीस पाठवून खबर घेऊन नजरेने पाहिलेवर मालूम होईल दराज लिहणे आहे दियाज (?) नाही **हे किताबत.**

१२

हू

अमारत व अयालत पना : सियोर अलम
अकरम विजुरई जंजिरे गोवा दाईम दौलत हू

छ्रं आजीदिल येकलास विठल पुंडलीक सुमेदार प्रा डिचोली सलाम बादज सलाम येथील नेकी बनजर— जाणऊन आपली कार नेकी लिहावेया कलमे इशारत फर्माविलो पाहिजे मोहवल मकसूद आंकी मस्कताकडील आरबांचा समाचार काय तो मनास आणून लिहून पाठवणे म्हणोन तरी मालीक तारवाचा याणे समाचार सांगितले जे आरबाचे आरमार मुस्तैद होऊन बसनूरचा बार धरून तांदूळ गोवेस येऊ देऊ नये यैसे मस्कतच्या खावदाने ताकीद करून आरमार रवाना केले होते ते येता वाटेस तारु येक सौदागरी बारेचा गैरहंगाम होऊन येत होते त्यास धरून नेऊन वाटेहून फिरोन गेले तेवरी त्या आरमारच्या कपितावर रागावर होऊन कुली आरमारचे लस्केरी व कपितास आदबखानी ठेविले ते त्याणी रदबदल करून मागुती हाली आरमार मुस्तैद करून हे प्रांती येणार आहेती व करनाटकी तारवा मस्कतास गेली होती ती अटक करून ठेविली आहेत जे फिरंगी यांस तांदुल देऊ नयेत यैसी तजवीज करून टेविली आहेत म्हणोन समाचार सांगत होता मालूम जाहाले पाहिजे हर येक कार्ये प्रयोजन तो लिहून पाठवाल त्यास हाजीर आहो हे प्रांती आहू ते आपले यैसे जाणोन हुकूम केला पाहिजे खेरीज बडे लोकाप्रती लिहावे लागत नाही प्यार आर्जानी आसो दिला पाहिजे **हे किताबती.**

लेखन सीमा

श्री मा
न्विठल पुं
डलीकस्य भा
ति मुद्रा यश
श्विनि

१३

हू

अमारत पन्हा सियोर विज्रुरई जंजिरे
गोवा दाम मोहबत हू

छ्रं आजिदिल येकलास तान सावत भोसले सलाम बाजत सलाम महवल मकसूद अंकी येथील नेकी जाणऊन व मोहिबी कारने की ल्याहावया रजा फर्माविले पाहिजे

दिगर चंद रोज गुदरले मोहिबी आठवण करून किताबत नामा पाठविला नाही याउपर हरघडी आपणाकडील खुसी खबर लिहून दिला आराम केला पाहिजे दिगर मोहिबाची मुलाखत इदीमध्ये जाहाली ते समई बहुत प्यार आमा ठाई धरून श्नेह केला ते विसर अहिर्नेसी पडत नाही तैसेच ह्याही परीस स्नेह विशेष धरून किताबत पाठवून सेवा निरोप लिहिली पाहिजे आम्ही आपले आहो दराज लिहिणे नलगे प्यार मोहबत आर्जानी असो दिली पाहिजे. **हे किताबत. रा छ ७ जिल्हेज** **श्री / राजते**

श्रीशिव **राजेन्द्र प्रताप** **वंत तस्य सेव** **क तान सा** **वत**

१४

विरजई अजम अकरम अतोन कुवीस
गोसाल कामर कोडतीन विजरई जंजिरे
गोवा दाम दौलत हू

छं अयालत व अमारत पना वौकतवा इसमत दस्तगाहां — आनी खेम सावत भोसले सरदेसाई प्रा कुडाळ व माहालानीहाये सलाम बादज सलाम येथील खुशी जाणऊन मोहीबी आपुली खुषी खबर लेहावेया कलमे इशारत फर्माविली पाहिजे मकसूद उंकी ममरुल पुंडलीक सेणवी या बराबरी किताबती पाठविली खुषवख्ती पाहोन बहुत खुशा- हाली वाटली त्यामधे मजमून लिहिला जे भतृगाम विलायेत जालीली या करिता आपणासी वाईट वाटले तरी पैली अलग मेटा ठेवून मजबूती करावी ती तुमचे सुभेदाराने केली नाही म्हणऊन लिहिले तरी हाली चिरंजीव बाबासी जमावानसी पाठविले आहे ती तरी ईज्यानेबानी आपले तरफेने जी कुमक करावी ती केली पाहिजे सर्व विसी अमारत पनाचा भरवसा धरिला आहे तरी सर्वाविसी साहेता केली पाहिजे प्यार असो दिली पाहिजे. **हे किताबती**

फार्सी मोहर

१५

ह्

अमारत व अयालत पना सियोर
अजम अकरम विजुरई जंजिरे गोवा
दाम दौलत ह्

र्छ अजिदिल येकलास विठल पुंडलीक सुभेदार प्रांत डिचोली सलाम बादज सलाम येथील नेकी बनजर—जाणऊन आपली कार नेकी ल्याहावया कलमे इशारत फर्माविली पाहिजे मोहवल मकसूद अंकी येथे जमाव लोक आहेत त्यासी अडिसेरी बदल तांदूल पाहिजेत याकरिता गोवेस माणूस पाठविले आहेत ऐसीयासी साहेबी मेहरबानी करून तांदूल २० वीस खंडी आणायासी रजा देविली पाहिजे येथे लोक आहेत ते साहेबाचेच चाकर आहेत त्यास पाऊसकाली खावयास पाहिजेत मेहरबानी करून निरोप देविला पाहिजे येथील सारिखे कार्य काम असेल ते फर्माबित आसले पाहिजे हरघडी कार नेकी लिहून प्यार मोहबत अर्जानी राखिली पाहिजे **हे किताबत.**

१६

दर बंदगी सिनोर विजेरे साहेब सलामत

र्छ अजी खिजमतगार पुंडलीक सेणवी ज्यानेब खेम सावत भोसले सरदेसाई प्रा कुडाळ व माहालानिहाये सलाम बाजत सलाम येथील खुसी जाणऊन साहेबी खुसी खबर लिहावया रजा फर्मावणे महवल मुराद मुकी लस्कर तर्फेचे वर्तमान तर पनाले गडास वेढा देऊन पादशाही मोहिमेने सिकजा केला आहे थोडेच रोजी किला घेतील येसे खबर लस्कराहून आली आहे त्यावरून येथून सरदेसाई याणी आग्ले वकील भास्करराऊ याकडेस माणूस पाठऊन हमेशा खबर समाचार आणवीत आहेत ज्यादा खबर येताच खिजमतगार साहेबाचे मुलाखतीस येऊ दिगर खिजमतगाराचे घरी मुलाची मेजवानी आहे याबद्दल कर्नाटका होऊन तांदूळ खंडी १० येकून मूड १०० सेंभर व काही किरकोली जिनस मेजवानी बदल आणविला होता तो आरमाराबराबर गोवेसी आला तो येथे आणावयाबदल माणूस पाठविला आहे तर साहेबी मेहरबानी करून आवगातचे कपितास वोडद देऊसीस फर्माऊन तांदूळ येथे पावे सारिखे करावया साहेब मेहेरबान आहेत.

१७

आजम अकरम आतोन लुईश गोसाल
कामर कोडतीन विजरई जंजिरे गोवा
दाम दौलत हू

छ अमारत व अयालतपना हुकुमत व पैकवत दस्तगाहा सादत मालीज्या — आजी खेम सावत भोसले सरदेसाई प्रा कुडाळ व महालनिहाये सलाम वाजद सलाम येथील खुसी जाणऊन मोहीबी आपुली खुसी खबर लेहावेया कलमे इशारत केली पाहिजे मकसूद उकी डिचोली प्रांती आमचे लोक आहेती त्यासी द्यावेयासी तांदूल पाहेजेती याबद्दल सोहीर नाईक आमचे पैके देऊन तांदूलाचे खरेदी बदल पाठविला आहे हा तांदूल पंचवीस खंडी खरेदी करील त्यासी आल तडीस आणावेयासी आमारतपन्हाने निरोप देविला पाहिजे प्यार मोहबत असो दिली पाहिजे ज्यादा लिहीणे नलगे छ१२ सवाल सुहूर सन इहिदे मया आलफ.

फार्सी शिक्का

(१२ मार्च, १७०१)

१८

मोहबत व मुवदत अनुवार येखलास असार पाद्र पेसगाह अलमगीर दाम मोहबतहू दरिविला तुम्ही हुजरून कितेक मतलब मुदे माफिक सरबराई होऊनू आले म्हणऊनू मालूम जाहाले ते वरून खुशेवख्त जाहाली जे तुमा तरफेचे मुलुकस पादशाही मुलुक येक सरादी आहे. दुतर्फा येखलासी येगानगी चाललेने खूब आहे हरवख्त तुमा तरफेची कारने की लिहित आसणे तुम्ही हजुरून आले आहा कितेक या मुलुकाचे मकदमे शामत पन्हा विजरई नजीक आले आहेती तरी तुम्ही हरवख्त पाा मुलुकाची रदबदल करीत असावे आमी लिहिणे ते तुमा मारफत लिहिणे वाजिब आहे पेस्तर दुतर्फा येखलासी जियादा होऊनू खुलासा करवणे जाणीजे तुमा तरफेची येखलासी बहुत वजा तुजारत माहा हिरे प्रबू सावकार याही जाहीर केली तेवरून माळूम जाहाले ऐसियासी नागोजी ना सरदेसाई फोडायाचा मोकदमा गोवेसी पाठविली आहे या मोकदमेसी तुम्ही तन देऊनू पादशाही मुळूकाची फिसात दूर होये ते करावया तुमासी वाजीब आहे येबाबे दराज लिहणे नलगे. जाणिजे छ१६ रजेबू सन **जुळूसवाला**

१९

जाबिता आंकोल्यापासोन राजापूर पावेतव किले व गड आहेती त्याचा तपशील

ता।। आकोला

येक गड येक किला कोट
१ १

ता।। कडवाड किला १
मामले फोडे कोट
ता।। आतरुज १

तास तट व साकली
गड भिमगड कोट किलेलान
१ १

ता।। खारेपाटण कोट किले
१

ता।। सिवेस्वर किला
१

ता।। कद्रे किला किला सुपा
कोट
१

ता।। मणेरी गड पारगड
१

ता।। बादे गड मनोहर
१

ता।। परगणे कुडाल घाट
मस्तकी गड रांगणा १

ता।। मालवण सेंदूदुर्ग
कोट दरियाच्या
किनारयासी जंजिरा १

जुमले किले व कोटा १३

जाब्रिता सुभा ता।।
तल कोकण
सुभा आकोल्या
खाली परगणे
आकोला

कडवाड ता৷
ता৷ सिवेस्वर

सुभा मामल्या खाली
ता৷ आंतरुज ता৷ आस्टग्राव
ता৷ हेब्राडबारसे ता৷ खेडारब्ली
म्हालारू चंद्रवाड
काकोड

२०

ता भीमगड सुभा
तो भतग्राम   तो पेडिणे
तो मणेरी   बादेबंदर
    तो साकली

पेडिणे विलायेतीची गावाची
नावे

कसबा पेडणे	कोरगाव	पारसे
१	१	१
धारगली	मादरे	मोरज
१	१	
चोपडे	कौलगाव	तुबिये
१	१	१
मुजरी	कासारवरडे	हलवर्न
१	१	१
राऊलवर्डे	चदेलर	वारखंड
१	१	१
मोप	तारसे	उगे
१	१	१
तांबवे	परसकोडे	आंबेरे
१	१	१
पालये	केरीर	हरंबल
१	१	१
खाजनउणदे	वाडपारसे	वाडआलकणे
१	१	१
वाडमालपे	विरनोडे	
१	१	

परगणे कुडाला खाली
तमाम विलायेती कुडाल
सुभा राजापूराखाली
सालवी   संगमेस्वर

खारेपाटण   देवरुख
गाव नावे

कासारवडे	तुबिये	कौलगाव
१	१	१
खाजण उणदे		
१		

याखेरीज तैनाती देसगती व बैनामे

तैनाति होन मावजेमधे मादरेमधे
२०००
सालीना कितेबागा इता बागा
४ १० ४

पारसेमधे बागा वजरेमधे इतर
४

इता माडाची सुपारी म्हादला
३ ३ ० १

हरकेणे जकायेती
ता पेडणे पसारा वाई डोंगर होन
१ १ १०

या येकुण तिसा गावामधले च्यार
गाव मोकासा केसऊ देसाई ताा
पेडणे यासी आहे.

देसाई ताा तलकोकण
देसाई मामले फोडापासोन
कुडाल व आंकोले पावेतो

देसाई फोडा

दुलबा नाा लखनायेक

१ १
विणेजी नाा विठोजीराम नाा
१ १
आकोलेचे देसाई
राम घोड १
देसाई कडवाड
देसाई व सेणवी
प्रमाणे १
सिवेस्वरचे देसाई
१
देसाई भतग्राम
राऊ गणबाराऊ
वकार १
रामाजी राऊ
१
सोने प्रभू
१

देसाई पेडणे
येसोबा जसवंतराऊ बिदूनाा अदासाली
१ १ १
केसे प्रभू गोपाळ पड्यार बाबाजी राऊ
१ १
येसवदा – १
विठोजी – १
भास्कर प्रभू कृष्ण प्रभू
१
बाजे किरकोल देसाई ताा पेडणे
बदर बादे आबाजी
सावंत देसाई
परगणे कुडाल खेम
सावत देसाई व त्याचे
तालकातीचे नफर

वतनदार
खासा खेम राम दलवी
सावत १ १
तान सावत नाडकर्णी
१ गुण सेणवी
१

पुरनूर

२१

विजुरई अजम विजुरई राजे जंजिरे
गोवा दाम शराकत हू

छ रफाअत व आवालीवाल्हा सुज्याअत व तहवर दस्तगाहा दोस्तान इस्तिजाबारी जुब्रादे व उमदे राजे हाय आजिदिल येखलास मिर्जा महमद बकर फौजदार माहालानिहाय पाा मिर्जानि वर्जडा वगैरे सलाम दुवा आंकी येथील नेकी बनजर खैर जाणउन तुम्ही आपले नेकी सलामती लिहावे या मरकुम करणे दिगर बहुत दिन होऊ आले अमा आपले हवाल मालूम जाहाले नाही ईसवास्त दु कलमे तसदी दिले आहे येकीन आहे की आपले खैरीयेत व सलामती से इतला देवणे दिली आपले

सियोर अजम सियोर विजुरई दाम दौलत हू

२२

सियोर विजरई

येथील अहवाल साहेबाचे नेक नजर करून बैखेर सला येत असे हनासाहेब सलामत मागा कमिनाची बटकुरा राजले येक व केदूम येक त्याची मुले वर्फि म्हणोन न्हेऊन काजकोमीमधे ठेऊन मुलास किरिस्ताव केली ती मुले मेली एक उरले ते घेऊन आमास सोडण्ये म्हणितलेया सोडीत नाही जाहाला शेवट त्यास भऊत जीवास पीडा जाली देवोन आलद्यामधे आपला मकदूम होता त्याचे हवाली केली तेथोन मागती येऊन पाद्रीस सांगितले जे हे मूल उरले आहे हे मूल घेऊन सोडणे म्हणितले या मागते काजकोनीमध्ये आमास ठेऊन मारतात तर ज्यास सांगावे त्यास सांगोन आमास सोडून देणे म्हणोन त्या राजलो येक व केदूम येक यैसे दोगानी सांगोन पाठविले आहे म्हणोन पाद्री किरस्तवास लिहीले या जबाब देत नाही व घरी नाही म्हणोन ते दरवाजकर सांगत आहेत तर विकस्टी काजकोमीमधे होत आहेत तर साहेबास पुरतकाला होऊन देवान गोरगरीबाची मनसुभी रास्ती मनास आणून कोणाचे बल न चाले असे करावे यास इदीस सलामत आणिले आहे तर देवाकड पाऊन सदरहू दोगाई बटकुरास उजूर आणोन उजूर पुसोन ती जेणे प्रमाणे सांगतील ते आईकोन सरफराज करावेया साहेब धणी आहेत कमीनाचे हस्तादाचे खिजमतीस कोताई जरा केली नाही व सिरविसई साहेबास भऊतदा दाखविली आहे उमेदवार आहू जे मागती इस्तादाचे कोम वाडल तर बिन पागा वेगळे खिजमतगार कोठेई आसला तरे खिजमतगार म्हणोन घेतो हे आर्ज.

भाग २

[राष्ट्रीय ग्रंथालय, लिस्बन (Bibliotheca Nacional De Lisboa) येथील Inventario Dos Manuscriptos Seccão XIII Colleccão Pombalina, Lisboa, 189, Cod 684 Fl 191–212–एकूण ९ मराठी कागद (यांचे पोर्तुगीज भाषांतरही आहे) या भागात आहेत. ही सारी पत्रे बाळाजी बाजीरावच्या काळातील आणि १७६०–६१ मधील आहेत. विनतारखेचे पत्र शेवटी दिले आहे.]

१

२८ मे, १७६०

अजम दोम जवेल अमल दाभ्य आलबु केर कोंद येग वजेरे जंजिरे गोवा दाम मोहबत हू

श्री राजा शाहू नरपती हर्ष नि धान बाळाजी वा जीराव प्रधान

(बदामी उलटा शिक्का)

आजम दोम जवेल अमल दाभ्य अलबुकेर कोंद येंग विजेरे जंजिरे गोवा दाम मोहबत हू

बिसालत व अयालत मर्तबत हशमत व शौकत मंजिलत मकज दोस्ता– बादजे शौक मशहूद जमीर मुनीर गर्दानी दमे आये दमे दरीवीला हबसी याची मकाने जंजिरा व कांसा ईजानेब याजकडे फते व्हावे सबबे मसलहत जाली शाचे मदती बाार किले येणे मालूम अजी सबबे आरफत पन्हास सांगितले त्या बमोजीब अराफत पन्हा ही कबूल केले त्यास जलद आरमार येऊन दाखल व्हावे ते बात बनोन न आली चंद रोजाने रवाना जाले सबबे अंगरेजानी दरक माफ करून मसलत नव दीगर केली व अरफत

पन्हाची ही माहनत जाली याचा बदला पेस्तर तरतूद करून इनसीदाम करावे हे आरफत पन्हास लवाजीम तेणे करून आरफत पन्हाचा व इजानेबाचा नकशा राहिले सबब हे काम जरुर मद नजर असे, बाकी तमाम हकिकत ईजत असार विष्णु नाईक जबानी बयान करतील रा। छ१२ सवाल **जियादा काय लिहीणे. हे किताबती.**

२

३ जून, १७६०

॥ श्री ॥

राजमान्य राजश्री बालाजी गोपाल दी॥ राजश्री नारायेणराव वेंकटेस गो॥
सेवक बालाजी बाजीराव प्रधान,

नमस्कार सु॥ इहिदे सितैन मया अलफै गोवेकराकडील पाद्री लष्करातून गोव्यास जात होता त्यास तुम्ही चांदीवडे येथे लुटले घोडा येक व बैल येक व हजार रुपयाची बाडबीसाद येणे प्रो घेतले ते मागीतल्यास देत नाही घोडा मात्र देता म्हणोन हुजूर विदीत जाले यैशीयास हे बेकैदी कार्याची नसे हाली हे आज्ञापत्र सादर केले असे व सरकारची जासूद जोडी पाठविली असे तरी जासूदाचे गुजारतीने पाद्री मजकुर याचा घोडा बैल व बाडबिसाद जे घेतली असेल ते कुल जरा बाजरा माघारे देणे उजूर केला आणी हुजूर बोभाट आला म्हणजे कार्यास येणार नाही.

जाणीजे छ१७ शालौवल आज्ञा प्रमाण.

लेखन सीमा

३

२८ जुलै, १७६०

सिमोर बोमेप बाल्ये बाजीन मलबाम मोहबतहू मोहियान पनाब मखलीशान दस्तगाह अजतर्फ नबाब हैदर अलीखा सलाम खरीयेत आजम आकी येथील कुशल (?) ता॥ छ१५ जिलकाद जाणोन तुम्ही आपली शादमानी हमेशा कलमी करीत जाणे दिगर आपण शमसेर बहादर दिलावरजंग याचे सगे भाई म्हणोन आपले तरीफ बहुत ऐकण्यात आले दिलावरजंग याचे भाई जाहलीयावरी आमचेही भाई जाहलेत दरीबीला वजिर साहेब व दीवानजी सो स सख्त लिहोले असे आपणही वजीर सो व दिवाणजी सो स सांगून पाच देतारवे (?) पाठवीनेस कारणे बाकी मजकूर शमसेर बहादर दिलावरजंग याणी लिहीलेवरून मालूम होईल हमेशा आपली खैरीयेत मालूम करून बाजे बमते आशनाई तरकी होई यैसे करणे ज्यादा काये लिहीणे.

४

२१ ऑक्टोबर, १७६०

राजश्री मोरोजी सिंदे नामजाद
जंजिरे रेवदंडा गो.

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रो बालाजी बाजीराव प्रधान आसिर्वाद सु ॥ इहिदे सीतैन मया व अलफ सुज्या अशार तैनेत कुरनेल फिरंगी याणी हुजूर विदीत केले की रेवदंडीयास फिरंगी याचे देऊल ईगरेज आहे त्यासमीप आवाडवाडा आहे झाडे पाने आहेत ती देवलाकडे चालतात हाली अमलदार उपसर्ग करीतात तरी ताकीद करावी म्हणून त्याजवरून हे पत्र सादर केले असे तरी सालाबाद नेमणुक असेल सुदामत चालत आले असेल त्या प्रो चालवणे जाणीजे छ११ रबिलौवल बहुत काय लिही (णे).

लेखन सीमा

श्री
राजा शाहू नर
पति हर्षनिधान
बाळाजी बाजी
राव प्रधान

५

२५ ऑक्टोबर, १७६०

अजम मनवेल साल दाभ्य दे अलबुकेर
की कोयेंग विजूर गोवा दाम मार

श्री
राजा शाहू नर
पती हर्षनिधा
न बाळाजी
बाजीराव
प्रधान

अजम मनवेल साल दाभ्य दे अलबुकेर की कोद येंग विजुरे बंदर गोवा दाम महबत हू

छं बिसालत व अयालत व मर्तबत हशमत व शौकत मंजिलत मकज दोस्ता बाजद शौक मराहू द जमीर मुनीर गर्दांनी देमे आयेदके दरीविला निविस्ता मरसुल केला तो नेक सादत पोहचून मजमुन मालूम जाहला ज्याके फिलीप कद्रजेते तैनेत कुरनेल व विष्णु नाईक आले याणी दोस्तीचे सांगून व जंजिरे याची मोहिम कबुल केली याचा मजकूर इजहार केला त्याजवरून मुफसल मालूम जाहाले व मुद्याचा मजकूर इजहार केला तो इजानेबी कबूल करून तहनामा करार करून दिल्हा त्याची कुल कैफियेत तैनेत कुरनेल याणी कलमी केले असे त्याजवरून मालूम होईल तर आरमार व जंगी सरंजाम फिरंगी लोक देखील अज करीब जंजिरीयास पाठवून करार बमोजिब दोनी मकाने जेर करून सरकारचे लोक चढत ते करावे रा छ१५ रालौवल **जियादा काये लिहीणे हे किताबत.**

६

२५ ऑक्टोबर, १७६०

रफाअतपन्हा बेलच्योर दुनेवास करवालस
कडतार गोवा दाम महबत हू

श्री
राजा शाहू नर
पती हर्षनिधान
बाळाजी बाजीराव
प्रधान

बेलच्योर जुनेवास करवाल्यस कडतार गोवा दाम महबत हू—

छं रफाअत अवाली पन्हा शाहामत मअली दस्तगाह–बादज शौक मकशुफ आंकी निविस्ता मरसुल केला तो नेक सादत पोहचून मजमून मालूम जाहाला ज्याके फिलीप कद्र जे ते तैनेत कुरनेल व विष्णु नाईक आले याणी दोस्तीचे सांगून जंजिरे याची मोहीम कबूल केली याचा मजकूर इजहार केला त्याजवरून मुफसल मालूम जाहाले व मुद्याचा मजकूर इजहार केला तो इजानेबी कबुल करून तहनामा करार करून दिल्हा त्याची कुल कैफियत तैनेत कुरनेल याणी कलमी केली असे त्याजवरून मालूम होईल तरी आरमार व जंगी सरंजाम फिरंगी लोक देखील अज करीब जंजिरे यास पाठवून करार बमोजीब दोनी मकाने जेर करून सरकारचे लोक चढत ते करणे सा छ१५ रबिलोवल **जियादा काये लिहिणे.**

७

२८ ऑक्टोबर, १७६०

॥ श्री ॥

राजश्री मोराजी सिंदे नामजाद जंजीरे रेवदंडा गोसावी यासी

अखंडीत लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रो बाळाजी बाजीराव प्रधान आसीर्वाद सु॥ ईहिदे सीतैन मया व अलफ रेवदंडा येथे फिरंगी याचे देऊल ईंगेरज आहे तेथे दोन पाद्री आहेत त्यास सरकारातून पावावयाची नेमणुक आहे त्याप्रो पावत असता तुम्ही दिकत करता म्हणोन **शुज्याअतशार तैनेत** कुरनेल फिरंगी गोवा याणी विनती केली त्याजवरून हे पत्र सादर केले असे तरी हर दु पाद्री याची नेमणुक पेशजी पासून आहे त्याप्रो पावत असता तुम्ही दिकत करीता ते न करणे सालाबाद पावते त्याप्रो पावीत जाणे फिरोन बोभाट येऊ न देणे जाणीजे. **छ१८ रा लौवल बहुत काये लिहीणे.**

(बाळाजीचा शिक्का) **लेखन सीमा**

८

१ नोव्हेंबर, १७६०

॥ श्रीव्यंकटेश ॥

अखंडित लक्ष्मी आलंकृत राज्यमान्य राजश्री बालाजी गोपाल सुभेदार ता॥ किले हाय गोसावीयासी,

सेवक नारायेणराव व्यंकटेश नमस्कार सन सन इहिदे सीतैन मया व अलफै फिरंगी याची ईग्रज व पादरी कसबे खानापुरी आहेत त्यास तुम्हाकडून उपसर्ग हरयेक वीसी होतो म्हणून हुजूर विदीत जाहाले तरी हे गोष्ट कार्याची नाही बहुत दिवस तेथे इग्रज व पादरी आहेत त्यास नवीन उपद्रव करावया (स) कारण काय इग्रज आत आपल्या जातीमध्ये आपला महजब सांगतील त्यास सांगोन देत जाणे अतःपर त्यास उपसर्ग येकजरा न देणे सालाबाद प्रा॥ पादरी वर्तणुक करीत राहतील त्याचा बोभाटा पुन्हा सरकारात न ये ते करणे तैसेच मार्गाहून फिरंगी गोमातकास जात होता त्याची वस्तभाव (व) घोडे तुम्ही हिरून घेतले येविसी पेशजी तुम्हास लिहिले होते की राजश्री गोविदराव निराजी याच्या विद्यमाने त्याचे घेतले असेल ते माघारा देणे त्यास अद्यापी ही दिल्हे नाही म्हणोन कलले याचा बोभाट श्रीमतापर्यंत जाला हे उत्तम नव्हे याउपरी तैनात दूर

होईल फिरंगी गोमातकाचा वकील याकडून फिरंगी तुम्हाकडे येतील त्याचे स्वाधीन घोडे व बैल गैर वस्तभाव जरा ब्राजरा देखील सुतलीचा तोडा स्वाधीन करणे **याउपरी बोभाट येऊ न देणे जाणीजे छ२२ रबिलौवल.**

लेखन सीमा

९

अजम बेल चीयोर उजे वासदे करवाल
सडक तार जंजिरे गोवा उसलम कहूताला

छं मोहीब मुखलीसान येतीजाद दोस्तान आऊकत व मरमत अफगाने–अजबज्योन वखर अंदेश गोविंदराव निराजी सुभेदार मामले फोंडा सलाम ब्रादज सलाम मोहवल मकसूद आकी खैर खैरयेत जात मलकी सिफात बाब मदम करू नस्त लेबा जाकी मकसूद **ईनस्त** कीर्द मारत व अयालत मरतीबरत पेशवेचे व आमोहीबाचे येगानगी आजी च्यार साल चालत आले आणी उस बमोजिब ईज्यानेब्राचे ही बरदास्ते त्याचे व जदेमेले (?) दरमीयाने काही तसखीस जाहाले नाही पेशही होणार नाही हे इज्यानेब्राचे खातीर निशाच आहे लेकीन बिलफैल तपे चेद्रवडी पैकी तीन गावू कानडेचे मुजती पासोन आं मोही (ब्रा) कडेस आहेत त्यापैकी पारोडेगाव येथे मोहिबाचे किला अलंगा बांधोन होते हाली इजानेब्राचे सरहद नदी किनारा नजिक प्राा जाबोली येथे नवी इमारत सुरू केली आहे म्हणून खबर आली आहे पेसजी काही नवता हाली इमारत काय वास्ते मुस्तैद होत आहे हे इजानेबास मालूम व्हावे याकरता मरसूल केले आहे पेसजी मौजे मडकई अंतरुज येथील खाजन कानडेचे मुजतीत कीर्द मामुरी होते दरमीयान दोन च्यार साल दडंग पडले होते ते दाखला पाहोन मौजे माारचे रयेत व गावकर यानी मिलोन तो बांद दुरुस्त करून सेत करावे म्हणून करीत असता आपणा-कडील लोकांनी आमचे माणुसासी मारीले तो मार मोहिबास लिहीले मोहीबी त्याचे जाब लिहीली त्यावरून आपले येगानगतीचे दरसाल आम्हास जरूर जाणून ती गोष्टी तहकूब केली मोहिबी हरयेक बात नेकी करून दोस्ती तरकी व्हावेसे करणार बडे मुरबी आसे हरवखत याद करून खत किताबतनामे मरसुल करून दोस्ती बमुल मकदुर दराज करणे आयाराची बया नुमायेद **ज्यादा काये लिहीणे हे किताबत.**

शब्दकोष

(अ)

अकरम — दयाळू
अजम — सर्वश्रेष्ठ
अजिदिल — मनापासून
अर्जानी — मिळालेला
अमा — पण, परंतु
अमारत -- महानुभवित्व, श्रेष्ठता
अमारतपन्हा — अमीर
अम्र — हुकूम
अयाम — अय्याम = काल
अयालत — महत्त्व

(आ)

आंकी — ते की
आंकील आब — श्रेष्ठ
आकीलदान — शहाणा
आजीतलग — आजपावेतो
आदबखाना — तुरुंग
आरीफ — सुज्ञ

(इ)

इ — हा
इकबाल — दैव, अभ्युदय
ईज्याइब — पत्रलेखक
इनशाला — इनशाअलाहुतआला — सर्वश्रेष्ठ प्रभू इच्छील तर
इलाही — ईश्वरी कृपेने
इस्तिजाबारी — जाहीर

(उ)

उमदा — विश्वसनीय

(क)

कर — तंटा
कारनेकी — नेकीचा करार

(ख)

खैर — कुशल

(ग)

गरज गोपणे — मतलबीपणे
गोशमाल — शिक्षा

(ज)

जंजिरा — बेट
जलद — युद्ध
जुमान — दखल
जुवा — चहुबाजूस
जियादा — ज्यादा

(त)

तबलीग — प्रसार, प्रचार
तलफ – उद्ध्वस्त
तवाफ — प्रदक्षिणा
तवालियत — जिम्मेदारी
तहवर — तहव्वुर = बहादुरी, वीरता
तासील - तहसील = तसदी करणे, हाल करणे

(द)

दरबंदगी — दोन प्रदेशांतील अंतर, परकोट, घाट
दराज — लांब, दीर्घ
दरी — यात

दरी अयाम — या वेळी
दरीविला — या वेळी
दस्तगाह — हस्तगत
दांदून — लबाडी करून, दमदाटी
दाम सा दत हू — त्याचे नशीब चिरायू होवो
दिगर — अन्य
दियाजत — ईमानदारी
दूतमर्द — बंडखोर
दुरंदेसी — पुढील विचार

(न)

नस्त — खाडीचे तोंड
नामोश — कीर्ती
नामोश दराज — मोठा कीर्तीवान

(प)

परज — तुरुंग
पेशमानी — पस्तावलेला, दुःखी
फिरोजी — कामयाबी, विजयी
फिसाद — बंड

(ब)

बनजर — नजरेने
बालकी (के) — इतकेच काय
बवाजिब — योग्य ती
बाआदज — नंतर, पुन्हा
बाआबा — आवईप्रमाणे
बाडगा — लबाड
बार — परवानगी
बाशद — कदाचित्
बिसात — माल, सामान
बुलंद — उंच

(भ)

भीस्त — विश्वासू, बहिस्त

(म)

मकसूद — हेतू, मतलब
मजमून — मजकूर
मजरा — मान्यता
मरकुम — कलमाने लिहून पाठवणे
मरसुल — रवाना
मलाजमेस — भेटण्यास
मवदत — मित्रता
मवास — बंडखोर
महबत — प्रेम
महसुफ — उपरिनिर्दिष्ट (थोरांसाठी वापरतात) ('मजकूर' हा शब्द याच अर्थी सामान्यासाठी)
मा अलिजा — ऐश्वर्यवान
माबैन — दोन्हीकडून
मारुज — अर्ज, प्रविष्ट
मावजे — ऐवजी
माहामूर — भरपूर, विपुल
मुचेलका — जामीन
मुजाखा — अडचण
मुतमकीन — स्थिर
मुसद — इच्छा
मुस्तद — मुस्तैद — सिद्ध, तयार भक्कम,
मोहीब — स्नेही
मोहीम — महत्त्वपूर्ण काम

(य)

येकजहती — निःसिमी दोस्ती
येकवजा — गैरविचार

येखलास — मैत्री
येगानगत — ऐकत

(र)

रफाअत — श्रेष्ठ, कल्याणकारी

(ल)

लंग — पूज्य
लाग — पत्ता, माग
लाफा — लाफजानी = बडबड करणारा

(व)

विजरई — पोर्तुगीज राज्यपाल; प्रमुख प्रशासक
वोडद — वर्दी, परवाना

(श)

शराकत — दोस्त
शाआरा — पोषाख
शादमान — खुशाली
शौकत — वैभवशाली

(स)

सखून — शब्द
सजावट — योग्य
सरफराज — सन्मान
सहल — जुजबी, साध्या
सिकजा — पेच, संकट
सियादत — प्रतिष्ठावान
सुजाअत — धैर्यवान

(ह)

हमबाब — सर्वबाबी
हमराह — बरोबर, परिवारात
हरगाह — बिलकुल, कधीही
हरफीन — हरफ, हर्फ
= अक्षर, शब्द
= लेखक
हालखूद — जागच्याजागी
हिंमत — शौर्य

तंजावूर राज्यातील तर्फ तिरुकणमंग याची १७८५-८६ सालाची हिशेब जमाबंदी *

प्रा. डॉ. कृ. ना. चिटणीस,
पुणे विद्यापीठ, पुणे

इ. स. १६७६ साली व्यंकोजीने तंजावूर राज्याची स्थापना केली. १६८३ पर्यंत त्याने राज्य केले. त्याच्यानंतर, शहाजी दुसरा (१६८४–१७१२), शरभोजी पहिला (१७१२–१७२८) आणि तुकोजी (१७२८–१७३६) हे राजे होऊन गेले. मग १७३६ पासून १७३९ पर्यंतच्या काळात कोणी राज्य करीत नव्हते. १७३९ मध्ये प्रतापसिंग पुन्हा राजपद मिळविण्यात यशस्वी ठरला. तो १७६३ पर्यंत राजपदावर होता. त्याच्यामागे तुळजाजी (१७६३–१७८७), अमरसिंग (१७८७–१७९८), शरभोजी दुसरा (१७९८–१८३३) आणि शेवटी शिवाजी (१८३३–१८५६) या राजांनी राज्य केले.

वरील मोडी कागद तुळजाजीच्या कारकीर्दीतील आहे. तो एक नालायक राजा असून १७७३ पासून १७७६ पर्यंत त्याने राजपद गमविले होते. १७७६ मध्ये ब्रिटिशांच्या सहाय्याने तो पुन्हा गादीवर बसला. असो.

तंजावूर राज्यात मायावरम्, मन्नारगुडी, तिरुवाडी, कुंभकोणम् आणि पडुकोट्टाई असे पाच सुभे होते. प्रत्येक सुभ्याची मगनम्–परगण्यांत, आणि प्रत्येक मगनम्–परगण्याची तर्फामध्ये विभागणी केली होती असे दिसते. आणि तर्फेमध्ये मौजे होते.

प्रस्तुतच्या तिरुकणमंगै तर्फेच्या हिशेब जमाबंदीच्या बंदात १६ लांबडे कागद असून कागदाच्या दोन्ही बाजूंवर मोडीत लिहिलेले आहे. यातील जमाबंदीचा हिशेब सुहूर सन सीत समानीन मया व अलफ (११८६) विश्वावसु संवत्सराच्या वैशाख मास दि. २५

* १९८४ च्या फेब्रुवारी महिन्यात मी तंजावूर सरस्वती महल पॅलेस लायब्ररीला गेलो होतो. त्या वेळी मोडी दफ्तरातील रुमाल नं. ९४ यातील प्रस्तुत जमाबंदी कागदाची नक्कल मी केली. (इंग्रजी विभागात रूपान्तर पाहावे.)

पासून (May–June,1785) पुढल्या वर्षाच्या (April–May, 1786) वैशाख मास दि २४ पर्यंतचा आहे.

तर्फ तिरुकणमंगैमध्ये तेरा मौजे होते. ते म्हणजे वडघंडम, तेपरसेकवळे, राज्याकवळे, कारांजेरी (कळंजेरी), नगरीश्वरम, मेलतले, शातगुडी, जगनाथपाले, मागोड्यानकवळे, सिधवली, मेलयेरी, काट्लर (काटूर), मणकाल आणि तर्कवयल.

या सर्व तेरा खेड्यांतून मागील वर्षी येणारा महसूल या वर्षी घेण्यात आला. हा महसूल ३८३० चक्रे आणि ८ फलम (३८३०–८–०) इतका होता. चक्र म्हणजे साधारपणे विजयनगरच्या गद्याण किंवा वराह या नाण्याच्या बरोबरीचे होते. एका चक्रात १० फलम नाणी होती आणि एका फलममध्ये १६ 'वीस' नावाची नाणी होती. वर्ष मजकुरीचा जमा २६६० चक्रे, १ फलम आणि १५ वीस (२६६०–१–१५) इतका झाला. हा महसूल साधारणपणे बागाईत जमिनीतून घेतलेला असून खरीप (कार) तसेच रब्बी (पशान) या दोन्ही हंगामांचा होता.

या तर्फेत एकूण जमीन ११५–२–४ वेली इतकी असून यात बागाईत जमीन ४–१३–४ वेली इतकी होती. या बागाईत जमिनीतील उत्पन्न गेल्या वर्षाच्या हिशेबाने १५६७७ कले असून त्याच्यावर एकूण कर १०८–८–१५ चक्रे इतका होता.

१५६७७ कले धान्यातून चालू वर्षी रयताकरिता ६८६८–६–४ कले धान्य सोडून जमीन मालकांना आलेल्या उरलेल्या ८८१८–११–१२ कले धान्यातून पुन्हा इनाम जमीन, अर्धमान्य जमीन, आयकट जमीन वगैरेमधील त्या त्या जमीनमालकांकरिता त्यांचा हिस्सा सोडून त्यातून राहिलेले ८७४६–१०–३/१६ कले धान्यावर २३५९–२–२ चक्रे कर घेण्यात आला.

बागाईतपेक्षा कमी दर्जाची कडपा जमीन १९–४–४ वेली असून त्यातील उत्पन्न ३४४७ कले धान्य होते. याचा अर्धा हिस्सा रयताकरिता सोडून राहिलेला अर्धा हिस्सा १०२३–१०–० कले, म्हणजे जमीनमालकांच्या हिश्श्यावर, दर कल्यास अडीच फलमप्रमाणे ४३०–८–१२ चक्रे कर घेण्यात आला. तसेच मुसमवार २३० कल्यामधून ११०–२–४ कले रयतांचा हिस्सा देऊन उरलेल्या ११९-१५–३/४ कल्यास दर कल्यास अडीच फलमप्रमाणे २९–९–८ चक्रे कर आकारण्यात आला.

जमिनीचा आणखी एक प्रकार होता. याचे नाव स्पष्ट होत नाही. या जमिनी ६४–९–० वेली असून त्यातील उत्पन्न १२००० कले होते. यातून रयतेकरिता काही हिस्सा (टक्केवारी दिलेली आहे) सोडून बाकी ६९७५–६–० कले धान्य जमीनमालकांना आले. रयतेस सोडलेल्या भागात ५०% किंवा ४०% किंवा ३५% किंवा ३०% किंवा ३३-६-०% प्रमाणे सोडलेल्या धान्याचा समावेश होता. जमीनमालकांना मिळालेल्या हिश्श्यातून इनाम जमीन वगैरे जमिनीवर संपूर्ण किंवा काही भाग धान्य

सोडून उरलेल्या ६९०३-५-० कल्यास दर कल्यास पावणेतीन फलमप्रमाणे १८९८-३-१४ चक्रे कर आकारण्यात आला.

तंजावूर राज्यातील तर्फ तिरुकणमंगै याची १७८५-८६ सालाची हिशेब जमाबंदी

Fol. 1 a

हीसेब जमाबंदी ता त्रिकणमंगी
मापा त्रिवाळूर मापा उळणी
सुभा मनारगुडी सुमा सीत समानैन मया
अलफ विश्वावसु नाम संवछर ईगा वैयासी
मास ते दि २५ अवल साल ता वैयासी
मास ते दि २४ अखेर साल साल
गु॥ प्रो कुलदेह
१ मो वडघडम (वडकंडम्)
१ मो तेंपरेसकवळे
१ मो राजपाकवळे
१ मो कारांजेरी (कळंजेरी)
१ मो नगरीश्वरम
१ मो मेलतले शतागुडी (मेलतेल शात्तंगुडि)
१ मो जगनाथपाले
१ मो मोगोड्यानकवळे
१ मो सीधवली (सिद्धमल्लि)
१ मो मेलयेरी
१ मो काट्ल ( )
१ मो मणकाले (erased partly)

Fol. 1 b

१ मो तर्कवयेल
———
१३

यासी सालगुा प्रो तीर्वा चोर
६५५॥२।≡ मो वडघंडम
१५८॥१ϭ- मो तेपरसेकवळे
१९६ϭ२।= मो राज्याकवळे
२८८ϭ४॥= मो कारांजेरी
३१०ϭ२ϭ≡ मो नगरीश्वरम
३५२॥४ϭ≡ मो मेलले शातगुडी
५२१॥४।।।- मो जगनाथपाल
१२४॥२ϭ= मो मागोडरयानकवळे
१२९॥२।।। मो सिधवली
२३४ϭ१ϭ= मो मेलयेरी
६२२ϭ१।।। मो काटलर
२०ϭ२।≡ मो मणकाल
१५॥·।।।= मो तर्कवयल
———
३८३०॥३

सालमारी तीर्वा चोर
२५३७ϭ२ϭ - यैनजमा
१२२॥४।।।=दफाते जमा
———
२६६०ϭ१।।।≡

यनजम चाार
१७७॥४।।।≡ बाबती नगदी
२३५९ϭ[२ϭ -] बाबतीजिनसी

P. T. O.

हिसेब जमाबंदी ता। त्रिमणमंगी

Fo o 2a

२५३७८२८—

बानगदी चोर

६९८१ यैननगदी

१०८॥३॥≡ गला तहुरीक

१७८॥४॥≡

यैननगदी चोर

२८१ नख्तबात्र

१८१॥ कार

॥४॥ पशान

२८१

६४॥१॥– पुजीपतकट जमीन ६॥२

२५॥२।– कार

३८॥४। पाशान

६४॥१॥—

·॥३॥ – संक्रातीवरी कार

१८४॥= पोस्तवरी पान

६९८१

तपसील

२७॥२। कार

४१८३॥ =पाशान

Folio 2 b

६९८१

यासी गावगानावार

७८॥ — मो वडघडम

८२ नख्तबाब

८१ कार

८१ पाशान

८२

६८३॥≡ पुंजीपतकट जा॥ जा

२॥·॥ =कार

३॥३। —पशान

६८३॥≡

८१॥· सक्रा॥वरी कार

८२॥ =पोस्तवरी पा॥न

७८॥ –

यासी तपसील

२॥३। =कार

४८२८≡ पशान

७८॥ –

॥२≡ मो तेपरसेकवळे

॥१॥ —पुजीपतकट जा॥ ८२

८२॥= कार

८३॥≡ पशान

·॥१॥ —

हिसेब जमावंदी ता॥ त्रिमणमंगी

८। — संक्रांतीवरी कार
८॥ —पोस्तवरी पा॥न
————
·॥२।≡

P. T. O.

Folio 3 a
तपसील
८२॥।≡ कार
८४॥ पशान
————
·॥२।≡
८॥= **मो राज्याकवळे**
८। सा॥वरी कार
८।= पोस्तवरी पा॥न
————
८॥=
१०८३॥। **मो कारांजेदी**
·॥ २ नख्तबाव
८४ कार
८३ पशान
————
॥ २
९८४।÷पुंजीपतकट जा॥े ।।।·
३॥२॥।=कार
५॥१।≡ पशान
————
९८४।–
८॥।=सां॥वरी कार
८१॥—पांस्तवरी पा॥शन
————
१०८३॥।
तपशील

Folio 3 b
४८२॥। कार
६८१ पशान
————
१०८३॥।

१३॥·॥—**मो नगरीश्वरम्**
१३८३॥। पुंजीपतकट जमीन १॥
५८३॥ कार
८८। पशान
————
१३८३॥।

८॥≡ संक्रांतीवरी कार
λ१८=पोस्तवरी पा॥न
————
१३॥·॥ -

तपसील
५८४८= कार
८८१।=पा॥न
————
१३॥·॥ -

६॥१॥ **मो मेलतले शातगुडी**
६८४८ – पुंजीपतकट जा॥े १।
२॥·॥=कार
३॥३।≡पशान
————
६८४८ –

हिसेब जमाबंदी ता॥ त्रिमणमंगी

८॥। = सा॥वरी कार
८१॥ – पांस्तवरी पा॥न
———
६॥१॥

तपसील
२॥१॥ कार

P. T. O.

८। सा॥वरी कार
८। = पोस्तवरी पशान
———
२॥२८ –

९८३॥ मो सीधवली
९८२। पुंजीपतकट जा॥ १८
३॥१॥। = कार

Folio 4 a
यैननगदी काराजेरी
४८ पशान
———
६॥१॥

८४। ≡ मो जगनाथपाल
८१॥। सा॥वरी कार
८२॥ ≡ पोस्तवरी पशान
———
८४। ≡

२॥२८ – मौजे मांगोड्यानकवळे
८३ नख्तबाब
८१॥ कार
८१॥ पशान
———
८३

२८३। ≡ पुंजीपतकट जा॥ ।·।
·॥४। = कार
१८४८ – पशान
———
२८३। ≡

Folio 4 b
५॥·। = पशान
———
९८२।
८॥ – सा॥वरी कार
८॥। ≡ पोस्तवरी पा॥न
———
९८३॥।

५८४८ = मो मेलयेरी
५८२॥। ÷ पुंजीपतकट जा॥ ·॥·
२८१८ = कार
३८१॥ ≡ पशान
———
५८२॥।÷
८ = सा॥वरी कार
८॥। – पोस्तवरी पा॥न
———
५८४८ =
तपसील
२८१॥ = कार
३८२ = पशान
———
५८४८ =

हिसेब जमाबंदी ता॥ त्रिमणमंगी

१२॥२८ – **मो काटूर**
·।।४ नख्तबाव
·।। कार
८४ पशान
———
·।। ४

११॥·।≡ पुंजीपतकट ॥·
४८४॥≡ कार

P. T. O.

Folio 5 a

घा॥ना।।यै।।।मेलयेरी
७८।।। पशान
———
११॥·।≡

८।।। संक्रांतीवरी कार
८२ पोस्तवरी पशान
———
१२॥२८≡

० मो मणकाल
० मो तर्कवयल
———
६९८१

Folio 5 b

गलतफरीक अजगला
१५६७७
यासी तीर्वा चोर
४४॥३।।।≡ पटीबाब
१४८८≡ मघमा
११८२। घासपटी
३८॥२॥ ÷ अलाहिदा
———
१०८॥३।।।≡

पटीबाबकुलगलाकले
१५६७७

पैकीं वजा सांडी
१२५ इनामजोडी मो वडघडम
अयेकट अर्धमान्य पोनकुली
ता॥ट कोवीलमान्यकले २५०
यासी तह निमेस कले
४३३० दरोबस्त सांडी
९१७ राज्याकवळे
३४१३ जगनाथपाले
———
४३३०
———
४४५५

जाता बाकी कले
११२२२
यासी तीर्वा दर सदे ८४ प्रो
४४॥३।।।≡

P. T. O.

Folio 6 a

तफुरींकमघमा
मघमा कुलगला
१५६७७
पैकीं वजा सोडी गला
१२५ इनामसोडी मो वडघडमपो

हिसेब जमाबंदी ता॥ त्रिमणमंगी

नकुलितारकोवीलअयेकट अर्ध
मान्यमोईनकले २५०
तहनिमेस
४३३० दरोबस्त सोडी
९१७ मो राज्याकवळे
३४१३ मो जगनाथपाले

———

४३३०

———

४४५६
जातांबाकी गलाकले
११२२२
यासी तीर्वा दरसदे ८१। प्र॥
१४८८ =
घासपटी कुलगला
१५६७७
पैकी वजा सोडी
१२५ इनामसोडी मो वडघडमपो

Folio 6 b

नकुली तार कोवील अयकट अर्धमान्य
कले २५० तहनिमेस
४३३० दरोबस्त सोडी
९१७ मो राज्याकवळे
३४१३ मो जगनाथपाल

———

४३३०

———

४४५६
जा॥ बाकी गलाकले
११२२२

यासी तीर्वा दरसदे ८१ प्रो
११८२।
अलाहिदा कुलगला
१५६७७
पैकीं वजा इनाम सोडी
१२५ इनामसोडी मो वडघंडमपो
नकुली तारकोवील अयकट अर्धमान्य
मोईनकले २५०
यासी तहनिमेस
७८०२ दरोबस्त सोडी
९१७ मो राज्याकवळे
१२४० मो कारांजेरी
११२५ मो नगरीश्वरम
३४१३ मो जगनाथपाले
१०४० मो मेलयेरी
६७ मो तर्लावयल

P. T. O.

Folio 7 a

घा॥न॥गला तदुरीकमघमा

———

७८०२

———

७९२७
जातां बाकी गलाकेल
७७५०
यांसी तीर्वा दरसेद ·॥ प्रो
३८॥२॥ –

Folio 7 b blank

P. T. O.

हिसेब जमाबंदी ता॥ त्रिम्रणमंगी

Folio 8 a

धा॥जिनसीरु ॥। जा॥जुमल्या प्रों
२३। परिंपोक जमीन
६॥।= पुंजीपतकट
·।२ काट्रूरपा॥प्रो नख्ती गुतगा
८४॥३। नंजी जमीन
____
११५८२।

यासी गावगाना
१७ ८मो वडघडम
·॥· परिपोक
१८ पुंजीपतकट
१५। नंजी जमीन
____
१७८

३८२ मो तेंपरसेकवळे
८२ पुंजीपतकट
३८ नंजी
____
३८२

१६॥ मो राज्याकळे
११८—परिपोक
·।२ काटल प्रों नख्ती गुतगार

P. T. O.

९॥३ पो काराजेरी
१॥। परिपोक
·॥। पुंजीपतकट
७८३ नंजी जमीन
____
९॥३

९॥२॥ मो नगरीश्वरम
१॥ परिपोक
१॥ पतमट
६॥२॥ नंजी जमीन
____
९॥२॥

१३८॥। मो मेलतेल शातंगुडी
३॥। परिपोक जमीन
१। पुंजीपतकट
८८॥। नंजी जमीन
____
१३८॥।

१५॥।१॥ **मो जगनाथपाले**
·॥। परिपोक जा॥
१५८१॥ नंजी
____
१५॥।१। ।

Folio 8 b

५८३ नंजी जमीन
____
१६

१८२॥ **मो मागोड्यानकवळे**
·।× परिपोक
·। पुंजीपतकट

P. T. O.

हिसेब जमाबंदी ता॥ त्रिमणमंगी

Folio 9 a

२॥२॥ नंजी जमीन

———

३८२॥

७८ मो सीधवली

१८ परिपोक जो

१८ पतकट

५८ नंजी जमीन

———

७८

१२। मो काट्लर

·॥· पुंजीपतकट

११॥। नंजी जो

———

१२।

·॥। मो मणकालनजी

·। मो तर्कवयलनजी

———

११५८२।

Folio 9 b

पैकीं वजा परिपोक जमीन २३।

जातां बाकी जो ९१॥।२।

पैकीं वजा पतकट जो ६॥। ≡

जातां बाकी जो ८५८।

पैकीं काट्लर पा॥ प्रो नखभी गुतगा

जो ·।२

जातां बाकी जमीन नंजीवली ८४॥३।

यासी सालगु॥ जो ८४॥३।

सकले

२४६२ मो वडघडम १५।

६२१ मो तेंपरसेकवळे जो ३८

९१७ मो राज्याकवळे ५८३

१२४० मो कारांजेरी जमीन ७८३

१२०० मो नगरीश्वरम जो ६॥२।

१ × ८५ मो मेलतले शातगुडी जो ८८॥

३४१३ मो जगनाथपाले जो १५८॥

४२५ मो मांगोड्यानकवळे २॥२॥

४४० मो सीधवली जमीनवली ५८

१०४० मो मेलयेरी जमीन ४८

२४८७ मो काट्लर जमीन ११॥

८० मो मणकाल जमीन ·॥·

P. T. O.

Folio 10 a

६७ मो तर्कवयल जमीन ·।·

यै॥जमीन ८४॥३।

१५६७७

यासी सालमा॥री रुजूगल्या

अकार प्रो नंजी जो ८४॥३।

सकले

३४४७ कडप जमीन १९८४।

२३० कार जाो १८

१२००० संभालयान जमीन

११५४०८२ तावळा जो ६२।४

४५९॥।१ इनाम जो

हिसेब जमाबंदी ता॥ त्रिमणमंगी

२५० अयेकट अर्धमान्य जो १८
२०९॥।१ च्याडीर्भाग जो १८
ये॥ २८

४५९॥।१

ये॥ ६४।४

१२०००

Folio 10 b

ये॥ जमीन ८४॥३।

१५६७७

यासी तपसील
१५२१७८२ तरप जमीन ८२॥३।
४५९॥।१ इनाम
२५० अयेकट अर्ध अर्धमान्य जो १८
२०९॥।१ च्याडीर्भाग जो १८
ये॥।जो २८

४६९॥।१

येकूण जमीन वेली ८४॥३।

१५६७७

यासी कुडीवार

अ	यैनगला	वारगला
दरसदे ५ प्रो	७८१९॥।	३९०९॥।१॥
दरसदे ४० प्रो	४४१६।	१७६६।२॥।
[दर] ३५७ कलेवार प्रों	२७७९	९७२॥१॥
दरसदे ३ प्रों कले	३३८	१०१।१॥
दरसदे तिजाई प्रों	३२४	१०८
ये॥ वारवधे ५७		
	१५६७०	६८६८।१।

जाता बाकी कलेवर गला
८८१८॥१॥।

P. T. O.

Folio 11 a

पैकीं वजा इनाममान्य घा॥मान्य ४०॥१॥
अयेकट अर्धमान्य मो वडधंडम पोनकुली
तारको॥। जो १८
सकले २५० सकुडीवार दरसदे ३५
कले प्रों ८७॥ जातां बाकी मेलवार
१६२॥ अर्धमान्य ८१। यासी तहनिमे
सकले ४०॥१॥
३१॥२॥ च्याडीर्भाग मो काटदेवरा
जशास्त्री जमीन १८ सकले २०९॥।१
सकुडीवार दरसदे ४० कलेवार
प्रो ८३॥।२। जातां बाकी कलेवार गला
१२५॥।१॥।
यासी च्याडीर्भाग चो केल

७२८[१]

हिसेब जमाबंदी ता॥ त्रिमणमंगी

जातां बाकी गला केल
८७४६॥·॥।

यासी तीर्वा चोर
४६०॥३। दर कल्यास ८२॥ प्रो यैनगला
१८४३।

Folio 11 b

१८९८८३॥। = दर कल्यास ८२॥।
प्रो गला ६९०३।
ये॥गला ८७४६।·॥।

२३५९८२८ =

P. T. O.

Folio 12 a

सुथल कडपसाल गु॥ प्रो जमीनवेली

४०६ मो वडघंडम जमीन ३।·
१५१ मो तेंपरसेकवळे जमीन ·।॥·
२९७ मो राज्याकवळे जमीन १।
३०३ मो कारांजेरी जमीन १॥।·
३०३ मो नगरीश्वरम जमीन १॥·
३१२ मो मेलतले शातंगुडी जमीन २८।
५०९ मो जगनाथपाले जमीन २।१
८७ मो मागोड्यानकवळे जमीन ॥२॥
११६ मो सीधवली जमीन १।·
२२५ मो मेलयेरी जमीन १८
६१७ मो काट्लर जमीन ३।८।
२४ मो मणकाल जमीन ·।·
६७ मो तर्कवयल जो ·।·
ये॥ जमीन १९८४।

३४४७

यास सालमारीं रु जुगल्या अकाराप्रमाणे
जमीन १९८४।७
(ताडा) तरमु ३४४७

Folio 12 b

सीकुडीवार निमेस केल १७२३॥.
जातां बाकी मेलवार गला १७२३॥
यासी तीर्वा दर कल्यास ८२॥ प्रों चोर
४३०॥३॥।

मुसवमार सालगु॥ प्रों
१२१ मो जगनाथपाले जमीन ·॥·
६१ मो मेलयेरी जमीन ·।·
४८ मो काट्लर जमीन ·।·
ये॥ जमीन १८

२३०

सालमारी रुजु गल्या अकारा प्रो जमीन
जासता गला केल २३०
सकुडीवार

अ	यैन	गला
दर ५० कले प्रो	१८२	९१
दरसदे ४० कले प्रो	४८	१९८२
	२३०	११०८२।

हिसेब जमाबंदी ता॥ त्रिमणमंगी

दरसदे ५० कले प्रमाणे
६०॥ मो जगनाथपोल यैन १२।
३०॥ मो मेलयेरी जमीन ६।

P. T. O.

Folio 13 a

ये॥ यैनकले १८॥
———
९१

दरकले ४० कले प्रमाणे मो काटूलर
यैनकलेस कुडीवार गला
४८ १९८२।

जातां बाकी मेलवार गला ११९॥।·॥
तीर्वा दर कल्यास ८२॥ प्रों २९॥४॥
सा॥पा॥न साल गु॥प्रों जमीन वेली
२०५६ मो वडधंडम जमीन १२८
४७० मो तेंपरसेकवळे जमीन २।
६२० मो राज्याकवळे जो ३॥।३
९३७ मो कारांजेरी जमीन ५।३
८९७ मो नगरीश्वरम जो ५८२॥
९७३ मो मेलतले शातंगुडी जो ६८॥।
२७८३ मो जगनाथपाले जो वेली १२।·॥
३३८ मो मांगोड्यानकवळे जमीन २८
३२४ मो सीधवली जमीन × ॥।
७२४ मो मेलयेरी × × × २॥।

Folio 13 b

१८२२ मो काटूलर जमीन ८।४॥
५६ मो मणकाल वावठ जमीन ·॥·
ये जमीन ६४।४
———
१२०००

यास सालमा॥री रुजू गल्या अकारा प्रों
जमीन वेली ६४।४
गलाकेल १२०००
यासी तपसील
११५४०८२ तरफ जमीन ६२।४
४५९॥।१ इनाम जमीन
२५० अयेकट अधमान्य जमीन १८
२०९॥।१ च्याडीर्भाग जमीन १८
ये॥ जमीन २८
———
४५९॥।१

येकून जमीन ६४।४
———
१२०००

यासी कुडीवार
अ

	यैनकले	वारकले
दर ५० कले प्रों	४१९०॥।	२०९५।१॥
दरसदे ४० कले प्रों	४३६८।·	१७४७।॥·
दर ३५ स कले प्रों	२७०९	९७२॥१॥
दरसदे ३० कले प्रों	३३८	१०१।१॥

P. T. O.

हिसब जमाबंदी ता। त्रिमणमंगी

Folio 14 a

यैन वार
दर ३३।१ वार प्रों ३१४ १०८

१२०००

५०२४॥२

दरसदे ५० कले प्रों
३१० मो राज्याकवळे यैन ६२०
३१॥१॥ मो नगरीश्वरम यैन ६३॥
१३९१॥ मो जगनाथपोल २७८३
३६२ मो मेलयेरी यैन ७२४
ये॥ यैन गला ४१९०॥

२०९५।१॥

दरसदे ४० कले प्र॥ गला
१०० मो वडघंडम येन २५०
१८८ मो तेंपरसेकवळे यैन ४७०
३७४॥।॥ मो काराजेरी यैन ९३७
३३३।॥ मो नगरीश्वरम यैन ८३३।
७९८॥।॥ मो काटूलर यैन कले १८२२
२२।१॥ मो मणकाल वा॥वट यैन ५६
ये॥ यैनगला ४३६८।

१७४७।॥

Folio 14 b

दरसदे ३५ कले प्रों
६३२८१ मो वडवंडम यैन १८०६
३४०॥।॥ मो मेलतेल शातंगुडी यैन ९७३
येकून जमीन २७७९

९७२॥१॥

दरसदे ३० कलेवार प्रों मो कांगोड्यान-
कवळे यैन ३३८७ वार ११।१॥
दरसदे ३३।१ वार प्रो मो सीधवली यैन
३२४ कुडीवार १०८
जाता बाकी मेलवार गलाकेल ६९७५।१
पैकीं वजा इनाम ब्रह्मणमान्य ४०॥१॥
अयेकट अर्धमान्य मो वडघंडम पोनकुली
तारकोवील जमीन १८
सकेल २५० कुडीवार दरसदे ३५
कले प्रो जातां बाकी मेलवार ८३
अर्धमान्य निमेस ८१।
यासी तहनिमेस कले
३१।२॥ चाडीभाग मो काटूलर देवराज
शा॥ जमीन मोईन १८७ कले २०९॥१
× सकुडीवार दरसदे ४० कले

P. T. O.

Folio 15 a

वारप्रो गला ८३॥२। सजाता बाकी गला
१२५॥१॥
यासि चाडीभाग चो सकेल

७२८१

हिसेब जमाबंदी ता॥ त्रिमणमंगी

जातां बाकी गला ६९०३।
यासी तीर्वा दर कल्यास ८२।।।
फलम
चोर
१८९८८३।।।=

Folio 15 b Blank

P. T. O.

७८।।३।।।≡ सा।म।। दरबारी प्रों
३१८३।।=नाटखर्च दरसदे ८२ प्रों

१०९।।२।।—

Folio 16 a

दफाते जमा चोर
१०९।।२।।—तफरीक वगैरे
१०८२।—खजाना तहरीर

१२२।।४।।।=

तफरीक वगैरे कुलगला
१५६७७
यासी तीर्वा दर चोर

तहरीर खजाना चोर
२५३७८२८—यैन जमा
१०९।।२।।—तफरीक वगैरे

२६४६।।४।।=

यासी तीर्वा दरसदे ।। प्रों
चोर
१३८२।÷

Folio 16 b Blank

खानदेशच्या इतिहासाची साधन

एरंडोल कागदपत्रे

— डॉ. प्र. न. देशपांडे

खानदेश इतिहास मंडळाचा उपक्रम

इ. वि. का राजवाडे संशोधन मंडळाच्या अनेक उपक्रमांपैकी एक लक्षणीय उपक्रम म्हणजे 'खानदेशच्या इतिहासाची साधने गोळा करणे आणि त्यातील प्रसिद्धियोग्य साधने प्रकाशित करणे' हा होय. यापूर्वी मंडळाने 'संशोधका'तून खानदेशच्या इतिहासाला उपयुक्त अशी साधने प्रकाशित केलेली आहेतच. 'संशोधक'च्या सातव्या आणि आठव्या वर्षाच्या अंकातून 'सुलतानपूर परगण्यासंबंधीचे कागद' प्रकाशित करण्यात आले. सहाव्या वर्षाच्या चौथ्या अंकात आणि सातव्या वर्षाच्या पहिल्या व दुसऱ्या अंकात 'खानदेशातील होळकरी सत्तेची पत्रे' प्रकाशित करण्यात आली. याशिवाय 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' खंड २३ वा हा मंडळानेच प्रकाशित केला असून या खंडात 'खानदेशातील ऐतिहासिक घराणी' या शीर्षकाखाली 'तोरखेडकर कदमबांडे' आणि 'शिंदखेडकर राऊळ' या घराण्यांची कागदपत्रे प्रकाशित करण्यात आलेली आहेत. याशिवाय 'तोरखेडकर कदमबांडे यांची कैफियत' हे साधन 'संशोधक'च्या पहिल्या वर्षाच्या पहिल्या अंकातच प्रकाशित करण्यात आले. इतर संशोधन लेखांमध्ये 'खानदेशच्या इतिहासाचे एक नवीन साधन' (वर्ष ७, अंक ३–४) खानदेशातील घराणी (वर्ष १५) '१६७८–८४ मधील खानदेशची आर्थिक स्थिती' (वर्ष १६), 'खानदेशातील कापसाचा धंदा' (वर्ष १९, अंक ३–४), 'प. खानदेशातील भामेर' (उपरोक्त), 'धुळ्याच्या गरुड घराण्याचे नावाचे मूळ' (वर्ष २२), 'खानदेश या नावाचे मूळ' (उपरोक्त), 'पुनश्च खानदेश' (वर्ष २४–२५), 'खानदेशातील एक नवा शिलालेख' (वर्ष २६), 'धुळे जिल्ह्याची ऐतिहासिक पार्श्वभूमी' (वर्ष २७), 'सोनगीरचा शिलालेख' (वर्ष २९), 'खानदेशातील लूटमार'

(वर्ष ४८, अंक १–२), ' खानदेशातील कानुगोंचे वतन ' (उपरोक्त), ' थाळनेर ताम्रपट ' (वर्ष ४८, अंक ३), ' खानदेशातील पाटीलकीचे वतन ' (वर्ष ४८, अंक ४), ' खानदेश सुभ्याच्या उजाड महालाची कमाविसी ' (वर्ष ४९, अंक २), ' सोनगीरसंबंधी अप्रकाशित माहिती ' (वर्ष ४९, अंक ४), इत्यादी लेखांचा उल्लेख करावा लागेल. ' संशोधका 'तून प्रसिद्ध झालेल्या खानदेशविषयीच्या साधनांचा आणि लेखांचा समग्र आढावा येथे घेण्याचे कारण असे की, राजवाडे संशोधन मंडळाने खानदेशच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी साधने आणि लेख अग्रक्रमाने प्रकाशित करण्याचे धोरण ' संशोधक 'च्या जन्मापासून सातत्याने राबविले आहे.

नंदुरबार दप्तर :

मंडळाच्या संग्रही नंदुरबार येथील कानुगो-देसाई यांचे दप्तर असून या दप्तरातील कागदपत्रे निवडण्याचे व त्यांची यादी करण्याचे काम मंडळाने हाती घेतले आहे. यातील महत्त्वाची कागदपत्रे ' संशोधक 'मधून यथावकाश प्रसिद्ध होणार आहेत. ' शंभुराजचरित ' या साधनग्रंथात ज्या शंभूचा उल्लेख आहे त्यावरून कै. बेंद्रेसारख्या इतिहासकारांनी शिवपुत्र संभाजीचा संबंध उपरोक्त शंभुराजाशी जोडला. तथापि हा शंभुराज म्हणजे नंदुरबारच्या देसाई घराण्यातील शंभुदास देसाई होय, हे श्री. शं. देसाई यांनी ' संशोधका 'च्या सोळाव्या वर्षाच्या अंकात प्रदीर्घ लेख लिहून सिद्ध केले. अशा प्रकारे स्थानिक स्वरूपाचे इतिहासविषयक अध्ययन समग्र इतिहासाला केवळ पूरक नसते, तर इतिहासात गृहीत धरलेल्या किंवा मान्यता पावलेल्या घटनांतील विसंगती दूर करण्यास मदत करीत असते. ' **तापी महात्म्य** ', ' **गोदा-महात्म्य** ' यासारख्या पोथ्यांचा ऐतिहासिक दृष्टिकोणातून अभ्यास होण्याची गरज आहे. अशा प्रकारच्या पोथ्यांतून नद्यांच्या परिसरातील मंदिरे, स्मारके यासंबंधी माहिती तर मिळतेच, परंतु त्याचबरोबर स्थानिक स्वरूपाच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी नवी माहिती उजेडात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

खानदेश इतिहास सेमिनार

मंडळाने १९८५ मध्ये खानदेश इतिहास सेमिनार आयोजित केला होता. प्रस्तुत सेमिनारमध्ये खानदेशच्या प्राचीन, मध्ययुगीन आणि अर्वाचीन इतिहासाशी संबंधित अशा विषयावर अनेक अभ्यासकांनी आपले शोधनिबंध सादर केले होते. शोधनिबंधांच्या निमित्ताने सेमिनारमध्ये जी चर्चा झाली ती फारच उद्बोधक ठरली. खानदेशचा समग्र इतिहास तयार करण्यास अनेक अडचणी असल्याचे लक्षात आले. मुख्य अडचण म्हणजे साधनांचा अभाव. त्या दृष्टीने अप्रकाशित साधने गोळा करणे, जुन्या घराण्यांची

कागदपत्रे मिळविण्याचा प्रयत्न करणे; नाणी, ताम्रपट, शिलालेख यांचा शोध घेणे व संकलन करणे; त्याचप्रमाणे स्थानिक ऐकीव माहिती, दंतकथा, दैवत कथा, लोकगीते, लोककथा इत्यादींचा संग्रह करणे वगैरे कार्य प्रथम पूर्ण होण्याची गरज आहे. मंडळाने त्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले आहेत.

एरंडोलची कागदपत्रे

राजवाडे मंडळाच्या संग्रही असलेल्या दफ्तरांमध्ये एका दफ्तरात एरंडोल येथील देशमुखी वतनाची कागदपत्रे आहेत. ही कागदपत्रे फार्सी असून त्यामध्ये वतनाच्या सनदा, खरेदीखते, महजरनामे इत्यादींचा समावेश आहे. विशेष म्हणजे सतराव्या शतकाच्या प्रारंभापासून ते एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभापर्यंतच्या कालखंडातील ही कागदपत्रे आहेत. मध्ययुगीन भारताच्या सामाजिक आणि आर्थिक इतिहासावर प्रकाश टाकणाऱ्या अनेक बाबी या कागदपत्रांतून स्पष्ट होतात. वतनदारी आणि जहागिरी पद्धतीच्या अभ्यासास उपयुक्त ठरतील अशी काही पत्रे आहेत. हीं मूळ फार्सी कागदपत्रे चाळीसगावचे अभ्यासक कै. गो. रा. पाडळकर यांनी काळजीपूर्वक अभ्यास करून त्यातील निवडक कागदपत्रांचे मराठीत रूपांतर केले. स्वतः कै. पाडळकर यांनी या कागदपत्रांच्या संदर्भात एक अभ्यासपूर्ण टिपणही तयार केले. तथापि अनेक वर्षे काही ना काही कारणांमुळे ही कागदपत्रे प्रकाशित होऊ शकली नाहीत. आज तो योग येत आहे. मराठी रूपांतराबरोबर मूळ फार्सी पत्रे छापण्याचा विचार होता. परंतु त्यासाठी छपाईचा खर्च व मुद्रणाच्या अडचणी लक्षात घेऊन तो विचार स्थगित करावा लागला. तथापि मूळ फार्सी कागदांच्या झेरॉक्स प्रतींची एक फाईल मुद्दाम तयार करून घेतली आहे. अभ्यासकांना आवश्यकता वाटेल तर मूळ पत्रे पाहता यावीत म्हणून रूपांतरित पत्रांचे क्रमांक मूळ पत्रांवर देऊन ठेवले आहेत. खानदेशच्या सामाजिक व आर्थिक इतिहासाला ही कागदपत्रे निश्चितच उपयुक्त ठरतील.

राजवाडे संशोधन मंदिर, धुळे येथील परगणे एरंडोलच्या देशमुखी वतनाच्या जुन्या फारसी सनदा व इतर कागद-पत्रें.

भाषांतरकार – **कै. गो. रा. पाडळकर**
शिक्षक हायस्कूल, चाळीसगाव.

वरील आशयाचे फारसी भाषेत लिहिलेले एकूण कागद २० आहेत. त्यांचा तपशील येणेप्रमाणे : —

(१) वतनाच्या सनदा ७ (२) सरकारी रकमा भरणा केल्याच्या पावत्या ७ (३) खरेदी खते : घरांचे ४ व वतनाचे १ (४) महजरनामे १ + १ स्वतंत्र.

कालमर्यादा :—

ह्या कागदांचा कालावधी सन १०३७ हिजरी ते सन १२१९ हिजरीचा आहे. म्हणजे तो १८२ वर्षांचा आहे. आरंभ शहाजहानाच्या कारकीर्दीपासूनचा आहे. पहिली सनद ज्या साली शहाजहान गादीवर बसला त्या सालची आहे. इ. स. १६२७ ते इ. स. १८०४ पर्यंतच्या काळातील ह्या सर्व कागदांत पाच पिढ्यांचा उल्लेख सापडतो. त्यांची वंशावळ खालीलप्रमाणे आहे :—

- कानोजी
  - यशवंत
    - किशनाजी
      - खंडोजी
  - हिरजी
    - मुरारजी
      - घनश्याम
      - मुधोजी
        - चंडीदास
    - रामजी

घराण्यातील कर्त्या पुरुषांसंबंधी :—

शहाजहान आणि औरंगजेबाच्या काळातले कागद १५ आहेत. औरंगजेबाच्या कारकीर्दीच्या नंतरचे कागद फक्त पाच आहेत. इ. स. १७०७ ते इ. स. १८०४ च्या या एका शतकाच्या काळात संग्रहित कागदांची संख्या फक्त पाचाची आहे यावरून देशमुखी वतनाबद्दल विशेष काही घडामोडी झाल्या नसाव्यात असे मानण्यास काही हरकत नाही. सन २० जुलूसची (क्रमांक ९) पावती व सन २२ जुलूसची (क्रमांक १०) पावती पाहिली म्हणजे कळते की कानोजी मूळपुरुषाचा मृत्यू केव्हातरी या दोन वर्षांत झाला आहे. (म्हणजे इ. स. १६४७ ते १६४९ च्या दरम्यान) नंतर हिरजीची वतनावर नेमणूक झाली. कानोजीचा वडील मुलगा यशवंत होता. तो लवकरच वारला. त्याचा मुलगा किशनाजी यास वतन मिळाले, हिरजी व किशनाजी चुलते-पुतणे कारभार पाहू लागले. पण यशवंतच्या नावे सरकारी रक्कम बाकी निघाली. सरकारी हुकमान्वये किशनाजीकडून वतन काढून घेण्यात आले व हे सगळे वतन हिरजी यांना

मिळाले. (सनद ८ जुलूस क्रमांक १३) हिरजी बरेच दिवस कामावर होते. ह्यांचा मृत्यू सन ४२ जुलूसच्या थोडे दिवस अगोदरचा असावा. त्यांची मुले मुरारजी व रामाजी होते. एक जाहिरनामा काढून त्यांच्या नावे वतन कायम झाले (जाहिरनामा सन ४२ जुलूस क्रमांक ३५) हिरजीची कारकीर्द लोकप्रियतेची गेली. त्यांच्या मुलांबद्दल देखील लोकमत अनुकूल होते. ह्या मजकुराच्या जाहिरनाम्यावर त्या वेळच्या सर्व सरकारी अधिकाऱ्यांच्या सह्या आहेत. हिरजी देशमुख फार कर्तबगार व समंजस इसम असावेत असे वाटते. त्यांनी आपल्या पुतण्याकडून वतन आपल्या नावे करून घेतले पण भांडणे वाढविली नाहीत. आपल्या पुतण्यास व त्याच्या मुलांनातवांस काही भाग ते पोचवीत असावेत. मधून मधून कागदोपत्री ह्या वारसांचा उल्लेख होतो. मुसलमान अधिकाऱ्यांवर स्वतःची छाप त्यानी चांगलीच बसविली असावी. सरकारी देण्याचे ओझे त्यांनी मुळीच ठेवले नाही उलट यशवंत (कानोजीचा मुलगा) याने ते ठेवले होते. व म्हणूनच या थोरल्या पातीतून सारे वतन धाकट्या पातीकडे गेले.

हिरजीची कर्तबगारी आणखीही एका गोष्टीवरून सिद्ध होते. त्यानी कसबे उतरणच्या हद्दीत मापुरा या नावाचे एक गाव वसविले. तेथे आठवडे बाजार सुरू केला. औरंगजेब बादशहाने खुश होऊन त्यांना ह्या गावचे कुळकर्णी वतन दिले, व बाजार सुरू केल्याबद्दल काही हक्क दिले. ही सनद सन २९ जुलूसची आहे. (क्रमांक ५)

हिरजीच्या नंतर ही प्रथा मोडकळीस आली. त्यांची मुले इतकी दक्ष नव्हती. त्यांच्याकडून सरकारी देणे वेळेवर भरले जात नव्हते. त्यांच्याकडे सरकारी अधिकाऱ्यांचा तगादा राहत असे. शेवटी कोणत्यातरी त्रयस्थाच्या मार्फत रक्कम वसूल होऊन ती भरली जात असे. (पावती सन १८ जुलूस क्रमांक १६) हिरजीची मुले मुरारजी व रामजी. पुढे मुरारजीची मुले घनश्याम व चंडीदास यांच्या कारकीर्दीतले कागद अगदीच नाहीत. फक्त एक कागद आहे व तो सन १८ जुलूसच्या पावतीचा (क्रमांक १७). मुधोजीचा मुलगा चंडीदास कारभार पाहू लागल्याचा उल्लेख प्रथम सन ११९८ फसलीच्या कागदात आहे. फसली सन ११४५ ते ११९८ च्या ५३ वर्षांत एकही कागद दफतरी नसावा हे संभवत नाही. संशोधन होणे जरूर आहे. चंडीदास हा धाकट्या भावाचा मुलगा. देशमुखीचे वतन ह्यास मिळाले. वडील भावाच्या मुलास हे वतन का नाही मिळाले ? संशोधनाचा हा मुद्दा येथे आहे.

चंडीदास आपले पूर्वज हिरजी यांचे प्रमाणेच होतकरू देशमुख झाले. त्यांनी जुन्या वतनात भर घातली. मुकद्दमीच्या वतनाचा आर्धा वाटा विकत घेतला. (खरेदीखत सन १२१२ हिजरी क्रमांक १९) एक घर विकत घेतले. व शहराच्या तटबंदीचा दरवाजा बांधून घेतला. सन १२१४ फसलीत फार मोठा दुष्काळ पडला होता. धान्य एका रुपयास एक शेर मिळणे देखील कठीण झाले होते. ह्याच वेळी त्यांनी घर खरेदी

घेतले. ह्यानंतरच्या माहितीची कागदपत्रे उपलब्ध नाहीत.

परगणे एरंडोलच्या देशमुखीच्या वतनाचे मूळ पुरुष कानोजी. खानदेशात देशमुख नेमण्याची व्यवस्था मोगल बादशहांनी सुरू केली. खानदेशात मोगल अंमल शहाजहानाच्या पूर्वी होता. पण संपूर्ण राजकीय अंमल शहाजहानाच्या कारकीर्दीच्या अगदी आरंभापासूनच झाला. म्हणून एरंडोलचे पहिले देशमुख कानोजी होत. शहाजहान बादशहाने येथील स्थानिक अधिकाऱ्यांच्या शिफारसीने कानोजीस देशमुखीची सनद व फर्मान दिला. (सन १०३७ हिजरी क्रमांक १) नंतर ११ वर्षांनी त्यांना आणखी एक मोठी सनद दिली. ह्या सनदेत परगणे एरंडोल व कसबे धरणगावच्या देशमुख्या दिल्याचा उल्लेख आहे. कानोजीचा मुलगा हिरजी याजकडे फक्त परगणे एरंडोलची देशमुखी राहिली. धरणगावची का नाही राहिली ? कोण जाणे ? पण धरणगावची देशमुखी सन १०७९ हिजरीत म्हणजे इ. स. १६६८ त मावजी नावाच्या एका इसमास दिल्याची सनद आहे. (महजर स्वतंत्र क्रमांक २१) एरंडोलचे घराणे व धरणगावचे घराणे यांच्यात कोणता संबंध होता हे ठरविणे जरूर आहे.

देशमुखी वतनाच्या सनदा देण्याचा अधिकार जरी संपूर्णपणें सार्वभौम बादशहाच्या मुख्य प्रधानाचा होता, तरी शिफारस करणे सुभेदारांच्या हाती असे व ह्या सुभेदाराकडे शिफारस करण्याचे काम जहागीरदार व फौजदार यांचे असे. देशमुखांना ह्या सर्व अधिकाऱ्यांना खुश ठेवावे लागत असे. एकानंतर दुसऱ्या देशमुखाची नेमणूक वंशपरंपरेने होत. ही नेमणूक जहागीरदार करीत अथवा महजर (जाहिरात) लावून होत असे. काही थोडा फेर-बदल करणे असल्यास तो जहागीरदार करीत. देशमुखांचे मुख्य काम परगण्याचा सरकारी सारा वसूल करून तो जहागीरदारांच्या कचेरीत भरणा करावयाचे असे. या कामी त्यांना देशपांड्यांची मदत मिळत असे. देशमुखांनी दर वर्षी वसूल किती गोळा करावा याचा अंदाज आगाऊ होत असे व त्यास ' अर्ज़् करार ' असे म्हणत. देशमुखांना वेतन कोणते होते ? याचा खुलासा या कागदात होत नाही. इतरत्र करणे जरूर आहे. पण एके ठिकाणी एरंडोलच्या देशमुखांना पन्नास बिघे जमीन इनाम दिल्याचा उल्लेख आहे. (ता. ११ जुलूस क्रमांक ६).

सनदांतील मोहरा, सरकारी अधिकाऱ्यांचे खिताब व सनासंबंधी :

देशमुखीच्या मूळ सनदेवर शहाजहान बादशहाची एक मोहोर आहे. तिच्यात हिजरी सन १०३७ असून जुलूस सन एक आहे. तेथेच एक वाक्य आहे. ते असे :—

" ईश्वराच्या कृपेने व त्याच्या आश्रयाने सन एकात मुमताज-महल शहाजहानची सहचारिणी झाली. " हे वाक्य घालण्याचा काय हेतू असावा न कळे. शहाजहानाचे मुमताजवरचे प्रेम सर्वश्रुतच आहे. त्याचेच तर हे द्योतक नसेल ना ? दुसऱ्या एक सनदेत एक चौकोनाकृती मोहर आहे. त्यात चारी बाजूंस आठ वर्तुळे आहेत. प्रत्येक

वर्तुळात तैमूरपासून ते शहाजहानपर्यंतच्या आठ बादशहांची नावे आहेत. जणू वंश–वृक्ष. मध्यावर बादशहाचे ह्या वेळेचे मुख्य वजीर नबाब शहाबुद्दीन यांचे नाव व शहाजहान बादशहाचे नाव आहे. ह्याच सनदेत आणखी तीन ठिकाणी 'अफझलखान मुख्य प्रधान' हे नाव असून त्यांना बहुमानाचे अनेक खिताब आहेत. (जुलूस सन ११ क्रमांक २) ह्या सनदेचा जुलूस सन ११ आहे म्हणजे इ. स. १६३८. तर मुख्य प्रधानाचे खरे नाव ह्या दोहोपैकी कोणते असावे ? ह्या सनदेच्या शेवटी अनेक शेरे आहेत व अनेक तारखा आहेत. म्हणून वाटते की दफ्तरी कामाचा त्या वेळेचा साचा व्यवस्थित होता. एका विशिष्ट पद्धतीने सर्व काम चालत होते. आणखी एक सनद सन २२ जुलूसची आहे. तिच्यावर 'बादशहाचे चिन्ह' असे म्हटले आहे. यावरून काही सनदांवर बादशहा स्वतः आपली काही खूण करीत असावे असे अनुमान निघते. ह्या सनदेत 'मुराद बख्श शहाबुद्दीनचा मुलगा' असे एक नाव आहे. मुख्य वजीर शहाबुद्दीनच्या नंतर त्याचाच मुलगा मुख्य वजीर झाला की काय ?

प्रांतातील सरकारी हुद्देदारांचे ठराविक खिताब दिसून येतात. त्या खिताबाच्या कोष अर्थाशी व प्रत्यक्ष हुद्द्याशी मुळीच मेळ बसत नाही. विजारत पनाह हा खिताब सर-सुभ्याचा, इमारत पनाह हा जहागीरदाराचा, रफअत-पनाह हा तहसीलदाराचा व खादिम-शरा हा काजीचा असे ठरवावे लागते.

तारखा व सन नक्की ठरविण्यात फार सावधगिरी ठेवावी लागते. जुलूस सन असला तर हिजरी सन नसतो व केव्हा केव्हा याच्या उलट असते. फसली सन देण्याचा प्रयत्न औरंगजेबानंतर सरसकट सुरू झाला. तत्पूर्वीच्या कागदांवर जुलूस सन बहुतेक आहेत. मोहरेतले सन त्या व्यक्तीने पदाधिकार घेतला त्या सालाचा असतो. म्हणून बराच गोंधळ झाल्याखेरीज राहत नाही.

इतर : खरेदीखते फार व्यवस्थित असत. विशेषतः दस्तावेज पंचांच्या बैठकीत लिहिले जात, व रक्कम त्या सभेत तेथे समक्ष दिली जात. हल्लीच्या नोंदणीप्रमाणे. पण सरकारी स्टँपची रक्कम मात्र भरावी लागत नसे. साक्षीदारांच्या सह्या घेण्याची जरूर नसे. विकलेल्या वस्तूंची संपूर्ण माहिती तपशीलवार दिली जात असे. खरेदी घेणारा व देणारा यांची प्रत्येकी तीन पिढ्यांची नावे लिहिली जात. हल्ली उपनावांनी ही उणीव भरून निघते आहे.

चाळीसगांव
७-४-१९४४

(१)

ईश्वर सर्वश्रेष्ठ आहे.

अरबी मजकूर	ईश्वराच्या कृपेने व त्याच्या आश्रयाने सन १०३७ एकांत मुमताज-महेल शाह-जहानाची सहचारिणी झाली.

परगणे एरंडोल सुभा खानदेशचे सर्व लोक व सर्व आजी माजी अधिकारी यांना कळावे की परगणे मजकुरची देशमुखी फार जुन्या काळापासून कानोजीकडे चालत आली आहे. पण सूर्याजीने जबरीने हे वतन स्वतःच्या ताब्यात घेतले. नंतर असे कळाले की सूर्याजी मरण पावला. ह्या परगण्याच्या देशमुखीचे वतन पूर्ववत् कानोजीकडे कायम समजावे. ह्या वतनात त्यांचे कोणी वाटेकरी नाहीत असे समजावे... कानोजीने परंपरेने चालत आलेल्या रिवाजाप्रमाणे आपले वतन सांभाळावे. तेथील प्रजेशी व राहणाऱ्या लोकांशी प्रेमाने वागून त्यांना उपकृत ठेवावे. परगण्याच्या वस्तीची रोजरोज वृद्धी होईल असे उपाय करावे. सरकारी बाबींचे उत्तम रक्षण करावे. एका रुपयाचे देखील नुकसान करून घेऊ नये ह्या हुकमाची अंमलबजावणी जरूर व्हावी. या विरुद्ध वागू नये. तारीख १६ माहे मेहेर सन ......

[ईश्वराच्या कृपेने व त्याच्या आश्रयाने सन एकांत मुमताज-महेल शाहजहानाची सहचारिणी झाली.]

(२)

ईश्वर सर्वश्रेष्ठ आहे

विजय असो | हे ईश्वर

मीरान शाह	अमीर तैमूर		जहांगीर बादशाह	अकबर बादशाह
सुलतान महंमद मुराद	१०३७ नवाब अबुजमुजफ्फर शहाबुद्दीन महंमद साहेब फरान खानी शाहजहान बादशाह विजयी			हुमायून बादशाह बाबर बादशाह
सु	लतान	अबु	सईद	उमर शेख मिर्झा

हे रक्षक | हे अन्नदात्या

नवाब शहाबुद्दीन अबुल मुजफ्फर
महंमद साहेब फरानखानी यांचा फर्मान

परगणे उतराण सुभा खानदेशच्या सर्व लोकांना बादशहाची कृपा म्हणून कळावे की कानोजी दरबारात आले व त्यांनी हुजुरात विनंति अर्ज केला की परगणे मजकुरची देशमुखीचे वतन स्वतंत्रपणे कोणाचाही वाटा न ठेवता माझ्याकडे फार दिवसापासून आहे. परगणे मजकुरचे जहागिरदार व सर्व लोक माझ्या अधिकाराने संतुष्ट आहेत. म्हणून बादशाही हुकूम झाला की वरील कारणामुळे परगणे मजकुरची देशमुखी पूर्ववत अर्जदाराकडे रहावी. यात कोणाचा वाटा नसावा. प्रजेने व जहागीरदाराने असेच खुश असावे. कोणीही जबरीने अथवा अनधिकाराने सनदेखेरीज दखल देऊ नये. हुकमाच्या विरुद्ध वागू नये. तारीख १४ माहे फरवरदी सन ९ जुलूस अथवा ता. २२ माहे शव्वाल सन १०४५ हिजरी.

सेवक अफजलखान यांच्या मार्फत.

(३)

ईश्वर सर्वश्रेष्ठ आहे

[तू विजयदाता आहेस]
हे विजयदात्या

[तू सर्वश्रेष्ठ आहेस]
हे सर्वश्रेष्ठा

मीरान शहा	अमीर तैमूर	जहांगीर बादशहा	अकबर बादशहा
सुलतान महंमद मुनीर	१०३७ नवाब अबुलमुजफ्फर शहाबुद्दीन महंमद साहेब फरान खानी विजयी बादशाह शाहजहान		हुमायून बादशहा
सुलतान अबुसईद	उमर शेख मिर्झा		बाबर बादशहा

हे अन्नदात्या
[तू अन्नदाता आहेस]

हे रक्षका
[तू रक्षक आहेस]

नवाब शहाबुद्दीन अबुल मुजफ्फर
महंमद साहेब फरानखानी यांचा हुकुम (फर्मान)

बादशहांचे सेवेशी असे श्रुत झाले की (इमारत पनाह) रशीदखान यांनी परगणे एरंडोल व कसबे धरणगावची देशमुखी कानोजीच्या नावे नेमली आहे. आणि त्या-बद्दल पंचवीस हजार रुपये पेशकश (नजराणा) नेमला आहे. ही रक्कम दर वर्षी पाच हजार रुपयांप्रमाणे पाच वर्षांत बादशाही खजीन्यात दाखल करावी असे ठरविले आहे. म्हणून बादशाही हुकुम झाला की वरील महालाच्या देशमुखीचे वतन इमारत पनाह यांनी ठरविलेल्या कराराप्रमाणे वरील इसमाच्या नावे सन ११ च्या आरंभा-पासून नेमले गेले आहे. कानोजी यांनी वरील खिदमतीचा मानपानासुद्धा उपभोग घ्यावा. त्यांनी शेतीची वाढ करावी. आपल्या महालाची वस्ती वाढवावी. आपल्या प्रजेच्या सुखसोयीकरिता झटावे. यात मुळीच दुर्लक्ष करू नये. सरकारी रीति-रिवाज व

उत्पन्नाच्या बाबी वाया घालवू नयेत. असेच वागावे की ज्यामुळे ह्या सर्व बाबींचे अवश्य रक्षण होईल. सर्व सरकारी अधिकारी, सर्व जहागीरदार, सर्व मुत्सद्दी व विद्यमान व माजी सर्व नोकर यांनी हा बादशाही हुकुम मान्य करावा. ह्या हुकमान्वये यांना ह्या महालाचे देशमुख मानावे. त्यांच्या सरकारी कामांच्या अंमलबजावणीत मान्यता द्यावी. वरील महालाच्या शेतकऱ्यांनीं व प्रजेने यांनीं आपले देशमुख समजावे आणि त्यांच्या विचाराच्या विरुद्ध वागू नये. त्यांचा हुकुम मान्य करावा. तारीख १५ माहे सफर सन ११ जुलूस.

शेरा : ता० २ माहे जीकाद सन ११ जुलूस रोज शुक्रवार सन १०४७ हिजरी ता० २९ माहे इस्फींदार. मुख्य प्रधान अफजल खान यांच्या छावणीत (मुख्य प्रधानाचे खिताब असे – इफादत व इफामत पनाह, इकबाल व इजलाल दस्तगाह, उमदतुल मुल्क, रुकनुल सलतनत्, इनामुल आलिया, एतमादे खिलाफत व फरमान खानी, एतकोद सलतनत् व किशावर कुशाय, मुन्तजमे अखूरे शाहिनशाही, मखजने असरार, खलोफा इन दस्तूरे मुअजम, वजीरे आजम, हमीदतुल मुल्क, मदारूल महामी, गुलामे जहानी, अफजलखान सय्यद महंमद अलहुसेनी चिटणीस (शेरा लिहिणार) यांनी असा अर्ज केला कीं इमारत पनाह रशीदखान यांनी परगणे एरंडोल व कसबे धरणगावची देशमुखी कानोजी यांना दिली आहे. व असा कौल केला आहे की जर कानोजीच्या नावे देशमुखीची सनद दिली गेली तर पंचवीस हजार रुपये नजराणा (पेशकश) सरकारात जमा करावा. ही रक्कम भरणा करण्याची मुदत पाच वर्षांची आहे व दर वर्षी पाच हजार रुपये सरकारी खजीन्यात जमा होत जावेत. या बाबतीत हरकत होऊ नये सार्वभौम बादशहा यांचा हुकुम झाला की इमारत पनाह रशीदखान यांच्या तजवीजीप्रमाणे परगणे एरंडोल व कसबे धरणगावच्या देशमुखीचे वतन सन ११ च्या रब्बीच्या हंगामापासून कानोजीस देण्यात आले आहे व असाही हुकुम दिला आहे की सर्व प्रधानांनी ठरविल्याप्रमाणे नजराण्याची सर्व रक्कम सरकारात जमा करून घ्यावी. देशमुखीच्या वतनाची शर्त अशी की त्यांनी त्यांच्या परगण्याच्या वस्तीची वाढ करावी. प्रजेच्या कल्याणाची जी कामे असतील ती पार पाडण्यात मुळीच कसूर करू नये व सर्व प्रकारे परगण्याची उन्नती व्हावी. ह्या शेऱ्यावर मान्यतेची सही झाली – सहीचा शेरा हमीदतुल मुल्क मदारुल महामी (मुख्य प्रधान) व शेरा की कैफीयत लिहावी— कैफीयत लिहिलेली दुरुस्त आहे. अवलोकन केली. हमीदतुलमुल्क.

इमारत पनाह मनसबखान यांचा शेरा ता० १६ माहे जिल्हेज सन ११ जुलूस सन १०४७ हिजरीचा असा की मुख्य प्रधान अफजल खानांच्या हुकमान्वये फर्मान लिहिण्यात यावा.

नाजमे मुल्क व माल, नवाब उमदतुल मुल्क, मदारुल महाम अफजल-खान यांच्या कृपे वरून.

(१) ता० १३ माहे रब्बीलावल सन ११ जुलूस अथवा ३ माहे अमरदाद सन १०४८ रोजी सनद लिहिली गेली समक्ष दाखविली गेली व नक्कल मुख्य प्रधानाच्या दफ्तरी रवाना केली.

(२) ता० १६ माहे रब्बीउलसानी सन ११ जु० नक्कल दरबारी पोचली व सदर दफ्तरी मुहर होण्यास रवाना झाली. ता० ४ माहे शहरेवर सन १०४८.

(३) ता०२३ माहे रब्बीउलसानी सन ११ अथवा ११ शहरेवर सन १०४८ रोजी नक्कल चौकशी दफ्तर मध्ये रवाना झाली.

(४) ता० ६ जमादिलसानी सन ११ जुलूस व सन १०४८ रोजी शेऱ्याच्या कैफियतीप्रमाणे बादशाही फर्मान लिहिला गेला.

(५) ता० १२ माहे जमादिलसानी सन १२ बख्शींच्या कचेरीतून जाहिरात झाली व लेखकाच्या बरोबर सनद रवाना झाली.

(६) ता० ३ माहे रज्जब सन १२ रोजी दफ्तरी सनदेची तपासणी झाली.

(७) ता० ४ माहे रज्जब सन १२ अथवा ता० १९ माहे आबान सन १०४८ रोजी सनद सय्यद जवालजा यांच्या दफ्तरी रवाना.

(८) ता० ५ माहे रज्जब सन १२ अथवा सन १०४८ हिजरी रोजी नक्कल आवक मध्ये नोंदली गेली.

(४)

बिस्मिल्ला अर्रहमान निर्रहीम्

शहाजहान बादशहा यांचे सेवक शहाबुद्दीन महंमदुल मुजफ्फर यांचा फर्मान

सुलतान बादशहा गाजी (वीर) यांचे चिन्ह

१०४९
शहाबुद्दीन महंमद
साहेब यांचे मुलगे
मुरादबख्श फरानखानी
शहाजहान बादशहा गाजी

श्रेष्ठ
सर्वश्रेष्ठ

हल्ली बादशाही चिन्हाचा हुकूम आला आहे की परगणे एरंडोल व परगणे उतराणची देशमुखी जुन्या फरमानान्वये कानोजीकडे नेमली गेली आहे आणि नबाब साहेबांच्या हुकमान्वये उतराणची देशमुखी अबदुलहक नव-मुसलीम् (मुसलमान झालेला) तिसऱ्या हिश्शाने नेमली आहे. पैगंबरवासी इस्लामखान यांनी व शाहनवाजखान यांनी त्यांच्या फर्मानात कानोजी यांना देशमुखी बहाल केली आहे. व त्याप्रमाणे त्यांना सनद दिली आहे. म्हणून बादशहा यांनी परगणे उतराण व एरंडोलची देशमुखी कानोजी यांच्याकडेच चालू ठेविली. दोन्ही परगण्याचे सर्व लोक व आजी माजी अधिकाऱ्यांनी कानोजी यांना तेथील देशमुख मान्य करावे. देशमुखीचे सर्व हक्क त्यांना द्यावे. व त्यात काही फेरबदल करू नये. देशमुखांनी जहागीरदारांना व प्रजेला प्रेमळपणे वागवून खुश ठेवावे. सरकारी उत्पन्नाच्या सर्व बाबी सुरक्षित ठेवाव्यात. व स्वतःला वरील सर्व शर्ती व जुन्या सर्व शर्तींच्या अन्वये देशमुख समजावे. ह्या बाबतीत कडक ताकीद समजावी व त्या विरुद्ध मुळीच वागू नये.

ता० १५ माहे रब्बीउलसानी सन २२ जुलूस.

अब्दुल लतीफ सवक यांच्या छावणीतून

अबदुल
लतीफ सेवक
शाहजहान

(५)

बिस्मिल्ला अलरहमान निर्रहीम
अबुलमुजफ्फर शहाबुद्दीन महंमद इबन् साहेब
यांच्या फर्मानावरून

अल्लाहु अकबर १०६१ महंमद इबन् साहेब फरानखानी औरंगजेब बहादुर २५	अरबी मजकूर

बादशाही हुकूम झाला आहे की कानोजी देशमुख परगणे एरंडोल सुभा खानदेश यांनी सरकारी हुकमावरून कसबे उतराणच्या हद्दीत मापुरा नावाचे गाव वसविले व शिवाय तेथे बाजार सुरू केला. त्यांच्या नंतर त्यांची मुले यशवंत व हिरजी यांनी दरबारी येऊन पुरा व हाट (बाजार) वसविल्याचे व चालू असल्याचे वृत्त विदित केले म्हणून त्यांच्यावर सरकारची कृपा झाली व तेथील कुलकर्णीपणाचे व मुकद्दमीचे वतन त्याच्यात कोणाचा वाटा न ठेवता त्यांच्या नावे नेमण्यात आले. तेथील जहागिरदारांनी व सरकारी आजी व माजी अधिकाऱ्यांनी यांना तेथील कायम पटवारी (कुलकर्णी) समजावे. देशमुख व देशपांड्यांनी त्यांच्या सल्लेने काम करावे. कुलकर्णी मजकुरांनी नेहमी सरकारचे हित व प्रजेचे कल्याण करण्यात दक्ष असावे. खाली दर्शविल्याप्रमाणे हक्क मिळवावेत. बाजाराची व्यवस्था व पुऱ्याचा बंदोबस्त इतका उत्तम ठेवावा कीं त्यांची भरभराट स्पष्ट दिसावी. आपल्या हाताखालच्या लोकांना सलोख्याने वागवावे व त्यांना नेहमी आनंदी व संतुष्ट ठेवावे. जुन्या हक्कांच्यावर मागणी करू नये. व ह्या बादशाही हुकमाची अंमलबजावणी करण्याचा मनःपूर्वक प्रयत्न करावा. या बाबतीत कडक ताकीद समजावी. ता. १७ माहे रमजान सन २९.

यशवंत व हिरजी देशमुख कानोजी देशमुखाची मुले यांना मिळणारे हक्क :

रोजी– एक शेर तेल, खळ ५ शेर, विड्याची पाने २५.

बाजाराचे दिवशी – चुंगी आणि भाजी.

पांढरीच्या लोकांनी पायली मागे चार भट्टू.

मुलतफितखान यांच्या रिसाल्यात हुकुम मिळाला.

(६)

नक्कल : वाचणाप्रमाणे

ता. १७ माहे जिल्हेज सन ११ जुलूस अथवा ११ फरवर्दी सन १०४७ हिजरी मुख्यप्रधान यांच्या छावणीतून चिटणीस (लेखक) माधवदास यांनी लिहिले की सरकारी हुकुम झाला की कसबे धरणगाव परगणे एरंडोल येथील पन्नास बिघे पडित जमीन पण बागेस उपयोगी पडेल अशी रब्बीच्या हंगामाच्या आरंभापासून कानोजी देशमुख परगणे एरंडोल यांना बाग करण्याकरिता इनाम देण्यात यावी. ह्या हुकमाप्रमाणे सनद लिहिली गेली. दाखल ता० ८ माहे जिकाद सन ११ जुलूस अथवा सन १०४७ हिजरी. हुकमान्वये लेख दिला गेला.

सहीचा शेरा – : मुख्य-प्रधान (विजारत व इकबाल पनाह, मदारुल महाम) यांच्या सहीचा शेरा की छावणीत कैफीयत द्यावी. पन्नास बिघे पडित जमीन बागेस लायक.

सहीचा शेरा की ता. ७ माहे मुहर्रम सन ११ जुलूस अथवा सन १०४७ हिजरी रोजी सरकारात अर्ज पावला.

नक्कल : [मागील बाजूस]

ता. १७ माहे जिल्हेज सन ११ जुलूसचा बादशाही चिन्हाचा हुकूम :–

बादशाही चिन्हाचा फर्मान (हुकुम) असा की कसबे धरणगाव परगणे एरंडोल येथील पन्नास बिघे पडित जमीन बागेस उपयोगी पडेल अशी रब्बीच्या हंगामाच्या आरंभापासून कानोजी देशमुख परगणे एरंडोल यांना बाग करण्याकरिता इनाम देण्यात यावी. परगणे मजकुरच्या सर्व अधिकाऱ्यांनी, व आजी माजी सरकारी नोकरांनी यांना ही जमीन इनामी समजावी. यात रदबदलीचा अधिकार नसावा. ह्या जमिनीच्या उत्पन्नावर सरकारी नजराणा, हक्क, मान-पान, पेशकार व दारोग्यांचे कर, गावकरी अधिकारी व मुकद्दम यांचा हक्क, व फौजेतील अथवा दिवाणी खात्यातील नोकरांचा खर्च यांपैकी कोणत्याही बाबीचा बोझा नसावा. या बाबतीत कडक ताकीद समजावी. व हुकमाच्या विरुद्ध वागू नये. तारीख मजकूर.

(७)

भरणा केल्याची पावती

ईश्वर सर्वश्रेष्ठ आहे

मुबारक खजिनदार सुभा दक्षिण यांची पावती की तारीख एक माहे जीकाद, सन १७ च्या कराराप्रमाणे कानोजी देशमुख परगणे एरंडोल यांनी परगणे एरंडोल व उत्राणच्या नजराण्यापैकी सरकारी खजिन्यात रक्कम दाखल केली. नऊशे नऊ रुपये शाहजहानी वसूल तारीख १३ माहे जीकाद सन १७ जुलूस पावती लिहिल्याची तारीख १४ माहे जीकाद सन १७ रक्कम रुपये ९०९ शाहजहानी.

(८)

पावती

मुबारक खजिनदार खजिना सरकारी यांची पावती की तारीख एक माहे जमादील उ. अव्वल सन २० च्या कराराप्रमाणे कानोजी देशमुख परगणे एरंडोल व उत्राण यांनी परगणे एरंडोल व उत्राणचा नजराण्यापैकी महंमद रशीद याने जी रक्कम वसूल केली ती पाठवली व ती मुबारक खजिनदार सुभा यांनी कानोजीचे पुतणे रंभाजी यांचे मार्फत सरकारी खजिन्यात दाखल केली. रक्कम रुपये पाचशे शाहजहानी तारीख ११ माहे जमादीलावल सन २० जुलूस.

मोहर मुबारक जवान

(९)

पावती

मुबारक खजिनदार खजिना सुभा दक्षिण यांची पावती की तारीख १० माहे जिल्हेज सन २० च्या कराराप्रमाणे कानोजी देशमुख यांनी ज्या काही रकमेचा भरणा केला ती सरकारी खजिन्यात दाखल केली. रक्कम रुपये पाचशे सहा रुपये आठ आणे व अर्धा पैसा. पावती लिहिल्याची तारीख १६ माहे जिल्हेज सन २० जुलूस.

सहीचा शेरा : ता० १० माहे जिल्हेज सन २० चा शेरा की तपासणी केली.

मुख्य प्रधान (विजारत व एकबाल पनाह मदारुल महाम)

(१०)

नक्कल :

शेख महंमद सालेह अमीन (फौजदार) परगणे तुर्काबाद वगैरे यांच्या मोहरेचा लेख

ता० एक रमजान सन २२ जुलूम का — हिरजी व किशनाजी देशमुख कसबे एरंडोल यांना कळावे की, नवाब साहेबांकडून असा मजकूर लिहून आला आहे की सदरेतून सरकारी नजराण्याची रक्कम तीन हजार रुपये आकारून आली आहे व ती त्यांना रूसूम व इनाम या बाबतीत वसूल झाली आहे. म्हणून त्याबद्दलचे व त्या रकमेचे दस्तावेज नवाब साहेबांकडे देण्यात आले. जर आणखी त्या रकमेची व दस्तावेजाची मागणी झाली तर बातल समजावी. या बाबतीत आपण पूर्णपणे विसंबून असावे. लिहिले तारीख मजकूर.

बुऱ्हाणअलीच्या मोहरेने याची नक्कल दिली आहे.

(११)

नक्कल :

ता० १० माहे रब्बीलावल सन २६ जुलूसचा बुऱ्हाणपुरच्या सरकारी नोकरांच्या मोहरेची पावती, भाऊसिंग खजिनदार खजिना बुऱ्हाणपुर यांच्या जिम्मे रक्कम बाबत सरकारी नजराणा परगणे एरंडोल की, ता० ४ माहे रब्बीलावल सन २६ जुलूसच्या करारान्वये शहर बुऱ्हाणपुरच्या खंडणीची रक्कम हिरजी देशमुख परगणे एरंडोल यांनी भाऊसिंग खजिनदार यांच्या जिम्मे सरकारी खजिन्यात दाखल केली. ही रक्कम रुस्तुमबेग तहसीलदार यांनी वसूल केली व त्याप्रमाणे सरकारी खजिन्यात जमा झाली.

रक्कम रुपये तीनशे सत्तेचाळीस अलमगीरी व सात आणे.

सहीचा शेरा : महंमद इसहाक दीवाण (विजारत व इकबाल पनाह) यांच्या सहीचा शेरा ता० ५ माहे रब्बीलावल सन २६ जुलूस की ही रक्कम भाऊसिंग खजिनदार यांच्या जिम्मे असावी. रक्कम रुपये ३४७ आणे ७ तारीख व सन मजकूर.

दाखला : भाऊसिंग खजिनदार खजिना शहर बुऱ्हाणपुर सुभा खानदेश यांनी ता. १० माहे रब्बीलावल सन २६ जुलूस रोजी सरकारी खजिन्यात रक्कम रुपये ३४७ पैसे २५ बदाखल केले. ता० १० रब्बीलावल सन २६ जु.

(१२)

खजीना शहर बुऱ्हाणपुर ता० २ माहे रज्जब सन २८ जुलूस

भाऊसिंग खजिनदार खजीना शहर बुऱ्हाणपुर बाबत खंडणीतर्फे हिरजी देशमुख करार ता० १५ माहे जमादी उलसानी सन २८ जुलूस.

हिरजी देशमुख परगणे एरंडोल यांचेकडे असलेल्या एकूण वसुलापैकी रुस्तुमबेग तहसीलदार यांनी जी रक्कम वसूल केली ती शहर बुऱ्हाणपुरच्या सरकारी खजिन्यात जमा झाली. रक्कम रुपये एकशे बारा आलमगिरी व सहा पैसे.

सहीचा शेरा : रफअत पनाह हाजी फैजुल्ला नायब सियादत (हुद्दा) व मीर अबुलफजल दीवाण यांचा की ता. ७ माहे जमादीउलसानी सन २८ ह्या दिवशी तपासणी केली व भाऊसिंगच्या जिम्मे दिली.

दाखला : शहर बुऱ्हाणपुरच्या खंडणीच्या कीर्दीत ता. २ रज्जब सन २८ रोजी-एकशे बारा रुपये व सहा पैसे भाऊसिंग खजिनदार यांच्या नावे.

(१३)

अस्सलप्रमाणे आहे. **मीर जनुल आबीदैन**

नक्कल :

ता० १० माहे रब्बीलावल सन ८ जुलूसचा विजारत व इकबाल पनाहच्या मोहरेचा परवाना (लेख)

परगणे ता. एरंडोलचे गुमास्ते, आजी माजी अधिकारी व सर्व प्रजागण यांना कळावे की कानोजीच्या नावे परगणे मजकुराच्या देशमुखी वतनाचा बादशाही फर्मान होता· यांच्या मृत्यूनंतर हे वतन हिरजी व यशवंत ह्या त्यांच्या मुलांच्या नावे झाले. त्यांनी ह्या वतनाचा उपभोग आतापर्यंत घेतला. त्यानंतर असे कळाले की कानोजीचे वडील चिरंजीव यशवंत कालवश झाले. यशवंतचे चिरंजीव किशनाजी हे व हिरजी असे दोघे देशमुखीचे वतन करू लागले. पण यशवंतच्या जिम्मे सरकारी वसूल निघाला होता म्हणून असा निकाल देण्यात आला की मृताचा वतनाचा हिस्सा यशवंतचा मुलगा किशनाजीच्या वतनाचा हिस्सा कानोजीचे मुलगे हिरजी यांच्याकडे रहावा. कारण ते वारस आहेतच. अर्थात जो काही सरकारी वसूल देणे घेणे असेल त्याबद्दल यांनी

जबाबदार असावे. आपल्या प्रजेस संतुष्ट ठेवावे. वस्ती वाढविण्याचे प्रयत्न करावेत. वंशपरंपरा जे मानपान व हक्क चालू असतील ते घेत जावेत, पण जास्त घेऊ नये.

(१४)

काजी महमद अजीमुद्दीन नायब (दुय्यम हुद्दा) यांची मोहर

मी खंडोजी वल्द रामाजी वल्द यशवंत देशमुख परगणे एरंडोल कसबा व परगणा मजकूर सहकार अशीर सुभा खानदेश कबूल करतो व शपथविधी घेऊन मान्य करतो की एक इमला घर व त्याचा एक कोपरा अडतीस खांबी व चौदा लाटी व सागवानी लाकडाने बांधलेले वर धाबे असलेले ज्याचे चौरस क्षेत्रफळ १७० एकशे सत्तर हात आहे व ज्याचे वर्णन असे आहे : घर लांबी दक्षिणोत्तर सव्वीस हात शिवाय भिंतीच्या पायाची जमीन; रुंदी पूर्वपश्चिम साडे पाच हात व शिवाय भिंतीच्या पायाची जमीन ह्याच घराच्या कोपऱ्याची दक्षिणोत्तर लांबी नऊ हात व पूर्वपश्चिम रुंदी तीन हात भिंतीच्या पायाची जमीन वेगळी; ह्या घराची चतुःसीमा खालीलप्रमाणे आहे :—

पूर्वेस : रायाजी वल्द येशवंतजी देशमुख यांची हवेली स्वतःची व लागून असलेली.

पश्चिमेस : जाधव वल्द जाओजी याचा नौबतखाना

उत्तरेस : सार्वजनिक रस्ता व एक चौक

दक्षिणेस : फौजदार कचेरीच्या चबुतऱ्याची भिंत व एक चौक.

हे घर खरेदी होण्याच्या दिवसापर्यंत स्वतःच्या मालकीचे व स्वतःच्या उपभोगाचे आहे आज हे घर मी माझ्या खुशीने व अक्कलहुशारीने कोणाची जबरी नसताना माझ्या सर्व मालकी हक्कासुद्धा व घराच्या सर्व हद्दी क्षेत्रफळासुद्धा व त्यातील सर्व लाकूड माती सुद्धा, त्याच्या आत व बाहेरच्या मार्गा सुद्धा एकशे पंचवीस रुपयाच्या किंमतीत घनश्यामजी व मुधोजी वल्द मुरारजी वल्द हिरजी देशमुख परगणे एरंडोल यांना खरेदी दिले आहे. खरेदीदार घनश्यामजी व मुधोजी यांनी पंचात येऊन खरेदीखत खरेदी देणारा कडून मान्य केले व आम्ही त्यांचे कडून खरेदीची रक्कम भरून पावलो व आमच्या ताब्यात घेतली. हे खरेदीखत दस्तावेज म्हणून लिहून दिले. जरूर पडल्यास उपयोगी पडावे.

ता० ११ माहे रज्जब सन २५ जुलूस.

(१५)

कबुलायत : [जाहीरनामा]

परगणे एरंडोल व परगणे मजकुरचे कसबे व खेडी सरकार अशीर सुभा खानदेशचे सर्व सरकारी अधिकारी व महाजन व शेट व शेतकरी व इतर सर्व लोक यांना कळावे की परगणे मजकूरची देशमुखी फार जुन्या काळा पासून बादशाही फर्मानाच्या आधारे व सांप्रतच्या जुलूसच्या (राज्याभिषेकाच्या) काळाच्या पूर्वीपासूनच्या मुख्य प्रधानांच्या हुकुमांच्या आधारे कानोजी देशमुखांच्या नावे चालत आली आहे. जेव्हा याचा मृत्यू झाला तेव्हा त्यांच्या नंतर त्यांचे मुलगे हिरजी यांनी वरील वतनाची नोकरी चालू ठेविली व त्यांच्या उज्ज्वल वागणुकीने त्यांनी सरकारास व प्रजेस संतुष्ट ठेविले. हल्ली हिरजीची मुले मुरारजी व रामाजी त्याचप्रमाणे लोकप्रियतेने आपली चाकरी करीत आहेत. म्हणून आम्ही खालील वर्गांचे लोक ह्या देशमुखावर खुश व बहाल आहोत. त्यांचे आभारी आहोत. म्हणून ही कबूलायत (जाहीरनामा) आम्ही लिहून दिला. याचा उपयोग जरूर व्हावा. तारीख एक माहे रब्बीलावल सन ४२ जुलूस

बंदा वाजीद खान ३ : १०० ::	खाकी बेग सन ११०० खाकबाय महंमद	
वाजिदखान नायब (दुय्यम) सरकार यासीनखान जहागीरदार व फौजदार कसबे धरणगाव वगैरे परगणे एरंडोल	खाकी बेग नायब गुलाम मुहियुद्दीन खान फौजदार परगणे एरंडोल	महंमद ऊनीस खान एरंडोल खान साहेबांच्या जहागिरदारातर्फे
१०९९ इख्तयार बंदा दरगाह	हरिसिंग	याकूबखान
इख्तियार आमिल अहमद फौजदार (परगणे एरंडोलचे जहागीरदार)	किशन वल्द नवाजसिंग	

(१६)

काजी महंमद अजीमुद्दीन नायब खादिम शरा ११२८	महंमद जरीफ फिदवी असफजाही

दस्तावेज लिहून देणार सय्यद युसूफ वल्द सय्यद जाफर वल्द सय्यद महंमद वकील तर्फे गुलबीबी मर्द अजीज महंमद वल्द महंमद दरयाबेग राहणार परगणे नसीराबाद सरकार अशीर सुभा खानदेश :– या कारणे की नवाब जनाब असदुल्लाखान सर सुभा यांचे वजीर दीवाण जफरखान यांनी परगणे एरंडोलच्या देशमुख व देशपांडे यांच्या जिम्मे जिल्हेदारीचा कर रक्कम रुपये पाच हजार सहाशे एकबाकी देणे काढला % व म्हणून त्यांनी देशमुख देशपांड्याच्या सह्यांचा करारनामा करून घेतला. त्यापैकी रक्कम रुपये पाच हजार पाचशे एकतीस वसूल झाली व सत्तर रुपये बाकी राहिले. ही बाकी रक्कम मुधोजी देशमुख व खंडोजी देशमुख व लीलाधर देशपांडे परगणे मजकूर यांचे पासून आम्ही सर्वच्या सर्व भरून पावलो. व ती रक्कम आम्ही आमच्या ताब्यात घेतली. वरील रकमेचे सर्व करारनामे आम्ही त्यांचे त्यांना परत केले आहेत. आत्ता या बाबतीत काही तकरार राहिली नाही. ह्या खेरीज जर आमची पक्षकार अजीज महंमद सुलतानखान यांच्या मार्फत परगणे एरंडोलचे देशमुख व देशपांड्यांच्या नावे काही जमा-खर्चाचे कागद अथवा करारनामे अथवा दस्तावेज अथवा पत्र अथवा गहाण खते अथवा कसबे धरणगावच्या हवेली बाबत काही हुंड्या आणतील तर ते सम्पूर्ण बातल समजावे. व जरी आम्ही चुकून या बाबतीत काही तंटा-भांडण केला तरी तो खोटा व म्हणून अग्राह्य समजावा. जरूर पडल्यास वेळेवर सनद असावी म्हणून आम्ही हा दस्तावेज लिहून दिला. ता. २ माहे जमादिलावल सन १८ जुलूस अथवा सन ११४५ फसली.

[% ह्या रकमेची वसुली करावयाचे काम सरकारातून अजीज महंमद व सुलतान खान यांच्याकडे देण्यात आले.]

(१७)

मोहर काजी गुलाम अहमद नायब खादिम शरा

करारनामा लिहून देणार रुधीराजी देशमुख व चंडीदास देशमुख व मल्हारजी लीलाधर देशपांडे व मळजी पाटील राहणार कसबे एरंडोल परगणे मजकूर सरकार अशीर सुभा खानदेश सप्रमाण व सशास्त्र शपथपूर्वक लिहून देतो की एक राहते घर पंचवीस हात उघड्या जागेसुद्धा असलेले व शिवाय पायाच्या भिंती असलेले व ज्याची पूर्व पश्चिम लांबी सोळा हात व ज्याची दक्षिणोत्तर रुंदी नऊ हात पायाच्या भिंती सोडून असलेले व ज्याच्यावर इमला नाही असे पुऱ्याच्या हद्दीतले कसबे सदरचे घर ज्याची चतु:सीमा खालीलप्रमाणे आहे :–

पूर्वेस : सार्वजनिक रस्ता लागून शिवाय मोकळी जागा.
पश्चिमेस : पुऱ्याची संरक्षक भिंत नंतर पडित जमीन.
उत्तरेस : लखुवल्द भीका मराठे राहणार पूरा यांच्या घराची भिंत.
दक्षिणेस : चाहोजीवल्द पेलू मराठे यांच्या घराची भिंत लागून.

वरील चतु:सीमेचे घर आमच्या मालकीचे व वडिलोपार्जित आहे. ह्या खरेदी-खताच्या दिवसापर्यंत आम्ही काबिज होतो व त्याचा उपभोग घेत होतो. आता आम्हास पुऱ्याच्या दरवाजाच्या भिंतीचा तट बांधणे भाग पडले आहे म्हणून आम्ही आमच्या संतोषाने, अक्कलहुशारीने, कोणाचीही जबरी नसताना उखावल्द रयाजीवल्द नावजी जात मराठे कूळ ताटकर यांना प्रचलित शिक्कऱ्याच्या छपन्न रुपयांत ज्याचे निमे अठ्ठावीस रुपये होतात विकले आहे. ह्या घराचे सर्व मालकी हक्क, त्याच्या सर्व हद्दी सुद्धा, त्याच्या प्रवेशद्वारासुद्धा व त्याच्या माती चिखलसुद्धा तुम्हास विकले आहेत. आम्ही खरेदी लिहून देणारांनी पंचाच्या बैठकीत खरेदीची रक्कम उखा खरेदी घेणारा-पासून पूर्ण घेतली. व ही रक्कम आम्ही पूरा शहराच्या दरवाजाच्या तटबंदीच्या खर्चास उपयोगी आणिली. आम्हास हे खरेदीखत मान्य आहे व तसेच खरेदी घेणाराने प्रामाणिकपणे खरेदी कबूल केली आहे. जरूर पडल्यास वेळेवर सनद रहावी म्हणून हा करारनामा लिहून दिला. ता. ४ माहे जीकाद सन ११९८ फसली.

(१८)

मोहर
काजी गुलाम अहमद
नायब खादिम
शरा ११९१

करारनामा लिहून देणार रुधीराजी देशमुख व चंडिदास देशमुख व मल्हारजी लीलाधर देशपांडे व वेलजी पाटील राहणार कसबे एरंडोल परगणे मजकूर सरकार अशीर सुभा खानदेश. करारनामा लिहून देतो की एक राहते घर व मौजे मजकूरचे व त्याची मोकळी जागा एकोणतीस हात, ह्या घराची पूर्व पश्चिम लांबी वीस हात व दक्षिणोत्तर रुंदी नऊ हात शिवाय भिंतीच्या पायाची जमीन वेगळी, ज्या घराची चतुःसीमा खाली दिल्याप्रमाणे आहे :–

पूर्वेस : पुऱ्याच्या तटबंदीच्या भिंतीचा पाया.
पश्चिमेस : सार्वजनिक रस्ता व एक घर.
उत्तरेस : रखमाजी वल्द गंगाजी सुतार राहणार पुरा यांच्या घराची भिंत.
दक्षिणेस : केरू वल्द तुको जात मराठा राहणार पुरा याच्या घराची भिंत.

वरीलप्रमाणे आमच्या मालकीचे व आमचे वडिलोपार्जित घर लाहोजो व महादु वल्द सावजी वल्द लाहोजी मराठे कुळ अडळ राहणार पुरा यांना विकले आहे. ह्या घरावर आमचा ताबा हे खरेदीखत झाल्या दिवसापर्यंत होता. आम्हास पुऱ्याच्या शहर तटबंदीच्या दरवाज्याचे व भिंतीचे बांधकाम करावे लागत आहे म्हणून हे घर आम्ही विकले हे घर आम्ही आमच्या राजीखुशीने, अक्कलहुशारीने व कोणाचीही सक्ती न होऊ देता विकले आहे. ह्या घराचे आमचे सर्व मालकी हक्क, त्यांच्या प्रवेशद्वाराचे व बाहेर पडण्याचे मार्ग व त्यांतील माती चिखल यावरील हक्क आम्ही तुम्हास दिले आहेत. ह्या घराची किंमत आम्ही रक्कम रुपये छपन्न प्रचलित शिक्क्याचे ज्याचे निमे अठ्ठावीस होतात भरून पावलो. ही रक्कम आम्ही पंचाच्या बैठकीत खरेदी घेणार लाहोजी व महादू यांचे कडून सगळी भरून पावलो व तिचा विनियोग पुरा शहराच्या तटबंदीच्या बांधकामी केला आहे. ह्या खरेदीखताची कबुली खरेदी घेणार व खरेदी देणार या दोघांनी सत्यतेस जागून केली आहे. म्हणून हे खरेदीखत लिहून दिले. जरूर पडल्यास वेळेवर याचा उपयोग सनद म्हणून करता यावा. ता. एक माहे शव्वाल सन ११९८ फसली अथवा १२०२ हिजरी.

(१९)

मोहर
काजी गुलाम अहमद
नायब खादिम शरा
११६२

श्रीगजानन

श्री
लक्ष्मीराम
सि चरणी
घनशाम त्रींबक
निरंतर-तत्पर

करारनामा लिहून देणार नव्रे शाह सिंग वल्द मानसिंग मुकद्दम वल्द बिंबाजी मुकद्दम जात राजपुत राहणार मौजे मायपुरा परगणे एरंडोल सरकार अशीर सुभा खानदेश. कारणे सप्रमाण व सशास्त्र करार करतो की मौजे मजकूरच्या मुकद्दमीचे वतन माझ्या वाडवडिलांपासून तो आजपर्यंत हे खरेदीखत लिहून देतो त्या दिवसापर्यंत माझ्या मालकीचे व माझ्या उपभोगाचे आहे. आता माझे म्हातारपण झाले आहे व त्यामुळे मी फार अशक्त झालो आहे. वस्तीच्या देखरेखीचे काम व स्वतःच्या शेतीची उस्तवारी माझेकडून होऊ शकत नाही. शिवाय करार केल्याप्रमाणे जे सरकारी देणे असते ते दिले जात नाही. म्हणून मी माझ्या राजीखुशीने अक्कलहुशारीने कोणाचीही सख्ती नसताना माझ्या मुकद्दमीच्या वतनाचा अर्धा हिस्सा चंडिदास देशमुख वल्द मुधोजी देशमुख वल्द मुरारजी देशमुख परगणे मजकूर यांना प्रचलित शिक्क्याची रक्कम रुपये दोनशे पन्नासांच्या किंमतीत खरेदी दिले आहे. खरेदीची रक्कम पूर्णपणे खरेदी घेणाराकडून भरून पावलो व वतनाचा अर्धा हिस्सा त्यांना दिला. मुकद्दमीच्या वतनाची माझी इनाम जमीन सात परतन आहे. त्याचा निमा वाटा साडे तीन परतन जमीन देशमुखांनी घ्यावी. मौजे मजकुरच्या हद्दीत मुकद्दमीची पंधरा बिघे जमीन नेमली गेली आहे त्यापैकी निमी जमीन दर वर्षी घेत जावी. शिवाय मानपानाचे हक्क, आंबा व चिंच ह्या झाडांचा वाटा, शेतीच्या व घराच्या जमिनीचा हक्क वगैरे सिरशस्त्याप्रमाणे चालत आलेल्या हक्कांत तुम्ही निमा वाटा घेत जावा. ह्याप्रमाणे मुकद्दमी वतनाच्या निम्या जमिनीवर तुम्ही व तुमचे वंशज काबिज राहून त्याचा उपभोग घेत जावा. सरकारी वसूल तुमचा व आमचा एकत्र करीत जावा. जर माझ्या वंशजापैकी कोणी ह्या मुकद्दमीच्या वतनासंबंधी काही वेगळे बोलेल तर ते बातल समजावे. ह्याप्रमाणे हा करारनामा लिहून दिला. जरूर पडल्यास सनद म्हणून उपयोगी पडावा. ता. २ माहे जिल्हेज सन १२०७ फसली अथवा १२१२ हिजरी.

दस्तुर खंडो मल्हार देशपांडे परगणे मजकूर	दस्तुर चंडीदास देशमुख परगणे मजकूर	घनशाम त्रिंबक सरदेशमुख परगणे मजकूर यांच्या हुजुरी

(२०)

मोहर काजी गुलाम अहमद नायब खादिम शरा ११९२

करारनामा लिहून देणार झावरू वल्द भिमसन वल्द जावजी जात न्हावी कुळ अहुरा राहणार कसबे एरंडोल परगणे एरंडोल सरकार अशीर सुभा खानदेश. करार की एक राहते घर इमल्या व मोकळ्या जागे सुद्धा एकूण जमीन साडे सत्तावीस हात त्याची दक्षिणोत्तर लांबी आठरा हात, पूर्व पश्चिम रुंदी साडे नऊ हात, भिंतींचा पाया वेगळा व वर्णन खाली दिल्याप्रमाणे

दक्षिणेकडची खोली १५ खांब, १५ तिखे १० कडीबंद

दुसरी खोली हरि न्हाव्याची १२ खांब १२ तिखे ८०कडीबंद ४५ कडे

तिसरी खोली हरि न्हाव्याची १४ खांब १४ तिखे ९ कडीबंद

यावर धाबे व त्याची चतुःसीमा खालील प्रमाणे :—

पूर्वेस : खरेदी देणाऱ्याच्या घराची भिंत व लाला वल्द अर्जुन धनगर याच्या घराची भिंत.

पश्चिमेस : गल्ली व नंतर रंगाऱ्याच्या घराची भिंत. हे घर हल्ली खरेदीदाराजवळ गहाण आहे.

उत्तरेस : कसबे मजकुरच्या धनगर लोकांच्या मढीची भिंत

दक्षिणेस : गंगाजी वल्द हीराजी न्हावी राहणार कसबे मजकूरच्या घराची भिंत

अशा तफसीलाचे घर आमच्या मालकीचे आहे. ते आज खरेदी देईपर्यंत आम्ही वापरीत होतो. आता दिवस फार कठिण आले. महागाई अति झाली. येथपर्यंत की धान्य एक रुपयास एक शेर देखील मिळत नाही म्हणून निरुपाय झाला. व आम्ही आमच्या राजीखुशीने, अक्कलहुशारीने व कोणाचीही सक्ती नसता चंडीदास देशमुख वल्द मुधोजी वल्द मुराहजी देशमुख परगणे मजकूर यांना हे घर एकचाळीस रुपयात विकले आहे. खरेदी देणारांनी पंचाच्या बैठकीत खरेदीची सर्व रक्कम आपल्या ताब्यात घेतली, व खरेदी घेणारांनी खरेदीखत प्रामाणिकपणाने कबूल केले.

दुसरा करार की हरि न्हावी हा माझा चुलता होता. तो दुष्काळात निःसंतान मरण पावला. ह्यामुळे त्याचे घर माझ्या ताब्यात आले. ते घर मी स्वखुशीने तुम्हास विकले

आहे. हे खरेदीखत लिहून दिले. जरूर पडल्यास वेळेवर याचा उपयोग सनद म्हणून व्हावा. ता० १७ माहे जमादिलावल सन १२१४ फसली अथवा सन १२१९ हिजरी रोजी लिहिले गेले.

(२१)

फौजदार कचेरीतील फर्दी ता० २२ माहे रमजान सन ४१ जुलूस फौजदार मिर्जा खाकी बेग.

मुक्काम कसबे एरंडोल सरकारी गढी.

कसबे धरणगाव येथील शिंपीण नामे गेणू हिने आपल्या नवऱ्यास आडात फेकून दिले व त्याचा प्राण गेला. फौजदाराजवळ ही फिर्याद आली. फौजदाराने तिला हजर राहण्यास सांगितले, व कैद केले. नंतर लोमा वगैरे खत्री राहणार कसबे मजकूर यांच्यामार्फत एकशे दहा रुपये घेतले.

गेणू शिंपीण राहणार कसबे धरणगाव हिने फौजदाराजवळ फिर्याद केली की माझ्या मुलीस– आणि तिच्या नवऱ्याने कळविले नाही. म्हणून कसबे एरंडोलचा शिंपी नामे भिकू जो गेणू शिंपणीच्या मुलीचा नवरा आहे यास बोलविले गेले. दोन्ही वादी व प्रतिवादी यांना कैद केले. नंतर मौजे तारखेडे अमला परगणे पाचोरे येथील कुळकर्णी रघु यांच्यामार्फत फौजदाराने सहा रुपये घेतले.

[पुढे फाटके व अस्पष्ट]

(२२)

इमारत पनाह मीर अहमदखान व रफजत पनाह… यांच्या मोहरेनिशी जाहिरातीची नक्कल – हिजरी सन १०७९

जाहिरनामा लिहिला गेला असा : पूर्वी राजा अलीखान फारूकी यांच्या कारकीर्दीत सुभे खानदेशातील कोणत्याही परगण्यात देशमुखीचे वतन नव्हते. जेव्हा या देशात मोगली बादशहांचा अमल चालू झाला तेव्हा परगण्यातून देशमुखांची नेमणूक झाली. त्याप्रमाणे सुभे खानदेशच्या परगणे खानदेशची देशमुखी माजीच्या नावे नेमली गेली. मावजी यांनी आपल्या हीन हयातीत देशमुखी वतनाची सेवा उत्तम प्रकारे केली. व सरकारी शिरस्त्याप्रमाणे रुसूम मिळवीत गेले. या मावजी देशमुखाच्या मृत्यूनंतर त्यांची मुले जस्तजी व जोगाजीकडे देशमुखीचे वतन आले. काही वर्षांनंतर त्या दोघां भावांपैकी एकास वेड लागले व दुसऱ्यास मृत्यूने ओढून नेले. ह्या मावजीच्या

घराण्यात मावजी ह्याच नावाचा एक अल्पवयी मुलगा होता. व ह्याच वेळी मौजे पालघी परगणे मजकुर येथे बादशाही मुक्काम होता. कारण की ह्या दिवसात महाराजाधिराज सार्वभौम बादशहा सलामत यांनी औरंगबादी आगमन होणार होते. बादशहाच्या दर-बारांतून चिन्हांकित फर्मान मिळवून परगणे मजकूरची देशमुखी मिळवली व अशा प्रकारे आजपर्यंत मावजी देशमुखांचा हा अल्पवयी मुलगा बादशाही कृपेमुळे अज्ञाना-वस्थेत वतनावर बहाल राहिला. आता हा मुलगा सज्ञान झाला आहे व आपल्या वाडवडिलांच्या मिळकतीवर रुजू होऊ इच्छितो. म्हणून ज्याला या हकीकतीची माहिती असेल त्यांनी साक्षीदार म्हणून ह्या महजर (जाहिरातीवर) आपली सही द्यावी. तारीख व सन व मजकूर.

बादशहाचे सेवक भगवतीदास.कसबे, धरणगाव यांच्या हुजुरात हे महजर लिहिले गेले.

साक्षी

महंमद बेग मोहर	**खिरदमंद खान मीर महमद मनसबदार मोहर**	**शेख नथु देशमुख परगणे नसीराबाद**

केशवजी देशपांडे परगणे, नसीराबाद.

मोहर मीर अहमदखान महजर दुरुस्त आहे.

लोकहितवादींच्या दप्तरातील दोन कागद

डॉ. य. दि. फडके

राजवाडे संशोधन मंडळातील संग्रहात लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख यांची कागदपत्रे आहेत. त्यांतील दोन महत्त्वाचे कागद पुन्हा प्रसिद्ध करीत आहोत. ते एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या इतिहासाच्या अभ्यासकांना उपयुक्त ठरतील.

(अ) ' समुद्रयान अने म्लेंछ गमन मीमांसा ' या शीर्षकाचे गुजराती भाषेतील पत्रक म्हणजे शंकराचार्य ज्योतिर्मठाधीश्वर त्रोटकाचार्य कैलासानंद पुरुषोत्तमानंदस्वामी यांनी सहीशिक्क्यानिशी दिलेला निर्णय आहे. लोकहितवादींचे चिरंजीव कृष्णराव हे नारायणभट व बापूभट काळे या ब्राह्मणांसह २९ एप्रिल १८६९ रोजी विलायतेस गेले आणि २८ एप्रिल १८७३ रोजी मायदेशी परतले. कृष्णराव समुद्रपर्यटण करून आल्याने त्यांना ब्रह्मदंड देऊन प्रायश्चित्त घ्यावे लागले. त्यांना पावन करून घेतले असल्याचे प्रमाणपत्र देताना शंकराचार्यांनी स्मृतिग्रंथांच्या व पुराणांच्या आधारे समुद्रप्रवास केव्हा निषिद्ध असतो आणि केव्हा त्याबाबत अपवाद करता येतो याची मीमांसा निर्णयात केली आहे. (पाहा परिशिष्ट ' अ ')

(आ) लोकहितवादींनी शतपत्रांतून तसेच नंतरही विधवाविवाहाचा नेहमीच जोरदार पुरस्कार केला. वेणूताई नारायण बापट या बालविधवेने १५ जून १८६९ रोजी पांडुरंग विनायक करमरकर यांच्याशी मुंबईत पुनर्विवाह केला. त्यानंतर विधवाविवाह सशास्त्र की अशास्त्र याबद्दलचा सुधारक व सनातनी यांच्यामधील वाद पेटला. १८७० च्या एप्रिलमध्ये कलियुगात विधवा विवाह सर्वथैव अशास्त्र असल्याचा शंकराचार्यांनी निर्णय दिल्यामुळे कृष्णशास्त्री चिपळूणकर, केरूनाना छत्रे यांच्याप्रमाणे लोकहितवादींनीही प्रायश्चित्त घेतले. तडीमुळे जरी प्रायश्चित्त घेणे भाग पडले असले तरी आपण विधवा-


विवाहास पूर्वीप्रमाणेच मदत करू, अशा आशयाचे पत्र लोकहितवादींनी ख्यातनाम सुधारक विष्णुशास्त्री पंडित यांना लिहिले होते आणि पंडितांनी ते इंदुप्रकाशात प्रसिद्ध केले होते. कलियुगात विधवाविवाह अशास्त्र असल्याचा शंकराचार्यांनी निर्णय दिल्या-नंतर ऑगस्ट १८७० ते फेब्रुआरी १८७६ या जवळ जवळ सहा वर्षांच्या काळात अवघे सात विधवाविवाह झाले. खुद्द विष्णुशास्त्री पंडितांनी ११ डिसेंबर १८७४ रोजी कृष्णाबाई नावाच्या विधवेशी विवाह करून इतरांना उदाहरण घालून दिले. विधवेशी विवाह करणाऱ्याचा समाज नाना प्रकारे छळ करीत असे. त्याला व त्याच्या पत्नीला वाळीत टाकत असे. या साऱ्या प्रकाराविरुद्ध कायदेशीर कारवाई करणे शक्य नव्हते. म्हणून १८७६ साली मुंबई इलाख्यातील हिंदूंनी तेव्हाचे व्हाइसरॉय लॉर्ड लिटन यांना एक अर्ज धाडला होता. १८५६ च्या विधवा-विवाहविषयक कायद्यात योग्य ती दुरुस्ती करून किंवा वेगळा कायदा करून पुनर्विवाहितांना संरक्षण द्यावे आणि त्यांना छळणा-ऱ्यांचा बंदोबस्त करावा, अशी विनंती लॉर्ड लिटनला करण्यात आली होती.

लोकहितवादी दप्तरात या अर्जाच्या चारपाच प्रती आढळल्या. हा अर्ज धाडण्यात लोकहितवादींनी पुढाकार घेतला असावा; किमान त्यांनी त्यावर सही केली असावी असे अनुमान काढल्यास ते चुकीचे ठरणार नाही असे वाटते. (पाहा परिशिष्ट ‘ ब ’ साठी इंग्रजी विभागातील पाने १८७–१९२ पाहा.)

परिशिष्ट ' अ '

॥ श्रीशंकर ॥

॥ समुद्र जहाज आणि म्लेंछ देश गमन ॥



१. राजश्री कृष्णराव गोपाळराव देशमुख आणि त्यांचे साथीदार ब्राह्मण नारायणभट पि. बाबुभट काळे हे विलायतेत जाऊन आले म्हणून श्री गुरूंना विनंती केल्याप्रमाणे धर्मशास्त्राचा विचार करून निर्णय दिला गेला तो खालीलप्रमाणे :–

२. कोणत्या देशात जावे आणि कोणत्या देशात जाऊ नये ह्याविषयी स्मृतीमध्ये खालीलप्रमाणे लिहिले गेले आहे :–

सिंधुसौवीरसौराष्ट्रान् तथा प्रत्यन्तवासिनः ।
अंगवंगकालिंगांश्च गत्वा संस्कारं अर्हति ॥

देवल

त्याचप्रमाणे

सौराष्ट्रसिंधुसौवीरान् अवन्ति दक्षिणापथम् ।
एतानि ब्राह्मणो गत्वा पुनः संस्कारं अर्हति ॥

बौधायन

हे वाक्य याज्ञवल्क्य स्मृतीची टीका जी मिताक्षरा त्यामध्ये आहे आणि ते यज्ञेश्वरशास्त्रींनी प्रस्थानचंद्रिकेमध्ये छापिले आहे. ह्यावरून असा बोध होतो की ब्रह्मावर्तक्षेत्रातील लोक वगळता सर्व हिंदुस्थानातील ब्राह्मण प्रायश्चित्तपात्र आहेत. परंतु दक्षिण, गुजरात, काठीयावाड, कोकण आणि मल्याळ प्रांतातील ब्राह्मण नेहमी समुद्रकिनारी राहतात आणि बंदरातील जहाजातून प्रवासपण करतात.

हे वाक्य वरील देशांनाच "प्रत्यंतवासिनः" यांना लागू आहे. प्रत्यंत देशात म्हणजे म्लेंछ देशात जाणाऱ्यांना पुनः संस्कार करावा असे देवल ऋषींनी सांगितले आहे. परंतु नेहमी समुद्र–प्रवास करणारे आणि सिंधु म्हणजे सिंध (कराची) वगैरे निषिद्ध देशांमध्ये जाणारे-येणारे हजारो ब्राह्मण आहेत, ते कोणत्याही प्रकारचे प्रायश्चित्त करत नाहीत. आणि त्यांना कोणीही कधीही अव्यवहार्य म्हणजे जातिबहिष्कृत केले नाही म्हणजे शास्त्राप्रमाणे जसा गुजरात वगैरे देशात जाणाऱ्या आणि राहणाऱ्या ब्राह्मणाचा दोष आहे, तोच दोष विलायतेत जाऊन स्वतःहून स्वधर्माचे पालन करून परत येणाऱ्यांना लागू पडतो.

३. समुद्रयातुः स्वीकारः कमंडलुविधारणम् ।
X X X X X X X X X
इमान् धर्मान् कलियुगे वर्ज्या दाहुर्मनीषणः ॥

बृहन्नारदीय पुराणे
निर्णयसिंधौ कलिवर्ज्य प्र०

धर्मासाठी समुद्र प्रयाण न करणे अशाच अर्थाने वरील वाक्याचा उपयोग केला आहे हे मानणे योग्य ठरेल. कारण 'कमंडलुधारणं' वगैरे धर्मकृत्याबरोबर त्याची गणना केली जाते. म्हणजे धर्मासाठी समुद्र-गमन निषिद्ध, असे बृहन्नारदीय वचन सांगते. राजाचा हुकूम किंवा धर्मार्थाशिवाय दुसऱ्या कोणत्याही हेतूने जाण्यासाठी हे वचन लागू पडत नाही.

प्रायेण समानरूपाः सहचरा भवति ॥

बऱ्याच प्रमाणात एकसारखा विषय एक ठिकाणी छापला गेला आहे. याप्रमाणे न्याय आहे. त्याचप्रमाणे 'इमान् धर्मान्' या पदाचा भावार्थ त्या पूर्वीच्या युगातील धर्म होत हे सिद्ध होते. राजाच्या हुकुमानुसार विलायतला जाण्यात कोणते धर्मकार्य आहे हे मनी पण येत नाही.

४. समुद्रावर किती दिवस जावे, किती काळ राहावे ह्याविषयी छापले नाही. ज्याला वाटेल तो एक दिवस, ज्याला वाटेल तो एक महिनाभर समुद्रप्रवास करू शकतो. परंतु कोकण प्रांतातून मुंबईला ब्राह्मण येतात, द्वारकेला जातात, कराचीला जातात, कलकत्त्याला जातात, आणि विलायतला जातात. शास्त्राप्रमाणे या सर्वांची स्थिती एक-सारखीच म्हणजे एकसारखाच दोष समजला जातो. आणि कराची म्हणजे सिंध देशातील आणि कोकणातील पुष्कळ लोक जहाजातून प्रवास करतात म्हणून कोणाला प्रायश्चित्त दिले नाही. यावरून हे सिद्ध होते की नौकागमन करणे हे एक शिष्टाचाराचे किंवा देशकालमानाचे प्रमाण आहे.

५. द्वारिका बेटात जाण्यासाठी नावेत बसल्याशिवाय दर्शन घेता येत नाही. त्याच-प्रमाणे सेतुरामेश्वराचे दर्शन जहाजात बसल्याशिवाय घेता येत नाही. आणि सेतुदर्शनाचे पुण्य पराशरांनी म्हटल्याप्रमाणे :–

शतयोजनविस्तीर्णं शतयोजनमायतम् ।
रामचंद्रसमादिष्टं नलसंचयसंचितम् ।
सेतुं दृष्ट्वा समुद्रस्य ब्रह्महत्या व्यपोहति ॥

शतयोजनावरील सेतुदर्शन करायचे तर पुष्कळ दूर गेल्याशिवाय शक्य नाही.

६. **द्विजस्याब्धौतु नौयातुः शोधितस्याप्य संग्रहः ॥**

धर्मतत्त्वसार

याप्रमाणे आदित्य पुराणात उद्धृत केलेले वचन हेमाद्रिसंग्रहात नमूद केले आहे. परंतु स्वधर्माचे पालन करून विलायतला जाऊन परत येणाऱ्यांसाठी हे वचन लागू पडते असे समजता कामा नये. कारण की नौयातृ या पदाचे मूळरूप आणि प्रत्यय याचा विचार करता ते नेहमी कतान म्हणजे खलासीपणाचा धंदा स्वीकारून ज्यांचा चरितार्थ चालू आहे अशांसाठी वरील वचनाचा भावार्थ लागू पडतो.

७. **अब्धांजीवी न संग्राह्यो निष्कृत्यापि कलौ द्विजः ॥**

धर्मतत्त्वसार

हे वचन वरील नौयातृ शब्दाचा खुलासा आहे. नौयातृ हा शब्द तृन्नंत (तृन् प्रत्यय) आहे. नौयाता ॥ समुद्रयाता ॥ अब्धांजीवी ॥ ही सर्व पदे खलासीपण वर्णितात.

आक्केस्तच्छील तद्धर्म तत्साधु कारिषु ॥

पाणिनि

हे सूत्र वरील तिन्ही वाक्यांची एकवाक्यता आहे. स्वधर्माचे पालन करून परत येणाऱ्यांसाठी हे लागू पडत नाही.

८. म्लेंछ देशात जाणाऱ्यांना पुनः संस्कार दिला जातो. परंतु मिताक्षरामध्ये इदंतु बहुकाल सेवाविषयं ॥ पुनः संस्कार म्हणजे त्र्यब्द प्रायश्चित्त. अब्द म्हणजे त्रीशकृच्छ्र. आणि कृच्छ्रचे प्रयोग बरेच आहेत. जसे एक गौदान, सहस्रगायत्री, दोनशे प्राणायाम, बारा ब्राह्मणभोजन, तीर्थस्थानी बारा स्नाने, वेदपारायण इत्यादी.

९. प्राचीन काळी देखील आजच्याप्रमाणे होडीत बसून दुसऱ्या बेटात जाण्याचा शिष्टसंप्रदाय होता असे नमूद केले आहे.

तुग्रोह भुज्यु मश्विनोद मेघे ॥

ऋग्वेद प्र. अ. अ. अष्टवर्ग ८ ऋच्

इत्यादी तीन ऋचांमधील अभिप्राय पाहता स्पष्ट होते की, तुग्र राजाचा मुलगा भुज्यु सेना घेऊन समुद्रमार्गे द्वीपांतराला गेला असता त्याचे जहाज बुडाले होते. परंतु अश्विनीकुमारची प्रार्थना करता कुमारांनी त्याला आपल्या जहाजात बसवून पोहचविले.

अन्यत्र देखील

नानेव सिंधु दुरिता त्यग्नि ॥

ऋ. अ. १, अ. ७ वर्ग ७

अर्थ : हे अग्नि, ज्याप्रमाणे समुद्रामध्ये नाव रक्षण करते त्याप्रमाणे पापापासून तू आमचे रक्षण कर. या ठिकाणी दृष्टान्त (उदाहरण) देता येतो.

वेदनावः समुद्रियः ॥

ऋग्वेद अ. १, अध्या. २, वर्ग १९

वरुण हा विकविद्येचा देव मानला जातो.

१०. समुद्रप्रयाणाविषयी वेदामध्ये विरोध नाही, हे वरील वचनावरून स्पष्ट होते. वत्सराजाचा प्रधान बाभ्रव्य आणि यौगंधरायण राजाच्या हुकुमावरून समुद्रमार्गे गेला होता. श्रीमंत नावाचा वैश्य सिंहलद्वीप म्हणजे लंकेला प्रवास करण्यासाठी गेला होता. पांडवांपैकी नकुल समुद्रमार्गे द्वीपांतराला गेला होता, त्याविषयी महाभारतात नोंद आहे.

ततः सागरकुक्षिस्थान् । म्लेंच्छान् परमदारुणान् ॥

भारत : सभापर्व अ. २२

भास्कराचार्य रोमकपट्टण (रोम) ला गेला होता. आणि रोमक सिद्धान्त नावाच्या ग्रंथाची रचना केली. विक्रमादित्य इमशाम (इटाली आणि तुर्कस्थान) देशावर सैन्य घेऊन गेला होता असे ज्योतिर्विदाभरणातील राजकीर्तिप्रकरणात लिहिले आहे.

नौकालक्षचतुष्टयं समभवद्यस्यप्रयाणेविभोः ॥

महिप कुळाचा राजा सिंहलद्वीप (लंका) येथे गेला होता, असे राजतरंगिणीमध्ये आहे.

११. हा सर्व वरील इतिहास नावेमध्ये बसून परदेशात जाण्याची रूढी त्याचप्रमाणे आचार श्रुतिस्मृतीनुसार चालत असे स्पष्ट करतो.

त्याचप्रमाणे

धर्मजिज्ञा मुनानांच्च प्रमाणं परमं श्रुतिः ।
द्वितीयं धर्मशास्त्रं तु तृतीयो लोकसंग्रहः ॥

लोकांचा संग्रह करणे शिष्टसंप्रदाय असा धर्म आहे.

महाजनो येन गतः स पंथाः ॥

ज्या मार्गाने श्रेष्ठ लोक पूर्वीप्रमाणे जात आले त्या मार्गाने जाण्यात हरकत नाही.

स्वगृहे पूर्णमाचारो तदर्धं परवेश्मनि ।
परदेशे एक पादं पथि शूद्रवत् आचरेत् ।
आपत्काले तु विप्राणां शौचाचारं न कल्पयेत् ॥

१२. हे वचन, लोकांची स्थिती आणि व्यवहार ध्यानात घेऊन असे सूचित केले जाते की प्रायश्चित्ताची जरुरी नाहीं. परंतु धर्माविषयी ज्यांना निष्ठा आहे त्यांनी प्रायश्चित्त घेण्यात पुण्यकारक आहे. त्याप्रमाणे कृष्णराव गोपाळ देशमुखांची स्वधर्मावरील श्रद्धा आणि वर्तणूक लक्षात घेऊन प्रायश्चित्त घेतल्यानंतर त्यांना अनुग्रह देऊन पावन केले. त्यांची संस्कृतमधील जाण चांगली आहे. गीतेचे अठरा अध्याय मुखोद्गत आहेत. गीतेचा अर्थ देखील त्यांनी योग्य प्रकारे अवगत केला आहे. त्यांची वर्तणूक, तसेच ज्ञान पाहून आम्हाला कोणताही संशय राहिला नाही. गीतेच्या पाठाचे माहात्म्य याप्रमाणे आहे —

महापापादि पापानि गीताभ्यासं करोति चेत् ।
क्वचित्स्पर्शम् कुर्वन्ति नलिनीदलमम्भस ॥
गीतार्थ श्रवणासक्तो महापापयुतोऽपि वा ।
वैकुंठं समवाप्नोति विष्णुनासहमोदते ॥
गीतार्थं ध्यायते नित्यं कृत्वा कर्माणि भूरिशः ।
जीवन्मुक्तः सविज्ञेयो देहान्ते परमं पदम् ॥

वाराहपुराणे

ह्याप्रमाणे निर्णय करून संकेश्वर मठाधिपती स्वामींनी गणेश सीतारामशास्त्री सुभेदार होळकर सरकारांना प्रायश्चित्त दिल्यानंतर त्यांना शुद्धिपन दिले. त्याचप्रमाणे देशमुखांना पावन करण्यात आले. म्हणजे ही गुरू आज्ञा सगळ्यांनी मान्य केली. त्यांचे बरोबर अन्नोदक व्यवहार पार पाडून कोणतीही शंका मनात राहिली नाही.

मिती चैत्र वद्य ९ संवत १९२६ शके १७९१ सोमवार
मुक्काम नडीयाद प्रांत गुजरात

इत्यलम्.

श्री स्वामी शंकराचार्य कैलासानंद पुरुषोत्तमानंद सही

श्री
ज्योतिर्मठ
कैलासानंद स्वामी

॥ श्रीशंकरो विजयते ॥

कैलासानंद पुरुषोत्तमा

ज्योतिर्मठाधीश्वर

श्री
श्रीमत् परमहंस परि-
व्राजकाचार्य ज्योतिर्मठा-
धीश्वर त्रोटकाचार्य
कैलासानंद पुरुषोत्तमा
नंदस्वामी

संवत् १९२६ शके १७९१

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य, व पद वाक्य प्रणाम, पारा वारपरणिय नियमास न, प्राणायाम प्रत्याहार धारणाध्यानं समाधि अष्टांग योगाचरण, निरुपी चक्रवर्त्यत्वाद्यनाद्य नवच्छिन्न, गुरुपरंपरा प्राप्त, वैभव सकस निगमागम पारावक्ताखिल वेदान्तानुभवादिगत, शुद्धान्तः कर्णयुक्त धीवृत्य भलरवशाता, क्षेत्र वैदिक मार्गप्रवर्तक, श्री कैलासक्षेत्रस्थित, सुवर्ण हिरामणी माणिक्य मौक्तिक विलसत्, मंडप सिंहासनारूढ श्री कि प्रयागतीर निवासा सर्व तंत्र स्वतंत्र श्री गुरुचरणकमलोपासन संतत श्रीमत् महाराजाधिराज, ज्योतिर्मठाधीश्वर षड्दर्शन स्थापनाचार्य, अखंड भूमंडलाचार्य, जगद्गुरु श्रीनगर महास्थान राजधानी, श्रीमत् महाराधिराज शंकराचार्य कैलासानंद पुरुषोत्तमानंद महाराज

त्यांचे वतीने राजश्री कृष्णराव गोपाळ देशमुखांना आशीर्वाद. विशेष तुमच्या सरकारच्या आज्ञेवरून विलायतला बॅरिस्टरची परीक्षा देण्यासाठी गेलात आणि सनद घेऊन आलात, हीं वार्ता ह्या देशाच्या कल्याणाच्या दृष्टीने अनुकूल आहे. आणि देह-शुद्ध्यर्थ प्रायश्चित्त देऊन ब्रह्मदंड दिल्याचे स्वीकारल्याने तुम्हाला पावन करण्यात आले. आता जातीतील कोणीही माणूस कोणत्याही ठिकाणी हरकत घेणार नाहीं. यासाठी प्रमाण म्हणून हे पत्र देण्यात येत आहे.

मिती चैत्र वद्य ११ संवत १९२६
आशीर्वाद, मुक्काम नडीयाद

१ श्री स्वामी शंकराचार्य कैलासानंद पुरुषोत्तमानंद
स्वहस्ते सही शिक्क्यानिशी

श्री
ज्योतिर्मठ
कैलासानंद स्वामी

राजश्री कृष्णरावांना पावन करण्यात आले, म्हणजे त्यांना आणि त्यांचे साथीदार गणेश ब्राह्मण यांना कोणीही हरकत घेऊ नये अशा आशयाचे पत्र श्रीजगद्गुरु शंकराचार्य यांनी पुणे, बडोदे येथे पाठवले.

[For Appendix B See English Section Pages]

राजवाड्यांच्या शब्दसंग्रहाचे विशेष

डॉ. मु. श्री. कानडे
मराठी विभागप्रमुख, पुणे विद्यापीठ, पुणे – ४११००७

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात विशिष्ट ध्येयवादाने भारलेली व आपले सारे कर्तृत्व समाजहितार्थ वेचणारी जी पिढी निर्माण झाली तिच्यात इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांचे व्यक्तिमत्त्व आणि कार्य अनेक दृष्टींनी त्या काळातील इतर महापुरुषांपेक्षा आगळे-वेगळे आहे. एकापेक्षा अधिक क्षेत्रांत प्रवेश करून आपल्या कार्याचा प्रभाव वर्षानुवर्षे प्रस्थापित करणारे अनेक युगपुरुष त्या टिळकयुगात चमकून गेले. राजकारण किंवा समाजकारण यामध्ये समाजाचे मार्गदर्शन करणारा त्यागी विचारवंतांचा गट सोडला तर केवळ विचारप्रधान अशा लेखन-संशोधनाच्या कार्यात राजवाड्यांच्या तोलाचा, चौफेर व्यासंगाचा खराखुरा ज्ञानोपासक दुसरा दाखविणे कठीण आहे. त्यांच्या हातून निर्माण झालेल्या प्रचंड वाङ्मयनिर्मितीचे वरवर अवलोकन करणाऱ्या अभ्यासकाला राजवाड्यांची भेदक, मर्मग्राही व व्यापक बुद्धिमत्ता म्हणजे एक चमत्कार वाटल्या-खेरीज राहात नाही. त्यांच्यानंतर मराठी भाषेत जी वैचारिक स्वरूपाची ग्रंथनिर्मिती झाली ती पाहिली म्हणजे राजवाड्यांनी कै. वासुदेवशास्त्री खरे यांच्यासंबंधात विचारलेला, 'इतक्या अवाढव्य माहितीचा मनुष्य वारंवार निपजतो काय ?' हा प्रश्न स्वतः त्यांच्याही बाबतीत अनुत्तरित राहिलेला आहे हे ध्यानात येते. महाविद्यालयीन जीवनापासून पुढे सुमारे चाळीस वर्षे राजवाडे ज्ञानाच्या विविध शाखांचे समग्रतेने व मार्मिकपणे अध्ययन करणे व तत्संबंधी आपला स्वतंत्र अन्वयार्थ निर्भीड शब्दांत नमूद करणे यात रंगून गेलेले होते. महाराष्ट्रातील इतिहाससंशोधनाचे ते पहिले प्रखर असे पुरस्कर्ते होते आणि संशोधन, संकलन, संपादन व समीक्षण या इतिहासाच्या सर्व टप्प्यांत त्यांचा अप्रतिहत संचार आयुष्याच्या अखेरीपर्यंत चालू होता. मराठी भाषा आणि मराठी वाङ्मय या-विषयीही त्यांच्या मनात इतिहासाइतकीच उत्कट जिज्ञासावृत्ती असल्याने त्यांचे भाषा

व वाङ्मयविषयक लेखनही अभ्यासकांना अज्ञात असलेली माहिती देणारे, नवनवीन विचारांना खाद्य पुरविणारे आणि आपल्या लोकविलक्षण निष्कर्षांनी धक्के देणारे झाले आहे. म्हणूनच ज्ञानकोशकार डॉ. केतकरांनी, राजवाड्यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करताना, त्यांची भाषाविषयक कामगिरी सर्वाधिक महत्त्वाची ठरवून राजवाडे हे प्रथम भाषाशास्त्रज्ञ आहेत असा आपला परखड अभिप्राय व्यक्त केलेला आहे.

आपल्या तरुण वयातील, मुख्यतः महाविद्यालयीन जीवनातील अनुभव आणि नंतर लिहिलेला ' कादंबरी ' हा आजच्या समीक्षकांनाही आवर्जून दखल घ्यावीशी वाटणारा निबंध हे अपवाद मध्ययुगीन वाङ्मयासंबंधीचे आहेत. भारत इतिहास संशोधक मंडळात त्यांनी या काळातील ग्रंथ व ग्रंथकार यांच्यासंबंधी संशोधनात्मक अशी शेकडो टिपणे वाचली आणि मंडळाची संमेलनवृत्ते व त्रैमासिकाचे अंक यातून ती प्रकाशितही झाली. पाटांगण येथे उपलब्ध झालेल्या ज्ञानेश्वरीच्या, त्यांना प्राचीनतम वाटणाऱ्या हस्तलिखित पोथीच्या निमित्ताने त्यांनी ज्ञानेश्वरीच्या व्याकरणाची सूक्ष्म चिकित्सा केली व ती ग्रंथरूपाने प्रसिद्धही झाली. आपल्या इतिहाससंशोधनाच्या कामात राजवाड्यांना अनेक जुन्या व अप्रकाशित बखरीही मिळाल्या. त्या बखरींचा बारकाईने अभ्यास करताना राजवाड्यांनी इतिहासलेखक म्हणून बखरकारांची पात्रता आणि इतिहास साधन या दृष्टीने बखरींचे प्रामाण्य या विषयावरील मते निश्चित होत गेली. ती त्यांनी आपल्या ' मराठ्यांच्या इतिहासाची साधने ' या ग्रंथमालेच्या चौथ्या खंडाच्या प्रस्तावनेत अत्यंत विस्ताराने आणि तितक्याच परखडपणे मांडली. याखेरीज अन्य वाङ्मयप्रकारांची राजवाड्यांनी केलेली चर्चा इतरत्र फारशी आढळत नाही. मराठी भाषेच्या उगम-कालापासूनच्या इतिहासाबद्दल मात्र राजवाड्यांचे लेखन निरनिराळ्या निमित्ताने वर्षानुवर्षे चालू असल्याचे दिसते. फारसीच्या मराठीवरील परिणामांची चर्चा त्यांनी ' साधनांच्या ' आठव्या खंडात सविस्तरपणे केलेली आहे.

या सर्व भाषाविषयक लेखनाचे वर्गीकरण करून केलेला कालानुक्रमी अभ्यास मराठी भाषेच्या अभ्यासकांना आजही अनेक दृष्टींनी उपयुक्त ठरल्याशिवाय राहणार नाही. राजवाड्यांच्या स्वभावातील आपल्या मतांचा, भरपूर प्रमाणे देऊन मुद्देसूद रीतीने, ठाशीव पद्धतीने मांडण्याचे वैशिष्ट्य त्यांच्या एतद्विषयक प्रतिपादनात सर्वत्र आढळून येते. या गुणविशेषांमुळे राजवाड्यांच्या मतातील काही ठिकाणी आढळणारा एकांगी-पणा व आग्रहीपणा हे दोष ध्यानात घेऊनही त्यांचे लेखन दुर्लक्षिता येत नाही.

राजवाड्यांनी केलेले भाषाविषयक लेखन जितके अभ्यसनीय तितकेच राजवाड्यांच्या भाषेचे अध्ययनही भाषेच्या अभ्यासकांच्या दृष्टीने लक्षणीय ठरणारे आहे. जाणीवपूर्वक भाषेचे बहिरंग सजविण्याच्या नादी न लागताही ज्यांनी आपल्या वैचारिक कसदार-पणाच्या बळावर मराठी निबंधवाङ्मय समृद्ध केले त्यामध्ये राजवाड्यांचाही समावेश

करणे अवश्य आहे. एका छोट्या टिपणात त्यांच्या भाषेचे स्वरूप सामग्र्याने विचारात घेणे केवळ अशक्य असल्याने राजवाड्यांच्या शब्दसंग्रहाची ठळकपणे नजरेस पडणारी वैशिष्टये शोधण्याचा मर्यादित उद्देश समोर ठेवूनच पुढील चर्चा केलेली आहे.

राजवाड्यांचे ग्रंथस्वरूपातील लेखन तर विपुल आहेच, परंतु संग्रहित न झालेल्या स्फुट लेखांची किंवा छोट्या टिपणांची संख्याही अक्षरशः शेकड्यांनीच मोजावी लागेल. त्यांच्या शब्दसंग्रहाची वैशिष्टये पाहण्यासाठी त्यांच्या लेखनापैकी ऐतिहासिक प्रस्तावना [ऐ. प्र.], ऐतिहासिक विविध विषय [ऐ. वि.], साहित्य अकादमीने प्रकाशित केलेल्या लेखसंग्रहातील कादंबरी व रामदास हे दोन निबंध [ऐ. ले.], आणि शारदोपासक संमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेले भाषण [शा. वि.], या प्रातिनिधिक स्वरूपाच्या साहित्याचा आधारभूत म्हणून उपयोग केला आहे.

आज रूढ असलेल्या लेखनाच्या दृष्टीने पाहता राजवाड्यांनी काही शब्द उच्चारानुसारी किंवा आजच्यापेक्षा काहीसे वेगळ्या तऱ्हेने लिहिलेले दिसतात. त्यांची एक लकब किंवा त्या काळात प्रचलित असणारे रूप म्हणून या शब्दांकडे पाहता येईल.

अवरंगाबाद [ऐ. प्र. ३], चवकशी [ऐ. प्र. २७३], चवकसपणा [ऐ. प्र. २७].

दक्षण [दक्षिण, ऐ. प्र. ६२], मेजमाप [मोजमाप, ऐ. प्र. २८९], किंकर्तव्यतामूढ [किंकर्तव्यमूढ, ऐ. ले. २७६], उघडाउघडी [उघडउघड, ऐ. वि. १६], पाह्यरी [पायरी, ऐ. वि. २७], चिल्हर [चिल्लर, ऐ. वि. ३७१], कंभक्ती [कंबक्ती, शा. वि. ३].

राजवाड्यांचे संस्कृत ग्रंथांचे वाचनही चांगले होते याचा प्रत्यय त्यांच्या लेखनावरून येतो. अशा वाचनातून अनेक संस्कृत शब्द त्यांना विशेष आवडले असावे किंवा अर्थप्रकटनाच्या दृष्टीने ते पूर्वीच्या रूढ शब्दांपेक्षा समर्पक वाटले असावेत आणि म्हणून आजच्या वाचकाला पुष्कळदा अपरिचित असणारे अनेक संस्कृत शब्द राजवाड्यांनी अधूनमधून वापरलेले दिसतात. उदा. विगति [परागती, ऐ. प्र. २६], धर्माचार [आचारधर्म, ऐ. प्र. ३२], सान्निपातिक [ऐ. प्र. ४७], दुरुद्योग [अयोग्य, अनुचित उद्योग, ऐ. प्र. ५१], धर्मव्याख्यान [पुराण, प्रवचन, ऐ प्र. ९५], परिनालिका [परंपरा, ऐ. प्र. २३२], प्रकृत [प्रस्तुत, ऐ. प्र. २४३], समाहृत [समाविष्ट, ऐ. प्र. २६६], कातर्य [भीती, ऐ. ले. २४६], अभिभव [स्वीकार, ऐ. ले. २७१], निष्कासन [हकालपट्टी, ऐ. प्र. २८५], अनागत [न आलेला, ऐ प्र. ३०८], स्थाणु [स्थिर, ऐ. प्र. ३०८], नैर्घृण्य [निष्ठुरता, ऐ. वि. ५०], तत्स्थ [तद्देशीय, ऐ. वि. १५०], आर्तव [योग्य काळातील, ऐ. वि. १७४], भैक्ष्यवृत्ति [भिक्षावृत्ती, ऐ. वि. १८६], स्थापत्यिक [स्थापत्यविषयक, शा. वि. ७], वैय्यापारिक [व्यापारविषयक, शा. वि. २१], शास्त्रसमर्थ [शास्त्रांनी सुसज्ज, शा. वि. २४], सांभविक

[संभाव्य, शा. वि. २४], सांशयिक [संशयास्पद, शा. वि. २४], संतभाव [उदासीन वृत्ती, शा. वि. २५], समीपासन्न [जवळ आलेला, शा. वि. ३१].

अशा तत्सम शब्दाबरोबरच आजच्या मराठीतून बहुवंशी लुप्त झालेले काही तद्भव शब्दही राजवाडे काही वेळा वापरतात. त्यांच्या जुन्या वाङ्मयाच्या अभ्यासातून हे शब्द त्यांना मिळाले असावेत — अकटोविकट [अभूतपूर्व, प्रचंड, ऐ. प्र. ६, ८२], डवचाडवच [लुडबूड, हस्तक्षेप, ऐ. प्र. ७५], अर्बुज [धिप्पाड, ऐ. प्र. ९०], अंगेजणी [लगट, ऐ. प्र. १८९], धरमधोका [अंदाज, अनुमान, ऐ. प्र. २५६], कमतर [कमी प्रतीचा, ऐ. प्र. २९०], मात्क्यान् [ऐ. प्र. ३३३], मामूर [विपुल, ऐ. प्र. ४००], सटकसीतारामी [? ऐ. प्र. ४२३], गुरचरण [गुरांचे चरणे, ऐ. वि. १५४], गडदू [खांब ?, ऐ. वि. १५७], हंडीबाग [जादूगाराचा साहाय्यक, ऐ. ले. २३९], वाचाटता [वाचाळपणा, शा. वि. २], चढ [उत्कर्ष, शा. वि. २४], या सुट्या शब्दाबरोबरच, काही अप्रचलित जोडशब्दही राजवाडे क्वचित प्रसंगी वापरतात. दाणागल्ला [धान्यसामग्री, ऐ. प्र. ४७], यात्राजत्रा [यात्रा इ., ऐ. प्र. ९५], असलीनसली [असलेली व नसलेली, ऐ. वि. २४४], तोंडदाबणी [मुस्कटदाबी, शा. वि. ७], डांबणूक [दडपण, शा. वि. ७].

राजवाड्यांनी आपल्या निबंधांतून व निबंधवजा प्रस्तावनांतून विविध विषयांचा परामर्श घेतला. त्यांपैकी काही विषयांवर मराठीत प्रथम लेखन करण्याचे श्रेय राजवाड्यांना दिले पाहिजे. अशा भिन्न क्षेत्रातील ज्ञानशाखांतून अवगाहन करताना राजवाड्यांना मराठीचा जुना शब्दसंग्रह अर्थातच अपुरा पडला. नवीन विचारांच्या आविष्कारासाठी त्यांना नवनवीन शब्द घडवावे लागले किंवा संस्कृत शब्दभांडारातून मराठीला अपरिचित असे शब्द धुंडाळून काढून त्यांचा यथायोग्य उपयोग करावा लागला. सावरकरांच्या व माधवराव पटवर्धनांच्या भाषाशुद्धीच्या चळवळीचा, त्यांची नावे न घेता राजवाड्यांनी आपल्या शारदोपासक संमेलनाच्या भाषणामध्ये काहीसा तुच्छतेने उल्लेख केला आहे. परंतु स्वतः राजवाड्यांना मात्र आपल्या अभिनव विचारांच्या प्रकटनासाठी नवनवीन शब्द घडवावे लागले किंवा संस्कृतातून धुंडाळून आणावे लागले व अप्रत्यक्षपणे भाषाशुद्धीतील एक महत्त्वाचे तत्त्व मान्य करावे लागले. अशा काही शब्दांची उदाहरणे — अजागरूक [बेसावध, ऐ. प्र. ४८], कारणीभवन [कारणांचे स्वरूप, ऐ. प्र. १७७], अनीतिमत्ता [नीतिमत्तेचा अभाव, ऐ. प्र. १८४], आशीर्वादिक [आशीर्वादपर, ऐ. प्र. १९०], देहसंतर्पण [देहाचे चोचले पुरविणे, ऐ. प्र. १९४], मात्सर्य [ऐ. प्र. २४०], सतती [सातत्य, ऐ. प्र. २८१], कालांश [काळाचा एक भाग, ऐ. प्र. २८१], पाटलोण्या [पाटलोण घालणारा, इंग्रजी शिकलेला, ऐ. प्र. ३०५], पूर्वात्य [पौरस्त्य, ऐ. प्र. ३१०], संस्कृतावस्था [प्रगत

अवस्था, ऐ. प्र. ३१३], भूतवृत्त [भूतकालीन वृत्त, ऐ. प्र. ३१८], समानकालीन [समकालीन, ऐ. प्र. ३२१], प्रतिफलित [फलद्रूप, ऐ. प्र. ३३५], इतिहासकलंक [अत्यंत सदोष इतिहास, ऐ. प्र. ३४७], सुयंत्रित [सुसज्ज, ऐ. प्र. ३५६], रूपभंग [मूळ रूपातील बिघाड, ऐ. प्र. ४२०], निश्चयलेख [अधिकृत, पक्का निर्णय, ऐ. प्र. ४४४], पद्धतिशास्त्र [संशोधनपद्धती, ऐ. प्र. ४६०], निबिडांधक [अंधकारमय, ऐ. वि. १७४], लंगडशाई [अज्ञान, अपुरेपणा, ऐ. वि. २४६], वाक्प्रदर्शन [वाङ्मयलेखन, ऐ. वि. ३६६], विचारस्रष्टा [विचारांचा प्रवर्तक, ऐ. वि. ३७२], सनातनता [प्राचीनता, ऐ. ले. २४०], मुमुक्षा [मोक्षाची इच्छा, ऐ. ले. २४२], एकधर्मी [एकाच धर्माचे, ऐ. ले. २५३], संतोषप्रवण [सुखासीन, ऐ. ले. २६१], नियंतृत्व पत्करणे [प्रभाव पाडणे, पकड घेणे, ऐ. ले. २७२], गोष्टीवाला [गोष्ट सांगणारा, ऐ. ले. २७७], साम्राज्यलब्धी [साम्राज्यप्राप्ती, ऐ. ले. २८४], ठळठळीतपणा [ठसठशीतपणा, ऐ. ले. २८७], प्रावासिक [प्रवासविषयक, ऐ. ले. २९४], वाङ्मयप्रजा [वाङ्मयनिर्मिती, ऐ. ले. २९२], उत्तेजनोत्पन्न [प्रलोभनाने निर्माण होणारी, ऐ. ले. २९२], मानोभाविक [निष्ठावान् , प्रामाणिक, ऐ. वि. ५], वाङ्मयीक [वाङ्मयीन, ऐ. वि. ७], देवधार्मिक [देवासंबंधी, ऐ. वि. ७], कलिक [कलाविषयक, ऐ. वि. १४०], बहुशाख [विविध शाखी, ऐ. वि. १७], ग्रामकूटपणा [पाटीलकी, ऐ. वि. १४३], राष्ट्रकूटपणा [देशमुखी, ऐ. वि. १४३], महाराष्ट्रकूटपणा [सरदेशमुखी, ऐ. वि. १४३], गद्यक–पद्यक [गद्य लेखक–पद्य लेखक, शा. वि. ३], इंग्रजीशीक [इंग्रजी शिकलेला, शा. वि. १८], बाहुल्य–वैरल्य [विपुलता व दुर्मिळता, शा. वि. १८].

रूढ शब्दाऐवजी नवीन शब्द वापरणे किंवा जुन्या रूढ शब्दाच्या धर्तीवर नवीन शब्द तयार करणे या राजवाड्यांच्या आणखी दोन लकबी आहेत.

विगती [परागती, ऐ. प्र. २६], कुलेखक [चांगला लेखक, ऐ. प्र. ३००], झाडपूस [झाडझूड, ऐ. प्र. ३०१], बिनतूट [अतूट, अखंडित, ऐ. प्र. ३११], अधोगतिक [अधोगतीला नेणारे], मोहान्ध [मोहाने अंध झालेला, ऐ. प्र. ३५५], कुधारक [ऐ. प्र. ४१८], अकलंक [निष्कलंक, ऐ. प्र. ४५७], गुणपराङ्मुख [गुणांकडे पाठ फिरवणारा, ऐ. वि. ३७३], विद्यावीर, रणवीर, सभावीर, शास्त्रवीर [ऐ. ले. २३९], सूचनान्तर [अन्य भाषेवर आधारित, ऐ. ले. २६७], मागोदर [नंतर, ऐ. वि. ४४], अनपवाद [निरपवाद, ऐ. वि. ५०], आद्भुतिक [अद्भुत-रम्य, ऐ. ले. २८७], अशस्त्र [निःशस्त्र, शा. वि. २८].

राजवाड्यांचे सारे लेखन गंभीर प्रकृतीचे आहे. अनेक जटिल विषयांचा ऊहापोह राजवाड्यांनी अत्यंत सुबोध भाषेत केलेला आहे. त्यांच्या विवेचनामध्ये कोठेही दुर्बोधता

निर्माण झालेली नाही. विचारप्रतिपादन करताना पांडित्यप्रदर्शन करण्याची राजवाड्यांना मुळीच हौस नाही. 'शहाणे करून सोडावे। सकळजन ॥' ही समर्थांची शिकवण अंगी बाणलेली असल्याने त्यांचे लेखन अभ्यासपूर्ण असूनही अभ्यासजड झालेले नाही. त्यांच्या शब्दयोजनेत मात्र काही वेळा दीर्घ सामासिक शब्दांचा वापर करण्याची प्रवृत्ती आढळते. अशा शब्दांत दुर्बोध शब्दांचे प्रमाण तुलनेने फार कमी आहे. अनेक शब्दांच्या एकत्रीकरणातून तयार केलेल्या व अर्थाच्या आकलनामध्ये अडचण न येणाऱ्या लांबलचक सामासिक शब्दांचा मोठा भरणा राजवाड्यांच्या लेखनात आढळतो. संधीची फोड केली म्हणजे शब्दाचा अर्थ सहज रीतीने स्पष्ट होतो.

स्वामिद्रोहोत्पन्न [ऐ.प्र. ४८], देवालयोद्ध्वंसन [मंदिरांचा विध्वंस, ऐ. प्र. १५६], स्वपक्षपुष्टीकरणार्थ [ऐ. प्र. १८१], युक्त्यभिज्ञ [मुत्सद्दी, ऐ प्र. २६१], महाराष्ट्र-धर्मपालना [महाराष्ट्र धर्माचे परिपालन, ऐ. प्र. २८८], शूरसंभावना [शूरांचा सन्मान, ऐ. प्र. २८८], श्रमसहिष्णुता [अखंड श्रम करण्याची वृत्ती, ऐ. प्र. २८८], राष्ट्राप-मानकारक [ऐ. प्र. २९२], आजन्मैकपतित्व [जन्मभर एकाच पतीशी संसार कर-ण्याची निष्ठा, ऐ. प्र. ३१७], मानवसमाजगतिशास्त्र [ऐ. प्र. ३३२], कालदेशवर्त-मानानुसार [ऐ. प्र. ३५२], स्वपरसमाजचरित्र [ऐ. प्र. ३६१], स्वपरेतिहाससाधन [ऐ. प्र. २६१], अखिलगुणगुणालंकृत [सर्वगुणसंपन्न, ऐ. ले. २६९], अस्पष्टोच्चा-रासहिष्णुता [ऐ. वि. ५०], म्लेंच्छभाषासहिष्णुता [ऐ. वि. ५०], सर्वप्रसिद्धवनस्पति-नामजन्य [ऐ. वि. ६५], महाराष्ट्रधर्मप्रसरणकाळ [ऐ. वि. १४६], निर्जीवसृष्टपदार्थ-नामोपपन्न, [ऐ. वि. २०४], ऐतिहासिकव्याकरणानभिज्ञ [ऐ. वि. २४६], पूर्वप्रोक्त-गुणविशिष्ट [पूर्वी सांगितलेल्या गुणांनी युक्त, ऐ. वि. ३५७], गद्यपद्यवाक्येतिहास [ऐ. वि. ३६१], बालेतरोपयोगी [लहान मुलांखेरीज इतरांना उपयोगी, ऐ. वि. ३६३], पारलौकिक प्रसारकवाङ्मय [ऐ. वि. ३६४], बालोपयोगीशास्त्रकलाज्ञानप्रसारक वाङ्मयेतिहास [ऐ. वि. ३६५], चमत्कृतिजनकवाङ्मयेतिहास [ऐ. वि. ३६५], परलोकसंबंधकवाङ्मयेतिहास [ऐ. वि. ३६५], पुराणेतिहासादिशोधक [शा वि. ९].

इंग्रजी भाषेत स्थिर झालेल्या संकल्पना १९ व्या शतकात मराठी भाषिकांच्या परि-चयाच्या होऊ लागल्या. राजवाड्यांनी आपले महाविद्यालयीन अध्ययन आपल्या लोकविलक्षण स्वभावाप्रमाणेच पूर्ण केले होते. त्या काळात त्यांनी इंग्रजी ग्रंथांचा सखोल अभ्यास केल्याचा प्रत्यय त्यांच्या आत्मनिवेदनात्मक लेखनातून तर येतोच, परंतु अन्यत्रही त्याचे अनेक पुरावे मिळतात. इंग्रजीतील विचारांचा आपल्या वेगवेगळ्या लेखांतून सटीक परामर्श घेताना राजवाड्यांनी इंग्रजी संकल्पनांना पर्यायी मराठी शब्द योजण्याचा अनेक ठिकाणी प्रयत्न केलेला आहे. पाश्चात्त्य लेखकांची नावे ते रोमन लिपीतच उद्धृत करतात. [ऐ. प्र. ३१४], ज्या शब्दांसाठी त्यांना योग्य पर्याय

सापडले नाहीत ते इंग्रजी शब्द त्यांनी तसेच ठेवलेले आहेत. युनिव्हर्सिटी [ऐ. प्र. १], पॅरिग्राफ [ऐ. प्र. २४], Militarism [ऐ. प्र.३१०], Seminars [ऐ वि.२०], नंबर टेकर [शा. वि. ८], अशी काही उदाहरणे नमूद करता येतील. परंतु जेथे योग्य प्रतिशब्द घडविणे शक्य झाले तेथे राजवाड्यांनी नवीन मराठी शब्द तयार करून तो रुळविण्याचा प्रयत्न केला आहे. तेथेही त्यांनी, भाषाशुद्धीच्या चळवळीतील तत्त्वच त्याबद्दल चर्चा न करता स्वीकारलेले आहे. त्यातले काही पर्याय त्यांनी संस्कृतातील परिभाषेतून उचलले असणे शक्य आहे. असे काही शब्द पुढीलप्रमाणे — प्रतिनिधि-निक्षिप्त [Democratic, ऐ. प्र. १७८], प्रतिलेखक [Copiest, ऐ. प्र. ३०४], गतराजकारण [Past Politics, ऐ.प्र. ३०५], कालानुक्रमिक पद्धती [Chronological, ऐ.प्र. ३२०], कौलिक [Ethnological, ऐ. प्र. ३२१], अनुनयनपद्धती [Inductive Method, ऐ. प्र. ३३९], निर्णयन पद्धती [Deductive Method, ऐ प्र. ३३९], विश्लिष्टाक्षरात्मक [Monosyllabic, ऐ. प्र. ४२१], श्लिष्टाक्षरात्मक [Agglutinative, ऐ.प्र. ४२१], विकृतिक्षम [Inflected, ऐ. प्र. ४२१], त्यक्तविकृती [Analytical, ऐ. प्र. ४२१], छापक [Printer, ऐ. ले. २३३], तपासक [Proof reader, ऐ. वि. १५९], खिळारी [Compositor, ऐ. वि. २५४], आदेशप्रक्रियाकार [Phonetician, ऐ. वि. ३६०], दशकपद्धती [Decimal System, ऐ. वि. १५९], वैवेविक, आत्मिक, तात्त्विक [Psychological, ऐ. ले. २५६].

ऐतिहासिक कागदपत्रांचे संशोधन व वाचन करण्यामध्ये सारा जन्म जाऊनही राजवाड्यांच्या भाषेमध्ये फारसी शब्दांचे प्रमाण एका मर्यादेपलीकडे गेले नाही हे त्यांचे फार मोठे वैशिष्ट्य आहे. वर्षानुवर्षाच्या वापरामध्ये मराठी भाषेत स्थिर झालेले फारसी शब्द राजवाडे वापरतात परंतु त्याचा अतिरेक त्यांच्या भाषेत कोठेही दिसत नाही. आजच्या अभ्यासकाला अपरिचित असे फारसी-अरबी शब्द तर फारच तुरळक आलेले आहेत. अशा शब्दांच्या बरोबर फारसी-मराठीच्या मिश्रणातूनही त्यांचे काही शब्द निर्माण झालेले आहेत. सालवारी [वर्षानुक्रमे, ऐ. प्र. ६], गनीमाई [खंडणी (?) ऐ.प्र. ३४], तगीरी [बदली, ऐ. प्र. ५७], तोबा [चाबूक (?) ऐ. प्र. ८६], पेषामद ऐ. प्र. १७८], दस्त [पराभूत, ऐ.प्र. २६१], शाईर [शाहीर, ऐ प्र २७९], दफाता [स्मरणवही, ऐ. प्र. २९९], राशियत [ऐ. प्र. ३७०], पैदास्त [उत्पन्न फायदा, ऐ.प्र. ४५८], इलम [उपाय, ऐ.ले. २७३], बेमुबलग [विपुल, ऐ वि. ११], तलखं [त्रस्त, ऐ वि. १५७], बुरखेबाज [बुरखा धारण केलेले, ऐ. वि. १७८], तवलक्के [ऐ. वि. २४३] अशी काही उदाहरणे राजवाड्यांच्या भाषेत सापडतात.

आजच्या मराठीत फारसे वापरले जात नाहीत अशा अगदी थोड्या नामधातूंचा

राजवाडे यांनी प्रयोग केलेला आहे. प्रपंचिणे [विशद करणे, ऐ. प्र. ३४३], नमूदणे [नमूद करणे, ऐ. प्र. ३५८], शोधवणे [संशोधनाने सिद्ध करणे, तपासून घेणे, ऐ. ले. २३३], अंदाजणे [अंदाज करणे, ऐ. वि. १४७], शरमणे [शरम वाढणे, ऐ. ले. २८८], भुरकटणे [भुरा रंग चढणे, ऐ. वि. २४३].

राजवाड्यांच्या साऱ्याच विवेचनात त्यांच्या स्वतंत्र व काही वेळा धक्का देणाऱ्या दृष्टिकोणाचा प्रत्यय येतो. त्यांच्या शब्दघडणीमध्ये जसे त्यांचे स्वतःचे असे वेगळेपण काही शब्दांच्या बाबतीत उमटून दिसते तसेच त्यांच्या शब्दार्थांच्या संदर्भातही म्हणता येईल. त्यांच्या साहित्यातील अनेक शब्दांचे अर्थ रूढार्थापेक्षा अगदी वेगळे असल्याचे जाणवते. राजवाड्यांना अभिप्रेत असलेले पुढील शब्दार्थ पाहिले म्हणजे तेथे राजवाडे आपले स्वतंत्र अर्थ वाचकांच्या गळी उतरविण्याच्या प्रयत्नात आहेत हे स्पष्टपणे दिसते. उदा. व्यंग [सदोष, ऐ. प्र. २८], सशास्त्र [रीतसर, युक्त, ऐ. प्र. ४१], उफाड्याने [वेगाने, ऐ. प्र. ४६], ग्राहकशक्ती [ग्रहणशक्ती, आकलनशक्ती, ऐ. प्र. ९७], शिक्षा [शिक्षण, मार्गदर्शन, ऐ. प्र. १०७], अपूर्ती [अपूर्ण, त्रुटित, ऐ. प्र. १२४], गचाळ [अप्रमाण, अविश्वसनीय, ऐ. प्र. १५१], परीक्षा [चिकित्सा, ऐ. प्र. २४१], सहिष्णुता [संयम, मनःशांती, ऐ. प्र. २८६], यथास्थित [यथार्थपणे, योग्य प्रकारे, ऐ. ले. २३८], कुटिल कविता [वक्रोक्तिपूर्ण कविता ?, ऐ. ले. २५१], उत्तमोत्तम [उत्तम प्रकारे, ऐ. ले. २८०], झुरून जाणे [मिसळून जाणे, ऐ. वि. २०७], मुग्ध [सूचित, ध्वनित, ऐ. ले. २५३], वक्ता [प्रवक्ता, ऐ. ले. २८२], हैवान [नगण्य, तुच्छ, ऐ. वि. ११], विवंचना [चर्चा, शा. वि. ६]

राजवाड्यांच्या अफाट लेखनसंभारातील काही महत्त्वाच्या ग्रंथांच्या आधारे केलेली ही पाहणी आहे, तथापि त्या लेखनाचे प्रातिनिधिक स्वरूप व त्याच्या लेखनकालाचा प्रदीर्घ पल्ला ध्यानात घेतला म्हणजे राजवाड्यांच्या समग्र वाङ्मयाच्या अभ्यासातून निघणारे निष्कर्ष अगदी भिन्न स्वरूपाचे निघतील असे वाटत नाही. विविध वैशिष्ट्यांची निदर्शक अशी उदाहरणे भरपूर प्रमाणात मिळतील, परंतु त्या बाबतीतली राजवाड्यांची लेखनदृष्टी ही तीच असल्याचे प्रत्ययाला येईल याबद्दल संदेह वाटत नाही. राजवाड्यांचे वैचारिक योगदान हे तर सदैव अभ्यसनीय आहेच, परंतु केवळ भाषिक दृष्टीनेही त्यांचे लेखन अभ्यासकांना विचारप्रवर्तक ठरणारे आहे.

साधन ग्रंथ :-

ऐ. प्र. – ऐतिहासिक प्रस्तावना [चित्रशाळा], पुणे १९२८.

ऐ. ले. – राजवाडे लेखसंग्रह [साहित्य अकादमी]

ऐ. वि. – ऐतिहासिक विविध विषय [सत्कार्योत्तेजक सभा] धुळे, १९१८.

शा. वि. – शारदाविहार [सं. निरंतर–देव], पुणे १९४०.

राजवाडे आणि ' उखाहरण '

डॉ. यू. म. पठाण
२, आनंदनगर, टाऊन हॉलजवळ, औरंगाबाद–४३१००१

भारत इतिहास संशोधक मंडळाच्या शके १८३३ च्या अहवालात इति० वि० का० राजवाडे यांनी चोंभा कवीच्या ' उखाहरणा 'ची ४९ पृष्ठे संपादून प्रसिद्ध केली होती. आपल्या विवेचनात या हस्तलिखित पृष्ठांच्या उपलब्धीविषयी त्यांनी म्हटले होते. [१]

' अहमदनगरच्या ईशान्येस सुमारे चौदा कोसांवर तिसगाव नावाचे खेडे आहे. तेथे दिनकर रामदासी यांच्या मठात प्रस्तुत काव्य रा. रा. शंकर श्रीकृष्ण देव, यांस सापडले. मठात पोथ्यांच्या पत्रांचा ढीग व गळाठा पडला होता, त्यातले एक पान रा. देव यांच्या प्रथम नजरेस पडले व आकारावरून ते जुने असावेसे वाटले. जरा वाचून पाहता, तोच अंदाज खरा झाला. तेव्हा ढिगातील तसली सर्व पत्रे रा. देव यांनी निवडून काढली. ती ४९ भरली. ती त्यांनी कृपाळूपणे माझ्या स्वाधीन केली.'

शंकरराव देवांना ' ह्यानंतर केव्हा तरी ' उखाहरणाची आणखी सहा पृष्ठे तिसगाव मठातच मिळाली. ती पुढे श्री. ज. शा. देशपांडे यांनी म. सा. पत्रिकेत [२] व ' प्राचीन मराठी ' कविता,' [३] खंड : १, या ग्रंथात प्रसिद्ध केली. पण ' उखाहरणा'चे आद्यन्तयुक्त हस्तलिखित मात्र उपलब्ध झाले नव्हते.

राजवाड्यांनी या काव्याचा जो भाग संपादून प्रसिद्ध केला, तोच पुढील संशोधनाला गती देण्यास प्रेरक ठरला. त्यांनी आपल्या संपादकीय विवरणात याविषयी लिहिलेले वाक्य न् वाक्य महत्त्वाचे होते. त्यांनी प्रतिपादिलेल्या मतांविषयी मतभेद असू शकतील व तसे आहेतही. मी त्याचे सविस्तर विवेचन ' उखाहरणा 'च्या मी संपादिलेल्या प्रतीच्या प्रस्तावनेत केले आहे, दुर्दैवाने त्याची फारशी दखल घेतली गेली नाही. ' नवभारत '-मधून एका समीक्षकाने त्याविषयी जे लिहिले, ते पूर्वग्रहदूषित होते. पुढे त्याचा समाचार मध्ययुगीन मराठीच्या दोन श्रेष्ठ व अग्रगण्य संशोधकांनी घेतला. मी त्या वादात पडलो

नाही, कारण ' उखाहरणा 'चे मराठी वाङ्मयात ' अवतरण ' हीच माझ्या दृष्टीने अपूर्व अशी बाब होती. माझे स्नेही व श्रेष्ठ संतसाहित्यसंशोधक डॉ. ढेरे यांनाही माझ्या-प्रमाणेच संपूर्ण ' उखाहरण ' संपादून प्रसिद्ध व्हावे, असे वाटत होते व त्यासाठी त्यांनीही मनःपूर्वक सहकार्य दिले होते. राजवाड्यांच्या पाऊलखुणा न्याहाळतच मी या ग्रंथाचे संशोधन व संपादन केले. त्यांनी आपल्या संपादकीय विवेचनातच या त्रुटित हस्तलिखिताच्या आधारे कितीतरी गोष्टी सांगून ठेवल्या होत्या. त्यांनी जी अनुमाने केली होती ती जवळजवळ सिद्धान्तस्वरूपच होती. ही अनुमाने केवळ त्या विखुरलेल्या ४९ पृष्ठांवर आधारलेली होती.

सुदैवाने शोध घेता घेता, ' उखाहरणा 'चे एक आद्यन्तयुक्त हस्तलिखित लिंबगावच्या (गोपाळचावडी) महानुभाव मठाच्या हस्तलिखित-संग्रहात उपलब्ध झाले. त्यातील प्रतलेखकाची लेखनपद्धती देवांना उपलब्ध झालेल्या प्रतीच्या लेखनपद्धतीशी बरीचशी मिळतीजुळती होती. एकाच प्रतलेखकाने या दोन प्रती केल्या असाव्यात, असे म्हणण्याइतपत साम्य या दोन्ही प्रतींत आढळले.

राजवाड्यांनी या ग्रंथाच्या संदर्भात जी अनुमाने केली होती, त्यांतील अनेक अनुमाने काळाच्या आड दडलेल्या सत्याचा वेध घेणारी होती.

उखाहरणाच्या ओवीसंख्येबद्दलचे त्यांचे अनुमान तंतोतंत जुळले. त्यांनी याविषयी म्हटले होते :

' ह्या काव्याचा जो त्रुटित भाग सध्या प्रसिद्ध होत आहे, त्याचा शेवटल्या ओवीचा संख्यांक १८८५ आहे. संपूर्ण काव्य व्हावयाला आणिक सुमारे ४००–५०० ओव्या हव्या. म्हणजे सुमाराने सरासरी २३००–२४०० ओव्यांचा हा ग्रंथ मुळात असावा. पैकी जी ४८½ पाने सध्या प्रसिद्ध होत आहेत, त्यात २२४३ चरण आहेत. म्हणजे **सुमारे एक चतुर्थांश काव्य आपल्या हाती लागले आहे. बाकीचे कायमचे गहाळ झाले. कदाचित दुसरी एखादी प्रत पुढेमागे सापडल्यास प्रत्यंतराला तेव्हा उपयोगी पडेल.** सध्या प्रत्यंतराशिवाय एकाच एकस्यादुकस्या त्रुटित पोथी-वरून प्रसिद्धी निरुपायाने करावी लागत आहे. त्यामुळे एक मोठे नुकसान होत आहे. '

लिंबगाव (गोपाळचावडी) मठात उपलब्ध झालेल्या हस्तलिखितात २३११ ओव्या आहेत.

राजवाड्यांनी या काव्याचे आगळेपण, महत्त्व व महात्म्य अचूक जाणले होते. उखाहरणाच्या भाषेत त्यांना यादवकालीन मराठीचे अवशेष आढळले, एवढेच नव्हे तर बव्हंशी ज्ञानदेवकालीनत्व आढळले. उखाहरणाची भाषा एकनाथाचा समकालीन व त्याहून वडील जो दासोपंत, त्याच्या भाषेहून ज्ञानेश्वरी भाषेसारखी जास्त आहे.'[४] किंवा ज्ञानेश्वराच्याहून चौंभा अर्वाचीन आहे[४] व ही महत्त्वपूर्ण विधाने करून त्यांनी

चोंभा आणि यादवकाल यांची जणू सांगडच सूचित केली. ‘उखाहरणाच्या काळा’-विषयी श्री. देवीसिंग चौहान यांनी विचार केला आहे.[५] त्यातूनही या काव्याचे एकनाथ-पूर्वत्व, (यादवकालीनत्व) सिद्ध होते. राजवाडे म्हणतात त्याप्रमाणेच कवीचा काल केवळ ‘उखाहरणा’तील अंतःप्रमाणावरून व भाषेवरून ठरविता येतो.

राजवाडे यांनी ‘उखाहरणा’ची ‘भाषा बहुतेक ज्ञानेश्वरीतल्यासारखी आहे’ हे जे महत्त्वपूर्ण विधान केले आहे व त्यासाठी काही प्रमाणे दिली आहे ती लक्षात घेण्याजोगी आहेत.

(१) ‘नामांची, धातूंची व अव्ययांची रूपे प्रकृत काव्यात थेट ज्ञानेश्वरीतल्यासारखी आहेत.’

(२) ‘उनुप्रत्ययान्त धातुसाधिते या काव्यात सडकून आहेत. हे उनुधातुसाधित ज्ञानेश्वरीत फार, दासोपंतात त्याहून अति कमी, दासबोधात क्वचित व श्रीधराच्या काव्यात बिलकुल न दिसणारे ... दासोपंताच्या काव्यातल्यापेक्षा ह्या काव्यात उनुधातुसाधित फार.’

(३) ‘चतुर्थीचा थे प्रत्यय ज्ञानेश्वरीत चार पाच स्थली आहे. या काव्यात पंधरावीस ठिकाणी आहे.’

(४) ‘म्हणौनि, म्हणौनु वगैरे औनि, औनु प्रत्ययान्त धातुसाधिते या ग्रंथात सडकून आहेत.’

(५) ‘दो घे, नेदेखे न धली वगैरे रूपे थेट ज्ञानेश्वरीतल्यासारखी आहेत.’

(६) ‘ज्ञानेश्वरीतील जेया हे रूप यद्यपि ह्या पोथीत हमेश येते तथापि जया हेही रूप चारदा (६८, ७२५, ८५६, १६५६) आले आहे. कदाचित जया मधील ज वर मात्रा देण्यास नकलाकार चुकला असल्याचा फार संभव आहे.’

(७) (‘उखाहरणा’ च्या राजवाडे संपादित प्रतीच्या) ‘१८४५ व्या ओवीत असमासास—असमासाहास हा शब्द आला आहे. तो ज्ञानेश्वरीत येतो’ असेही राजवाडे म्हणतात. हा शब्द प्रस्तुत गोपाळचावडो-प्रतीत ओवी क्र. २०२३ मध्ये ‘अस्मसाहस’ या रूपात आढळतो.

(८) ज्ञानेश्वरीत अरबी-फार्सी शब्द (फारसे) आढळत नाहीत. एकूण यादवकालीन भाषेतच हाताच्या बोटांवर मोजण्याइतके तुरळक अरबी-फार्सी शब्द आढळतात. व त्याचे कारण मी माझ्या ‘मराठी बखरीतील फार्सीचे स्वरूप’ या ग्रंथात सांगितले आहे.[६] ज्ञानेश्वरपूर्व कालात अरब व इराणी लोक व्यापाराच्या निमित्ताने भारतात आले होते व त्यामुळे काही (तुरळक) अरबी-फार्सी शब्द ज्ञानदेवकालीन भाषेत आले होते. ‘पोतडी (१४–१७) आणि ‘निसान’ (९–२१६) हे दोन फार्सी शब्द ‘ज्ञानेश्वरी’त आढळतात, असे डॉ. शं. गो. तुळपुळे

यांनी 'यादवकालीन मराठी भाषा' या ग्रंथात निर्देशिले असून त्यांचे पुढील विधान महत्त्वाचे वाटते.[७]

'ज्ञानेश्वरांच्या आणि तत्समकालीन लेखकांच्या मराठी भाषेत फार्सी शब्द नाहीत' अशी राजवाडे ग्वाही देतात; परंतु यादव-मराठीला फार्सीचा संपर्कही नव्हता हे म्हणणे अवास्तव आहे. इतिहास आणि यादवकालीन मराठी भाषा ही त्याच्याविरुद्ध जातात. उत्तर कोकणच्या किनाऱ्याशी अरबांचा व्यापार सातव्या शतकापासून सुरू होता आणि साहजिकच तत्कालीन कोकणी प्रांतिक बोलीत काही अरबी शब्द शिरले असले पाहिजेत. 'चोंभ्याच्या काव्यात फार्सी शब्द एकही नाही' असे राजवाडे यांनी म्हटले आहे.[८] हे विधान चोंभा कवीस ज्ञानदेवसमकालीन ठरवीत असले तरी 'ज्ञानेश्वरी'त काही तुरळक (दोन का होईना) अरबी-फार्सी शब्द आहेत हेही चिन्त्य होय आणि 'उखाहरणा'च्या गोपाळचावडो-प्रतीत पुढील ४ शब्द या संदर्भात विचारात घेण्याजोगे वाटतात. ते असे : निशाण (ओ. ९६०), तबक (ओ. ९६०), दमामे (ओ. ९६०) आणि पेरोज ('पेरोजांची' ओ. २१५५). यातील 'तबक' शब्द शंकास्पद आहे, कारण तबक या अरबी शब्दाचा 'ताट' किंवा 'मोठे ताट' असा अर्थ प्रचलित आहे. 'उखाहरणा'त हा शब्द वाद्यांच्या संदर्भात उपयोजिला असल्याने तो अरबी 'तबक' हा नसावा, अन्य वाद्यविषयक शब्दाचे प्रतलेखकाने लिहिलेले ते अपभ्रष्ट रूप असावे असे निश्चितपणे म्हणता येईल. वाद्य या अर्थाने 'तबक' हा शब्द अरबी-फार्सी या भाषांतही प्रचलित नाही.[९] 'निशाण' हा शब्द तर 'ज्ञानेश्वरी'तही आढळतो. उरले 'दमामा' (फा. दम्दमह) आणि 'पेरोज' हे दोन फार्सी शब्द. यांपैकी 'पेरोज' हा शब्द यादवकालीन भाषेत धवळ्यांच्या उत्तरार्धात (उत्त. ५) आढळतो. याचा अर्थ 'उखाहरणा'तील तीन अरबी-फार्सी शब्दांपैकी दोन यादवकालीन (ज्ञानदेव-समकालीन) भाषेत **असून** 'दमामा' हा आणखी एक फार्सी शब्द तेवढा 'उखाहरणा'त आढळतो. एकूण, ज्ञानदेवसमकालीनत्वाचाच विचार करायचा झाला तर फार्सीचा जेवढा प्रभाव 'ज्ञानेश्वरी' वर आढळतो तेवढाच प्रभाव 'उखाहरणा' वर आढळतो.

हे सर्व पाहता राजवाडे यांनी घेतलेला हा निर्णय ('तात्पर्य, उखाहरणाचा *) **भाषा बहुतेक ज्ञानेश्वरीसारखी आहे.**[१०] साधार व समप्रमाण आहे. याच ठिकाणी त्यांनी '**चोंभ्याची भाषा ज्ञानेश्वरीसारखी जास्त आहे**'[१०] हेही मान्य केले आहे. आणि शेवटी तर त्यांनी एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन चोंभा कवीला व त्याच्या या काव्याला न्याय दिला आहे. त्यांचा हा निर्णय एक ऐतिहासिक महत्त्वाचा निर्णय आहे, हे वाङ्मयेतिहासकार मान्य करतीलच.

' एकंदरीत (उदाहरणाची) भाषा ज्ञानेश्वरीतल्यासारखी हुबेहुब आहे. फरक असलाच (व तो आहे) तर तो अत्यंत सूक्ष्म आहे. त्यामुळे, असे विधान करणे शक्य होते की ज्ञानेश्वरांनंतर थोड्याच अवधीने हा चोंभा कवी झाला. शक १३०० पासून शक १४०० पर्यंतच्या काळात, हा केव्हातरी होऊन गेला असावा. खेरीज, ह्याचे नावही आतापर्यंत महशूर नव्हते, या बाबीचेही कालनिर्णयाला उपयुक्तत्व आहे. '[११].

या निर्णयाच्या पूर्वार्धाशी मी सहमत असलो तरी उत्तरार्ध चोंभा कवीला पलीकडील (ज्ञानदेवोत्तर) काळात नेत असल्याने तो मान्य करवत नाही. खरे तर ' ज्ञानेश्वरी '-तील रूपांहूनही काही विलक्षण (महत्त्वाचीं) रूपे या ग्रंथात आढळतात व ती प्राकृत भाषांच्या व्याकरणाच्या संदर्भात अत्यंत लक्षणीय असल्याचे श्री. राजवाडे यांनाही जाणवले आहे. याविषयी ते म्हणतात, [१२]

' ज्ञानेश्वरीतील मराठी भाषेच्या व्याकरणात जी रूपे सांगितली आहेत, त्याहून एक-दोन रूपे या ग्रंथात अशी सापडतात ती ही—

दैत्यकाळयुनासा भेण ।
गेलेती समुद्रा सरण ॥ १४२३ ॥

कालयवन नावाचा दैत्य कृष्णाचा शत्रू होता, त्याच्या भयाने, असा दैत्यकाळयुनासा भेण या वाक्यखंडाचा अर्थ आहे. येथे काळयुनासा हे चान्त विशेषण आहे. काळयुनासा भेण म्हणजे काळयुनाचा (उच्चार ' च्या ') भेण. ' चा ' चोंभा किंवा चोंभाचा नकलकार ' सा ' उच्चार करतो. ग्रंथात चान्त विशेषणे इतरत्र हवी तितकी आहेत. ज्या चान्त विशेषणाला अर्वाचीन वैयाकरण षष्ठी म्हणतात, त्याचे हे सान्त रूप आहे.

काळयवन = काळयोन = काळयुन. षष्ठी काळयुनासा.

– १७३३ व्या ओवीत असा प्रयोग आहे :

' तीये अग्नीसी माझारी : गरूड जळती कवणी परी :

' तीये अग्नीसी माझारी ' म्हणजे त्या अग्नीच्यामध्ये. ' अग्नीसी ' हे षष्ठीसंबंधवाचक विशेषण आहे.

अग्नीचिये = अग्नीसिए = अग्नीसी

हा सा–सी प्रयोग लक्षात ठेवण्यासारखा आहे. **प्राकृत भाषांच्या व्युत्पित्सूला या** ग्रंथात बहुत खाद्य सापडेल. [१३]

यादव–मराठी हा मध्ययुगीन आर्यभाषा (MIA) प्राकृत आणि आधुनिक भारतीय आर्यभाषा (NIA) यांना जोडणारा दुवा होय, असा निष्कर्ष डॉ. तुळपुळे यांनी ' यादवकालीन मराठी भाषा ' या आपल्या ग्रंथात काढला असून त्या

संदर्भात महाराष्ट्र व अपभ्रंश भाषांचे 'उखाहरणा'च्या भाषेशी जे निकटचे साहचर्य आढळते, ते लक्षात घेतल्यास या काव्यातील ज्ञानदेवकालीनत्वाची बीजे जाणवल्याविना राहात नाहीत. या संदर्भातही राजवाडे यांनी दिलेली ग्वाहीच पुरेशी आहे.

'श्वासबद्दल सस, स्वामीबद्दल सामी, शस्त्रबद्दल सस्त्र, कालिंदीबद्दल काळंद्री, धनुष्यबद्दल धनुक, जिव्हाबद्दल जीवा, अनिरुद्धबद्दल अनुर्धं, कृष्णबद्दल क्रस्ण, पन्नकबद्दल पानक, भाषाबद्दल भास, स्मरबद्दल सुमर, असे **शेकडो अपभ्रंश अगदी महाराष्ट्रात व अपभ्रंश प्राकृतातल्याप्रमाणे या ग्रंथात आढळतात हेच या काव्याचे मुख्य महत्त्व होय** * आणि याच दृष्टीने ते येथे संपादले जात आहे. ज्ञानेश्वरीत शुद्ध संस्कृत **उच्चार भरणा या ग्रंथातल्याहून फार.** * ज्ञानेश्वर सर्वविद्यासंपन्न होता व यद्यपि प्राकृतात ग्रंथरचना करण्याचा प्रयत्न त्याने केला, तथापि शुद्ध संस्कृत उच्चार त्याच्या ग्रंथात अतोनात आले. **तशी गोष्ट चोंभ्याची किंवा चोंभ्याच्या नकलकराची नाही** * ते संस्कृत शब्दही तत्कालीन बोलण्यातल्या भाषेप्रमाणे अपभ्रंश करून लिहितात व अर्थात बोलतात.[१४]

आणि आपल्या प्रस्तावनेच्या शेवटी तर राजवाडे यांनी ग्रंथाचे ज्ञानदेवकालीनत्व सरळ शब्दात मान्य केले आहे : **ज्ञानेश्वरकालीन जुन्या मराठी भाषेतील हा दुसरा ग्रंथ.** * प्रसिद्ध करण्यापासून मराठी भाषेच्या व्याकरणाला व इतिहासाला फायदा होईल हे उघड आहे. 'या विधानास त्यांचे यापूर्वीचे ' ज्ञानेश्वराच्याहून चोंभा हा अर्वाचीन आहे.' हे केवळ 'या' प्रत्ययाच्या संदर्भात केलेले विधान अन्तर्विरोधात्मक वाटत असले तरी त्यावर राजवाडे यांना फार भर द्यावयाचा आहे, असे त्यांच्या या प्रस्तावनेतील एकूण विवेचनावरून वाटत नाही. (आणि तरीही, गोपाळचावडीप्रतीत राजवाडे यांना हव्या असलेल्या 'इया' या रूपाशी सादृश्य असलेले चतुर्थ्यन्त 'इएसि' हे रूप ओवी क्र. १८५ मध्ये आढळते, हेही येथे नमूद करून ठेवणे इष्ट आहे असे मला वाटते.

'ज्ञानेश्वरांच्याहून चोंभा अर्वाचीन आहे' या राजवाडे यांच्या विधानाचे परीक्षणही वरील विवेचनाच्या व प्रमाणांच्या संदर्भात करायला हवे. हे अर्वाचीनत्व असलेच तर ते प्रतकाराचे असावे, कवी चोंभा याचे नसावे, याची साक्ष 'उखाहरणा'तील ज्ञानदेवकालीन भाषाविशेष देतात.

संदर्भ :

१. भा. इ. सं. मं. अहवाल, शके १८३३, पृ० १.
२. म. सा. पत्रिका, ३४–१३७, एप्रिल–जून, १९६१.
३. प्राचीन मराठी कविता, खंड १, सं. ज. शा. देशपांडे, मुंबई, १९६२.

४. भा. इ. सं. मंडळ अहवाल, शके १८३३, पृ. ३.
५. मराठी आणि दक्खिनी हिंदी, म. रा. सभा, पुणे, पृ. ५४ व ५८.
६. मराठी बखरीतील फार्सीचे स्वरूप, यू. म. पठाण, पृ. १४ ते १७.
७. यादवकालीन मराठी भाषा, पहिली आवृत्ती, डॉ. शं. गो. तुळपुळे, पृ. ३४३.
८. भा. इ. सं. मं. अहवाल, शके १८३३, पृ. ३.
९. मराठी बखरीतील फार्सीचे स्वरूप, यू. म. पठाण, पृ. ४९५.
* 'उखाहरणाची' हा शब्द प्रस्तुत लेखकाचा व राजवाडे यांना तेथे त्याच संदर्भात विवेचन करावयाचे आहे. पाहा– भा. इ. सं. अहवाल, शके १८३३, पृ. ३.
१०. ठळक टाईप प्रस्तुत लेखकाचा.
११. भा. इ. सं. मंडळ अहवाल, शके १८३३, पृ. ४.
१२. भा. इ. सं. मंडळ अहवाल, शके १८३३, पृ. ५–६.
१३. ठळक टाईप प्रस्तुत लेखकाचा
* टळक टाईप प्रस्तुत लेखकाचा
१४. भा. इ. सं. मंडळ अहवाल, शके १८३३, पृ. ४
* ठळक टाईप प्रस्तुत लेखकाचा.

श्री. इतिहासाचार्य राजवाडे आणि कोरीव लेख

डॉ. चिं. ना. परचुरे

५२८/क शनिवार पेठ, पुणे ४११०३०

इतिहासाच्या साधनांमध्ये कोरीव लेखांचे विशेष स्थान सर्वमान्य आहे. 'प्राचीन मराठी कोरीव लेख' हा ग्रंथ डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी प्रसिद्ध करून **कोरीव** हा शब्द रूढ केला आहे. मात्र या ग्रंथात त्यांनी शिलालेख व ताम्रपट या साधनांचा आढावा घेतला आहे. कातड्यांवर कोरलेल्या लेखांचा त्यात समावेश झालेला नाही. उस्मानिया विद्यापीठातील मराठी विभागाचे माजी विभागप्रमुख – डॉ. श्री. रं. कुलकर्णी यांनी इ. स. १९७० मध्ये 'प्राचीन मराठी गद्य-प्रेरणा आणि परंपरा' हा ग्रंथ प्रसिद्ध केला. या ग्रंथात हैदराबाद येथील राष्ट्रीय वस्तुसंग्रहालयातील कातड्यांवरील कोरीव लेखांचा उल्लेख आला आहे. **कोरीव** या शब्दाचा इतिहासाच्या साधनांच्या दृष्टीने असा व्यापक अर्थ आहे. इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनी इतिहाससंबंधीची जी असंख्य साधने आणि कागदपत्रे उपलब्ध करून दिली तिच्या वर्गवारीत शिलालेख आणि ताम्रपटांनाही निश्चित स्थान प्राप्त आले आहे. कातड्यावरील लेख मात्र त्यांना उपलब्ध झाल्याचे दिसत नाही. तेव्हा इतिहासाचार्यांनी संकलित केलेल्या शिलालेख व ताम्रपटासंबंधी त्यांनी कसा अभ्यास केला याचा परिचय करून घेणे अगत्याचे आहे. राजवाडे-कार्याचा अभ्यास करताना या त्यांच्या संशोधित साधनांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही.

मराठ्यांच्या इतिहासाची साधने एकत्रित करताना उपलब्ध सर्व साधनांचा राजवाडे स्वीकार करीत, त्यांचा अभ्यास करीत आणि त्यावर ठाम स्वरूपाचे भाष्यही करीत. शक १८३२ आषाढ शु. प्रतिपदेला त्यांच्या प्रेरणेने, प्रयत्नाने आणि कै. खंडेराव मेहेंदळे यांच्या सहकार्याने पुण्यात भारत इतिहास संशोधक मंडळाची स्थापना झाली. यामुळे संशोधित सामग्री अभ्यासकांपुढे सादर करण्यास त्यांना स्वतंत्र व्यासपीठ तयार

झाले. इतिहासविषयक साधनांवर टीका-टिपण्णी करण्याकरिता ह्या पीठाचा प्रारंभीच्या काळात इतिहासाचार्यांनी पुरेपूर उपयोग करून घेतला. कागदपत्रे, प्राचीन मराठी-संस्कृत काव्य, कवी, पोथ्या, व्युत्पत्त्या, व्याकरण, यांच्याबरोबरच काही शिलालेख व ताम्रपट सादर करून त्यांनी त्यांवर स्वतःचे विचार व्यक्त केले. शक १८३७ नंतर त्यांनी इतरत्रही असे विचार प्रकाशित केले आहेत. मंडळाच्या पहिल्या वर्षाच्या दुसऱ्याच बैठकीत म्हणजे शक १८३२, भाद्रपद शु. ५ रोजी राजवाड्यांनी 'शेंदुर्णी येथील खोलेश्वराचा शिलालेख' यावर भाष्य केल्याची मंडळाच्या दफ्तरी नोंद झाली आहे. पुढील सुमारे पाच वर्षांत म्हणजे शक १८३७ पर्यंत साधने सादर करण्याचे कार्य त्यांनी या मंडळाच्या व्यासपीठावरून केले व नंतर अन्य क्षेत्रांतही ते संचार करू लागले.

तसे पाहता प्राचीन कोरीव लेख अभ्यासाच्या दृष्टीने वेगवेगळ्या कारणांमुळे क्लिष्ट बनतात असे म्हटले तर ते वावगे ठरू नये. वारा, पाऊस किंवा इतर नैसर्गिक कारणांनी किंवा दीर्घकाल जमिनीत गाडल्यामुळे त्यावरील अक्षरे अस्पष्ट होतात. दैनंदिन वापरामुळे झिजतात किंवा तुटतातही! क्वचित त्यासंबंधीच्या धार्मिक पण भावुक श्रद्धेमुळे ती पुसट झालेली आढळतात. यामुळे त्यावरील लिप्यंतर जेवढे प्राचीन काळातील, तितके मजकूर वाचण्यातील दुर्बोधता अधिक वाढण्याची शक्यता असते. अनेकदा त्यातील मजकूर सामान्य वा शासकीय व्यवहारांशी संबंधित असूनही त्यास धार्मिकतेचे आवरण चढते व हे लेख विनाकारणच देव्हाऱ्यात जाऊन बसतात.

इसवी सन १८३७–३८ मध्ये जेम्स प्रिन्सेप याने ब्राह्मी लिपीसंबंधी शोध घेऊन या लेखांच्या चिकित्सक अभ्यासाचे एक स्वतंत्र दालन निर्माण केले. कोरीव लेखांच्या दृष्टीने या शतकाच्या पहिल्या अर्ध-शतकातील ही एक महत्त्वाची घटना मानावी लागते. ह्या वेळी इतिहासाचार्यांचा जन्मही झालेला नव्हता; पण या घटनेमुळे कोरीव लेखांच्या अभ्यासास भारतात प्रारंभ झाला. 'इंडियन अँटिक्वरी' 'एपिग्राफिका इंडिया' इत्यादी नियतकालिकांतून कोरीव लेखांचे ठसे व त्यावरील विवेचन प्रसिद्ध होऊ लागले.

कोरीव लेखांच्या अभ्यासाचे प्रथम श्रेय युरोपीय संशोधकांकडे जाते. या काळात कॅ. जेम्स ग्रँट, डॉ. वॉथेन, मि बर्जेस, मि. कझेन्स, ग्रँड जेकम किंवा जेम्सवर्ड इ. अभ्यासक या क्षेत्रात पुढे आलेले आढळतात. मात्र या अभ्यासकांच्या पाठोपाठ लगेच डॉ. भाऊ दाजी किंवा बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर असे भारतीय अभ्यासकही या संशोधनक्षेत्रात पुढे सरसावले. या वेळी रॉयल एशियाटिक सोसायटीच्या मुंबई जर्नल-मधून व पुढे मुंबई प्रांताच्या गॅझेटिअरमधून कोरीव लेखांचे प्रकाशन होऊ लागले. अर्थात नव्या अभ्यासकांचे लक्ष या विषयाकडे वेधले गेले. राजवाडे चरित्राचा हा उदयकाळ मानावा लागेल. ह्या काळातही मराठी भाषेतील एखादा शिलालेख वा

ताम्रपट प्रकाशात आल्याचे आढळत नाही.

कोरीव लेखांच्या या पहिल्या कालखंडात मराठी लेखांकडे कुणा संशोधकाचे फारसे लक्ष गेलेले आढळत नसले तरी ह्या काळात व पुढेही संशोधित झालेल्या तमिळी आणि कानडी लेखांची संख्या ध्यानात घेण्याइतकी आहे. ह्या भाषांतील कोरीव लेख तर प्रसिद्ध झालेच, परंतु पुढे नरसिंहाचार किंवा फ्लीट ह्यांच्यासारख्या अभ्यासकांची त्यावरील व्याकरणेही प्रसिद्ध झाली. या वेळी मराठी भाषेतील कोरीव लेख फारसे उपलब्धच नव्हते तर त्यांचे व्याकरण कसे अभ्यासले जाणार? मराठी भाषेच्या दृष्टीने जणू संकलनाचा प्रारंभही नव्हता. मराठी भाषेच्या ह्या आरंभकाळातील प्रामुख्याने इतिहासाचे एक साधन या दृष्टीने या अभ्यासक्षेत्रात मराठी भाषेचे कडवे अभिमानी आणि इतिहास संशोधक या नात्याने राजवाड्यांचे कार्य महत्त्वाचे ठरते. तसे पाहता त्यांच्या क्षेत्राचा विस्तार आटोपशीरच आहे; पण संशोधनक्षेत्रात मराठीच्या दृष्टीने त्यांच्या कार्यास महत्त्वाचे स्थान द्यावे लागते व त्यांच्यासंबंधीच्या अपेक्षाही वाढतात.

राजवाडे यांनी शेंदुर्णी शिलालेखावर प्रथम भाष्य केले असले तरी तत्पूर्वीच या विषयाच्या अभ्यासास त्यांनी प्रारंभ केला होता हे निश्चित. त्यांनी केलेले विशेषतः मराठी वाङ्मयविषयक कार्य अभ्यासताना, भाष्य केलेले व सादर केलेले जे शिलालेख आणि ताम्रपट ध्यानात आले ते अकारविल्हे असे –

शिलालेख

लेखाचे नाव	प्रकाशन–उपलब्धी
१. आगासन शिलालेख	... इतिहाससंग्रह, भाग २, क्र. १४
२. आळंदी शिलालेख	... विश्ववृत्त, इ. १९०८
३. उद्ध्वस्त पाटण येथील नदीत सापडलेला फुटका शिलालेख	... 'प्रभात' मासिक वर्ष १ – अं. ५. शके १८२८ श्रावण शु. १, पृ. १ ते २४
४. कर्णेश्वराच्या देवळातील शिलालेख	... भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे. इतिवृत्त शके १८३५, पृ. २१०–२११.
५. कऱ्हाड येथील एक मराठी शिलालेख	... भा. इ. सं. मंडळ, पुणे इतिवृत्त शके १८३६, पृ. १७५.
६. खेडच्या सिद्धेश्वराच्या देवळातील व दीपमाळांवरील व पुष्करणीवरील शिलालेख	... भा. इ. सं. मंडळ, पुणे, अहवाल शके १८३२, पृ. ३९-४०.

लेखाचे नाव	प्रकाशन-उपलब्धी
७. तंजावर येथील शिलालेख : मराठ्यांचा...	(अ) 'प्रभात' मासिक, वर्ष १ : अंक शके १८२८ चैत्र शु. १ पृ. १ ते १६ वैशाख पृ. १७ ते २४. ज्येष्ठ पृ. २५ ते ४०. आषाढ पृ. ४१ ते ५४. (आ) मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ९ इ. स. १९०७.
८. देवरूख येथील शके १५७५ मधील शिलालेख ...	भा. इ. सं. मंडळ, पुणे. इतिवृत्त शके १८३५ पृ. २०९-२१०.
९. नागांव शिलालेख	ग्रंथमाला व. ५
१०. निंबगाव येथील खंडोबाचे देवळा-समोरील दीपमाळेवरील शिलालेख ...	भा. इ. सं. मंडळ, पुणे. अहवाल शके १८३२, पृ. ३८.
११. निंबगाव येथील खंडोबाच्या देवळाच्या... पाठीवरील शिलालेख	भा. इ. सं. मंडळ, पुणे. अहवाल शके १८३२, पृ. ३८.
१२. पंढरपूर येथील शक १२३३ मधील ... शिलालेख	'ग्रंथमाला' वर्ष १२ : अंक ३. इ. १९०५–जून. पृ. १-२.
१३. पंढरपूरच्या विठोबाच्या देवळातील ... चौऱ्यायशीचा शिलालेख	'ग्रंथमाला' वर्ष १२ : अंक १. इ. १९०५ एप्रिल पृ. १ ते ५५.
१४. पळसदेव शिलालेख ...	—
१५. पाटण येथील शक ११२८ तला ... मराठी शिलालेख	'प्रभात' मासिक, वर्ष १ अंक ५. शक १८२८ श्रावण शु. १ पृ. १ ते २२.
१६. बाहाळ येथील गढीवरील शिलालेख ...	'ग्रंथमाला' अंक १४२, वर्ष १२ अंक १०, इ. १९०६ जानेवारी, पृ. २.
१७. बांदीवडे येथील एक मराठी शिलालेख... (गोवे फोंडा) शके १३३५	भा. इ. सं. मंडळ, पुणे. अहवाल शके १८३५, पृ. १६९ ते १७५.
१८. मठगाव शिलालेख ...	मराठ्यांच्या इतिहासातील साधने, खंड ८ उपप्रस्तावना, पृ. ३३.
१९. मसूर येथील जयशंकराच्या देवळा-जवळील थडग्यावरील दोन शिलालेख ...	भा. इ. सं. मंडळ, पुणे. अहवाल शके १८३२, पृ. ४१.

लेखाचे नाव	प्रकाशन-उपलब्धी
२०. मसूर येथील भवानीच्या देवळाबाहेरील रस्त्याच्या कोपऱ्यावरील थडग्यावरील शिलालेख	... भा. इ. सं. मंडळ, पुणे. अहवाल, शके १८३२, पृ. ४१.
२१. शेंदुर्णी येथील खोलेश्वराच्या देवळातील शिलालेख	... भा. इ. सं. मंडळ, पुणे. अहवाल शके १८३२, पृ. ३७
२२. शेल पिंपळगाव येथील शिलालेख	... भा. इ. सं. मंडळ, पुणे. अहवाल, शके १८३२, पृ. ३८-३९.
२३. सोनगीरच्या किल्ल्यावरील शिलालेख	... 'ग्रंथमाला' अंक १४२, वर्ष १२ अंक १०, इ. १९०६ जानेवारी, पृ. १.

ताम्रपट

१. कशेळी येथील शक ११७३ तील शिलाहारांचा ताम्रपट	... भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे. अहवाल शके १८३५, पृ. २२० ते २२६
२. चिकुर्डे ताम्रपट	... 'विश्ववृत्त', इ. १९०७ जानेवारी.
३. चिकोडी येथील शक ९१० तील एक ताम्रपट.	... भा. इ. सं मंडळ, पुणे. अहवाल शके १८३५, पृ. ४३० ते ४३५.
४. मंगळवेढे येथील शक ४१० तील ताम्रपट	... 'प्रभात' मासिक, वर्ष २ : अंक ८-९. शके १८२९ कार्तिक-मार्गशीर्ष, पृ. ७.
५. शक ११२६ तील तीन मराठी ताम्रपट	... भा. इ. सं. मंडळ, पुणे. इतिवृत्त शके १८३६ पृ. २०९ ते २१८.
६. श्रवणबेळगोळ शिलालेख	... 'विश्ववृत्त', १९०७ जुलै.

शिलालेख-विचार

याप्रमाणे २९ शिलालेख व ताम्रपटांपैकी बहुसंख्य लेख राजवाडे यांनी शोधून काढलेले व काहींवर भाष्य वा टीका-टिपणी केलेले आहेत. मराठी भाषेतील एकूण उपलब्ध कोरीव लेखांची संख्या ध्यानात घेता इतिहास संशोधनाच्या प्रारंभीच्या काळात त्यांनी सादर केलेल्या किंवा अभ्यास केलेल्या लेखांची संख्या महत्त्वाची ठरते. या लेखांचे प्रकाशनकाळ किंवा भाष्यकाळ जरी ध्यानात घेतले तरीसुद्धा भा. इ. सं. मंडळाच्या पहिल्या वर्षात म्हणजे शक १८३२ (इसवी १९१०) मध्ये त्यांनी ७

शिलालेख अभ्यासलेले आढळतात. प्रारंभीच्या काळात त्यांनी या विषयात किती लक्ष घातले होते ते यावरून सहजच ध्यानात येते.

या सर्व कोरीव लेखांची सामान्य माहिती राजवाडे यांनी ते सादर करताना किंवा त्यावर भाष्य करताना दिली आहे. ह्या कोरीव लेखांत २–४ ओळींच्या लहान लेखांपासून तो थेट दक्षिणेकडील तंजावरच्या प्रदीर्घ शिलालेखापर्यंतचे सर्व प्रकार आढळतात. आजच्या काळात त्यातील काहींचे महत्त्व कमी झाल्यासारखे भासत असले तरी तत्कालीन इतिहास, भाषा, वाङ्मय इत्यादींच्या अभ्यासाच्या दृष्टीने ते तितकेच महत्त्वाचे आहेत. त्यांनी हे कोरीव लेख सादर केले किंवा अभ्यासले; पण सादर करताना त्या लेखाचा मूळ ठसा मात्र सादर केलेला आढळत नाही. उदा. पंढरपूरच्या चौऱ्यायशीच्या शिलालेखाचे देता येते. पुढल्या काळात डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी पुणे विद्यापीठ पत्रिकेच्या अंकात हा लेखच ठशासह दिला व अनेक प्रश्नांची उत्तरे परस्पर देऊन टाकली. कोणतेही कारण असे ना का इतिहासाचार्यांनी असे ठसे देण्याचा प्रघात का ठेवला नाही हा अनुत्तरित प्रश्न शिल्लकच राहतो ! या सादर केलेल्या लेखांची काही वैशिष्ट्ये आजही माहिती करून घेण्यासारखी आहेत.

इतिहासाचे एक साधन या विचाराने प्रवास करताना राजवाडे यांनी कोरीव लेख आढळताच त्याचे तेथेच वाचन करून त्यातील मजकूर लिहून काढलेला दिसतो. त्यामुळे पुन्हा तो तपासून पाहणे त्यांना कदाचित शक्य झाले नसावे. ‘ कऱ्हाड येथील एक मराठी शिलालेख ’ (शक १५९४ चा उल्लेख असलेला) त्यांना कऱ्हाडलाच घराच्या एका परड्यात केळीच्या झाडाखाली आढळून आला. त्यांनी त्याचे वाचन करून भाष्य न करता तो लगोलग सादर केला; पण ‘ कर्णेश्वराच्या देवळातील लेख ’ मात्र त्यांनी व कै. द. वि. आपटे यांनी एकत्रितपणे अभ्यासला. सभामंडपातील खांबावरील हा तिकोनी लेख आहे. गद्याण व दाम या नाण्यासंबंधींचा उल्लेख त्यांनी या प्रसंगी ध्यानात आणून दिला. गद्याण हे रुप्याचे नाणे असावे असा या बाबतीत त्यांनी अंदाज बांधला. देवरूख येथील शके १५७५ मधील शिलालेख सादर करून त्या काळातील बालबोध मराठीचे स्वरूप म्हणून त्यांनी दर्शविला. ‘ नागावचा शक १२८९ चा शिलालेख ’ विशेष गाजला असे म्हणावे लागेल. तसे पाहता राजवाड्यांनी केलेल्या या लेखाचे संपादन सामान्य म्हणून ठरविले गेले; पण पुढे ‘ स्कूल ऑफ ओरिएंटल स्टडीज ’ या संस्थेमध्ये डॉटरेट यांनी त्याचे पुन्हा वाचन केले. त्यावरील टिपण सादर केले. हे टिपण सादर करताना त्यांनी कान्हेरेशास्त्री यांचेही साहाय्य घेतले. आश्चर्य असे की पुढे डॉटरेटचेही वाचन सदोष ठरले व त्यानेही कल्पनेचाच आधार घेतल्याचे सिद्ध झाले ! निंबगावच्या देवळातील दोन शिलालेख राजवाडे यांनी सादर केले आहेत. याबद्दल मंदिर बांधल्याच्या काळासंबंधीचा अंदाज व तो थोरले मल्हाररावाचे कारकीर्दी-

तील असण्याचा संभव त्यांनी प्रकट केला.

पाटण येथील दोन शिलालेख राजवाडे यांनी अभ्यासलेले दिसतात. हे दोन्ही लेख 'प्रभात' मासिकाच्या वर्ष १ अंक ५ मध्ये त्यांनी प्रसिद्ध केले. त्यातील 'उद्‌ध्वस्त पाटण येथील नदीत सापडलेला फुटका शिलालेख' त्यांना पाटण शहराबाहेरील चांगदेवाच्या मठाखालून वाहत जाणाऱ्या नदीच्या व ओढ्याच्या पात्रात उपलब्ध झाला. तो अर्धा गाडलेला होता. त्यातील १९ ओळी लावण्याची खटपट करून सदरचा लेख निकुंभ वंशातील बहुशः गोवन देवाचा असून तो भास्कराने लिहिला असा निर्णय त्यांनी दिला. तुटलेल्या भागामुळे त्यांना काळ ठरविता आला नाही. त्यांनी जो दुसरा 'पाटणचा शिलालेख' प्रसिद्ध केला त्याचा काळ शक ११२८ होता. वास्तविक हा लेख त्यांच्यापूर्वी इसवी सन १८६४ मध्ये डॉ. भाऊ दाजी यांनी छापलेला आहे. त्यांचे वाचन राजवाडे यांना तसेच डॉ. कीलहॉर्न यांनाही मान्य झाले नव्हते. म्हणूनच की काय त्यांनी इसवी सन १८९२ मध्ये तो पुन्हा छापला !

या लेखाच्या बाबतीत राजवाडे विशेष जागरूक दिसतात. ते लिहितात, 'कीलहॉर्नने भाऊ दाजीपेक्षा मजकूर बराच नीट वाचला. पण जुन्या मराठीशी परिचय नसल्यामुळे, शब्द तोडण्यात त्याच्या काही चुका झाल्या आहेत. ...भाषा बिलकुल येत नसता कोणताही शिलालेख वाचण्यात पुराणाक्षरवाचनपटुत्वाची खरोखरच परीक्षा होण्याचा प्रसंग येतो.' अर्थात या लेखाचे संपादन त्यांचे हातून अधिक शास्त्रशुद्ध पद्धतीने झाले. या लेखात भास्कराचार्याचा नातू जो चांगदेव त्यांची वंशावळ आहे. तिच्या आधारे मराठी भाषा सातव्या शतकात अस्तित्वात होती असे सिद्ध करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. हा त्यांचा निष्कर्ष अभ्यासकांनी मात्र मान्य केला नाही. या प्रसंगी त्यांनी इतर बरेच कोरीव लेख अभ्यासलेले दिसतात. ज्ञानेश्वरीवरील त्यांचे भाष्य प्रसिद्ध झालेच होते. पाटणच्या शिलालेखावरील भाष्यात ते म्हणतात, 'शक ६०२ पर्यंत अर्वाचीन मराठी भाषेची आदी नेण्यास सबळ कारणे आहेत असे दिसते. परळच्या शिलालेखावरून ११०२, पाटणच्या शिलालेखातील वंशावळीवरून शक ७७० व सहाव्या कलमातील दिलेल्या तेरा प्राचीन लेखांतील मराठी शब्दांवरून शक ६०२, अशा मराठी भाषेच्या चरित्रातील कालसीमा दिसतात...! याच लेखाच्या निमित्ताने त्यांचा 'अतिरिक्त कल्पनाविलास' प्रकट झाला आहे. त्यांनी महाराष्ट्री, प्राकृत, पालीभाषा, वैदिक आर्ष इ. संबंधी स्वतःचे अंदाजी सिद्धान्त मांडले व मराठी भाषेसंबंधीचा स्वतःचा आवडता सिद्धान्त, 'शक ६०२ त मराठी आपण बोलतो ती मराठी महाराष्ट्रात सामान्य लोक बोलत हे मात्र निश्चित आहे.' सादर केला.

'पाली येथील शक १६९० तील मराठी शिलालेख' हा राजवाडे यांनी 'प्रभात' मासिकात प्रसिद्ध केला. श्री. दातार यांच्या मालकीच्या विहिरीतील ११ ओळींचा हा

शिलालेख होय. याच्या वाचनाने त्यांनी शक १६९० तील पाली-परिसरात मराठी शुद्धलेखन कसे असावे ? – याचा विचार केलेला आढळतो. येथे ते लिहितात, "... त्यावरून नाकाने अनुनासिक उच्चारणारे हातानें तो नियमानें लिहीतच असत, असें नाहीं." आजच्या व्याकरणातील अनुनासिकांच्या उच्चाराबाबत जो नवीन नियम आहे तो असाच आढळून येत नाही का ?

पंढरपूर हे तर विशिष्ट काळात शिलालेखांचे आगरच होते असे वाटते. तेथील दोन शिलालेखांचे संशोधन राजवाडे यांनी सादर केले आहे. त्यांनी ग्रंथमालेच्या १२ व्य वर्षाच्या पहिल्या अंकात 'पंढरपूर येथील 'चौऱ्यायशीचा शिलालेख' व अंक ३ मध्ये 'पंढरपूर येथील शक १२३३ तील शिलालेख' हे लेख प्रसिद्ध केले. चौऱ्यायशीचा शिलालेख वाचण्याचा पहिला प्रयत्न राजवाडे यांचा आहे. त्यावर नंतर त्यानी विवेचनात्मक असा प्रदीर्घ लेख प्रसिद्ध केला. या लेखाचे त्यांचे वाचन पूर्णतः निर्दोष म्हणता येत नसले तरी मूळ लेखाचा विस्तार ध्यानात घेता त्यांचे यश लक्षणीय होते हे मान्य करावे लागते. यातील काही पंक्ती त्यांना लागल्या नाहीत. या लेखाचे वाचन त्यांनी चौऱ्यायशीच्या लेखाबरोबर केले त्यामुळे कदाचित सदोषता निर्माण झाली असावी.

मठगावच्या (शक १३१९) तीन शिलालेखांचे वाचन करतानाही त्यांचे लक्ष मराठी भाषेच्या दृष्टीने अधिक होते. हा लेख त्यांनी मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ८ मधील उपप्रस्तावनेत छापला. वेंगुर्ल्यापासून ४ मैलांवर असलेल्या मठगावात वाडीच्या सावंतांची मंदिरे होती. तेथील हा लेख होय. यांतील अक्षरवळणासंबंधी त्यांनी लिहिले आहे, "लेखांतील अक्षरे जाधवांच्या तेराव्या शतकांतील अक्षरांसारखी..." त्यातील सकु, सावंतु, दीनु, हे जुने मराठी धर्तीचे शब्द त्यांनी दाखवून दिले आहेत आणि निष्कर्ष दिला आहे, तो असा, "ह्यावरून शके १३१९ त म्हणजे इ. स. १३९७ त द. कोंकणांत सावंतांच्या राज्यांत शुद्ध मराठी चालत होती असे दिसते." लासूर नजिक नटेश्वराच्या देवळातील शक ११४६ तील संस्कृत शिलालेख 'प्रभात' मासिकात प्रसिद्ध झाला. हा लेख त्यांनी फोटोवरून उतरवून घेतला होता. या लेखाचें वाचन करताना त्यांनी लिहिले आहे, "असले शिलालेख जेथच्या तेथे असलेले, ऐतिहासिक दृष्ट्या उत्तम. ते मुंबईस, किंवा कलकत्त्यास व कदाचित लंडणास जावे हे सर्वथा अयोग्य व अनुचित आहे."

'शक १३३५ तील बांदीवडे येथील एक मराठी शिलालेख' (गोवे, फोंडा) हा राजवाडे आणि कै. द. वि आपटे यांनी पुन्हा प्रसिद्ध केला. याच्या संपादनाचे लक्षही मराठी भाषेच्याच अभ्यासाचे राहिलेले आहे. गोव्यातील बांदीवडे या गावी जे श्रीनागनाथाचे मंदिर त्याच्या तळीवरील हा लेख होय. त्यांनीच लिहिल्याप्रमाणे वास्तविक हा लेख प्रथम मुंबईच्या रॉयल एशियाटिक सोसायटीच्या जर्नलमध्ये ३—४ वर्षांपूर्वी

(शक १८३५ चे पूर्वी) प्रसिद्ध झाला होता. तथापि राजवाड्यांच्या दृष्टीने त्यात वाचनाचे व पदव्यवच्छेदाचे बरेच प्रमाद राहिले होते. ते प्रमाद शुद्ध करण्याकरिता त्यांनी लेखाचे पुनर्मुद्रण केले. त्यातील भाषेबद्दल ते लिहितात, " अक्षरे शालिवाहनाच्या चौदाव्या शतकातील असून भाषा मराठी...काही कोंकणी मराठी भाषेची रूपे आलेली आहेत. ज्ञानेश्वरीनंतर हा शिलालेख बरोबर १२३ वर्षांनी खोदला गेला. अर्थात् भाषेतही फरक झाला.... " तेया बद्दल तया...या रूपाच्या फरकावरून ज्ञानेश्वरी भाषा शक १३०० च्या सुमारास किंचित् बदलावयाला लागली " – असा त्यांनी निष्कर्ष काढला आहे. या शिलालेखाचे विशेषत्व सांगताना त्यांनी लिहिले आहे, " हा शिलालेख भाषेच्या स्थित्यन्तरांत मर्यादा होतो. "

शेलपिंपळगांव येथील शिलालेख (शक १७०७) आणि शेंदुर्णी येथील खोलेश्वराच्या देवळातील शिलालेख हे अनुक्रमे पानिपतकालीन व यादवकालीन म्हणून त्यांनी मानले आहेत. सोनगीरच्या किल्ल्यावरील लेखाचेही त्यांनी वाचन लेले. पण यापेक्षा महत्त्वाचा असा शिलालेख म्हणजे ' श्रवणबेळगोळचा शिलालेख ' हा होय (शक. ९०५). या लेखावर अनेकांनी आपापली मते प्रकट केली. त्याप्रमाणे राजवाडे यांनीही आपले मत व्यक्त केले होते.

एकाच ठिकाणी शेकड्यांनी शिलालेख असलेल्या मंदिर परिसराचे क्वचित पाहावयास मिळणारे उदाहरण भारतात अवश्य दाखविता येते. पण प्रदीर्घ लेखाच्या दृष्टीने शिलालेखातील सर्वात मोठा असा लेख म्हणजे ' तंजावरचा शिलालेख ' होय. पुढील काळात ' प्रभात ' मासिकाने तो प्रसिद्ध केला आहे. इतरत्रही तो प्रकाशित झाला. डेमी स्वरूपाच्या १०२ पृष्ठांच्या या शिलालेखाचे वाचन करून संपूर्ण आणि योग्य अर्थ लावून त्याचे ऐतिहासिक महत्त्व इतिहासाचार्य राजवाड्यांनी संशोधकांच्या ध्यानात आणून दिले आहे. मराठ्यांच्या इतिहासाचे साधन म्हणून या शिलालेखाला एक महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. यासंबंधीचे फार मोठे श्रेय इतिहासाचार्यांकडेच जाते.

ताम्रपट-विचार

राजवाड्यांनी अभ्यासलेल्या ताम्रपटांची संख्या शिलालेखांच्या एकूण संख्येपेक्षा बरीच कमी आहे. तथापि शिलालेखाच्या मानाने ताम्रपटातील मजकूर अधिक असण्याची शक्यता असते. तसेच ताम्रपटाचा संबंध बहुतांशी राज्ययंत्रणेशी असल्यामुळे त्यातील मजकूरही अधिक विश्वसनीय आणि व्यावहारिक दृष्ट्या महत्त्वाचा ठरतो. विशेषतः मराठीच्या भाषिक अभ्यासाच्या दृष्टीने शिलालेखाप्रमाणेच ताम्रपट अभ्यासासही राजवाडे यांनी तितकेच किंबहुना काकणभर अधिकच महत्त्व दिले आहे.

कशेळी येथील शक १११३ तील शिलाहारांचा ताम्रपट त्यांना रत्नागिरी जिल्ह्यातील श्री. वि. रा. भागवत यांचेकडे उपलब्ध झाला. हा लेख संस्कृत व मराठीत लिहिलेला आहे. यातील लिपी यांनी शातवाहनाच्या १२ व्या शतकातील देवनागरी अशी ठरविली. ह्या ताम्रपट झिजला गेल्यामुळे अक्षरे पुसट झाली. त्यातील मराठी ओळी लावताना बरीच अडचण आल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे. यातील लेखाचा काल त्यांनी ज्ञानेश्वरीच्या पूर्वी ११ वर्षे ठरविला. त्यात वाचकें, मंडलि, केलिं, उद्धास, सतें, एका, भागवता, भटा, हरि देवे इत्यादी ज्ञानेश्वरीतल्यासारखी हुबेहूब रूपे आहेत असे त्यांचे प्रतिपादन आहे. ' भागवता माधव भटा ' अशा प्रयोगावरून राजवाड्यांच्या कल्पनाशक्तीला चालना मिळाली. त्यानी आडाखा बांधला तो असा, "... कऱ्हाडे ब्राह्मणांची वस्ती कसेळी नावात शक १२०१ पासून शक १८३५ पर्यंत अखंड चालली आहे. नव्हे ती १११३ पासूनची आहे. म्हणजे भागवतांचे कुळ कसेळीस आज ७२२ वर्षे नांदत आहे." केवळ लेखातील ' भागवत ' या कुलनामांवरून निष्कर्ष काढणे व प्रकट करणे हे थोडे धाडसाचेच, परंतु तेही राजवाडेच करू शकतात ! असो. ' चिकोडी येथील शक ९१० तील एक ताम्रपट ' हा लेख राजवाडे व गो. का. चांदोरकर यांनी प्रसिद्ध केला होता. सिलाहारांच्या वंशावळीचे दृष्टीने त्यांनी तो अवलोकिला आणि अर्थ लागत नसल्याची तक्रारही करून ठेवली.

११२६ तील तीन मराठी ताम्रपट राजवाडे यांना करवीर संस्थानात पीरवाडी येथील पाटलाच्या पूजेच्या देव्हाऱ्यात आढळून आले. भा. इ. सं. मंडळाला त्यांनी शक १८३६ मध्ये ते सादर केल्याची नोंद आहे. याच्या प्रत्येक पत्र्यावर ३२ ओळी असून त्यातील अक्षरे व भाषा याबद्दल त्यांनी लिहिले आहे की, "प्रथम वाचण्यास जरा जडच जाते तथापि एकदा नजर बसली म्हणजे. किंचित अडचण कमी होते. सबंध अडचण कमी होते असे मात्र नाही." त्यांच्या अनुमानाप्रमाणे या पत्र्यातील भाषा ज्ञानेश्वरी भाषेच्या पूर्वीची शंभर वर्षांची आहे. दुसऱ्या भोजराजाच्या आमदानीतील हे ताम्रपट म्हणून त्यांनी निर्णय दिला आहे. या पत्र्यांचे आणखी वैशिष्ट्य म्हणजे त्यात तत्कालीन ' सुवर्णटंक ' या नावाच्या नाण्याचा उल्लेख आलेला आहे. या तीन ताम्रपटांचा अभ्यास करून मराठी भाषेसंबंधीचा त्यांनी जो निष्कर्ष काढला तो असा, " शिलाहारांची मूळ भाषा मराठी होती. व ठेव पुरणाऱ्या मराठ्यांची भाषा मराठी होती. व करवीर इलाख्यातील कोकदनूर वगैरे गावाची भाषा त्या काळी मराठी होती, असे ह्या ताम्रपटांवरून म्हणावे लागते, तसेच शिलाहारांची ही जर मूळ भाषा होती तर ती त्या वंशाच्या प्रारंभापासूनच त्यांची मूळ भाषा असावी म्हणजे शक ७१६ त ती त्यांची मूळ भाषा होती असेही विधान करण्याकडे प्रवृत्ती होते. ..आणि ही म्हणजे काही असंभाव्य गोष्ट नव्हे, कारण शक ७१६ त मराठी चांगली बोलती-चालती भाषा होती."

इतिहासाचार्यांना उपलब्ध झालेल्या ताम्रपटांपैकी सर्वांत महत्त्वाचा असा ताम्रपट म्हणजे ' मंगळवेढ्याचा शक ४१० तील मराठी ताम्रपट ' हा होय. हा ताम्रपट आणि त्यावरील राजवाड्यांचे भाष्य धुळ्याच्या ' प्रभात ' मासिकाने प्रसिद्ध केले आहे. मराठी भाषेच्या काळासंबंधीचा विचार करताना अभ्यासकास या ताम्रपटाचा उल्लेख करावाच लागतो. कारण राजवाडे यांनी ह्याच ताम्रपटाच्या आधारे मराठी भाषेचा काल शक ४१० पर्यंत नेऊन भिडविला. अन्य कोणताही आधार नसताना ह्या ताम्रपटावर राजवाडे पूर्णतया विसंबून राहिले. ह्या ताम्रपटाचा अभ्यास करून मराठी भाषेच्या दृष्टीने त्यांनी जे भाष्य केले ते असे —

" सारांश, ह्या ताम्रपटावरून एवढे सिद्ध आहे की, शक ४१० त महाराष्ट्रांतील सामान्य लोक मराठी भाषा लिहीत व बोलत. महाराष्ट्री भाषा शक १५० च्या सुमारास शातवाहन साम्राज्याच्या नाशाबरोबर लोप पावली. नंतर दोन-अडीचशे वर्षे महाराष्ट्रांत अपभ्रष्ट भाषा ऊर्फ अपभ्रंश प्रचलित झाला; आणि चालुक्यांच्या राशियतीच्या सुमारास म्हणजे शक ४०० च्या सुमारास मराठी भाषा सुरू झाली यद्यपि मराठी भाषा शक ४०० च्या सुमारास लोकात प्रचलित झाली होती. तथापि ती शिष्टमान्य व राजमान्य झाली नसल्यामुळे चालुक्यांच्या राजवटीत दरबारी लिखाणांत म्हणजे ब्राह्मणादि लोकांना दिलेल्या ताम्रपटात वगैरे तिचा प्रवेश झाला नाही. शक ४१० त महाराष्ट्री मेली होती. महाराष्ट्रीचा अपभ्रंश लोप पावत होता, आणि मराठी शिष्टमान्य व राजमान्य झाली नव्हती, यास्तव चालुक्यांनी आपले बरेच लेख संस्कृतात कोरवले. " (प्रभात , वर्ष २ अंक ८-९, कार्तिक–मार्गशीर्ष, शके १८२९. पृ. ७)

" देसाई, देसाई, कुलकरणी, महाजन, पाटील, नाईकवडी, हे दर्जे व घाडे (गाडे), पवार, जादव, मोरे, राडरे, सीद किंवा सिंदे, सुराव (सुराज), लाड, वगैरे आडनावे शक ४१० त महाराष्ट्रांत प्रचलित होती. " (' प्रभात ', वर्ष २ अंक ८–९, कार्तिक–मार्गशीर्ष, शके १८२९ पृ. ८).

या ताम्रपटाचा अभ्यास करताना ते लिहितात, "ताम्रपट लावण्यात किंचित् कठीणच आहे. परंतु पाच-पंचवीस वेळा मेहनत केल्याने बहुतेक सर्व अक्षरे लागली असे वाटते. पाच-चार स्थळी संशय आहे. तो सोबत जोडलेल्या ठशावरून कोणी पुराणाक्षरप्रवीण विद्वान निःसंशय लवकरच काढून टाकेल, अशी उमेद आहे. " या ताम्रपटाची लांबी रुंदी, जाडी, त्यातील ४५ ओळी (२१ + २४) इत्यादी देऊन त्याचे अक्षर वळण जुने, दक्षिणी ऊर्फ महाराष्ट्री असे त्यांनी निश्चित केले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे, हे अक्षर वळण ११९५ तील पंढरपूर येथील शिलालेख, ११२८ चा पाटण मराठी शिलालेख, किंवा ९०५ मधील चामुंडरायाच्या मराठी शिलालेखात व शक ६५८ तील चिकुर्डी येथील मराठी ताम्रपटात जसे अक्षरवळण त्याहून भिन्न नाही. ' या अक्षरवळणासंबंधी

त्यांनी असेही लिहिलेले आहे की, " ६५८ पेक्षा हा ताम्रपट २४८ वर्षांनी जुना म्हणून अक्षरवळण जुने व गांवढळपणा. " येथील अक्षरे बाळबोध पण त्यांत मोडीची झाक असल्याचे त्यांना भासते.

ज्या ह्या अत्यंत महत्त्वाच्या ताम्रपटाच्या पुराव्यानिशी राजवाड्यांनी मराठी भाषेचा काल निश्चित करण्याचा खटाटोप केला, त्यासंबंधीचा सिद्धान्त मांडला आणि त्या सिद्धान्ताचा पाठपुरावा केला त्या ह्या ताम्रपटाची जपणूक मात्र राजवाड्यांकडून झाली नाही हे मान्य करावे लागते. त्याचा ठसाही त्यांनी प्रकाशित केला नाही. त्यांनी स्पष्टीकरणात जोडलेला ठसाही कोठे उपलब्ध झाला नाही. ज्ञानेश्वरीच्या सर्वांत जुन्या प्रतीप्रमाणेच ह्या ताम्रपटाची अवस्था झाली. हा ताम्रपट त्यामुळे पुढील संशोधकांना आणि भाषेच्या अभ्यासकांना उपयोगी पडला नाही. प्रत्यक्ष पाहताच आला नाही. ह्या ताम्रपटामुळे मराठी भाषेचा प्रारंभीचा काळ शक ४१० पर्यंत मागे जाऊ शकत असता तर त्यामुळे मराठी भाषा अभिमान्यांना आनंदच झाला असता. परंतु असे घडले नाही हेच दुर्दैव !

राजवाडे यांनी संशोधिलेल्या आणि भाष्य केलेल्या शिलालेख आणि ताम्रपट यांची एकूण संख्या मर्यादित आहे. तरीपण साकल्याने पाहता शालिवाहन आणि यादवकाला-पासूनचे हे लेख त्यांनी अभ्यासकांना उपलब्ध करून दिले आहेत. त्यांनी हे कोरीव लेख महाराष्ट्रातून तर प्राप्त केलेच पण त्यानिमित्ताने ते गोव्यातही पोहोचले आणि दक्षिणेस तंजावरपर्यंत त्यांनी भ्रमंती केली. त्यांच्या प्राप्तीकरिता त्यांना खेड्यापाड्या-पासून नगरानगरांपर्यंत जावे लागले होते. त्यामुळेच त्यांचे हे लेख मंदिरातील, थडग्यावरील, नदी-नाल्यातील, अशा अनेक स्थानांवरून एकत्रित झालेले दिसतात. त्यांच्या संकलनाकरिता आणि प्रामुख्याने अभ्यासासाठी कोरीव लेखातील अक्षरांचा, लिपीचा आणि तिच्या वळणांचा, शब्दांच्या रूपाचा, व्याकरणाचा असा अनेक प्रकारचा अभ्यासही त्यांना करावा लागला.

या कोरीव लेखांचा स्व–तंत्राप्रमाणे अभ्यास करून त्यांनी इतिहासाबरोबरच मराठी भाषेसंबंधीचे विशेष सिद्धान्त मांडले. या लेखांवरील त्यांच्या भाष्यात ' पुराणा-क्षरवाचनपटुत्व ' असे शब्द काही वेळा आले आहेत. अक्षरवळणांबाबत अडचणी आल्यास त्याचा निर्णय कोणी पुराणाक्षरवाचनपटूकडून ते अपेक्षितही होते. याचा अर्थच असा की राजवाडे केवळ या एकाच संशोधन विभागात अडकून पडणारे नव्हते. संशोधनाचे आणि अभ्यासाचे त्यांचे क्षेत्र अतिविशाल होते हे मुद्दाम सांगण्याचे कारण नाही. ' कोरीव लेखाभ्यास ' हा त्यातील केवळ एका दालनाचा विषय होता.

' कोरीव लेख ' या विभागाचा अभ्यास करून राजवाडे यांनी जे सिद्धान्त मांडले ते आज कदाचित मागे पडल्यासारखे भासत असतील. ते सिद्धान्त अपूर्णावस्थेत असतील

परंतु त्यांना जी साधने प्राप्त झाली त्यांच्या अभ्यासाने त्यांनी मराठी भाषेच्या काल-निर्मितीचा महत्त्वाचा प्रश्न उभा केला. या विषयास त्यांनी विलक्षण चालना दिली. त्यामुळे अनेकांचें लक्ष मराठी भाषेच्या काळाकडे वेधले गेले. गेल्या काही वर्षांत डॉ. म. म. मिराशी, डॉ. वि. भि. कोलते, प्रा. ग. ह. खरे इत्यादी जुन्या पिढीतील संशोधकांनी या क्षेत्रात मोठे काम केले आहे. अलीकडील काळात डॉ. शं. गो. तुळपुळे किंवा मराठवाड्यातील डॉ. ब्रह्मानंद देशपांडे यांचेही प्रयत्न चालू आहेत. त्यांची या क्षेत्रातील कामगिरी तितकीच भरीव आहे. मात्र भाऊ दाजींच्या काळानंतर विशेषतः मराठी भाषेच्या क्षेत्रात बाल्यावस्थेचा काळ सोडला तर राजवाडे यांच्या या भाषिक संशोधनाचे महत्त्व विशेषच म्हणावे लागेल. कारण त्यांच्या या कार्यामुळे या विषयाच्या अभ्यासातील दुवा जोडला गेला. त्यांचे हे ऐतिहासिक कार्य आहे.

मराठी भाषा व इतिहासविषयक संशोधनकार्याला महाराष्ट्रात प्रारंभ झाला होता त्या काळात इतिहासाचार्य राजवाडे यांनी आपल्या प्रखर दूरदृष्टीने अनेक क्षेत्रांत प्रवेश केला. या क्षेत्रातील विविध साधनांचे संकलन व संशोधन करून आपले विचार स्पष्टपणे व ठासून मांडले. कोरीव लेखविषयक क्षेत्रातही त्यांनी मोठ्या परिश्रमाने अनेक शिला-लेख व ताम्रपट शोधून काढून, त्यांचे वाचन करून आपली मते तितक्याच स्पष्टपणे अभ्यासकांपुढे सादर केली. महाराष्ट्रातील या विशिष्ट संशोधनयुगात प्रारंभीच्या काळात वेगवेगळ्या अभ्यासकांनी संशोधनविषयक कार्य केले आहे. परंतु राजवाडे यांनी संशोधनाची जेवढी क्षेत्रे धुंडाळली आणि जेवढा प्रदीर्घ काळ कार्य केले त्याला महाराष्ट्रात तरी तोड नाही. राजवाडे यांचे हे श्रेय त्यांनाच दिले पाहिजे, पण त्याच-बरोबर त्या संदर्भातील त्यांच्या संशोधनकार्याच्या मर्यादाही मान्य केल्या पाहिजेत. कोरीव लेखांच्या वाचनाच्या बाबतीत राजवाडे यांचे बरेचसे निष्कर्ष पुढील अभ्यास-कांनी स्वीकारलेले नाहीत. त्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे मूळ साधने अभ्यासकांना उपलब्ध करून देणे हा संशोधनक्षेत्रातील महत्त्वाचा टप्पा राजवाडे यांनी पत्करला नाही. बहुतांशी आर्थिकदृष्ट्या त्यांना ते जमले नसावे. कारण काही असले तरी प्रकाशित झालेले मूळ लेख अभ्यासकांना प्राप्त झाले नाहीत. कोरीव लेखांचे मूळ ठसे त्यानी कोठेही प्रकाशित केले नाहीत. या मूलभूत उणिवांमुळे राजवाडे यांचे मराठी भाषाविषयक सिद्धान्त डळमळीत झाले. मराठी भाषेचे त्यामुळे अतीव नुकसान झाले. अर्थात त्यांनी कोरीव लेखांच्या अभ्यासाला विशिष्ट काळात जी चालना दिली ती विसरता येणार नाही. राजवाडे इतिहास संशोधकांचे अग्रणी होते त्याचप्रमाणे अनेक त्रुटी मान्य करूनही कोरीव लेखांच्या अभ्यासातही त्यांना विशेष स्थान प्राप्त झाले आहे. इतिहाससंशोधनाचे एक महत्त्वाचे क्षेत्र या दृष्टीने कोरीव लेख अभ्यासाच्या क्षेत्रातही ते अग्रेसर राहिले.

राजवाड्यांची इतिहाससंशोधन-पद्धती

माधव. रा. कंटक
डेक्कन कॉलेज, पुणे

आज महाराष्ट्रात राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व लष्करी अशा विविध अंगांनी इतिहाससंशोधन चालू असल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे इतिहाससाधनांचा प्रचंड साठा महाराष्ट्रात निरनिराळ्या ठिकाणच्या खाजगी व सरकारी संग्रहालयांतून आढळून येतो. मात्र याचे मुख्य श्रेय आहे कै. विश्वनाथ काशीनाथ राजवाडे या थोर इतिहाससंशोधकाला. त्यांनी सुमारे सत्तर-ऐंशी वर्षांपूर्वी शास्त्रशुद्ध इतिहाससंशोधनाची महाराष्ट्रात जी पायाभरणी केली तिच्यावरच आजच्या इतिहाससंशोधनाची भव्य इमारत उभी राहिलेली आहे. राजवाड्यांपासून प्रेरणा घेऊनच अनेक महाराष्ट्रीय इतिहाससंशोधकांनी व इतिहाससंशोधनाला वाहिलेल्या संस्थांनी इतिहासक्षेत्रातील विविध प्रकारच्या संशोधनाच्या प्रगतीला हातभार लावलेला आहे.

महाराष्ट्रातील राजवाडेपूर्व इतिहाससंशोधन :

तसे पाहिले तर इतिहाससंशोधनाची प्रक्रिया ही राजवाड्यांच्या उदयापूर्वीच महाराष्ट्रात सुरू झालेली होती. स्प्रिंगेल या जर्मन इतिहासलेखकाचे मराठ्यांच्या इतिहासावरील पहिले पुस्तक इ. १७८२ त प्रकाशित झाले. त्यानंतर स्कॉट वेअरिंग व ग्रँट डफ या मराठ्यांच्या इतिहासात रस असलेल्या इंग्रज लेखकांचे ग्रंथ अनुक्रमे सन १८१० व १८२६ मध्ये प्रसिद्ध झाले. डफचा 'A History of the Mahrattas' हा ग्रंथ म्हणजे त्याच्या काळात उपलब्ध झालेल्या मूळ मराठी व इंग्रजी इतिहाससाधनांच्या साहाय्याने मराठ्यांचा इतिहास पद्धतशीरपणे लिहिण्याचा पहिला प्रयत्न होता. त्यामुळे तो ग्रंथ बराच काळपर्यंत मराठ्यांच्या इतिहासावरील अधिकृत व विश्वसनीय ग्रंथ म्हणून समजला जात होता.

सन १८६८ मध्ये पुण्यातील जुन्या डेक्कन कॉलेजचे एक विद्यार्थी श्री. कीर्तने यांनी

डफच्या ग्रंथावर टीका करून त्यातील अनेक दोष व उणिवा स्पष्टपणे दाखवून दिल्या. त्यानंतर काही काळाने विष्णुशास्त्री चिपळूणकर यांचा 'इतिहास' हा विचारप्रवर्तक लेख त्यांच्या 'निबंधमाले'त प्रसिद्ध झाला. या दोहोंचा परिणाम म्हणजे, महाराष्ट्रामध्ये इतिहाससंशोधनात रस घेणाऱ्या तरुण संशोधकांची एक नवीन पिढी निर्माण झाली. का. ना. साने, वासुदेवशास्त्री खरे व द. ब. पारसनीस यांच्यासारख्या उत्साही संशोधकांनी निरनिराळ्या ठिकाणांहून ऐतिहासिक साधने गोळा करून ती 'काव्येतिहाससंग्रह', 'भारतवर्ष' आणि 'ऐतिहासिक लेखसंग्रह' यांसारख्या ऐतिहासिक मासिक-पुस्तकांतून व ग्रंथांतून प्रकाशित केली. तसेच या साधनांचे संपादन करून त्यावर आधारित ऐतिहासिक लिखाणही बरेच केले.

इतिहासशास्त्र व ऐतिहासिक पद्धती यांचा जनक :

अशा रीतीने राजवाड्यांच्या 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' या मालिकेतील पहिला खंड इ. १८९८ मध्ये प्रसिद्ध होण्यापूर्वी महाराष्ट्रात इतिहासंशोधनाची वाटचाल सुरू झालेली होती. पण ही वाटचाल अतिशय संथ गतीने चाललेली असून प्रारंभिक अवस्थेतील होती. या इतिहाससंशोधनाला इतिहासशास्त्र (Historiography) व ऐतिहासिक पद्धती (Historical Method) यांचे अधिष्ठान नसल्याने त्याच्यामागे निश्चित ध्येय वा दिशा नव्हती. स्कॉट वेअरिंग, डफ यांच्यासारखे इंग्रज इतिहासलेखक काय, किंवा साने, पारसनीस इत्यादी महाराष्ट्रीय संशोधक काय, कोणालाच इतिहासाची व्याख्या, त्याचा खरा अर्थ व त्याचे वास्तव स्वरूप याबद्दल माहिती नव्हती. तसेच इतिहाससाधनांचा संग्रह, त्यांची परीक्षा, त्यांचे संपादन आणि विवेचन करण्यासाठी लागणारी शास्त्रशुद्ध ऐतिहासिक पद्धतीही त्यांना ठाऊक नव्हती. खेरीज आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, खरे, साने, पारसनीस यांची दृष्टी मुख्यत्वेकरून महाराष्ट्राच्या आणि त्यातही त्याच्या राजकीय इतिहासावर केंद्रित झालेली होती. सबंध भारताच्या इतिहासाच्या संदर्भात महाराष्ट्राच्या इतिहासाचा सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, लष्करी अशा विविध अंगांनी अभ्यास होणे आवश्यक आहे याची यांपैकी कोणालाही एक तर जाणीव तरी नव्हती, किंवा जाणीव असल्यास, त्या अंगाचा विचार करण्यास सवड नसावी.

परंतु एकोणिसाव्या शतकाच्या अखेरच्या दशकात महाराष्ट्रातील इतिहाससंशोधनाच्या क्षितिजावर राजवाडेरूपी सूर्याचा उदय होताच सर्वच चित्र एकदम पालटले. त्यांच्या आगमनाबरोबर अशी एक प्रचंड लाट निर्माण झाली की तिने महाराष्ट्रातल्या इतिहाससंशोधनक्षेत्रातील जवळजवळ प्रत्येक विभाग व्यापून टाकला. इतर समकालीन मराठी इतिहाससंशोधकांकडून आगळे असे राजवाड्यांचे वैशिष्ट्य, म्हणजे त्यांनी बेकन, लॉक,

मॉंतेस्क्यू, व्हॉल्तेअर, डेव्हीड ह्यूम, रॉबर्टसन, रांके, हेगेल, ऑगस्ट कोमन इत्यादी अनेक युरोपियन विचारवंतांच्या इतिहासशास्त्रावरील व ऐतिहासिक संशोधनपद्धती-बद्दलच्या लिखाणाचे सूक्ष्म परिशीलन केलेले होते. त्याचप्रमाणे प्राचीन ग्रीक, रोमन संस्कृतींचा आणि युरोपच्या प्राचीन-मध्ययुगीन इतिहासाचा त्यांचा अभ्यास दांडगा होता. साहजिकच त्यांच्या इतिहासशास्त्र व ऐतिहासिक संशोधन पद्धतीविषयीच्या विचारा-वर युरोपियन इतिहासलेखकांचा मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. मात्र असे असले तरी राजवाडे हे केवळ अंधानुकरणी नव्हते. भारतीय इतिहासलेखकांना एतद्देशीय ऐतिहासिक साधने हाताळताना ज्या समस्यांना तोंड द्यावे लागते त्या युरोपियन इति-हासकारांना युरोपच्या इतिहासाची जुनी साधने वापरताना ज्या समस्या सोडवाव्या लागतात त्यापेक्षा वेगळया असतात याची राजवाड्यांना पूर्ण जाणीव होती. हा फरक पडण्याचे कारण, प्राचीन व मध्ययुगीन काळातील भारतीय इतिहाससाधनांतील ऐति-हासिक घटनांची माहिती देण्याची शैली, तारखा नोंदण्याची पद्धती वगैरे गोष्टी त्याच काळातील युरोपीय इतिहाससाधनांपेक्षा वेगळ्या होत्या. युरोपचा इतिहास व संस्कृती आणि भारतीय इतिहास व संस्कृती यांच्या परंपरा व दिशा भिन्न होत्या. या सर्व बाबींचा विचार करून राजवाड्यांनी युरोपियन इतिहासंशोधकांच्या इतिहाससंशोधन–पद्धतीत योग्य ते बदल करून अशी एक संशोधनपद्धती दिली की जिच्या योगे मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचा यशस्वीरीत्या वापर करता यावा.

इतिहास व इतिहाससंशोधनपद्धती :

राजवाड्यांची इतिहाससंशोधन-पद्धती ही त्यांच्या इतिहासविषयक विचारांवर अधिष्ठित असल्याने त्यांचा इतिहासाकडे पाहण्याचा दृष्टिकोण लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यांच्या मते निखळ सत्याचा शोध हे इतिहासाचे अंतिम ध्येय आहे. मानवी संस्कृतीला सुरुवात झाली तेव्हापासून आजच्या घटकेपर्यंत मानवाने राजकीय, राज्यकारभारविषयक, लष्करी, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, वैज्ञानिक व तांत्रिक अशा सर्व क्षेत्रांत जी बरीवाईट प्रगती केली तिचा शुद्ध व निरपेक्ष बुद्धीने अभ्यास करून सांगितलेली सत्य-कथा म्हणजे इतिहास, अशी राजवाड्यांची इतिहाससंबंधीची धारणा होती. अखिल मानवजात हा इतिहासाचा विषय, तर मानवी संस्कृतीच्या आरंभापासून ते आताच्या क्षणापर्यंतचा काल ही इतिहासाची व्याप्ती, असे राजवाडे मानत असत.[१]

इतिहासाची ही अतिशय व्यापक व्याख्या दृष्टीसमोर ठेवून राजवाड्यांनी इतिहास-संशोधनाचे एकापुढील एक असे पाच महत्त्वाचे टप्पे विशद करून सांगितले : १. इतिहासाची साधने गोळा करणे किंवा इतिहाससाधनसंग्रह, २. साधनांचे जतन व त्यांची देखभाल, ३. साधनांचे परीक्षण व वर्गीकरण, ४. साधनांचे संपादन व प्रकाशन,

आणि ५. साधनांचे विश्लेषण व इतिहासलेखन. [२]

साधने गोळा करण्याची पद्धती :

राजवाड्यांपूर्वीच्या महाराष्ट्रातील इतिहाससंशोधकांनी आपले लक्ष फक्त मराठी साधने गोळा करण्यावर केंद्रित केलेले होते. मराठी भाषेखेरीज इतर भारतीय तसेच इंग्रजी, फ्रेंच इत्यादी युरोपियन भाषांतील साधनांचा संग्रह करण्याकडे त्यांचे लक्ष गेले नव्हते. दुसरी गोष्ट म्हणजे त्यांनी जी मराठी साधने प्रकाशित केली त्यांतील बरीचशी दुय्यम व तिय्यम दर्जाचीच होती. वासुदेवशास्त्र्यांच्या ‘ ऐतिहासिक लेखसंग्रहा ’च्या सुरुवातीच्या खंडांतील व ‘ काव्येतिहाससंग्रह ’ ग्रंथातील ऐतिहासिक पत्रांचा अपवाद सोडल्यास मराठी इतिहाससंशोधकांनी बखरी, कैफियती, करीणे, महजर इत्यादी साधने प्रसिद्ध करण्यावरच विशेष भर दिलेला होता.

अशा परिस्थितीत राजवाडे हेच पहिले इतिहाससंशोधक होत की, ज्यांनी ‘ ना मूलं लिख्यते किंचित् ’ या संशोधकीय मंत्राचा उद्‌घोष केला. पहिल्या दर्जाच्या अस्सल पुराव्याच्या आधाराशिवाय इतिहासाचे लेखन होताच कामा नये, या तत्त्वाचा त्यांनी मोठ्या कटाक्षाने व हिरीरीने पुरस्कार केला. आणि म्हणूनच, केवळ ऐतिहासिक कागदपत्रे, पोथ्या व हस्तलिखिते गोळा करून भागणार नाही, तर नाणी, नकाशे, ताम्रपट, शिलालेख, चित्रे, वास्तुशिल्पे, वस्त्रप्रावरणे, अलंकार, शस्त्रे, विविध प्रकारच्या वस्तू आणि वास्तू या सर्वांचा धांडोळा घ्यावा लागेल, असे त्यांनी आग्रहाने प्रतिपादन केले. त्यांनी असेही बजावले की, फार्सी, संस्कृत, हिंदी, राजस्तानी, कन्नड, गुजराती, इंग्रजी, फ्रेंच, पोर्तुगीज व डच अशा विविध भाषांतील समकालीन अस्सल व प्रथम श्रेणीच्या साधनांचा शोध घेऊन त्यांचा वापर केल्याशिवाय मराठ्यांचा इतिहास अपुरा राहील.[३]

राजवाडेपूर्वकालीन महाराष्ट्रात मराठ्यांच्या इतिहासाची साधने जमविण्याचे जे प्रयत्न झाले त्यामागे विशिष्ट दिशा व नियोजनबद्धता नव्हती. राजवाड्यांनी मात्र मराठी साधने गोळा करण्याची एक पद्धतशीर योजना आखली. मराठ्यांच्या इतिहासाच्या सखोल ज्ञानाच्या जोरावर जेथे ऐतिहासिक साधने विपुल प्रमाणात सापडण्याची शक्यता होती अशा एकशे तेरा ठिकाणांची त्यांनी एक यादी तयार केली. [४] या यादीमध्ये लिस्बन, पॅरिस, लंडन, ॲम्स्टर्‌डॅम, अयोध्या, बनारस, अलीगढ, पानिपत, बुंदी, झांसी, महेश्वर, उज्जैन, सुरत, इंदोर, ग्वालेर, मद्रास, तंजावर, बंगलोर, औरंगाबाद, बिदर, सातारा, कोल्हापूर, सांगली, नासिक, पुणे, हैदराबाद वगैरे भारतातील आणि भारताबाहेरील अनेक ठिकाणांचा समावेश आहे. अकिंचन स्थितीमुळे महाराष्ट्राबाहेर जाणे राजवाड्यांना शक्य नव्हते. पण स्वतःचे वेळापत्रक ठरवून त्यानुसार दऱ्याखोऱ्या, गावे, शहरे हिंडून पायी व बैलगाडीतून त्यांनी उभा महाराष्ट्र इतिहाससाधने मिळविण्यासाठी अक्षरशः

पिंजून काढला. राजवाडे आणि इतर मराठी इतिहास-संशोधक यांच्यातील इतिहास साधनसंग्रहाबाबतचा फरक म्हणजे, इतर संशोधक जमेल त्याप्रमाणे साधने गोळा करीत, तर राजवाडे हे इतिहासदेवतेला वाहिलेले ' धाडसी व भटके संशोधक ' होते. खरेशास्त्र्यांनी जन्मभर मिरजमळ्यात एके ठिकाणी बसून कार्य केले. साने, पारसनीस यांना साधने गोळा करण्यात इतरांची मदत झाली, पण राजवाड्यांनी मात्र द्रव्यबळ व मनुष्यबळ पाठीशी नसताना केवळ स्वतःच्या हिंमतीवर वर्षानुवर्षे रानावनात, उन्हातान्हात भटकून हजारो मराठी (मोडी) कागदपत्रे, अनेक मराठी व संस्कृत हस्तलिखिते, ताम्रपट व शिलालेख गोळा केले. त्यांनी प्रत्येक प्रकारची किती साधने गोळा केली याचे नेमके आकडे सांगता येत नाहीत.[५] कारण असे सांगतात की, ज्या ठिकाणी राजवाडे आपला साधनसंग्रह जमवून ठेवीत त्यांच्याबद्दल ते अत्यंत गुप्तता राखीत असत.

तथापि राजवाड्यांनी गोळा केलेल्या असंख्य कागदपत्रांपैकी मराठ्यांच्या इतिहासावर नवीन प्रकाश टाकणाऱ्या काही निवडक महत्त्वाच्या कागदपत्रांचा उदाहरणादाखल येथे उल्लेख करता येईल. ती कागदपत्रे पुढीलप्रमाणे आहेत : एरंडे दफ्तर, पिसाळ दफ्तर, धावडशी दफ्तर, पंत अमात्य दफ्तर, गोविंदराव काळे दफ्तर, रायरीकर दफ्तर, खाजगीवाले दफ्तर, टिपूच्या दरबारातून कृष्णाजी नारायण जोशी याची पत्रे, शिवकालातील जेधे, जगदाळे, सिलिमकर, गिजरे यांसारख्या घराण्यांची पत्रे, तंजावरचा बृहदीश्वर शिलालेख, आणि ' नारायण व्यवहार शिक्षा ' हे हस्तलिखित इत्यादी.

नवीन इतिहाससाधने मिळविण्याची राजवाड्यांची पद्धती व त्या साधनांसाठी त्यांनी पार पाडलेल्या मोहिमा याचे यथायोग्य मूल्यमापन प्रख्यात इतिहासकार सर जदुनाथ सरकार यांनी पुढील शब्दांत केले आहे : "Time may bring forth others to carry on his work, but they will be merely a tamer race of the after-born, scanty-gleaners after his copious harvest; not one of them will devote— as Rajwade devoted– all thoughts, all passions, all interests of a long mateless, professionless life to the ceaseless exploration of all possible and impossible ' find-spots ' of historical records, amidst hopelessly defective means of transport, discomfort, privation and lack of helpers, in the teeth of ignorance, suspicion and hostility; neglect and inertia from a local public whom he had to honour, coax, educate and, when necessarily, delude. But his life's mission

was achieved; he alone revolutionised historical methodology in the Deccan and — by that example -- other parts of India as well."[६]

राजवाड्यांचा इतिहाससंशोधनक्षेत्रात प्रवेश होण्यापूर्वी महाराष्ट्रात ऐतिहासिक साधने जमविण्याचे जे प्रयत्न झाले ते व्यक्तिगत व फुटकळ स्वरूपाचे होते. अशा तऱ्हेच्या प्रयत्नांनी राजवाड्यांचे समाधान होण्यासारखे नव्हते. या सर्व व्यक्तिगत प्रयत्नांत एकसूत्रीपणा आणून त्यांना व्यापक सामूहिक स्वरूप दिल्याखेरीज महाराष्ट्रात इतिहाससंशोधनाची प्रगती झपाट्याने व योग्य त्या दिशेनें होणार नाही याची राजवाड्यांना खात्री होती. म्हणून इ. १९१० मध्ये सरदार खं. चिं. मेहेंदळे व प्रा. द. वा. पोतदार यांच्या मदतीने त्यांनी पुण्यात भारत इतिहास संशोधक मंडळ या संस्थेची स्थापना केली. ऐतिहासिक अस्सल साधने गोळा करण्याचे महत्त्व महाराष्ट्रातील विद्वानांच्या मनावर बिंबविण्यासाठी राजवाड्यांनी भा. इ. सं. मंडळाचा माध्यम म्हणून उत्तम तऱ्हेने उपयोग करून घेतला. पुण्यात असताना राजवाडे न चुकता दरवर्षी मंडळाच्या वार्षिक संमेलनप्रसंगी निबंध वाचत व या निबंधाद्वारे आपल्या संशोधन-मोहिमांची व नवीन जमा केलेल्या ऐतिहासिक सामग्रीची संशोधकांना व लोकांना माहिती करून देत.[७] राजवाड्यांचा ध्येयवादी आदर्श व भा. इ. सं. मंडळाचे कार्य यांच्यामुळे महाराष्ट्रातील अनेक तरुण संशोधकांना स्फूर्ती मिळून त्यांनी निरनिराळ्या ठिकाणी हिंडून ऐतिहासिक साधने मिळविण्यास सुरुवात केली. पुढील काळात नानासाहेब देव, भा. वा. भट, प्रा. ग. ह. खरे यांच्यासारख्या 'झपाटलेल्या' इतिहाससंशोधकांनी जी प्रचंड ऐतिहासिक सामग्री मिळवून धुळे व पुणे येथे जमा करून ठेवली, त्यामागील प्रेरणेचे उगमस्थान राजवाडेच होत. त्याचप्रमाणे भा. इ. सं. मंडळ व धुळ्याचे राजवाडे संशोधन मंडळ या दोन संस्था आज महाराष्ट्रातील मोठी पुराभिलेखागारे बनलेल्या आहेत. त्याचे श्रेय राजवाड्यांनाच द्यावयास हवे.

साधनांच्या जतनाची व देखभालीची पद्धती :

साधनांचे जतन व त्याची देखभाल (Preservation and Maintenance) या संशोधनाच्या दुसऱ्या टप्प्याकडे राजवाड्यांनी फार थोडे लक्ष दिले. मात्र या बाबतीत त्यांनी एक फार मोलाचा विचार मांडलेला आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात व जिल्ह्यात इतिहासाभ्यासू लोकांची अभ्यासमंडळे किंवा गट स्थापन करण्यात यावेत अशी सूचना त्यांनी एके ठिकाणी केलेली आहे. कारण त्यामुळे प्रत्येक तालुक्यातील व जिल्ह्यातील तरुण व उत्साही संशोधकांना उत्तेजन मिळून ते आपापल्या भागातील साधने गोळा करून आणतील असे त्यांना वाटत होते. ही साधने प्रत्येक तालुका व

जिल्हा मंडळाच्या संग्रहालयात जतन करून ठेवण्यात यावीत असे राजवाड्यांचे मत होते.[८] राजवाड्यांची ही सूचना खरोखरीच विचार करण्यासारखी होती. पण त्यांनी ती स्वतः कार्यवाहीत आणण्याचा कधी प्रयत्न केला नाही, किंवा महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्याच्या व जिल्ह्याच्या ठिकाणी हिंडून स्थानिक लोकांना आपापल्या भागात पुराभिलेखागारे निर्माण करण्यास उत्तेजन देतील असे कार्यकर्तेही तयार केले नाहीत. परिणामी तालुका व जिल्हा संग्रहालयांची राजवाड्यांची योजना मागे पडली.

सामूहिक मालकीची ऐतिहासिक साधने कोठे व कशी ठेवण्यात यावीत याबाबत राजवाड्यांनी मार्गदर्शन केले खरे; पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे साधनांचे जतन व त्याची देखभाल या इतिहास-संशोधनपद्धतीच्या महत्त्वाच्या अंगासंबंधी त्यांनी काहीच विचार मांडलेले नाहीत. ऐतिहासिक साधने जतन करण्याची शास्त्रीय पद्धती(Science of Preservation and Conservation) आजच्या काळात जितकी विकसित झालेली आहे तितकी ती राजवाड्यांच्या काळात नव्हती ही गोष्ट खरी. परंतु आपल्याकडील जुन्या सोप्या पद्धती वापरून साधनांचे जतन कसे करता येईल याबद्दल काही विचार त्यांनी मांडावयास हरकत नव्हती. ज्याप्रमाणे त्यांनी आपल्या अनुयायांना साधनांचे जतन कसे करावे याचे मार्गदर्शन केले नाही, त्याचप्रमाणे शास्त्रशुद्ध पद्धतीने साधनांच्या याद्या (Cataloguing), वर्गीकरण (Classification) व सूची (Indexing) कशा केल्या पाहिजेत याचे शिक्षण दिले नाही. राजवाड्यांच्या संशोधनपद्धतीतील ही एक मोठी त्रुटी होती. या त्रुटीचा दुष्परिणाम असा झाला की, पुण्याच्या भा.इ.सं. मंडळात व धुळ्याच्या राजवाडे संशोधन मंडळात अनेक प्रकारची साधने जमा होऊनही अगदी अलीकडच्या काळापर्यंत त्याचे शास्त्रीय पद्धतीने वर्गीकरण व सूचीकरण झालेले नव्हते.

ऐतिहासिक साधने : परीक्षणाची पद्धती :

ऐतिहासिक साधनांचा संग्रह करण्याइतकेच महत्त्व राजवाडे त्यांच्या परीक्षणाला व त्यांच्या दर्जानुसार ठरणाऱ्या वर्गवारीला देत असत. साने, पारसनीस, फॉरेस्ट यांच्यासारखे त्यांचे समकालीन इतिहासंशोधक साधने गोळा करण्याला जितके महत्त्व देत तितके त्यांच्या परीक्षणाला देत नसत. बखरी, कैफियती, कूळकटे, करीने यांसारख्या दुय्यम दर्जाच्या साधनांवर विश्वास ठेवून त्यांनी आपले इतिहासविषयक लिखाण सजविलेले होते. राजवाड्यांनी त्यांना दाखवून दिले की, समकालीन विश्वासार्ह लोकांनी लिहिलेली व सरकारी मूळ कागदपत्रे हीच काय ती इतिहासलेखनाच्या दृष्टीने विश्वासार्ह व पहिल्या दर्जाची सामग्री होय; बाकी सर्व साधने दुय्यम किंवा तिय्यम दर्जाची होत. एक अस्सल चिटोरे सर्व बखरीच्या पुराव्यास हाणून पाडण्यास पुरेसे आहे असे राजवाडे

ठणकावून सांगतात. समकालीन अस्सल कागदपत्रांचा जो ध्यास राजवाड्यांनी एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस घेतला तो इंग्लंड आणि फ्रान्समध्ये सुरू होण्यास अजून एक दशक उजाडावे लागले. राजवाड्यांचा 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने' चा तिसरा खंड इ. १९०१ मध्ये प्रसिद्ध झाला. त्याच्या शीर्षक पृष्ठावर 'ना मूलं लिख्यते किंचित्' हे प्रतिज्ञा-वाक्य म्हणून राजवाड्यांनी छापलेले आहे. तसेच दुसऱ्या एका ठिकाणी लामार्तिनचे 'No Document No History' हे वाक्यही त्यांनी उद्धृत केलेले आहे. त्या ठिकाणी लक्षात ठेवण्याची गोष्ट म्हणजे लॉर्ड ॲक्टनसारखा थोर विद्वानही फ्रेंच राज्यक्रांतीवरील त्याच्या भाषणात अप्रकाशित ऐतिहासिक साधनांबद्दल काहीसे तुच्छतादर्शक उद्‌गार काढतो !

गोळा केलेली सर्वच साधने म्हणजे इतिहासलेखनाच्या दृष्टीने पहिल्या दर्जाचा विश्वसनीय पुरावा नव्हे ही गोष्ट राजवाड्यांनी आग्रहाने प्रतिपादन केली. त्यामुळे ही साधने ऐतिहासिक सत्यतेच्या कसोटीवर घासून त्यांच्या विश्वसनीयतेच्या कमी-अधिक प्रमाणानुसार त्यांचा दर्जा किंवा वर्गवारी ठरविली पाहिजे, असे राजवाड्यांचे मत होते. राजवाडे असे सांगतात की एखाद्या साधनाच्या विश्वसनीयतेचे प्रमाण हे त्या साधनाचा लेखक किती प्रामाणिकपणे हकीगत लिहितो व ती हकीगत सत्याला धरून व्यवस्थितपणे लिहिण्याचे शिक्षण त्याला कितपत मिळाले आहे यावर अवलंबून असते.

राजवाड्यांच्या दृष्टीने ऐतिहासिक कागदपत्रांचे परीक्षण दोन प्रकारचे असते — एक बहिरंग–परीक्षण व दुसरे अंतरंग–परीक्षण. एखादा कागद पुढील बाबी पूर्ण करत असला तर तो विश्वसनीय व पहिल्या दर्जाचा पुरावा म्हणून समजण्यात यावा : १. तो समकालीन असला, २. जर त्यात दिलेल्या तारीख, तिथी, वार, महिना व वर्ष या सर्व बाबी जंत्रीशी जुळत असतील, ३. जर कागदामध्ये दिलेली हकीगत, कागदाची भाषा व हकीगत देण्याची शैली या गोष्टी त्याच्या कालाशी सुसंगत असतील, ४. जर कागद मूळ म्हणजे अस्सल किंवा अधिकृत नकल असेल, ५. जर कागदाचा लेखक वर्णिलेल्या घटनांशी प्रत्यक्ष संबंधित असेल किंवा समकालीन अस्सल साधनांच्या आधारे हकीगत देत असेल, ६. जर लेखक पुरेसा प्रामाणिक असेल व घटना जशा घडल्या तशा त्या सुसंगतपणे लिहिण्याचे शिक्षण त्याला मिळालेले असेल आणि जर ७. घटनांचा तपशील व तारखा दुसऱ्या समकालीन विश्वसनीय साधनांशी जुळत असतील. या सात कसोट्यांपैकी पहिल्या सहा कसोट्या बहिरंग-परीक्षणाखाली होतात व शेवटची सातवी कसोटी अंतरंग-परीक्षणाशी निगडित आहे.[९]

मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांना वरील कसोट्यांचा निकष लावून राजवाड्यांनी जे निष्कर्ष काढलेले आहेत ते असे : १. मराठी, फार्सी, इंग्रजी, फ्रेंच, पोर्तुगीज व डच या भाषांतील सरकारी अधिकृत कागदपत्रे ही पहिल्या दर्जाची साधने होत. २. खासगी

कागदपत्रे जर वरील सर्व कसोट्यांना उतरत असतील तर ती पहिल्या दर्जाची समजावीत. ३. जो कागदपत्रे वरील निकष अंशतः पूर्ण करत असतील ती दुसऱ्या दर्जाची आणि उरलेली तिसऱ्या श्रेणीची समजण्यात यावीत. ४. सभासद बखर, माहीमची बखर, भाऊसाहेबांची बखर यांच्यासारख्या अगदी मोजक्या बखरी दुय्यम दर्जाच्या साधनांत मोडतात. पण बाकीच्या सर्व बखरी, कैफियती, करीने, वंशावळी, कुळकटे व त्या प्रकारची इतर मराठी साधने तिसऱ्या चौथ्या दर्जाची असून अविश्वसनीय समजावीत. बखरी किंवा तत्सम इतर साधनांतील माहिती जर इतर समकालीन अस्सल पहिल्या दर्जाच्या साधनाने सिद्ध झाली तरच विश्वसनीय समजावी. ५. मराठीखेरीज इतर स्वकीय व परकीय भाषांत सरकारी कागदपत्रांखेरीज जी इतर अनेक प्रकारची साधने आहेत त्यांनाही वर उल्लेखिलेल्या सात कसोट्या लावून त्यांची विश्वसनीयता ठरवावी.[१०]

ऐतिहासिक सत्यान्वेषणाच्या दृष्टीने राजवाड्यांनी सांगितलेल्या कसोट्या व त्या लावून त्यांनी काढलेले निष्कर्ष बऱ्याच अंशी बरोबर आहेत. पण काही ठिकाणी मात्र त्यांचे निष्कर्ष योग्य वाटत नाहीत. याची काही उदाहरणे देता येतील. सर्वसाधारणपणे पोवाडे हे साधन तिसऱ्या दर्जाचे मानले जाते. पण राजवाडे त्यांना बखरीपेक्षा अधिक विश्वसनीय मानतात. कवि भूषण हा शिवाजीचा समकालीन होता की नाही याबद्दल संशोधकांत वाद आहे. त्याची काव्यशैली भाटाची असून अतिशयोक्तिपूर्ण वर्णने त्याने पुष्कळच केलेली आहेत. तरी राजवाडे त्याच्या काव्याला पहिल्या दर्जाचे साधन समजतात. हनुमानस्वामीची बखर ही शिवाजीनंतर अनेक वर्षांनी लिहिली गेली असून भाकडकथांनी भरलेली आहे. तिची लायकी चौथ्या दर्जाची सुद्धा नाही. तरी राजवाडे तिला शिवकालीन इतर बखरींपेक्षा काही ठिकाणी प्रमाण धरतात. राजवाड्यांच्या मतानुसार इंग्रज व्यापाऱ्यांच्या हकीगती अजिबात विश्वासार्ह नाहीत.[११] पण त्यांचे हे मतही बरोबर नाही. इंग्रज व्यापाऱ्यांच्या हकीगतीत सत्य घटना व ऐकीव बातम्या यांची सरमिसळ झालेली असते, त्याचप्रमाणे या हकीगती देताना निरनिराळ्या वेळी त्यांचे हेतू निरनिराळे असतात. त्यामुळे इतर समकालीन पहिल्या दर्जाच्या पुराव्याच्या प्रकाशातच त्यांची विश्वसनीयता पडताळून घ्यावी लागते.

ऐतिहासिक कागदपत्रांचे परीक्षण व त्यांची वर्गवारी यासंबंधी राजवाड्यांचे विचार पाहता ते युरोपियन तत्त्वज्ञ व इतिहासकार यांनी भूतकाळात अनेक वर्षे पुरस्कारलेली तर्कशास्त्रातील जी विगमन पद्धती (Inductive Method) तिला अतिशय महत्त्व देत होते हे सहज ध्यानात येते. भारतीय तत्त्वज्ञांच्या व दार्शनिकांच्या निगमन पद्धतीपेक्षा (Deductive Method) विगमन पद्धती शास्त्रीय व तांत्रिक ज्ञानाच्या प्रगतीस अधिक पोषक आहे, निगमन पद्धती ही फक्त मनःशांती देण्यापुरती उपयोगी

आहे, असे राजवाड्यांचे स्पष्ट व प्रांजल मत होते. विगमन पद्धतीत विशिष्ट घटनांपासून (Particular facts) सर्वसाधारण स्वरूपाचे निष्कर्ष (Generalizations) काढले जातात, तर निगमन पद्धतीत सर्वसाधारण सिद्धान्तांपासून (General Assumptions) विशिष्ट प्रकारचे निष्कर्ष काढण्यात येतात. (Deductions)[१२], निरीक्षण (Observation), पृथक्करण किंवा विश्लेषण (Analysis), कालानुक्रम, वर्गीकरण, घटनांचा किंवा प्रसंगांचा पडताळा, घटनांचे एकत्रीकरण (Synthesis of facts), अनुमान (Hypothesis) व निष्कर्ष, या विगमन पद्धतीतील आठ पायऱ्या आहेत. विशिष्ट घटनांपासून सर्वसाधारण स्वरूपाचे निष्कर्ष काढताना या आठ पायऱ्या ओलांडाव्या लागतात.

विगमन पद्धतीचा इतिहाससंशोधनात उपयोग केल्यामुळेच राजवाडे ग्रँट डफ, द. ब. पारसनीस यांनी व इतर अनेक संशोधकांनी केलेल्या चुका दाखवू शकले. 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने', खंड १ ते ४ यांना राजवाड्यांनी लिहिलेल्या प्रस्तावना सूक्ष्मपणे वाचल्या तर त्यात राजवाड्यांनी आपले मुद्दे विगमन पद्धतीला अनुसरून मांडले असल्याचे स्पष्ट दिसते. या प्रस्तावनांमध्ये घटनांचे पृथक्करण, त्यांची कालानुक्रमाने मांडणी, त्याचे वर्गीकरण, इतर पुराव्याच्या आधारे घटनांचा पडताळा, घटनांचे एकत्रीकरण व निष्कर्ष अशी विचारांची तर्कशुद्ध साखळी राजवाड्यांनी जोडल्याचे दिसून येते.

दुर्दैवाने राजवाडे विगमन पद्धतीच्या विचारसरणीचा सर्व ठिकाणी सारखाच वापर करीत नाहीत. यासंबंधीची एकदोन उदाहरणे देता येतील. 'राधामाधव विलासचंपू' ग्रंथाच्या प्रस्तावनेत राजवाड्यांनी वैदिक आर्यांच्या चतुर्वर्ण्य पद्धतीच्या उगमाची व विकासाची मोठ्या विस्ताराने चर्चा केलेली आहे. या चर्चेच्या सुरवातीला, आर्य लोक हे मध्य आशियामधील पामीरच्या पठाराजवळचे रहिवासी होत हे ते कोणताही आधार न देता गृहीत धरून चालतात. पुढे ते सांगतात की सुरुवातीला आर्यांच्या टोळ्यांत फक्त शुभ्रवर्णी ब्राह्मण होते. या टोळ्या जेव्हा मध्य आशियातून हिंदुस्थानात येण्यास निघाल्या तेव्हा वाटेत त्यांना प्रथम ताम्रवर्णी क्षत्रिय व पुढे पीतवर्णी वैश्य भेटले. आर्य टोळ्या हिंदुस्थानात आल्यावर येथील ज्या मागासलेल्या स्थानिक अनार्यांच्या वसाहती होत्या त्यातील अनेकांना आर्यांनी आपले सेवाकर्म करावयास लावून शूद्र बनविले. परिणामी चातुर्वर्ण्य संस्था उदयाला आली. राजवाड्यांच्या या सिद्धान्ताला कोणत्या ऐतिहासिक पुराव्याचा आधार आहे? कोणत्याही प्रकारचा पुरावा न देता ते आर्यांच्या वसाहतीबाबत विधानामागे विधाने करत सुटतात. पुरातत्त्व, इतिहास, जुने संस्कृत वाङ्मय, ज्योतिषशास्त्रीय गणित असा विविध प्रकारचा पुरावा उपलब्ध असताना आजदेखील आर्यांचा काळ, त्यांचे उगमस्थान व त्यांच्या वसाहती याबाबत निश्चितपणे

सांगणे अवघड जाते, पण राजवाडे मात्र केवळ तर्कावर विसंबून याविषयासंबंधी छातीठोक विधाने करतात तेव्हा आश्चर्य वाटते.[१३]

महाराष्ट्रातील शिवकालीन समाजरचना हा एक विचारप्रवर्तक लेख राजवाड्यांनी लिहिलेला आहे. या लेखातही आपले निष्कर्ष मांडताना राजवाडे एक गोष्ट आधीच गृहीत धरून मग त्याच्या आधारे चर्चा करतात. ही गोष्ट म्हणजे शिवपूर्वकालाच्या काही शतके आधी चातुर्वर्ण्य समाजरचना ही तिच्या मूळ शुद्ध स्वरूपात अस्तित्वात होती. हळूहळू काही काळानंतर चातुर्वर्ण्याचे नियम पाळण्यात ढिलेपणा निर्माण होऊ लागला. एका जातीतच विवाह न होता आंतरजातीय विवाह व अनैतिक स्त्रीपुरुष संबंध होऊ लागले. त्याचप्रमाणे वरच्या वर्णांनी खालच्या वर्णांचे धंदेव्यवसाय उचलले. ब्राह्मण क्षत्रियाची व वैश्याची, तर क्षत्रिय वैश्याची कामे करू लागले. त्यामुळे मूळची शुद्ध चातुर्वर्ण्य रचना दूषित होऊन तिच्यात विस्कळीतपणा आला. परिणामी महाराष्ट्र यवनांनी पादाक्रांत केला व महाराष्ट्रीय लोक यवनांचे गुलाम बनले. अनेक वर्षे महाराष्ट्राने गुलामगिरीचे दुःख भोगल्यावर पुढे शिवाजी व रामदास यांचा उदय झाला. त्यांच्या अजोड कार्यामुळे चातुर्वर्ण्य व्यवस्थेला पूर्वीचे शुद्ध स्वरूप प्राप्त झाले. त्यामुळे महाराष्ट्रीय समाजाचे उत्थान होऊन शिवाजीचे स्वराज्य स्थापन होऊ शकले.[१४] राजवाड्यांच्या या सर्व चर्चेला कोणत्याही ऐतिहासिक पुराव्याचा आधार नाही. देवगिरीचे यादव दिल्लीच्या खिलजींचे गुलाम झाले. त्याचा चातुर्वर्ण्याच्या शुद्धाशुद्धतेशी सुतराम् तरी संबंध आहे का? यादवाच्या कोणत्या दोषामुळे व चुकामुळे ते मुसलमानापुढे पराभूत झाले ते इतिहासाला चांगले ठाऊक आहे. त्या गोष्टीचा चातुर्वर्ण्याशी काडीचाही संबंध नाही. दुसरी गोष्ट म्हणणे शिवाजी व रामदास यांनी त्यांच्या काळच्या चातुर्वर्ण्य समाजरचनेत बदल घडवून आणून ती मनूच्या काळातील मूळ समाजरचनेप्रमाणे करण्याचा प्रयत्न केला असे म्हणणे हास्यास्पद आहे. तो त्यांचा हेतूही नव्हता व तसे करणे त्यांना शक्यही नव्हते. आहे तीच समाजरचनेची चौकट कायम ठेवून त्यांनी बदल घडवून आणला तो लोकांच्या मनोरचनेत. लोकांच्या मनात स्वातंत्र्याची ऊर्मी निर्माण करून शिवाजीने स्वराज्य स्थापले, चातुर्वर्ण्य पद्धती शुद्ध करून नव्हे. या बाबतीत राजवाड्यांचे जे विवेचन आहे ते त्यांनीच प्रतिपादन केलेल्या विगमन पद्धतीशी विसंगत आहे.

ऐतिहासिक कागदपत्रांची संपादनपद्धती :

जमविलेल्या कागदपत्रांपैकी संशोधनदृष्ट्या महत्त्वाची कागदपत्रे संपादित करून ती प्रकाशित करण्याच्या बाबतीत राजवाडे अतिशय जागरूक होते. इतिहास-संशोधनाची वेगाने प्रगती होण्यासाठी व इतिहासाभ्यासकांच्या उपयोगाकरिता जमवलेली कागदपत्रे वेळचे वेळी प्रकाशित करणे हे संशोधकाचे पवित्र कर्तव्य आहे असे ते मानीत. इतिहास-

संशोधनासाठी राजवाड्यांनी केलेल्या खडतर तपश्चर्येचे प्रत्यक्ष फळ म्हणजे इ. १८९८ ते १९१९ या काळात त्यांनी संपादून प्रकाशित केलेले ' मराठ्यांच्या इतिहासाची साधने ' या ग्रंथामालेचे बावीस खंड होत. या बावीस खंडांची सुमारे ७६०० पृष्ठे असून त्यात सुमारे ५६०० मूळ ऐतिहासिक कागदपत्रे, ८ हस्तलिखिते व १ शिलालेख इतकी सामग्री संपादित करून राजवाड्यांनी प्रसिद्ध केलेली आहे. याखेरीज ' राधा-माधवविलासचंपू ' व ' महिकावतीची ऊर्फ माहीमची बखर ' हे दोन ग्रंथ त्यांनी स्वतंत्र-पणे संपादित केलेले आहेत.

राजवाड्यांच्या पूर्वी दुसऱ्या दर्जाची अनेक व पहिल्या दर्जाची थोडी मराठी साधने संपादित होऊन प्रकाशात आलेली होती. त्यांपैकी पहिल्या दर्जाची साधने म्हणजे ऐतिहासिक पत्रे असून दुय्यम दर्जाच्या साधनांत बखरी, शकावल्या, कैफियती, पोवाडे, करीने, वंशावळ्या, काव्ये इत्यादींचा समावेश होता. ज्या पद्धतीने ही साधने संपादित व प्रकाशित केली गेली त्या अशास्त्रीय पद्धतीबाबत राजवाडे असमाधानी होते. संपादनात इतर संशोधकांकडून झालेल्या चुका राजवाड्यांनी त्यांच्या निदर्शनास आणून दिल्या. राजवाड्यांच्या मते, कीर्तने व पारसनीस हे दोघे समकालीन अस्सल कागदपत्रांचे महत्त्व न जाणता फक्त बखरी व तत्सम दुय्यम दर्जाची साधनेच संपादित व प्रकाशित करीत होते. ' कायस्थ प्रभूंच्या इतिहासाच्या साधनां'चे प्रकाशक व प्रा. फॉरेस्टसारखी मंडळी पहिल्या व दुसऱ्या दर्जाची साधने वेगवेगळी न छापता एकत्र छापत होती; पारसनीस व ग. चि. वाड यांनी छत्रपती शाहू महाराजांची रोजनिशी संपादन न करता प्रसिद्ध केली व मूळ रोजनिशीच्या मजकुरातही अनेक चुका होत्या.[१५]

राजवाड्यांनी ऐतिहासिक साधनांचे संपादन करताना कोणते नियम पाळले पाहिजेत याचे दिग्दर्शन केलेले आहे. त्यांनी घालून दिलेले नियम असे आहेत : १. मूळ साधना-तील मजकूर त्यात कोणताही फेरफार न करता जसाच्या तसा प्रसिद्ध करावा. २. कागदपत्र वा साधन कोणाकडून, कोठे व केव्हा मिळाले त्याचा तपशील द्यावा. ३. साधन मूळ अस्सल आहे, नकल आहे की नकलेची नकल आहे याचे स्पष्टीकरण द्यावे. ४. साधनाचे व ते ज्या अवस्थेत आहे त्याचे अचूक वर्णन द्यावे. ५. साधनात जे कठीण शब्द वा वाक्ये आली असतील त्यांचा अर्थ द्यावा. ६. या वाक्यांच्या आधारे जी अनुमाने निघत असतील त्यांची नोंद करावी, आणि ७. या अनुमानांच्या साहाय्याने साधनातील मजकुराचा व घटनांचा अन्वयार्थ लावणारे विवेचन करावे.[१६]

राजवाड्यांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी दिलेल्या वरील नियमांपैकी पाचवा नियम सोडून बाकीचे नियम आपल्या संपादित ग्रंथात काटेकोरपणे पाळले, पत्रांवरील निर-निराळे शिक्के तसेच पत्रांच्या शेवटी येणारे ' सुरू ', ' सुद ', ' बार ' सारखे शब्द छापण्याचा साक्षेपीपणा राजवाड्यांइतका क्वचितच कोणी दाखविला असेल. इतर

समकालीन मराठी संशोधकांपेक्षा राजवाडे मोडी कागदपत्रांतील मजकुराचा अर्थ अधिक चांगल्या प्रकारे सांगू शकत, कारण इतर संशोधकांप्रमाणे केवळ मोडी लिपीच्या वाचण्यावर प्रभुत्व मिळवून ते थांबले नाहीत, तर मोडी लिपीच्या उगमाचा शोध घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. ‘ लेखन–प्रशस्ती ’ नावाच्या एका अत्यंत महत्त्वाच्या मोडी हस्तलिखिताचा त्यांनी सूक्ष्मपणे अभ्यास केला. या हस्तलिखितात अठ्याहत्तर विविध प्रकारच्या कागदपत्रांची नावे, त्यांचे अर्थ त्याचप्रमाणे ही मोडी कागदपत्रे लिहिण्याचे नियम ह्यांची माहिती दिलेली आहे. [१७] राजवाड्यांसारखा संशोधनाच्या मूळ गाभ्यालाच हात घालणारा संशोधक विरळा.

ज्या काळात राजवाड्यांनी आपले संशोधनकार्य केले त्या काळाचा विचार करता राजवाड्यांची कागदपत्रे संपादन करण्याची पद्धती इतर अनेक समकालीन संशोधकांपेक्षा सरस होती. फक्त वासुदेवशास्त्रीच काय ते संपादनाच्या बाबतीत त्यांचा हात धरू शकतील. मात्र आजच्या काळात ऐतिहासिक कागदपत्रे संपादित करण्याची जी आदर्श पद्धती समजली जाते तिच्या दृष्टीने पाहता राजवाड्यांच्या संपादनपद्धतीत काही त्रुटी होत्या. उदाहरणे देऊन ही गोष्ट दाखवून देता येईल. राजवाड्यांनी, कागदपत्रांत ज्या मूळ हिंदू किंवा मुसलमानी तारखा येतात, त्या पत्रांच्या वर उजव्या कोपऱ्यात दिलेल्या आहेत. पण या तारखांचे इंग्रजी तारखेतील रूपांतर त्यांनी दिलेले नाही. आवश्यक त्या ठिकाणी संदर्भ व स्पष्टीकरणात्मक टीपा त्यांनी दिलेल्या नाहीत. महत्त्वाच्या स्थळांची व व्यक्तिनामांची सूची देण्याचे महत्त्व त्यांच्या लक्षात आलेले नसावे. कारण मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचे जे बावीस खंड आहेत त्यांपैकी फक्त दोन किंवा तीन खंडांत अशी सूची आलेली आहे. मोडी कागदांतून जुन्या वळणाचे असे कितीतरी मराठी व फार्सी शब्द येतात की त्यांचे स्पष्टीकरण देणे जरुरीचे असते. राजवाड्यांनी अशा तऱ्हेची स्पष्टीकरणे फारशी दिलेली नाहीत. मोडी कागदपत्रांतून जे शिक्के येतात त्यांच्याबाबत एक निश्चित पद्धत राजवाड्यांनी अवलंबिलेली दिसत नाही. कधी ते मूळ मजकुरासह शिक्के देतात, कधी त्यांचा नुसताच उल्लेख करतात. जेथे शिक्क्यातील मजकुराचा अर्थ समजण्यास अवघड असेल तेथे तो ते समजावून देत नाहीत. ‘ लेखन-प्रशस्ती ’वरील लेख सोडल्यास इतरत्र शिक्क्यांचे फारसे विवेचन त्यांनी केलेले नाही. त्याचप्रमाणे कागदपत्रांतून येणाऱ्या भौगोलिक स्थळांसंबंधीची टिपणेही ते देत नाहीत. नकाशांचा वापर तर त्यांनी केलेला मुळीच आढळत नाही.

ऐतिहासिक कागदपत्रांच्या संपादनात तारखानिश्चिती ही एक अत्यंत महत्त्वाची बाब असते. राजवाड्यांनी तिच्याकडे विशेष लक्ष पुरविले होते. तारखा निश्चित करण्यासाठी राजवाडे मोडक जंत्री व दीक्षित आणि सेवेल यांनी मिळून तयार केलेली जंत्री वापरत.[१८] भारताच्या इतिहासात तारखानिश्चिती ही एक अत्यंत गुंतागुंतीची गोष्ट असते.

कारण त्या इतिहासाच्या अभ्यासकाला हिंदू, मुसलमानी, ख्रिश्चन अशा अनेक प्रकारच्या कालमापनपद्धतींना तोंड द्यावे लागते. पुन्हा या तीन प्रकारच्या कालमापनपद्धतींत कालमापनाचे विविध उपप्रकार असतात. राजवाड्यांनी हिंदू व ख्रिश्चन कालमापन-पद्धतींचा बऱ्यापैकी अभ्यास केलेला होता. त्यामुळे त्यांनी कागदपत्रांना दिलेल्या तारखा बऱ्याच अंशी बरोबर आहेत. हिंदू व ख्रिश्चन कालमापनपद्धतीशी चांगला परिचय असल्याने राजवाडे द. ब. पारसनीस व ग्रँट डफ यांनी दिलेल्या तारखांतील अनेक चुका दाखवू शकले.[१९] मात्र मुसलमानी तारखापद्धतीशी त्यांचा हवा तितका परिचय नसल्याने त्या तारखांचे हिंदू शकात रूपांतर करताना त्यांच्या हातून काही चुका झालेल्या आहेत. या चुका कै. ग. ह. खरे यांनी दुरुस्त केलेल्या आहेत.

विवेचनाची व इतिहासलेखनाची पद्धती :

विवेचन व इतिहासलेखन ही राजवाड्यांनी इतिहाससंशोधन–पद्धतीतील अखेरची पायरी म्हणून सांगितली आहे. राजवाड्यांचे ऐतिहासिक विवेचन (Historical Interpretation) हे स्वतंत्र ग्रथांच्या स्वरूपात नाही. ‘ मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड १-२२’, ‘ राधामाधवविलासचंपू ’ आणि ‘ महिकावतीची बखर ’ यांना लिहिलेल्या प्रस्तावना, तसेच अनेक मराठी जुन्या मासिकांतून व नियतकालिकांतून विखुरलेले चारशेवर संशोधनात्मक लेख यांतून राजवाड्यांचे विविध विषयांवरील लिखाण प्रसिद्ध झालेले आहे.

ऐतिहासिक कागदपत्रांचे विवेचन व इतिहासलेखन यांना हात घालण्यापूर्वी इतिहास-संशोधकाने कोणती पथ्ये पाळली पाहिजेत याचे दिग्दर्शन राजवाड्यांनी ‘ संशोधक कसा असावा ’ या आपल्या लेखात केले आहे. पहिले महत्त्वाचे पथ्य म्हणजे इतिहास-लेखकाने इतिहासाशी संबंधित अशा विविध विषयांचे सखोल ज्ञान प्राप्त करून घेतले पाहिजे. दुसरी गोष्ट म्हणजे, इतिहाससंशोधन-पद्धतीच्या विविध शाखांमध्ये त्याची उत्तम गती असली पाहिजे. संशोधनाच्या दृष्टीने जितक्या भाषा व लिप्या शिकता येतील तितक्या त्याने शिकून घेतल्या पाहिजेत. त्याला नुसते भारताच्या इतिहासाचेच नव्हे तर सबंध जगाच्या इतिहासाचे चौफेर ज्ञान असले पाहिजे.[२०]

इतिहासलेखनाच्या क्षेत्रात प्रवेश करण्यापूर्वी राजवाड्यांनी वर उल्लेखिलेल्या बाबीं-पैकी सर्व जरी नाहीत तरी बऱ्याचशा पूर्ण केलेल्या होत्या. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना इतिहासशास्त्र व इतिहाससंशोधन-पद्धती या विषयावरील युरोपियन विचारवंतांचे अनेक ग्रंथ पालथे घातले होते. समाजशास्त्र, मानववंशशास्त्र, राजनीती, मानसशास्त्र, धर्मशास्त्र, तत्त्वज्ञान, भाषाशास्त्र, व्याकरण इत्यादी विषयांच्या मूलतत्त्वांचा त्यांचा अभ्यास स्तिमित करून सोडणारा होता. जुने मराठी साहित्य व संस्कृत वाङ्मय यांचा

त्यांनी केलेला व्यासंग अफाट होता. त्यांच्या काळात भारत, युरोप व जग या तिहींच्या इतिहासाचे सूक्ष्म परिशीलन केलेले महाराष्ट्रातील तेच एकमेव इतिहाससंशोधक होते. भाषांचा विचार करता संस्कृत भाषेचे ते तज्ज्ञ असून, फार्सी व फ्रेंच या भाषांशी त्यांची तोंडओळख झालेली होती. मोडी लिपी वाचण्यात त्यांनी इतकी पारंगतता मिळविली की ऐतिहासिक कागदपत्रे, शिलालेख व ताम्रपट ते इतर समकालीन मराठी इतिहास-संशोधकांपेक्षा अधिक चांगल्या रीतीने वाचत असत. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, महाराष्ट्राच्या गावागावातून व दऱ्याखोऱ्यातून हिंडून त्यांनी महाराष्ट्रातील भाषा, चालीरीती, लोकजीवन व संस्कृती यांचा अगदी जवळून प्रत्यक्ष परिचय करून घेतलेला होता.

इतिहासाशी संबंधित विविध विषयांचा राजवाडे आपल्या विवेचनात उपयोग करून घेत असल्याने त्यांच्या इतिहासलेखनाचे एक वैशिष्ट्य प्रकर्षाने जाणवते. ते म्हणजे विविध प्रकारच्या विषयांवर त्यांनी लिखाण केलेले आहे. इतिहासशास्त्र (चार लेख व मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ६ ची प्रस्तावना), ताम्रपट व शिलालेख (५० लेख), मराठ्यांचा इतिहास (म. इ. साधने खंड १ ते २२ च्या प्रस्तावना व ६० लेख), सामाजिक व मानववंशशास्त्रीय विषय (२० लेख), चालू काळातील राजकारण व समाजकारण (१५ लेख), भाषाशास्त्र, व्याकरण व व्युत्पत्तिशास्त्र (५० लेख), प्राचीन भारतीय इतिहास (१० लेख), मराठी साहित्य (१५० लेख), संस्कृत साहित्य (१५ लेख) व ग्रंथ-परीक्षणे (३ लेख), असे राजवाड्यांनी हाताळलेल्या विषयांचे वर्गीकरण करता येईल.[३१] 'हदगा ऊर्फ भोंडला', 'गणपतींची आरती' यांसारख्या लोकसाहित्याशी संबंधित विषयापासून ते इतिहासशास्त्राची तत्त्वे, ज्ञानेश्वरीचा भाषाशास्त्रीय अभ्यास, महाराष्ट्रीय संतांचे तत्त्वज्ञान यांसारख्या अत्यंत गहन विषयांत त्यांच्या प्रखर बुद्धीने लीलया अवगाहन केले. कोणताही विषय, जर तो इतिहास-संशोधनाच्या दृष्टीने उपयुक्त असेल, त्यांना वर्ज्य नव्हता. आज सांस्कृतिक इतिहासाचे साधन म्हणून लोकसाहित्याचा मोठा आदर केला जातो, पण या लोकसाहित्याचे इतिहासक्षेत्रातील महत्त्व राजवाड्यांनी सत्तर ऐंशी वर्षांपूर्वीच ओळखले होते.

राजवाडे हे केवळ इतिहाससंशोधक व इतिहास लेखक नव्हते तर सामाजिक, राजकीय व तत्त्वदर्शी प्रतिभासंपन्न विचारवंत होते, केवळ ऐतिहासिक घटना सांगून किंवा त्यांचे विवेचन करून संतुष्ट होणाऱ्यांपैकी ते नव्हते. ज्या विषयाचा ते अभ्यास करीत त्यात खोलवर बुडी मारून त्यामागील राजकीय, सामाजिक, धार्मिक वा सांस्कृतिक तत्त्वांचा उलगडा करण्याचा ते प्रयत्न करीत. मराठ्यांच्या इतिहासाचे विवेचन करताना ते महाराष्ट्रधर्माचे तत्त्व सांगतात तर 'राधामाधवविलासचंपू'त चातुर्वर्ण्यामागील सामाजिक तत्त्वज्ञानाची उकल करण्याचा ते प्रयत्न करतात. 'महिकावतीच्या बखरी'त तर एखाद्या

कम्युनिस्टाला शोभेल असे निरीश्वरवादी भौतिक तत्त्वज्ञान सांगण्याचा राजवाड्यांनी प्रयत्न केलेला आहे. राजवाड्यांचे सर्व सिद्धान्त पटणारे असतात असे नाही. पण त्यांच्या सिद्धान्ताचा मोठेपणा अचूकपणावर नसून ते सिद्धान्त इतरांच्या विचारांना चालना व दिशा देतात यात व त्यांच्यामागील मूलगामी चिंतनात आहे.

राजवाड्यांच्या इतिहासलेखन-पद्धतीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी ऐतिहासिक विषयांवरील आपले सिद्धान्त मांडताना भाषाशास्त्र, व्युत्पत्तिशास्त्र व व्याकरण या विषयांतील त्यांच्या ज्ञानाचा भरपूर उपयोग करून घेतला. 'महाराष्ट्राच्या वसाहतीचा काल,' 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' आणि 'राधामाधवविलासचंपू' या ग्रंथाची प्रस्तावना ही याची उदाहरणे आहेत. मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड ८ मध्ये भाषाशास्त्र व व्याकरण यांचा उपयोग करून मराठी व फार्सी या भाषांच्या एकमेकांवर झालेल्या परिणामांची त्यांनी सविस्तर चर्चा केलेली आहे.

राजवाड्यांनी इतिहासलेखनप्रक्रियेच्या तीन पायऱ्या किंवा अवस्था सांगितलेल्या आहेत. पहिली पायरी म्हणजे एखाद्या ऐतिहासिक कागदावर अगर कागदपत्रांवर टिपणे लिहिणे. दुसऱ्या पायरीवर इतिहासलेखक एक पाऊल पुढे टाकतो. त्या पायरीवर असताना तो अनेक कागदपत्रांवर मिळून लेख लिहू लागतो. तो जेव्हा तिसरी पायरी चढतो तेव्हा त्याचा संशोधनाचा स्तर आणखी उंचावतो. मग तो एखादी संस्था, देश, समाज वा धर्म यांच्यासंबंधी विविध अंगांनी विवेचनात्मक इतिहास लिहू लागतो. राजवाड्यांच्या मते ही तिसरी पायरी चढणे ही अत्यंत अवघड गोष्ट आहे. कारण अशा प्रकारचा इतिहास लिहिण्यास इतिहासाखेरीज अनेक विषयांचे सखोल ज्ञान, इतिहास-संशोधनाच्या विविध शाखांत प्रावीण्य, जगाच्या इतिहासाचा व्यासंग, सूक्ष्म चिंतन व प्रतिभेची भरारी यांची आवश्यकता असते.[२२] अनुक्रमाने जरी नसले, तरी हे सर्व टप्पे किंवा या पायऱ्या राजवाड्यांच्या लिखाणात दृग्गोचर होतात. सुरुवातीला राजवाडे भारत इतिहास संशोधक मंडळाची इतिवृत्ते, संमेलनवृत्ते व अहवाल यांतून ऐतिहासिक कागदपत्रे, शिलालेख, ताम्रपट इत्यादी साधनांवर छोटी मोठी टिपणे नियमितपणे लिहीत असत. पुढे विविध मासिकांतून व नियतकालिकांतून ते लेख लिहू लागले. ही त्यांनी सांगितल्याप्रमाणे संशोधनाची दुसरी पायरी होय. तिसऱ्या पायरीवर असताना त्यांनी अनेक ऐतिहासिक ग्रंथांना विद्वत्ताप्रचुर प्रस्तावना लिहिल्या. या प्रस्तावना म्हणजे दुसरे तिसरे काही नसून मराठ्यांचा व त्यांच्या संस्कृतीचा विश्लेषणात्मक व विवेचक इतिहासच होय. राजवाड्यांनी संशोधनाच्या तीन पायऱ्या सांगितल्या, पण चौथी व अखेरची महत्त्वाची पायरी सांगायला ते विसरले. जगातील सर्व मानवजातींचा व देशांचा विवेचनात्मक इतिहास लक्षात घेऊन इतिहासाचे सार किंवा तत्त्वज्ञान सांगणे ही इतिहास-संशोधनाची चौथी पायरी होय. विख्यात इतिहासकार अरनॉल्ड टॉइन्बी याने ही

अखेरची पायरी गाठली होती.

राजवाड्यांच्या दृष्टीने इतिहासलेखनाच्या तीन सर्वमान्य पद्धती आहेत— कालानुक्रमिक (Chronological), दैशिक व कौलिक. पहिल्या पद्धतीत कालखंड पाहून (उदा. दर शंभर वर्षांचा) कालानुक्रमे ऐतिहासिक घटनांचे वर्णन केले जाते. दुसऱ्या पद्धतीत निरनिराळे देश वा भौगोलिक प्रदेश हा घटक धरून त्यानुसार इतिहास लिहिले जातात. उदा. भारताचा इतिहास, इंग्लंडचा इतिहास, बंगालचा इतिहास. तिसऱ्या पद्धतीत अखिल मानवजात हा एक घटक धरून त्यानुसार तिचा इतिहास विविधांगांनी लिहिला जातो. भारताच्या व जगाच्या इतिहासाकडे पाहिल्यास विविध मानवसमूहांनी किंवा संघांनी निरनिराळ्या काळी निरनिराळ्या भागांत निरनिराळ्या संस्कृती निर्माण केल्याचे दिसून येते. इतिहास हा केवळ कालाचा, प्रदेशाचा किंवा देशाचा असू शकत नाही, तो सबंध मानवजातीचा असतो, अशी राजवाड्यांची धारणा होती. म्हणूनच, विविध मानववंशांचा किंवा संघांचा इतिहास कालानुक्रमे सुसंगतपणे विविधांगांनी लिहिणे ही इतिहासलेखनाची सर्वोत्कृष्ट पद्धती होय, असे राजवाड्यांचे आग्रहाचे प्रतिपादन होते.[२३] राजवाडे आधुनिक जगाची दानव, मुघल, आर्य, आफ्रिकन, अमेरिकन, असुर व पोलिनेशियन या सात मानववंशांत किंवा मानवसंघांत विभागणी करतात. या मानववंशाचे ते पुन्हा राष्ट्र, लोक, जात, व्यक्ती इत्यादी पोटविभाग पाडतात. जर कौलिक किंवा मानवी संस्कृतींचा इतिहास या पोटविभागांना अनुसरून लिहिला तर तो पद्धतशीर व समाधानकारकपणे लिहिला जाईल असे राजवाड्यांना वाटत होते. कौलिक इतिहासाची राजवाड्यांच्या मते दोन अंगे असतात—एक बहिरंग म्हणजे भौतिक बाजू व दुसरे अंतरंग म्हणजे आत्मिक बाजू. बहिरंगात धर्म, नीती, शिक्षण, राजनीती, अर्थशास्त्र इत्यादी अनेक विषयांच्या अभ्यासाचा समावेश होतो, तर अंतरंगात या सर्व विषयांच्या अभिव्यक्तीमागील कारणमीमांसेचा वेध घेतला जातो.[२४]

राजवाडे यांच्या इतिहासलेखनपद्धतीत दैशिक व कौलिक अशा दोन्ही पद्धतींचे मिश्रण आढळते. आपल्या अनेक लेखांतून व प्रस्तावनांतून ते जेव्हा मराठ्यांच्या इतिहासाची चर्चा करतात तेव्हा ते दैशिक पद्धतीचा वापर करतात. परंतु मराठ्यांच्या इतिहासाची चर्चा करीत असताना मध्येच ते मराठ्यांचे पूर्वज, वैदिक आर्यांचे मूल वसतिस्थान, चातुर्वर्ण्य पद्धतीचा उगम व विकास इत्यादी समस्यांची उकल करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा ते कौलिक पद्धतीचा अवलंब करतात. त्यांनी आपल्या अनेक संशोधकीय लेखांतून कौलिक लेखनपद्धतीचाच आधार घेतलेला आढळून येतो. उदा. 'कोकण व नागलोक', 'वारली,' 'देवरुखे यांची मूलोत्पत्ति', 'गोत्र ऊर्फ कुलनाम', 'चांद्रसेनीय कायस्थ', 'पाठारे ऊर्फ पाताणे', 'हिंदुस्थानातील आर्य लोकांचा वर्ण', 'भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास' वगैरे लेख. 'राधामाधवविलासचंपू'च्या प्रस्तावनेत

रट्ट, महारट्ट, नाग यांच्याविषयी त्यांनी केलेली चर्चा किंवा महिकावतीच्या बखरीत त्यांनी मांगेले, तांडेले, दुबळे, धेड, वारली, कोळी, कातवडी, ठक्कर इत्यादी जमातींची दिलेली माहिती म्हणजे कौलिक पद्धतीने महाराष्ट्राचा इतिहास लिहिण्याचाच प्रयत्न होय. या पद्धतीस अनुसरून त्यांनी चित्पावन व कऱ्हाडे ब्राह्मणांवरही लेख लिहिलेले आहेत.

राजवाड्यांनी बहिरंगी व अंतरंगी अशा दोन्ही पद्धतींनी मराठ्यांचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे. मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड १, ३, ५, ६, ८, ११, १५, १६, १७, १८ व २० मध्ये तसेच अनेक लेखांत त्यांनी मराठ्यांच्या इतिहासाच्या राजकीय, लष्करी व राज्यकारभारविषयक अंगांचा म्हणजे त्या इतिहासाच्या बहिरंगाचा विचार केलेला आहे. याउलट म. इ. साधने खंड १ व ४ मध्ये मराठ्यांच्या इतिहासामागील मुख्य प्रेरणा ' महाराष्ट्रधर्मा 'ची होती असे सांगून ते जेव्हा ' महाराष्ट्रधर्मा 'चा ऊहापोह करू लागतात तेव्हा मराठ्यांच्या इतिहासाच्या अंतरंगाची उकल करण्याचा त्यांचा हेतू असतो.[२५] त्याचप्रमाणे ' राधामाधवविलासचंपू 'च्या प्रस्तावनेत, प्रथम वैदिक आर्यांच्या भौतिक क्षेत्रांतील कामगिरीचे वर्णन करून झाल्यावर, ही सर्व भौतिक प्रगती आर्यांच्या चातुर्वर्ण्य समाजरचनेची बाह्य अभिव्यक्ती होती असे सांगून सनातन धर्म व चातुर्वर्ण्यपद्धती यांनी आर्य समाजाचे आतील व बाहेरील अशा दोन्ही प्रकारच्या संकटांपासून कसे रक्षण केले याचे स्पष्टीकरण ते देतात.

सुमारे पाऊणशे वर्षांपूर्वी राजवाड्यांनी इतिहासलेखनाची सर्वश्रेष्ठ पद्धती म्हणून कौलिक पद्धतीचा पुरस्कार केला. परंतु समाजशास्त्र, पुरातत्त्व, मानववंशशास्त्र व भाषाशास्त्र यांसारख्या शास्त्रांची झपाट्याने वाढ होऊनही आजच्या काळात राजवाड्यांनी सांगितलेली कौलिक पद्धतच इतिहासलेखनासाठी आदर्श व शास्त्रीय मानली जात आहे ही गोष्ट राजवाड्यांना भूषणावह नाही काय ? जेम्स हॉर्वे, रॉबिन्सन यांच्यासारखे आधुनिक इतिहासकार म्हणतात, " History deals with all aspects of everything that man has ever done or thought or hoped or felt. "[२६]

अरनॉल्ड टॉइन्बी यांनी इतिहास लिहिण्यासाठी जी पद्धती वापरलेली आहे तीमुळे राजवाड्यांच्या इतिहात व इतिहास-लेखनपद्धतिविषयक विचारांना भक्कम पाठबळ मिळालेले आहे. टॉइन्बी यांनी ' A Study of History ' ही ग्रंथमाला लिहिताना कालानुक्रमिक किंवा दैशिक पद्धती वापरलेली नाही. निरनिराळ्या मानववंशाच्या कामगिरीनुसार त्यांनी जगातील मानवी संस्कृतीचे एकवीस गट पाडलेले आहेत. या गटांपैकी आजच्या काळात फक्त पाच-सहाच अस्तित्वात असून बाकीचे सर्व नामशेष झालेले आहेत. टॉइन्बीने आपल्या ग्रंथमालेत जगाच्या इतिहासावर बरावाईट ठसा उमट-

विणाऱ्या मानवी संस्कृतीचा उदय, विकास व अस्त यांची तपशिलाने चर्चा केलेली आहे. ही चर्चा करीत असताना, त्याने राजवाड्यांनी सांगितलेल्या भौतिक व आत्मिक अशा मानवी संस्कृतींच्या दोन्ही अंगांकडे लक्ष पुरविले आहे. टॉइन्बी इतिहासलेखनपद्धतीबद्दल म्हणतो, " The intelligible unit of historical study is neither a nation nor mankind as a whole but a certain grouping of humanity which we have called a Society. "[२७]

राजवाड्यांनी दैशिक व कालानुक्रमिक पद्धतीच्या इतिहासांना कमी लेखले असले तरी त्या इतिहासांना काहीच महत्त्व नाही असे समजण्याचे कारण नाही. अशा प्रकारचे इतिहास जर लिहिले गेले नसते तर टॉइन्बी, विल ड्युरंट यांना आपले इतिहास लिहिणे शक्य झाले असते का ? अशा प्रकारचे इतिहास लिहिले गेले म्हणूनच टॉइन्बीला सबंध जगाची एकवीस मानवी संस्कृतींत किंवा मानववंशांत विभागणी करता आली. यावरून कालानुक्रमिक व दैशिक इतिहास हे कौलिक इतिहासलेखनपद्धतीपूर्वीचे सुरुवातीचे टप्पे होत असे म्हणावयास प्रत्यवाय नाही.

राजवाड्यांच्या इतिहाससंशोधनपद्धतीचा साकल्याने विचार केला तर तिच्यात काही त्रुटी व उणिवा आढळतील. राजवाड्यांनी युरोपच्या इतिहासावरील अनेक उत्कृष्ट इंग्रजी पुस्तके वाचलेली होती. पण आश्चर्याची गोष्ट म्हणजे, ही पुस्तके वाचूनही राजवाड्यांना भूगोल व नकाशाशास्त्र यांचे महत्त्व पाहिजे तेवढे लक्षात आले नाही. मानवी जीवनाच्या जडणीघडणीत भौगोलिक परिस्थितीचा मोठा वाटा असतो. तसेच नकाशाशास्त्राची मदत घेतल्याशिवाय इतिहास-संशोधक आपल्या क्षेत्रात मुळीच प्रगती करू शकणार नाही. राजवाड्यांनी भूगोलाचे व नकाशाशास्त्राचे महत्त्व आपल्या संशोधनपद्धतीत कोठेही सांगितलेले नाही. तसेच त्यांच्या लिखाणात भौगोलिक तपशील नकाशांचा उपयोग यांची उणीव प्रकर्षाने जाणवते. खरे म्हणजे आपल्या समाजशास्त्रीय व मानववंशशास्त्रीय लिखाणात त्यांनी राजकीय भूगोल व त्याचा मानवी जीवनावर होणारा बरावाईट परिणाम या गोष्टीकडे बारकाईने लक्ष द्यावयास हवे होते. परंतु तसे दिसून येत नाही.

राजवाड्यांच्या संशोधनपद्धतीतील आणखी एक उणीव म्हणजे, ती पद्धत ऐतिहासिक पुरावे वैयक्तिकरीत्या गोळा करण्यावर (Subjective Method) अवलंबून होती. राजवाडे जेव्हा महाराष्ट्रातील गावोगावी संशोधन मोहिमांसाठी हिंडले तेव्हा ठिकठिकाणच्या स्थानिक लोकांकडून अनेक प्रकारची तोंडी माहिती मिळवून आपल्या ज्ञानात भर टाकली. परंतु आधुनिक इतिहासकार, समाजशास्त्रज्ञ व अर्थशास्त्रज्ञ विविध ठिकाणी आकडेवारी गोळा करण्यासाठी जो पाहणी करतात (Statistical Surveys) ती आकडेवारी गोळा करण्याची संख्याशास्त्रीय पद्धती (Statistical Method)

तसेच ऐतिहासिक कागदपत्रांचा संख्याशास्त्रीय व गणिती दृष्टिकोणातून अभ्यास करण्याची वस्तुनिष्ठ (Objective Method) राजवाड्यांना ठाऊक नव्हती. त्यामुळे राजवाडे कित्येकदा आपल्या लिखाणात तोल सोडून भरकटत जातात. त्यांच्यासारख्य थोर व प्रतिभाशाली इतिहासकाराला ही गोष्ट साजेशी नव्हती.

इतिहासकार हा सर्व प्रकारचे पूर्वग्रह, अभिनिवेश व अभिमान यांच्यापासून पूर्णपणे अलिप्त असला पाहिजे असे राजवाडे यांनी वारंवार बजावून सांगितले आहे. पण स्वतः राजवाडे अशा पूर्वग्रहांपासून व अभिमानापासून मुक्त नव्हते. प्राचीन भारतातील आर्य लोक हे जगातील सर्व मानववंशांत श्रेष्ठ व शुद्ध होते; आर्यांची चातुर्वर्ण्य पद्धती ही सर्वश्रेष्ठ समाजरचना होय; चातुर्वर्ण्य समाजरचनेत ब्राह्मण हे सर्वांत श्रेष्ठ व सर्व ब्राह्मणांत चित्पावन हे अधिक हुषार व बुद्धिमान होत, यासारखे अहगंड राजवाड्यांच्या विचारात होते. त्यामुळे पुष्कळ वेळा त्यांचे लिखाण या गंडांनी दूषित झालेले आहे. उदा. पानिपत युद्धाच्या अपयशाची मीमांसा करताना त्यांनी गोविंदपंत बुंदेल्याच्या ठिकाणी कऱ्हाड्यांचा ' गोडबोलेपणा व साखरपेरेपणा ' होता असे सांगून अपयशाचे सर्व खापर त्याच्या डोक्यावर फोडले आहे.[२८] गोविंदपंत कऱ्हाडा असल्यामुळेच राजवाडे त्याच्यावर घसरले की काय अशी शंका येण्याइतपत कडवट टीका त्यांनी बुंदेल्यावर केलेली आहे. आपल्या अनेक समकालीनांप्रमाणे राजवाडे हेही कट्टर देशभक्त होते. देशभक्ती ही केव्हाही चांगलीच गोष्ट आहे. पण इतिहाससंशोधकाच्या सत्यान्वेषणात तिचा अडसर होता कामा नये. राजवाडे कित्येकदा या देशभक्तीच्या आहारी जाऊन युरोपियन संस्कृती ही प्राचीन आर्य संस्कृतीपेक्षा किती हीन दर्जाची होती हे सिद्ध करण्याचा व्यर्थ खटाटोप करताना दिसतात. त्या दृष्टीने मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड १ व ६ च्या प्रस्तावना वाचण्यासारख्या आहेत. काही आधुनिक इंग्रज इतिहासलेखकांनी आपल्या ग्रंथात, प्राचीन भारतीय संस्कृती युरोपियन संस्कृतीपेक्षा कमी दर्जाची होती असे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे; त्याची तीव्र प्रतिक्रिया म्हणून राजवाडे युरोपियन संस्कृतीवर घसरले ! एकाने गाय मारली म्हणून दुसऱ्याने वासरू मारण्यासारखाच हा प्रकार झाला.

राजवाड्यांच्या लिखाणाची जर जदुनाथ सरकार, गो. स. सरदेसाई, वासुदेवशास्त्री खरे व दत्तोपंत आपटे यांच्यासारख्या संशोधकांच्या लिखाणाशी तुलना केली तर इतिहासाचार्यांच्या लेखनपद्धतीतील काही दोष अधिक स्पष्ट होतात. खरे पाहिले तर प्रतिभा, कल्पनाशक्ती, विषयाचे मूलगामी विवेचन, अनेक विषयांचा व्यासंग या बाबींचा विचार केल्यास राजवाडे हे त्यांच्या सर्व समकालीन इतिहाससंशोधकांपेक्षा उंच होते. पण काही बाबतीत मात्र वर उल्लेखिलेले चार इतिहाससंशोधक त्यांच्यापेक्षा सरस होते. सरकार, सरदेसाई, खरे, आपटे यांच्या लिखाणात कोठेही राजवाड्यांसारखी प्रतिभेची झळाली

आढळून येत नाही हे खरे, पण त्यांचे लिखाण राजवाड्यांपेक्षा अधिक पद्धतशीर, समतोल व मुद्देसूद आहे. तसेच ऐतिहासिक पुरावे देण्याच्या बाबतीत ते राजवाड्यांपेक्षा अधिक पक्के आहेत. ज्या राजवाड्यांनी महाराष्ट्राला शास्त्रशुद्ध ऐतिहासिक पद्धती म्हणजे काय हे शिकविले, त्यांच्या लिखाणात पद्धतशीरपणा, नेटकेपणा व आटोपशीरपणा आढळत नाही हा एक दैवदुर्विलासच होय. पुनरुक्तीचा दोष तर राजवाड्यांच्या लिखाणात वारंवार आढळून येतो. अनेक वेळा मूळ विषय सोडून ते भरकटत जातात व अनावश्यक विषयांची चर्चा करण्यात गुरफटून पडतात. क्वचित् त्यांनी परस्परविरोधी निष्कर्षही काढलेले आहेत. जे राजवाडे मराठी संतांना एके ठिकाणी 'संस्कृतिरक्षक' म्हणून त्यांची भलावण करतात तेच राजवाडे दुसऱ्या ठिकाणी त्यांना 'टाळकुटे संताळे' असे म्हणून समाजाच्या दृष्टीने 'पंगू' ठरवून मोकळे होतात.[२९]

राजवाड्यांच्या लिखाणात वस्तुनिष्ठ पद्धतीचा अभाव असल्याने बेफाम विधाने करण्याची त्यांना सवय जडलेली होती. याची काही उदाहरणे देता येतील. समर्थ रामदास हे राजवाड्यांचे लाडके दैवत. त्यांच्यावर त्यांनी बऱ्याच वर्षांपूर्वी एक छोटीशी पुस्तिका प्रकाशित केली.[३०] समर्थांच्या 'दासबोधा'तील काही मोजक्या श्लोकांच्या आधारे या पुस्तिकेत त्यांनी असे सिद्ध करण्याचा खटाटोप केला की रामदासस्वामींना इतिहासाचे तत्त्वज्ञान उत्तम तऱ्हेने अवगत होते व त्या बाबतीत ते हेगेलच्याही वरच्या पायरीवर होते! रामदास अध्यात्मशास्त्रात हेगेलच्या वरच्या पायरीवर होते म्हणणे समजू शकते, पण त्यांच्या 'दासबोधा'चा व इतिहासशास्त्राचा थोडा तरी संबंध आहे काय?

'राधामाधवविलासचंपू'च्या प्रस्तावनेत राजवाड्यांनी शिवाजीचे वडील शहाजी याला त्याच्या योग्यतेपेक्षा अधिक वरच्या पदावर चढविले आहे. शहाजीला विजापूर दरबारी कितीही मान असला तरी तो अखेर आदिलशहाचा सेवक होता. पण जयराम पिण्ड्ये याच्या काव्यमय अतिशयोक्तिपूर्ण वर्णनावर विसंबून त्यांनी वैभव व पराक्रम या बाबतीत उत्तरेत शहाजहान तर दक्षिणेत शहाजी असे म्हणून दोघांनाही समान पातळीवर आणून बसविले आहे! याच प्रस्तावनेत पुढे अगदी तुटपुंज्या पुराव्याच्या आधारे शहाजी हा स्वराज्याचा खरा संस्थापक होता असा निष्कर्ष काढून शिवाजीचे श्रेय शहाजीच्या पदरात टाकले आहे.[३१] वास्तविक इ. १६४९ नंतर शहाजी कर्नाटकात गेल्यावर किंवा त्यापूर्वी त्याने शिवाजीला स्वराज्यस्थापनेत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मदत केल्याचा काडीमात्र पुरावा उपलब्ध झालेला नाही.

'महिकावतीच्या बखरी'च्या प्रस्तावनेत शिवाजीमहाराजांचा आग्र्याला औरंगजेबाच्या भेटीला जाण्याचा कोणता हेतू होता याची विस्ताराने चर्चा केली आहे. ती करताना, आग्र्याच्या दरबारात औरंगजेबाच्या अंगावर उडी घेऊन अफझलखानाप्रमाणे त्याला ठार करून चगत्याच्या पातशाहीला राम बोलो म्हणायला लावण्याचा महाराजांचा

उद्देश होता असे राजवाड्यांनी म्हटले आहे.[३२] इतके हास्यास्पद विधान इतिहासाचार्यांनी केले म्हणूनच ते खपवून घेतले गेले. दुसऱ्या एखाद्या संशोधकाने अशा तऱ्हेचे स्पष्टीकरण दिले असते तर त्याची हुर्यो झाली असती.

मराठ्यांच्या इतिहासाची साधने, खंड ६ च्या प्रस्तावनेत राजवाडे यांनी इतिहासाची व्याख्या व व्याप्ती यांची प्रदीर्घ चर्चा केलेली आहे. ती करीत असताना इंग्रजी इतिहासकार फ्रीमन याच्या History is Past Politics and Politics is Present History ' या व्याख्येवर टीका करून, युरोपियन इतिहासकारांपेक्षा प्राचीन भारतीय तत्त्वज्ञांची इतिहासाची व्याख्या किती अचूक आहे हे दाखविण्याचा राजवाड्यांनी प्रयत्न केलेला आहे.[३३] फ्रीमनने केलेली इतिहासाची व्याख्या दोषपूर्ण व अपुरी आहे हे राजवाड्यांचे म्हणणे मुळीच चूक नाही. पण त्याची व्याख्या ही काही सर्व युरोपियन इतिहासकारांनी केलेली इतिहासाची प्रातिनिधिक व्याख्या नव्हे. युरोपात इतिहासशास्त्राची प्रगती भारतापेक्षा इतक्या मोठ्या प्रमाणावर झालेली होती की इतिहासाची व्याख्या अनेक युरोपियन इतिहासकारांनी अनेक प्रकारे केली. फ्रीमनच्या व्याख्येवर टीका करणारे अनेकजण निघाले व त्यांनी ती नाकारून इतिहासाच्या दुसऱ्या व्याख्या सुचविल्या. राजवाड्यांनी इतिहासाची जी अत्यंत व्यापक अशी व्याख्या दिली तितकीच व्यापक व्याख्या युरोपात रांके व इतर अनेक इतिहासकारांनी दिलेली आहे. हा सर्व इतिहास माहीत असता केवळ फ्रीमनची इतिहाससंबंधीची व्याख्या घेऊन राजवाडे सर्व युरोपियन इतिहासलेखकांवर घसरतात व प्राचीन भारताचा मोठेपणा सिद्ध करण्याची खटपट करतात याला काय म्हणावे ?

शेवटी एक गोष्ट मात्र खरी. राजवाड्यांच्या संशोधन व लेखनपद्धतीतून वर उल्लेखिलेले दोष काढून टाकले तर खाली उरते ते मात्र निखळ ज्ञान व विविध विषयांवरील अस्सल व मूळ संशोधनाचा साठा. त्याबाबतीत यासम हाच, दुसरा कोणी नाही, असे म्हणावे लागते. आधुनिक महाराष्ट्रातील इतिहासशास्त्राचे व शास्त्रीय इतिहाससंशोधनपद्धतीचे ते जनक होत. त्यांच्या या कार्याची तुलना युरोपातील लिओपोल्ड रांके (इ. १७९५–१८८६) याच्याशीच करता येईल. रांकेचा उदय होण्यापूर्वी युरोपातील इतिहाससंशोधकांना व लेखकांना शास्त्रीय पद्धतीच्या इतिहाससंशोधनाची जाणीव नव्हती. समकालीन अस्सल विश्वसनीय साधनांचे महत्त्व त्यांना ठाऊक नव्हते. त्यांचे इतिहासलेखन दुय्यम व तिय्यम दर्जाच्या साधनांवर आधारलेले असे. समकालीन पहिल्या दर्जाची साधने गोळा करून त्यांच्या आधारावर लिहिलेला इतिहासच खरा हे राजवाड्यांप्रमाणे ठणकावून सांगणारा रांके हाच पहिला युरोपियन इतिहासकार होता. राजवाड्यांप्रमाणेच रांकेने आपल्या काळातील संशोधकांना साधनांचे शास्त्रीय परीक्षण करून त्यांचे निरनिराळ्या दर्जांमध्ये वर्गीकरण कसे करावे हे शिकविले. तसेच इतिहास-

संशोधनात कालानुक्रम, भूगोल, शिलालेख, नाणकशास्त्र, भाषाशास्त्र, पॅलिओग्राफी, लॅक्झिकोग्राफी, समाजशास्त्र, राजनीती, अर्थशास्त्र यांचे महत्त्व किती आहे ते युरोपियन संशोधकांना पटवून दिले. साधनांच्या परीक्षणासाठी रांकेने अंतरंग बहिरंग परीक्षणपद्धतींचा पुरस्कार केला तर इतिहासलेखनासाठी त्याने भौतिक व आत्मिक अशा दोन्ही पद्धतींची सांगड घातली. राजवाड्यांनी पुण्यात भारत इतिहास संशोधक मंडळ ही संस्था स्थापली, त्याप्रमाणे रांकेने तरुण इतिहाससंशोधकांना इतिहाससंशोधनाचे शिक्षण देणारी एक संशोधन संस्था काढली. राजवाड्यांच्या कार्यामुळे ज्याप्रमाणे महाराष्ट्रात राजवाडे परंपरा निर्माण होऊन इतिहाससंशोधनाला प्रचंड गती मिळाली, तशीच गोष्ट युरोपात रांकेमुळे घडून आली. अशा तऱ्हेने राजवाडे व रांके या वेगळ्या देशातील व काळातील दोन इतिहाससंशोधकांत विलक्षण साम्य आहे. म्हणूनच राजवाड्यांना 'महाराष्ट्राचा रांके' असे म्हटल्यास ते सर्वार्थाने त्यांना शोभून दिसेल.

संदर्भ :

१. वि. का. राजवाडे, **ऐतिहासिक प्रस्तावना** (राजवाडे लेखसंग्रह, खंड १), (पुणे, १९२८), मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड ६ ची प्रस्तावना, पृ. ३०५–३०८, ३२३–२४ [ऐ. प्र.]

२. **उपरोक्त**, पृ. ६–८, २९७–९८, ३६६–६७, ४६०–६२; ऐतिहासिक विविध विषय, खंड १, (इतिहास आणि ऐतिहासिक माला, भाग १), (धुळे, १९१८) पृ. १–२९ [ऐ. वि. वि.]

३. **ऐ. वि. वि.**, खंड १, पृ. २५–२९; **ऐ. प्र.**, पृ. ६, ४५७, ४६१.

४. **ऐ. प्र.**, (म. इ. साधने, खंड १, प्रस्तावना), पृ. ६–७.

५. Jadunath Sarkar, **House of Shivaji**, 2nd ed., (Calcutta, 1948,), P. 263.

६. **उपरोक्त**, पृ. २६२.

७. प्र. न. जोशी, **राजवाडे विचारदर्शन** (पुणे, १९६५), पृ. ३८–३९.

८. **ऐ. वि. वि.**, खं. १, पृ. २५–२६.

९-१०. **ऐ. प्र.** (म. इ. सा., खंड ४, प्रस्तावना), पृ. २४१–४२, पृ. २९४–९८.

११. **उपरोक्त**, पृ. २९७–९८.

१२. **ऐ. प्र.** (म. इ. सा., खंड ६, प्रस्तावना), पृ. ३३९–४०.

१३. वि. का. राजवाडे (संपा.), जयराम पिंड्येकृत **राधामाधवविलासचंपू** (पुणे, १९२२), प्रस्तावना, पृ. १४०–४१ [राधा.]

१४. वि. का. राजवाडे, **राजवाडे लेखसंग्रह**, खंड ३ (पुणे, १९३५), पृ. ८४–११६.

१५. **ऐ. प्र.** (म. इ. सा., खंड ८ प्रस्तावना), पृ. ३६८–७१.

१६. **उपरोक्त**, पृ. ३७३.

१७. खं. चिं. मेहेंदळे (संपा.), **भा. इ. सं. मंडळ अहवाल**, शके १८३२, पृ. ६०–६९.

१८. **ऐ. प्र.** (म. इ. सा., खंड ११ प्रस्तावना), पृ. ४६१.

१९. **उपरोक्त**, पृ. १०१, १७३, ३६९.

२०. **ऐ. वि. वि.**, खंड १, पृ. ८३–८४.

२१. राजवाडे संशोधन मंडळ प्रकाशित '**संशोधक**' (त्रैमासिक), वर्ष २१. अंक १–४, मार्च व जून १९५२, पृ. ३८-४३.

२२. **ऐ. वि. वि.**, खंड १, पृ. २६–२८.

२३. **ऐ. प्र.** (म. इ. सा., खंड ६, प्रस्तावना), पृ. ३२०–२६

२४. **उपरोक्त**, (म. इ. सा., खंड १, प्रस्तावना), पृ. २६–२८.

२५. **उपरोक्त**, पृ. २६–९८, २८३–८८

२६. भा. वा. भट, **राजवाडे यांचे चरित्र** (धुळे, १९४६), पृ. ३४१

२७. Arnold Toynbee, **A Study of History** (Abridgement of Vols 1–6 by D. C. Somerwell), 1947, P. 11

२८. **ऐ. प्र.** (म. इ. सा, खंड १, प्रस्तावना), पृ. ६६–८६

२९. शं. दा. पेंडसे, **महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास**, ४ थी आवृत्ती, (नागपूर १९६५), पृ. १७१–७२; **ऐ. प्र.** (म. इ. सा., खंड ४, प्रस्तावना), पृ. २८५–८६.

३०. **इतिहासाचार्य राजवाडे यांचा श्रीसमर्थ रामदास यांचेवरील निबंध**, प्रकाशक वि. शं. वैद्य, १९२६.

३१. **राधा.**, प्रस्तावना, पृ. १०२–१०३.

३२. वि. का. राजवाडे (संग.), **केशवाचार्यादिकृत महिकावतीची ऊर्फ माहीमची बखर** (पुणे, १९२४), प्रस्तावना, पृ. ९५.

३३. **ऐ. प्र.** (म. इ. सा., खंड ६, प्रस्तावना), पृ. ३०६–३०८.

कीर्तनाचे सादरीकरण

प्रा. डॉ. यशवंत पाठक
कुलकर्णी ब्लॉक, भगतसिंग मैदान मनमाड (जि. नासिक)

कीर्तन हा नेटका प्रयोग आहे. तो जाणीवनेणिवेच्या पातळीवर वावरणारा आहे. याला मौखिक परंपरा आहे. शेकडो वर्षांचा इतिहास आहे. शुकाचार्यांना व्यासांनी संकीर्तन करण्याचा उपदेश श्रीमद्भागवतात केला आहे. यास ' नारदीय संप्रदाय ' म्हणतात. याला प्रमाण खुद्द नारदांचेच आहे —

ब्रह्मदत्तामिमां वीणां स्वरब्रह्मविभूषिताम् ।
मूर्च्छयित्वा हरिकथा गायमानश्चराम्यहम् ॥

नारदांनी व्यासांना भगवत्कथागायनाचा उपदेश केला नि तोच उपदेश व्यासांनी आपल्या पुत्राला (शुकाचार्यांना) केला. तेव्हापासून कीर्तन ही नवविधा भक्तीत द्वितीय क्रमांकाची भक्ती झाली. शुकाचार्य कीर्तनभक्तीत प्रसिद्ध झाले.

कीर्तनात (१) नारदीय (२) वारकरी (३) रामदासी हे तीन प्रमुख संप्रदाय येतात. याशिवाय (४) गाणपत्य (५) शाक्त हेही संप्रदाय येतात. पण ते सध्या दुर्मिळ झाले आहेत. महाराष्ट्रात आज नारदीय व वारकरी या दोन कीर्तनपरंपरा आहेत.

कीर्तनप्रयोगाच्या सादरीकरणात प्रामुख्याने पुढील घटकांचा समावेश करता येईल.

(१) वाद्ये (२) वादक (साथीदार-संगतकार) (३) श्रोतृवर्ग (४) प्रतिकृती (५) सत्कृती (६) स्थळ (७) काळ (८) सादरकर्ता

या सर्वांमिळून कीर्तनप्रयोग होतो.

क्रमाक्रमाने या घटकांचा नेमक्या वैशिष्ट्यांसह थोडक्यात विचार करू.

१. **वाद्ये :** यात वीणा, पखवाज, टाळ यांचा पूर्वीच्या कीर्तनप्रयोगात समावेश होता. वारकरी कीर्तनात वीणा, पखवाज, टाळ हीच वाद्ये असतात. पूर्वी नारदीय

कीर्तनात हीच वाद्ये होती. कालांतराने हार्मोनियमचा समावेश नारदीय कीर्तनात झाला. वीणेऐवजी तंबोरा आला. पखवाज जाऊन तबला आला. काहींच्या कीर्तनात हातपेटी आली; तर काहींच्या कीर्तनात ऑर्गन आला. सोबत व्हायोलीन, बासरी, सनई यांचा समावेश झाला. या वाद्यांच्या समावेशनाबरोबर कीर्तनप्रयोगात विविध पातळयाही आल्या. वारकरी कीर्तनाने कोणतेही आधुनिक वाद्य सादरीकरणात वापरले नाही. नारदीय कीर्तनाने ही वाद्ये स्वीकारली.

कीर्तनात वीणा कशी असावी ते वाचा—

चतुस्तंत्री समायुक्ता सार्धद्वयकराकृतिः ।
मध्या प्रोक्ता वरा वीणा कीर्तने मणिभूषिता ॥

चार तारा लागलेली, अडीच हातांच्या आकाराची, अति मोठी किंवा अति लहान नसून मध्यम प्रतीची; खालच्या बाजूला मण्यांनी नटवलेली वीणा कीर्तनात योग्य आहे. कीर्तनप्रयोगापूर्वी बुवा वीणेला नमस्कार करून मग कीर्तनाला उभे राहतात. वीणा हे नारदमहर्षींच्या अस्तित्वाचे प्रतीक आहे. त्यावरच्या चार तारा म्हणजे सलोकता, सरूपता, समीपता, सायुज्यता या चारी मुक्ती आहेत. या तारा कीर्तनप्रयोगभर सतत झंकारतात. या नादातून भगवंत कीर्तनप्रयोगभर वावरतो, अशी श्रद्धा असल्याने वीणा आवश्यक आहे. नारदीय कीर्तनात जुन्या पठडीत मंगलाचरणापुरती वीणा वापरीत. आता ती वापरत नाहीत. याऐवजी तंबोरा वापरतात. तंबोरा वाजविणारे साथीदार निराळे असतात. वीणा, तंबोरा ही वाद्ये बुवांना सतत सूर पुरवितात. नादमुग्ध वातावरण निर्माण करतात. निरूपणातही सुरेलपणा येतो. वाक्यांची लयकारीही श्रोत्यांना हलवून सोडते. सुरेल गायनाला बुवांचे मन आकृष्ट करते. वारकरी कीर्तनात आजही वीणा आहे. नारदीय कीर्तनात आज हार्मोनियमचे महत्त्व आहे.

भजनातला पखवाज कीर्तनात चालत नाही. वाटोळी कातड्याच्या पुड्यांनी मढवलेली दोन तोंडे, त्यावर थोड्या प्रमाणात लोखंडाची शाई असते. उजवीकडचे पूड नऊ बोटे वापरलेले असते. डावीकडचे दहा अंगुळे रुंद असते. मोठ्या पोटाचा, लाकडी आतून पोकळ, नीट ओढ दिलेला, आठ लाकडाच्या गट्ट्यांनी वेढलेला तीन वीत लांबीचा पखवाज हरिकीर्तनास उपयुक्त आहे.

द्विदलो वर्तुलः कांस्य तालो मधुरनिःस्वनः ।
स्वस्वरे स्वरितं यस्य स्याच्चेतोहरं परम् ॥

दोन वेगळी टवळी असलेला, वाटोळा, गोड सुराचा टाळ असतो. तो बुवांच्या आवाजाच्या पट्टीला पूरक असतो. त्यामुळे कीर्तनाच्या सादरीकरणास उठाव मिळतो.

टाळ ही लयकारीसाठी असते. वारकरी कीर्तनात पितळी, जाड खोलगट टाळ असते. नारदीय कीर्तनात कुणी खोलगट, कुणी चपटी, कुणी मध्यम टाळ बुवा वापरतात. पितळी, स्टील, चांदीच्या झांजा असतात. काही बुवा नमनाला टाळ वापरतात. नमन संपताच टाळ साथीदारास देतात. मग चिपळ्या घेतात. प्रयोगाच्या शेवटी आरतीला पुन्हा झांज घेतात. बुवा आपापल्या प्रकृतिधर्मानुसार योग्य अशी टाळ वापरतात. काही बुवा स्टीलची छोटीशी मध्यम खोलगट आकाराची टाळ उजव्या हाताचा अंगठा व मध्यमा–अनामिका या दोन बोटांमिळून बांधतात. (किंवा टाळेच्या वरच्या गोल वेढ्यात ही बोटे अडकवितात.) ही टाळ कीर्तनप्रयोग पूर्ण होईस्तोवर हातातच असते. टाळेचा उपयोग लयींचे विविध प्रकार दाखविण्यासाठी असतो. श्रोत्यांना जागे करण्यासाठीही बुवा टाळ योजतात. वेदान्तनिरूपणाने श्रोत्याला डुलकी लागण्याची दाट शक्यता असते. ती लागू नये म्हणून बुवा ' पांडुरंग हरी, वासुदेव हरी,' किंवा ' पुंडलीक वरदे हरि विठ्ठल 'चा टाळगजर करतात. कधी भजन करतात. पखवाजाच्या, तबल्याच्या बोलाचे प्रकार बुवा टाळेवर म्हणतात. पदाचा ठेका टाळेतून सूचित करतात. विशेषत भजनी धुमाळीची उतारी हा टाळेचा खासच विशेष आहे. भल्या भल्या शास्त्रीय संगीतातल्या उस्तादांना ही उतारी पकडून समेपर्यंत पोहोचता येत नाही. ही उतारी हरिभक्तिपरायण बुवा अगदी सहजपणे टाळेवर दाखवतात, पुन्हा पुन्हा घेतात, अभंग पूर्ण करतात. केरव्यातली उतारीही चकवणारी असते.

वारकरी कीर्तनात अभंगाच्या प्रत्येक चरणाबरोबर टाळेची उतारी असते. ही उतारी आधी बुवा सांगतात, मग त्यांच्या पाठीमागे उभे असलेले टाळकरी घेतात. एकेक चरण परस्परांना सांगत सांगत बुवा म्हणतात. त्यामुळे टाळांच्या लयीत अभंग श्रोत्यांच्याही मुखात बसतो. आधी टाळ विलंबित लयीत वाजवितात. निरूपणाचा अभंग पुन्हा म्हणावयाचा झाल्यास मध्य लयीत टाळ वाजवितात. अभंगाच्या अखेरच्या चरणात द्रुत लय टाळेवर येते नि अतिद्रुत लयीत तर ' विठ्ठल विठ्ठल विठ्ठल 'चा गजर करतात. वारकरी कीर्तनात अभंगाच्या प्रत्येक चरणाबरोबर टाळकरी व बुवा असे परस्पर अभंग म्हणतात. नारदीय कीर्तनात आधी बुवा म्हणतात; त्यांच्या पाठोपाठ साथीदार म्हणतात. वारकरी कीर्तनात बुवांच्या निरूपणाला साजेसे अभंग टाळेवर गातात. बुवांनी म्हटलेला चरण टाळकरी ' उचलतात. ' हा वारकरी कीर्तनाचा दंडक आहे. नारदीय कीर्तनात टाळकरी सूर लावतो; कधी कधी बुवांचे पदही ' उचलतो. '

कीर्तनाच्या सादरीकरणात टाळकरी ' टाळ ' हळू, नेमकी मधुर स्वरात वाजवितो. बुवांचे शब्द श्रोत्यांपर्यंत तो टाळेतून पोहोचवितो. ध्रुपदाच्या वेळी टाळ जोरात वाजते. मग कमी होते. भजनाच्या वेळी ती अधिक उंच वाजते. टाळकऱ्यास टाळाचे उत्तम

ज्ञान असते. प्रत्येक पदाला टाळ वाजते. बुवांच्या पदाच्या प्रत्येक ओळीत टाळ वाजवायच्या विशिष्ट जागा असतात. पंचमावर टाळ मध्यावर, षड्जावर बारीक, मूळ स्वरावर मध्यावर टाळ वाजते. श्लोक, आर्या, ओवी संपण्याच्या शेवटी टाळेचा बारीक ठेका देतात, टाळ व पेटीचा स्वर मिळताजुळता असतो. टाळकऱ्यास स्वरावर, लयीवर, पदावर, निरूपणावर बारीक लक्ष ठेवावे लागते. टाळकरी हा भावी कीर्तनकार असतो. टाळेमधूनच त्यास कीर्तनाचे पाठ मिळतात. कितीतरी प्रथितयश कीर्तनकार टाळकरी होते. टाळ वाजवून–वाजवून ते कीर्तनातून कीर्तन शिकले. म्हणून टाळकऱ्यास स्वर. ताल, लय, पदे, श्लोक यांचे उत्कृष्ट ज्ञान असते. कीर्तनात टाळकरी साथ करतो. वारकरी कीर्तनात अनेक टाळकरी असतात.

२. **वादक :** वादक म्हणजे साथीदार. हे कीर्तनाच्या सादरीकरणातले सहाय्यक. हे काही दिवस कीर्तनकारांबरोबर रियाज करतात. साथीदार कीर्तनप्रयोगापूर्वी तासभर आधी येतात. वाद्ये सुरावर लावतात. वारकरी कीर्तनात वीणेकरी तासभर आधी येतो. वीणा लावतो. अभंगही गातो. बुवांचे मंगलाचरणही म्हणतो. वीणेकरी वीणा शेवटपर्यंत वाजवितो. यात पहिली पंचमाची तार दोन मात्रांत वाजवतात. नंतर पुढच्या जोडाच्या दोन तारा एका मात्रेत छेडतात. शेवटची खर्जाची तार पुन्हा दोन मात्रांत वाजवितात, अशी एकूण सहा मात्रांत वीणा वाजते. हीच वीणेची लय असते. तीत कमीअधिक होत नाही. त्यामुळे कीर्तनप्रयोगाला वातावरण व सूर लाभतो.

नारदीय कीर्तनात पेटी सक्तीची असते. पेटीमास्तर साथीदार असतात. बुवांचे स्वर तंतोतंत काढतात. साथीत रंग भरतात. स्वतःचे कौशल्य दाखवायचे झाल्यास पूर्वरंगानंतरच्या मध्यंतरात बुवा किंचित्काल विश्रांती घेतात. या वेळी बुवा पेटीमास्तरांना पद म्हणायला सांगतात. तेव्हा पेटीमास्तरांनाही आपले गानकौशल्य प्रकट करण्याची संधी असते. पेटीमास्तर मूळ स्वर कायम ठेवतात. बुवांनी मध्यम सूचित केल्यास तोही कौशल्याने पकडतात. कधी कधी बुवा गद्यनिवेदनातूनच पुढच्या पदाचा स्वर सांगता सांगता लावतात. पेटीमास्तर तो सूर सावधपणे पकडतात. पेटीमास्तरांना शास्त्रीय रागदारीबरोबर मिश्र रागदारीचेही ज्ञान असते.

पखवाजवादकही कीर्तनात महत्त्वाचा घटक असतो. कीर्तनकाराचे शब्द खुलतील असे त्याचे वादन असते. बुवांच्या प्रत्येक श्लोकाच्या शेवटी तो गोड, सुरेल थाप देतो. म्हणजे स्वर भरलेला राहतो. नारदीय कीर्तनकार आपल्या पदातून पखवाजातले बोल (शब्द) बोलू लागतात—

धिग् धिग् धिगातिक्रम धिक्तान धिक्तान ।
दुं दुं दुं दुं बाजे दुंदुभि भुं भुं भुं भुं शंख बजत है ।

कडां धा कडां धा मृदंग बाजत ।
वट वटन कपट नट भट कटक पट पटा आपटुनि ।
बिटपि सम बिकट नासी ॥

कीर्तनसार्वभौम गोविंदबुवा होशिंगांच्या पठडीतल्या 'रामजन्माख्याना'तील हे पद सुप्रसिद्ध आहे. रामजन्म झाल्यावर अयोध्येत सर्वत्र वाद्यांचा गजर झाला. त्या गजराचे वर्णन वर आहे. बुवा हे म्हणताना पखवाजी बोल काढतात. असे आख्यानांमधून जागोजागी पखवाजाला किंवा तबलजीला बोल काढावे लागतात. उदा. 'सुभद्रा-स्वयंवरा'ख्यानात अर्जुनाचा रथ चालला कसा ? बुवा सांगतात– (तबलजीला इशारा करून) 'धीट धीट धागेतीट. धीट धीट धागेतीट'ही लय विलंबित-मध्य-द्रुतातून फिरते. घोड्याच्या टापांचा आवाज 'तीट-तीट-तीटतीट' या बोलातून तबलजी काढतात. सोबत डग्गाही घुमतो. याव्यतिरिक्त तबलजीला आपले वादनकौशल्य दाखवायचे असल्यास बुवा चीजेतून, 'कृष्णा रामाऽरामारामाऽऽ ! रामरायाऽऽऽ राघोबाऽऽरे' या सुख्यात पदातून, ध्रुपदधमारातून, तराण्यातून, नमनाच्या ठाय लयीतून तबला प्रकट करावयास सांगतात. कीर्तनातल्या रसाला हानी पोहोचेल असे तबलावादक वाजवत नाही. तो पूरक वाजवतो. श्रोत्यांच्या मनावर सुपरिणाम होईल असे वाजवतो.

साथीदार समंजस असतात. कीर्तनाच्या सादरीकरणात मुख्य परिणाम कीर्तनाचा आहे अशी त्यांची रास्त समजूत असते. सश्रद्ध मन असते. सेवा हा भाव असतो. भक्ती हे अधिष्ठान असते. उत्कटता हा अनुभव असतो. सात्त्विक वातावरण असते. निर्मळ मन असते. संगीत नादब्रह्म असते. कीर्तनास बुवा उभे राहताना वाद्यांना व वादकाला ईश्वराचेच रूप मानून नमस्कार करतात. वादकही बुवांना वंदन करतात. या सगळयामिळून हे एक 'टीमवर्क' असते. यात कुणीही वरचढ नसतो. कुणीही कनिष्ठ नसतो. ख्यातकीर्त गायक-वादक मुद्दाम कीर्तनात सेवेला येतात. कीर्तनातले गायन, वादन, नृत्य ही साक्षात् परमेश्वराची विलसिते आहेत असे ते मानतात. म्हणून साथीदारांना उच्च आसन असते. बुवांच्या कीर्तनाच्या गादीस सर्वप्रथम नमस्कार करण्याचा त्यांचा मान असतो. काही कीर्तनांत तबलजीची आरती असते.

३. **श्रोतृवर्ग :** कीर्तनप्रयोगास येणारा श्रोतृवर्ग सामान्यातला विशिष्ट असतो. तो पूर्वग्रह बाजूला ठेवून स्वच्छ मनाने हरिकीर्तनप्रयोगास येतो. तो सश्रद्ध पण डोळस असतो. तो रसिक पण उदार मनाचा असतो. कीर्तनप्रयोगास येताना त्याचा पोषाख साधा, स्वच्छ असतो. धोतर, सदरा, टोपी हा पूर्वीचा श्रोत्याचा पोषाख होता. कीर्तन-प्रयोगात पँट वर्ज्य आहे. हल्ली पँटवाल्यांना (काहींना) धोतर नेसता येत नाही म्हणून लेंगा हा पर्यायी संकेत आला आहे. कपाळी गंध असते. गळयात तुळशीची माळ

असते. कीर्तनप्रयोगास आलेला श्रोता समंजस असतो. तो हरिभक्तीने युक्त असतो. तो सर्वांशी प्रेमाने वागतो व संवाद साधतो. तो मोकळ्या मनाने ईश्वराचे गुणगायन ऐकण्यास उत्सुक असतो.

कीर्तनप्रयोगास येणाऱ्या स्त्रियाही सश्रद्ध असतात. त्या भरजरी पातळात, अलंकारात येत नाहीत. डोक्यात वेण्या माळून येत नाहीत. अतिशृंगारही करीत नाहीत. आपल्याकडे कुणाचेही चित्त जाता कामा नये याची त्या खबरदारी घेतात. नाहीतर कीर्तनाच्या सादरीकरणात महाविघ्न येईल अशी त्यांची भावना असते. त्या साध्या, नऊवारी (पूर्वीच्या स्त्रिया) पोषाखात येतात. स्वच्छ वेषात येतात. देवापुढे टाकावयाचे धान्यही स्वच्छ असते. किडके, सडके धान्य त्या आणीत नाहीत. गुळगुळीत पैसा, खऊट खोबरे-नारळ, किडकी सुपारी देवाला देत नाहीत. कीर्तनप्रयोगास जाताना त्या कधीही रिकाम्या हाताने जात नाहीत. चार पैसे व मूठभर धान्य त्या देवापुढे ठेवल्याशिवाय कीर्तनप्रयोगात बसत नाहीत. प्रयोग चालू असताना सोबतच्या स्त्रियांशी संभाषण करीत नाहीत. त्या शुचिर्भूत असतात. विधवा स्त्रिया कीर्तनप्रयोगास कायम शुभ्रवस्त्रात येतात. प्रसन्न मनाने कीर्तनप्रयोगात सामील होतात.

कीर्तनाच्या सादरीकरणाच्या वेळी बुवांच्या उजव्या हातास पुरुष व डाव्या हातास स्त्रिया बसतात. सुज्ञ स्त्री-पुरुष भिंतीशी टेकून बसत नाहीत. ते आपापले छोटे आसन आणून त्यावर आसनस्थ होतात. प्रयोगात ते आपले आसन झटकत नाहीत. आसनही स्वच्छ असते. काही स्त्रिया पदराखाली माळ ओढतात. श्रीहरिनामस्मरणाची माळ ओढीत त्या कथा ऐकतात. काही पुरुषही उजव्या हातात गोमुखी ठेवून माळ सुरू ठेवतात. त्यामुळे नामस्मरण व कीर्तन दोन्हीही पदरात पडते.

कीर्तनप्रयोगापूर्वी श्रोत्यांनी पंधरा मिनिटे आधी आसनस्थ होण्याचा संकेत आहे. वृद्ध लोडाला किंचित रेलून बसतात. काही वृद्ध तक्क्याला पाठ टेकवतात. वृद्ध सन्मानाने कीर्तनकाराजवळ बसतात. तरुण मधल्या रांगेत बसतात. काहीसे प्रौढ तरुणांच्या पाठीशी बसतात. बाल कीर्तनास असतात. पण पठडीतले हरिदास मुलांना कधीही कीर्तनप्रयोगास बसू देत नाहीत. कारण मुलांच्या हालचालीमुळे कीर्तनप्रयोगात विघ्न निर्माण होते. दहा वर्षांवरील मुले पेटीमास्तरांच्या जवळ बसतात. कीर्तनकाराच्या समोरची जागा रिकामी (थोड्या प्रमाणात) असते. एखादे हरिदासबुवा आले तर त्यांच्या स्वागतासाठी ती जागा आरक्षित असते. (काही जागा राखीव असतात.) बुवा बुवांच्या कीर्तनास आले की आरंभी एकमेकांना नमस्कार करतात. ‘ कृष्णा रामा रामा रामा ! रामराया राघोबाऽऽरे ’ या पदाने बुवांचे स्वागत होते. आलेले बुवा सर्व श्रोत्यांना नमस्कार करतात. श्रोतेही त्यांना नमस्कार करतात. मग बुवा बुवांच्या हाताला धरून त्यांना सन्मानपूर्वक आसनावर बसवितात. आपल्या सम-व्यावसायिकाविषयी

वाटणारी ही असीम आपुलकी अनेक सांस्कृतिक, सामाजिक संदर्भ सुचविते. बुवा-बुवांची अंतर्गत भांडणे काहीही असोत, (आणि ती हमखास असतात. कारण ती माणसे आहेत.) श्रोत्याच्या समोर, कीर्तनाचे सादरीकरण होत असताना या भांडणांचे नावही येत नाही. किमान ती व्यक्त (सादरीकरणप्रसंगी) होत नाहीत. आणि व्यक्त झालीच तर; विद्वत्तेतून, प्रभावी निरूपणातून, रसाळ कथनातून व्यक्त होतात. म्हणजे बुवांपुढे आपण अधिक उत्कट कथा करतो आहोत की नाही याबद्दल स्पर्धा असते. अशी स्पर्धा निकोप असते. कदाचित यातून कीर्तनाचे सादरीकरण अधिक प्रभावी होण्याची शक्यता असते. या सगळ्यांसाठी श्रोता चाणाक्ष असतो. बुवांच्या निरूपणात मिसळणारा असतो. आख्यानात विरघळणारा असतो.

कीर्तनप्रयोगात बुवांनी देवाचा, संतांचा, पुण्यपुरुषांचा, विभूतींचा जयजयकार केला की त्यांच्या पाठोपाठ श्रोते करतात. या गजराने वातावरणनिर्मिती होते. श्रोते ताजेतवाने होतात. झोप काही वेळापुरती उडते. वातावरणात प्रसन्नता येते. यापेक्षा आणखी काही प्रसन्न वाटते. ते शब्दातून सांगता येत नाही. तो ' अनुभव ' असतो. कीर्तनप्रयोगातून सुज्ञ श्रोता कधीही उठून जात नाही. बुवांच्या विवेचनास योग्य जागी दाद देतो. बुवांचा व त्याचा संवाद जिथे सुरावर लागतो तिथे कीर्तनप्रयोग जिवंत होतो. तो साक्षात होतो. श्रोता-बुवा, बुवा-श्रोता यांचे संबंधित्व प्रस्थापित होते. या संबंधातून सादरीकरणास चैतन्य मिळते. या संबंधित्वातून अनेकविध पातळ्यांवर ही दोन्ही मने काम करतात. श्रोते रंगतात. ते मांडीला मांडी लावून बसतात. पण आपापसांत बोलत नाहीत. विश्रम करीत नाहीत. बुवांच्या निरूपणास उचलतात. बुवांबरोबर भजन करतात. अभंग गातात. पदेही म्हणतात. या एकमेकांच्या संवादातून दोघेही एकाच पातळीवर वावरतात. तरीही ते वेगळे असतात. त्यांच्या प्रकृत्या भिन्न असतात. काही श्रोते बुवांचे गाणे ऐकण्यासाठी येतात. काही बुवांना बघण्यासाठी येतात. तर काही बुवांचे चुटके खिशात ठेवून घरी खुषीत जातात. जाताना वेदान्त बुवांच्या उपरण्यात ठेवून जातात. कीर्तनाचा रंग श्रोत्यांच्या दाद देण्यातून व्यक्त होतो. बुवांना नमस्कार केल्याशिवाय श्रोता कीर्तन-प्रयोगात सहभागी होत नाही. अपरिहार्य कारणासाठी जर श्रोत्याला बाहेर जावे लागले तर तो उठून बुवांना नमस्कार करून पुढे जातो. कुणालाही धक्का मारून जात नाही. मधून बडबडतही जात नाही. श्रोत्याच्या वागणुकीवर कीर्तनाचे सादरीकरण बरेचसे अवलंबून असते.

५. **प्रतिकृती :** कीर्तनाच्या सादरीकरणात ज्या देवतेचा उत्सव असेल त्या देवतेची मूर्ती शृंगारतात. त्यामुळे केवळ वातावरणच निर्माण होत नाही; श्रोत्या-वक्त्याच्या चित्तांत सहजभाव निर्माण होतो. या भावाची कीर्तनप्रयोगात निर्मिलेल्या भक्तिभावास गरज असते. कीर्तनप्रयोगात उत्तररंगातल्या आख्यानात ज्या देवतेचे माहात्म्य बुवा

वर्णन करतात त्या देवतेची प्रतिमा जर श्रोत्यांसमोर व बुवांच्या संनिध असली तर ते उचित होते. प्रतिकृतीच्या आसपासचा परिसर गाभाऱ्यासह स्वच्छ, प्रसन्न असतो. त्यात भडकपणा नसतो. देवाच्या प्रकृतीला शोभेलसा शृंगार असतो. मूर्ती स्पष्ट सर्वांना दिसते. मूर्तीच्या शेजारी समई असते. विजेच्या झगझगाटापेक्षा समईच्या प्रकाशात प्रतिकृती भावते. प्रयोगापूर्वी मंदिरभर धूप लावतात. मात्र तो उशिरा लावतात. कारण धूप, उदबत्ती लावून लगेच कीर्तनाचे सादरीकरणास जर बुवा उभे राहिले तर बुवांच्या आवाजास त्रास होतो. प्रयोगात आरती कुणीही लावीत नाहीत. प्रतिकृती कीर्तन-प्रयोगास पूरक वातावरण निर्माण करते.

६. **सत्कृती** : कीर्तनप्रयोगासंबंधी श्रोत्यांच्या व बुवांच्या मनात मुळातूनच आस्था असते. यातूनच आदरभावना वाढते. हा आदर पराकोटीचा होतो. तो श्रोत्यांच्या व बुवांच्या 'आवडी'चा होतो. तो कीर्तनप्रयोगास उत्साहवर्धक करतो. मुख्यत्वे तो मुळातूनच, अंगांगांतूनच यावा लागतो. ('बहुता सुकृताचि जोडी। म्हणुनी विठ्ठलीं आवडी'चा हाच अर्थ आहे.) तरच कीर्तनप्रयोग अंगी लागतो. तो मनाचे वय वाढ-वितो. कीर्तन हा अनुभव होण्यासाठी या घटकाचा खूप उपयोग होतो.

७. **स्थळ** : कीर्तनप्रयोग हा शक्यतो स्वच्छ, विस्तीर्ण मंदिरात, प्रसन्न वातावरणात होतो. प्रयोगाच्या आसपास कसलाही आवाज नको. म्हणून जुन्या पठडीतील नारदीय हरिदास नमनास आरंभ केला की मंदिराचे दरवाजे बंद करीत. त्यामुळे प्रयोगाचे स्थळ हा त्या प्रयोगानुभवाचा सात्त्विक भाव बनते. श्रोते एक-चित्ताने कीर्तन ऐकतात. पण सर्वच कीर्तने देवळात होत नाहीत; नामसप्ताह, उत्सव रस्त्यांवर, पटांगणात, वाळ-वंटात, नदीघाटावर, किल्ल्यांवर, टेकड्यांवर, पर्वतांच्या पायथ्याशी होतात. या सगळयांना देवळाचे अधिष्ठान लाभते. म्हणून नामसप्ताहात भगवंताची प्रतिकृती ठेवतात. उत्सवमंडप सुव्यवस्थितपणे सजवितात. मंडप गडद नसतो. गडद मंडप भक्तिरसास बाधा आणतो. मंदिरात काचेची झुंबरे असतात. त्यात मेणबत्त्या लावतात. काही ठिकाणी कीर्तन नदीच्या वाळवंटात असते. वाळवंटात कुठल्याही विषयाचे बी रुजत नाही. हरिनामस्मरणाचा पाझर आतून स्फुरतो. म्हणून वारकरी कीर्तने बहुधा वाळ-वंटात असतात. नदीकाठ हा प्रवृत्ति निवृत्ती यांचा मिलाफ असतो. तो कीर्तनासाठी योग्य असतो. शक्यतो बाजारात कीर्तनप्रयोग होत नाही. व्यवहारात कुठल्याच भावाला किंमत नाही. मग ती कीर्तनातल्या भावाला अपवाद कशी ठरणार ?

८. **काळ** : कीर्तन हे बहुधा रात्रीच असते. काही ठिकाणी कीर्तनाची वेळ संध्या-काळची असते. जिथे अखंड कीर्तनसत्रे असतात तिथे संध्याकाळी कीर्तने होतात. रात्रीही कीर्तन असते. दिवसभराचे (नको ते) व्यवहार आटोपून श्रोते रात्री निवांत व स्वस्थ मनाने कीर्तनप्रयोगास येतात. रात्री दिवसाची गडबड नसते. कामगार, व्यापारी

आपापली कामे आटोपून येऊ शकतात. रात्र ही कलाप्रयोगांची रंगदेवता असते. या रात्री कलाविलास अधिक प्रसन्नपणे खुलतो. कीर्तन चार तासांपर्यंत चालते. काही बुवा रात्र-रात्र कीर्तन करीत. याला श्रोते जबाबदार असत. श्रोत्यांच्या प्रतिसादावर कीर्तन-प्रयोगाचा काळ असतो. सर्वसाधारणपणे नारदीय व वारकरी कीर्तनप्रयोग तीन तासपर्यंत चालतो. श्रोते कंटाळून जाऊ नयेत, त्यांचा कंटाळा जांभईतून व्यक्त होण्याच्या आतच बुवांनी 'हेचि दान दे गा देवा' म्हटलेले बरे. याचे बुवांना भान असते. नारदीय कीर्तनात उत्तररंगाला मध्यरात्रीनंतरचा काळ अधिक पोषक ठरतो. बुवांचा आवाजही लागलेला असतो. त्यामुळे कीर्तनप्रयोग रंगतो. यासाठी आवश्यक असणारे काळाचे भान बुवांना असते.

९. **सादरकर्ता :** कीर्तनप्रयोगाचे सादरकर्ते बुवा हरिभक्तपरायण असतात. हे अभ्यासू, विद्वान, पंडित व रसिकही असतात. व्यासंगाबरोबर त्यांच्या अंगी कवित्वशक्तीही असते. त्यांच्यापाशी प्रत्युत्पन्नमतित्वही असते. त्यांना संगीताचे उत्तम ज्ञान असते. गुरुपरंपरा असते. अनुग्रह असतो. गुरुकृपांकित अनुभव असतो. त्यांचे जबर पाठांतर असते. निरूपणात कधी कधी ते स्वतंत्र विचारही मांडतात. संतवचनात ते ढवळाढवळ करीत नाहीत. संशोधित प्रतींपेक्षा गुरुपरंपरेने आलेली संहिता ते प्रमाण मानतात. मौखिक परंपरा वारकरी कीर्तनसंप्रदायात अद्यापही चालत आलेली आहे. नारदीय कीर्तनसंहिता अलीकडल्या म्हणजे गेल्या तीन-चारशे वर्षांतली आहे. पण गुरुवचनेही मौखिक असतात. ती अनुग्रहाशिवाय इतरांना मिळत नाहीत. काही बुवा आख्यानात स्वकृत पदे रचतात. या पदात ते आपला उल्लेख करतात. बुवांचे निरूपण ठोस व मुद्देसूद असते. आख्यान-कथनात ते विविध रसांचा परिपोष करतात. पण आख्यानाचा संबंध पूर्वरंगातल्या मूळ अभंगाशी लावतात.

(उदा. 'भक्ति आकळिला दयाघन.' हा पूर्वरंग निरूपणाचा अभंग बुवा घेतात. 'रुक्मिणी एक्या तुलसीदलाने गिरीधर प्रभु तुळिला' हा पदाचा चरण घेऊन तेच आख्यान उत्तररंगात [कृष्णदानाख्यान] सांगतात. याला आख्यानाचे सूत्र पूर्वरंगाशी संबद्ध करणे म्हणतात.)

बुवा आख्यानात विविध रसांचे वर्णन करतात. पण पूर्वरंगाचे भक्तिनिरूपणाचे केंद्र कीर्तनाच्या सादरीकरणातून मुळीसुद्धा ढळू देत नाहीत. आख्यानात पुरुषार्थ, पराक्रम, तेज, विद्या, ऐश्वर्य, दातृत्व यांचे वर्णन करतात. कुठल्या आख्यानात नेमके काय सांगावे नि काय सांगू नये याचा विवेक बुवांच्या सादरीकरणामधे असतो. हा विवेक प्रत्येक बुवा आपापल्या संप्रदायानुसार कटाक्षाने अमलात आणतात. 'रामराज्यवियोग' या आख्यानात मंथरेच्या अंगात कली शिरला असे बुवा चुकूनही सांगणार नाहीत. (जरी ते आख्यानसंहितेत नोंदविलेले असले तरी.) 'रामराज्याभिषेकाख्याना'त देवांनीच

रामाच्या राज्याभिषेकात विघ्न आणले असे ते सांगत नाहीत. हे रावणवधानंतर देवांच्या तोंडी क्षमायाचना करतेवेळी सांगतात. 'मारीचवधा'च्या प्रसंगी सीता लक्ष्मणाला जे काही वाईट बोलली ते त्या जागी न सांगता अशोकवनिकेत स्वापराधचिंतनात स्वगतातून सांगतात. राम सुवर्णमृगाच्या मागे जाताना, 'सीते! तू एक वर्ष अग्नीत ऐस.' असे म्हणाले. हे त्या जागी बुवा सांगत नाहीत. रावणवधानंतर सीतासमर्पण करताना अग्नीच्या मुखातून सांगतात नि सांगता सांगता सुचवितात, 'ही तुमची ठेव घ्या.' यास कीर्तनाच्या सादरीकरणातले 'औचित्य' म्हणायला पाहिजे.

नारदीय कीर्तनात पाठ असलेली पदे बुवा म्हणतात. पण लोकांच्या मुखात बसलेली कवने सहसा म्हणत नाहीत. याचे कारण श्रोतृमुखातली पदे बुवांबरोबर श्रोते म्हणतात. यामुळे कीर्तनप्रयोगात विघ्न येते. म्हणून बुवा प्रयोगात विश्रांतीसाठी अशी पदे पेटीमास्तरांसह श्रोत्यांकडून पूर्वरंगानंतर झालेल्या मध्यंतरात म्हणवून घेतात. त्या वेळी बुवा मुखाने आपल्या कुलदेवतेचे स्मरण करतात. टाळ वाजविणे चालू ठेवतात. श्रोतेही पद गातात. प्रत्येक श्रोता या भगवद्गुणगायनात आपला आवाज देतो. जणू काही एकमेकांमधला परमेश्वरच गात असतो. या समूहगायनातून शक्ती लाभते. मन ताजे होते. या वेळात बुवा मनाच्या घरात आख्यानाची मांडणी करतात. वारकरी कीर्तनप्रयोगात बुवांबरोबर श्रोते सारखे अभंग, ओव्या म्हणतात. तरीही या प्रयोगात रसविघ्न येत नाही. कारण यातील निरूपणाचा बाज सामूहिक आहे. यात आख्यान नसल्याकारणाने भक्तिरसाव्यतिरिक्त इतर रसांचा आविष्कार क्वचितच आढळतो. याचा मूलभूत पाया नामस्मरण हा आहे. नारदीय कीर्तनाचा पाया नामस्मरण हा असला तथापि आख्यान हेही ईश्वराच्या गुणसंकीर्तनाचा एक आवश्यक घटक म्हणून येते. आख्यान नवरसांनी युक्त असते. हे रस कमी-अधिक प्रमाणात कीर्तनप्रयोगात अपरिहार्यपणे येतात. त्यामुळे नारदीय कीर्तनाच्या सादरीकरणात नवरसांचा विचार बुवांना करावा लागतो. आख्यानाची प्रत्येक बुवांच्या पठडीची मांडणी असते. ही ज्याच्या त्याच्या निवेदनाच्या प्रकृतीनुसार विभिन्न प्रकारची असते. नाहीतर एकच आख्यान वर्षानुवर्षे त्याच देवळात वा त्याच उत्सवात श्रोत्यांनी ऐकले नसते.

नारदीय कीर्तनात पूर्वरंगाइतकाच उत्तररंग महत्त्वाचा असतो. उत्तररंगात आख्यान असते. श्रोत्यांनाही पूर्वरंगाऐवजी आख्यान ऐकायला आवडते. काही मुरब्बी श्रोते मध्यंतरानंतर बुवांचे खास आख्यान ऐकण्यासाठी येतात. श्रोत्यांना वेदान्तनिरूपण फार वेळ ऐकले तर पचत नाही. वेदान्तातली शास्त्रीय परिभाषा श्रोत्यांना आकलन होत नाही. जुन्या पठडीतले प्रख्यात वेदान्ती हरिदास पूर्वरंग वजनदार निरूपणाने करीत. किंबहुना पूर्वरंगनिरूपण जर एखाद्या हरिदासाचे भारदस्त असले तर त्यांना समाजातही फार मोठा मान असे. 'कीर्तनप्रयोग म्हणजे वेदान्तविवेचन.' 'कीर्तनाचे सादरीकरण

म्हणजे सामान्यांना सर्वदर्शन संग्रहाचे सुलभ भाषेत विवेचन.' अशा व्याख्या जुन्या पठडीतील प्रख्यात हरिदास गंगाधरबुवा काशीकर, नानाबुवा बडोदेकर, पिलुबुवा वझूजकर यांनी कीर्तनसंमेलनाच्या अध्यक्षीय भाषणांतून केल्या आहेत. निरूपणाबरोबर प्रभावी आख्याननिवेदनाचा आग्रह यशवंतबुवा कवीश्वर, डॉ. दत्तोपंत पटवर्धनबुवा यांनी कीर्तनसंमेलनाच्या अध्यक्षीय व्याख्यानांतून व्यक्त केला आहे.

नारदीय कथेत ध्रुपद, ठुमरी, ख्याल, टप्पा हे आख्यानभावाला अनुरूप असेल त्याप्रमाणे बुवा गातात.

महाभारत हे नारदीय हरिदासांचे आवडते कथाकथनाचे अंग आहे. महाभारताख्यानात बुवा पांडवांची उत्पत्ती सांगत नाहीत. कुंतीच्या पोटी कर्णाचा जन्म कसा झाला याची चमत्कृतिपूर्ण मीमांसा ते करीत नाहीत. सज्जनांनी केलेल्या धर्मशास्त्रविरोधी कृत्यांचा चुकूनही उच्चार करीत नाहीत. आकाशवाणी, कीर्तिवर्णने, शूराचे भाषण, गर्वाचे बोलणे, आनंदाचे, रागाचे, हाक मारल्याचे भाषण बुवा उंच स्वरात करतात. करुणरसात कोमल स्वरात बोलतात. वीररसात तीव्र स्वरात निवेदन करतात. चम्पूकाव्यातील गद्य पंचमातून सांगतात. या सगळ्यांना आवश्यक असणारा विनोदही मोजक्या ठिकाणी वापरतात. विनोदही मर्यादित असतो. कीर्तनप्रयोगात विनोदाचा पदर सहसा बुवा ढळू देत नाहीत. अभद्र, अश्लील शब्द कीर्तनाच्या सादरीकरणात येत नाहीत. सर्व रसांच्या परिपोषातून आख्यानप्रयोगाच्या समाप्तीच्या अखेरीस पुन्हा बुवा आपल्या मूळ भक्तिप्रधाननिरूपणाच्या मुख्य सूत्राशी येतात. यामुळे ते 'कीर्तन' वाटते. यातल्या आख्यानातील शकुनांचे सूचनही (आख्यानातल्या) मार्मिक जागी येते. राजा कामाला निघाला असताना पाण्याचा धडा भरलेली सवाष्ण बाई दिसली की काम फत्ते होण्याचे सूचन या शकुनातून होते. एकदा सम्राट युद्धास निघताना विद्वानांनी त्याच्यापाशी पाच फळे मागितली, हा शुभशकुन आहे. पाच फळे हे पाच प्राण सुरक्षित राहण्याचे प्रतीक आहे. विद्वानांचा आशीर्वाद मृत्युंजयी असण्याचे ते सूचन आहे. यात प्राण्यांचे आवाज, पक्ष्यांचे आवाजही येतात. या शकुनांना वेळाही असतात. या वेळांना निसर्गही असतो. हा निसर्ग आणि शकुन यांच्या सूचक वर्णनातून बुवा आख्यानातल्या खुब्या मांडतात. त्यामुळे कथानक सूक्ष्म होते. चरित्रनायकाचे स्वभावदर्शन बारकाव्यानिशी बुवा करतात. यातून आख्यानास गतिमानताही मिळते. या शकुनांमधून मनाचे बारकावे उलगडतात.

नारदीय कीर्तनपरंपरेत कथाकार रसानुरूप छंदाची योजना आख्यानात करतात. ज्या पुराणातले किंवा रामायणातले वा महाभारतातले अथवा भागवतातले आख्यान असल्यास त्या ग्रंथातला महत्त्वाचा श्लोक आख्यानारंभी बुवा सादर करतात. त्यानंतर कविता योजतात. देव, राजे, ऋषी, देवांगना याविषयीचे काव्य प्रौढ असते. मुलांविषयीचे

काव्य सुबोध असते. स्त्रीकाव्य सहज असते. संतांच्या किंवा साधूंच्या चरित्रांत त्यांची पदे बुवा आख्यानात योजतात. हे काव्य देशी असते. पण काही आख्यानांमधली काव्ये इतर प्रांतीय भाषेतली असतात. उदा. संत नरसी मेहताच्या आख्यानात गुजराथी पदे येतात. ('वैष्णव जन तो तेने कहिये' हे पद विख्यात आहे.) तुलसीदास चरित्रात 'श्रीरामचंद्र कृपालु भज मन' हे पद येते. मीराख्यानात मीरेची मेवाडी पदे, सूरदास, चरित्रात सूरदासाची पदे येतात. कबीराख्यानात कबिराचे दोहे बुवा योजतात. पण त्याचे प्रमाण मर्यादित असते. यातली निवड कथाकाराचे रसिकत्व सुचविणारी असते. नामदेव, जनाबाई, दामाजी, लाखा कोल्हाटी या चरित्रांत संस्कृत श्लोक येत नाहीत. ही आख्याने मराठी काव्यांतून व गद्य निवेदनातून रसाळपणे बुवा सांगतात.

आख्याननायकाच्या येण्यात व जाण्यात साकी असते, कधी ती आख्यानारंभी येते. संतदर्शनात दिंडी येते. प्रार्थनेत ओवी; वैराग्य'त छोटे पद शोभते. युद्धप्रसंगात घनाक्षरी वृत्त चांगले असते. वियोगाच्या वेळी अंजनीगीत, प्रतिज्ञेच्या भाषणात व काही निरोप सांगायचा असेल किंवा काही अलौकिक घडवायचे असेल तर आर्या वृत्त योजतात. कधी कधी आर्येतून दोघांचा संवादही व्यक्त होतो. घर, उद्यान, वेष, भोजनवर्णनांना कटावरचना वापरतात. पुष्कळ वर्तमान कळवायचे असल्यास चूर्णिका किंवा स्रग्धरा वृत्त योजतात.

करुण रसात वसंततिलका व हरिणीवृत्त चांगल्या प्रकारे बुवा आख्यानात योजतात. वीररसात शार्दूलविक्रीडित व इंद्रवज्रा, शांत रसात शिखरिणी व स्रग्धरा, शृंगारात प्रहर्षिणी व मंजुभाषिणी, भयानक रसात रथोद्धता, अद्‌भुतरसात सुमचित्रा, इत्यादी विविध तऱ्हांची वृत्ते व छंद बुवा आख्यानातून योजतात. ऋषींच्या शापात व वरात संस्कृत श्लोक वापरतात. निषेध आणि ग्रहण असे दोन्ही प्रसंग आख्यानात आले तर दोन अर्थ व्यक्त करणारा एक श्लोक योजतात. उदा० 'द्रौपदीस्वयंवरा' ख्यानातील कर्णाचा खराखरा निषेध करून त्याची वरवर कशी स्तुती केली आहे पाहा—

भद्रे सूतसुतं ह्येनं जननीति वरं परम् ।
विद्धि कर्णेऽकुलीनत्वं वृणु मान्येष्वयेनरम् ॥

निषेधात्मक अर्थ : हे भद्रे (कल्याणी) कर्णेऽकुलीनत्वं विद्धि (कर्णाच्या ठिकाणी अकुलीनत्व जाण.) जननीति परं सूतसुतं एवं (कर्ण) मा वृणु (जनास नीतिनिपुण खरा, पण ह्या सूतपुत्रास वरू नकोस. अर्जुनास वर.)

स्वीकारात्मक अर्थ : हे भद्रे जननी एनं सुतं असूत (हे कल्याणी, आई याच मुलाला प्रसवली) कर्णे परं कुलीनत्वं विद्धि (कर्णाविषयी श्रेष्ठ कुलीनत्व जाण) अये (अगे द्रौपदी) मानेषु वरं नरं वृणु (मान्य त श्रेष्ठ पुरुष असलेला वर.)

करुणरसात गौरी, जोगी या रागांचा उपयोग बुवा करतात. वीररसात भूप राग योजतात. रात्री कीर्तन असल्यास त्या कीर्तनाचे नमन यमनकल्याणात होते. याव्यतिरिक्त अनेक राग कीर्तनात बुवा म्हणतात. संमिश्र रागही गातात. लावणी, पोवाडा, नाट्यसंगीतही जसे नारदीय कीर्तनात येते, जसे सिनेसंगीतातल्या चालीही योजतात या सिनेचालीचा प्रभाव फारसा कीर्तनात टिकत नाही.

वीररसात झपताल, करुणरसात दीपचंदी, शृंगाररसात भजनीधुमाळी, निरोपाच्या वेळी केरवा, संदेशाच्या वेळी कव्वाली, बोलावून आणावयाच्या वेळी दादरा–खेमटा, अद्‌भुतरसात व हास्यरसात केरवा असे ताल बुवा कीर्तनाच्या सादरीकरणात योजतात.

कीर्तनाच्या सादरीकरणाचे हे काही ठळक विशेष नोंदविले आहेत. कीर्तनप्रयोग व्यापक आहे. तो एकपात्री प्रयोग आहे. एका रसातून क्षणात दुसऱ्या रसात जाणे हे येरागबाळयाचे काम नाही. कीर्तनकारास हे सारे मनापासून करावे लागते. शिवाय ते नीतीच्या व सदाचाराच्या अधिष्ठानावरून करावे लागते मुळात तो आचारसंपन्न असावा लागतो. तरच त्याचे 'कीर्तन' हे खरे 'कीर्तन' वाटते. नाही तर ते नाटक होते. कीर्तनाच्या सादरीकरणापूर्वी सांप्रदायिक परंपरेत काही विधी सांगितले आहेत. ते बुवा पाळतात. ते विधी पूर्ण झाल्याशिवाय बुवा कीर्तनप्रयोगास उभे राहात नाहीत.

नारदीय कीर्तनकार शुचिर्भूत जीवन जगतो. त्याला कसलेही दुर्व्यसन नसते. त्याची सांप्रदायिक देवता शिव-विष्णू ही असते. गुरुपरंपराही असते. तो अनुगृहीत असतो. कपाळी गंध, गळयात तुळशीची किंवा रुद्राक्षाची माळ असते गळयात एका बारीकशा ताईतात गुरुमुद्रा असतात कीर्तनापूर्वी ते स्नान करतात. उपास्यदैवताची पूजा करतात. कीर्तनप्रयोगाच्या पोषाखपेटीची पूजा करतात. ही पेटी देवपेटीच्या शेजारी असते. हा पोषाख पाटावर मांडतात. त्यास हळदकुंकू, फुले वाहतात. गुरुपरंपरेचे श्लोक म्हणतात. शिव, राम, कृष्णाच्या नामस्मरणाने माळ ओढतात. मग तो पोषाख घालतात. कपाळी गंध लावतात. सोबत उपास्य दैवताची पेटी उघडतात. त्याला उदबत्ती ओवाळतात. फुले वाहतात. काही मिनिटे ध्यान लावतात. गुरुमुद्रा छातीवर काढतात. पुन्हा देव-स्मरण करतात. स्वतः देवपेटी झांज घेऊन कीर्तनप्रयोगास जातात.

वारकरी कीर्तनकार हरिपाठ झाल्याशिवाय जेवत नाहीत. ते पांडुरंग नामस्मरणाची माळ ओढतात. गोपीचंदनाची गंध-मुद्रा लावतात. बाराबंडी किंवा पांढरे धोतर, पांढरा सदरा, पांढरे उपरणे व पांढरा फेटा घालतात. ज्ञानेश्वरी वाचल्याशिवाय काही बुवा कीर्तनास उभे राहात नाहीत. एकनाथी भागवतावर तुळशीपत्र वाहतात. तुकोबाच्या गाथ्याला बुक्का लावतात, गुरूचे स्मरण करतात नि मग कीर्तनाच्या सादरीकरणास उभे राहतात.

रामदासी कीर्तनात दोन गाठ मानेशी मारलेला साधूंचा पंचा असतो. दाढी

वाढवावीच लागते. जटा असाव्याच लागतात. फक्त टाळ हातात असते. रामनामाच्या अकरा माळा बुवा कीर्तनप्रयोगापूर्वी जपतात. समर्थ रामदासांच्या प्रतिमेची फुले, दीप-धूपासह पूजा करतात. कपाळी उभे गंध लावतात. भस्मही लावतात. काही रामदासी कीर्तनकार भगवी कफनी कीर्तनापुरती घालतात. गुरुवारी भिक्षा मागतात. एकादशीस फक्त रामनामाचा जप कीर्तनातून सांगतात.

गाणपत्य हरिदास सोवळे व कर्मठ असतात. शाक्त हरिदास जोगवा मागतात. सोवळे कडक असते. सोवळ्यात गणपती व देवीची पूजा करून मग कीर्तनप्रयोग सादर करतात. यावरून कीर्तनाचे सादरीकरण म्हणजे केवढी खडतर तपस्या आहे हे ध्यानात येईल.

संदर्भ :

१. कीर्तनाचार्यकम् : वि. ग. भागवत.
२. कीर्तनभूषण गौतमबुवा पाठक यांची काही बाडे.
३. गोविंदबुवा होशिंग यांचे चरित्र.
४. नरहरबुवा कऱ्हाडकर यांचे हस्तलिखित.
५. संतवर्य धुंडा महाराज देगलूरकर यांची मुलाखत.
६. अभंग संकीर्तन भाग १ : शं. वा. दांडेकर.

कऱ्हाड शहरातील उत्तरालक्ष्मीची मूर्ती

प्रा. का. धों. देशपांडे
कराड कॉलेज ऑफ आर्ट्‌स, कॉमर्स, कराड

१

कऱ्हाड हे शहर कोल्हापूर, वाई, जुन्नर यासारखे प्राचीन शहर [१] असल्याने या गावात मंदिरे मोठ्या संख्येने असणे हे ओघानेच आले. याशिवाय कृष्णा व कोयना या दोन नद्यांच्या समोरासमोर झालेल्या प्रीतिसंगमाचे महत्त्वही यासाठी कारणीभूत झाले होते. बौद्ध व जैन धर्मांचा उदय व भरभराटीनंतर, विशेषतः गुप्तकालात हिंदुधर्मात मंदिर कल्पना स्थिरावली [२] व सर्वत्र निरनिराळ्या देवतांची मंदिरे निर्माण झाली.

महाराष्ट्र हा भारताच्या मध्यभागी असल्याने तेथे आर्य व द्रवीड संस्कृतींचे मनोहर असे मीलन झाले. वैदिकांचा रुद्र व इतर अनेक जातिजमातींचे तत्सदृश देव यांचा गुणकर्मसमन्वय होऊन सांप्रतच्या पौराणिक शिव आकाराला आला.[३] त्यामुळेच शिव ही अतिशय लोकप्रिय देवता आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक गावात एकतरी शिवालय दिसते. सर्व पुरुष देवतांचे क्रियाशक्ती स्वरूप स्त्री-स्वरूपात दिसते. ब्रह्म, शिव, स्कंद, विष्णू, यम, इंद्र, रुद्र यांच्या क्रियाशक्ती दर्शविणारा एक श्लोक आहे.

ब्राह्मी, माहेश्वरी, चैव कौमारी वैष्णवी तथा ।
वाराही च तथेन्द्राणी चामुंडा सप्तमातरः ॥ [४]

शक्तिपूजेतून तांत्रिक पंथ निर्माण झाला व शिवाबरोबर वरील स्त्रीदेवतांचा देखील पूजापद्धतीत समावेश झाला.

कऱ्हाडमध्ये संगमेश्वर, हाटकेश्वर, पावकेश्वर इत्यादी प्राचीन मंदिरे आहेत व त्या-बरोबरच शक्ति-उपासना दाखवणारी पण मंदिरे आहेत. सैदापूर येथील रेणुकादेवी, कोयनेच्या जुन्या पुलाजवळील दैत्यनिवारिणी ही अशी काही मंदिरे होत. त्यांपैकी सर्वात



कऱ्हाड शहरातील उत्तरालक्ष्मीची मूर्ती

भव्य देवालय हे महालक्ष्मीचे होते. आज ते मंदिर, त्यातील भव्यमूर्ती वगैरे काहीही नसून या मंदिराचा पाया मला अवशेषरूपाने निमजग्याच्या माळावर दिसतो. या देवळातील महालक्ष्मीची मूर्ती थोडी विच्छिन्न झालेली माळावरील इदग्याजवळील तळ्यात सापडली व ती बहिरोबाच्या आळीतील महालक्ष्मीच्या देवालयात बसविण्यात आली, असे सांगतात.[५] पण याबाबतची दुसरी एक आख्यायिका अशी की बहिरोबाच्या आळीतील महालक्ष्मीची मूर्ती ही मूळच्या मंदिरातील उत्तरपूजेची मूर्ती असून कोटा-खालील गणपती हा त्या मंदिराच्या गणेशपट्टीवरील होय. पण असा उल्लेख कोठे सापडला नाही. सध्याचे महालक्ष्मीमंदिर हे इ.स. १७२७ मध्ये शिवाजीराव डुबल यांनी बांधले.[६] मग प्रश्न असा पडतो की जेव्हा ज्या काळी या माळावरील मंदिराचा नाश झाला, तेव्हापासून बहिरोबाच्या आळीतील सध्या असलेली ही मूर्ती तळ्यात होती व ती १७२७ च्या सुमारास वर काढण्यात आली असावी, हाही प्रश्न अनुत्तरितच आहे. असो. या लेखात बहिरोबागल्लीतील हे छोटेसे मंदिर व त्यामधील महालक्ष्मीची मूर्ती यासंबधीचे विवेचन करण्याचे योजिले आहे.

उत्तरालक्ष्मीचे हे मंदिर अतिशय साधे आहे, व ते तसे प्रथमपासूनच आहे. अनेक ठिकाणी अतिशय साधे मंदिर व आत अतिशय प्राचीन मूर्ती असा प्रकार दिसतो. त्या-उलट प्राचीन मंदिर व आत अलीकडच्या काळातील मूर्ती अशीही उदाहरणे दिसतात. त्यांपैकी हे पहिल्या प्रकारचे उदाहरण म्हणावे लागेल. वर्णन करण्यासारखे या मंदिरात काही नाही. मूळ गाभारा असलेले मंदिर दगडी आहे. अगदी अलीकडे त्या समोर मंडप घालण्यात आलेला आहे. गाभाऱ्यात जाण्याचा मार्ग मात्र अतिशय लहान असून फार जपून जावे लागते. गाभाऱ्यात गेले की समोर कट्ट्यावर मुख्य महालक्ष्मीची मुख्य मूर्ती आहे. हा चबुतराही कमालीचा साधा आहे. शेजारी एक व्यंकटेशाची मूर्ती आहे. या मूर्तीचा पण अभ्यास व्हावयास हवा. येथे मात्र उत्तरालक्ष्मीच्या या मूर्तीचा विचार करावयाचा आहे.

लक्ष्मीची ही मूर्ती काळ्याकुळकुळीत दगडाच्या एका चौकोनी शिलाखंडात कोरली आहे. महाराष्ट्रातील बहुतेक मूर्ती बेसॉल्ट या दगडात कोरल्या असल्या तरी हा दगड त्यापेक्षा मऊ आहे. शिल्पकाम अतिशय सफाईदार असून काळ्या चिकणमातीत मूर्ती घडवावी एवढी कलाकाराची दगडावर हुकमत आहे. मूर्तीची उंची २१ इंच व पायापाशी रुंदी १६ इंच आहे. पाठीमागे मखरवजा कसलीही कलाकुसर नाही यामुळे मूळ दगडाचा भाग तसाच दिसतो.

या मूर्तीचे स्वरूप महिषासुरमर्दिनी या प्रकारचे आहे. प्राचीन काळातील मूर्ती या सहसा सरळ नसून अनेक ठिकाणी वाकलेल्या असत. या वाकल्यामुळे मूर्तीला एक सौंदर्य-पूर्ण लय मिळते. या वाकण्याला पारिभाषिक भाषेत ' भंग ' असे म्हणतात. मूर्तीच्या

सौंदर्याचे ते प्रमुख लक्षण मानले जाते. समभंग म्हणजे ताठ, अभंग म्हणजे वरचा व खालचा भाग किंचित वाकलेला, त्रिभंग म्हणजे मस्तक, धड व पाय अशा तीन ठिकाणी वाकलेली व अतिभंग म्हणजे अनेक ठिकाणी वाकलेली असे चार प्रकारचे भंग असतात. उग्र किंवा क्रोध देवता या अतिभंग अवस्थेत असतात.[७] सदरहू लक्ष्मीची मूर्ती ही उग्र स्वरूपात असल्याने अलीकडे या अवस्थेतच आहे. गळा, स्तनाच्याखाली, कंबर या शिवाय रेड्याच्या अंगावर ठेवलेला उजवा पाय अशा ठिकाणी हे भंग आहेत. मात्र 'कऱ्हाड' कर्ते य. रा. गुप्ते ही मूर्ती द्विभंगी आहे असे म्हणतात.[८]

मूर्ती दशभुजा म्हणजे दहा हातांची असून तिने आपला उजवा पाय रेड्याच्या अंगावर दाबला आहे. दाही हातांमध्ये परंपरेने सांगितलेली आयुधे आहेत. ती अनुक्रमे अशी —

मूर्तीची उजवी बाजू— वरपासून अनुक्रमे खाली — शंख, दुसऱ्या हाताचे एक बोट वर असून या हातातील चक्र खाली रेड्याच्या पोटात गेले असावे. पाश, खेटक म्हणजे ढाल व धनुष्य.

मूर्तीचो उजवी बाजू– वरपासून अनुक्रमे खाली– दोन बोटांनी बाण काढीत आहे, तलवार, वज्र, भाला व त्रिशूल. त्रिशूलाचे टोक पायाखालील रेड्यामध्ये घुसलेले आहे.

पारंपरिक शस्त्रे अशी – चक्र, शंख, वज्र, अग्नी, त्रिशूल, परशु, अंकुश, खेटक, धनुष्य, बाण, गदा, टंक व खड्ग.[९]

अभिषितार्थचिंतामणीमध्ये त्रिशूल, खड्ग, चक्र, बाण, शक्ती (वज्र), खेटक, धनुष्य, पाश, अंकुश व परशु ही आयुधे सांगितली आहेत.[१०] याचा विचार केला तर या लक्ष्मीच्या हातात सर्व शस्त्रे दिसून येतात. डाव्या बाजूला सर्वांत खालच्या हातात धनुष्य व उजव्या बाजूला सर्वांत वरच्या हातात बाण यामुळे या क्रियेचा तोल चांगल्या तऱ्हेने साधला आहे.

पार्श्वभूमीवरील काही भाग सोडला तर मूर्तीच्या अंगावर कोठेही वस्त्र दिसत नाही. पण भरगच्च दागिन्यांनी मढवलेल्या अवस्थेत ती विवस्त्र वाटतच नाही. डोक्यावर नक्षीदार असा मुकुट असून त्यावर योनी व लिंग ही प्रतीके आहेत. हेही महालक्ष्मीचे आवश्यक चिन्ह असावे. कारण कोल्हापूरच्या महालक्ष्मीच्या मुकुटात ही प्रतीके आहेत व त्याचे विवेचन करताना कै. खरे यांनी चतुर्वर्गचिंतामणी, मार्कंडेय पुराण, नित्य-कर्मसंग्रह, सिंघण यादवाच्या काळच्या लक्ष्मीस्तुती करणारा लेख असे संदर्भ दिले आहेत. त्यातील सिंघणाच्या उपरोक्त लेखाबद्दल ते म्हणतात, 'यातील महालक्ष्मीचे 'बिभ्रती शिरसालिंग' असे वर्णन आले असून ते लक्ष्य आहे.'[११] दोन्ही कानांत भली मोठी कुंडले असून ती खांद्यापर्यंत आलेली आहेत. मुकुटाच्या बाजूला बारीक शृंखलांची माळ असून तीच पुढे मस्तकाच्या मागे असलेल्या तेजोवलयाच्या भोवती

फिरवली आहे. गळ्यामध्ये दोन प्रकारच्या माळा आहेत. दोन प्रकारच्या माळा गळ्याभोवती आहेत तर आणखी दोन माळा या स्तनाखाली आल्या आहेत. छायाचित्रात मंगळसूत्र दिसते ते मूर्तीचे अंगचे नसून वरती निराळे घातले आहे. याशिवाय आणखी एक मोठा हार गळा, स्तनांमधून पार खाली गुडघ्यापर्यंत दिसतो आहे. पण तो उजव्या हातात घेतलेल्या त्रिशूलापर्यंतच आहे. याचा एक अर्थ असाही होऊ शकतो की ते यज्ञोपवीत असावे व म्हणून ते त्रिशूलापासून मागे गेले असावे. दंडामध्ये दोन प्रकारचे दागिने आहेत. एक वाकीसारखी असून दुसरी मोठ्या टपोऱ्या मण्यांची माळ आहे. एका मनगटात खूप मोठ्या प्रमाणात बारीक बांगड्या आहेत व बाकीच्या मनगटांत तोडे, कंकणे आहेत. पायामध्ये असेच तोडे व बारीक पैंजणे आहेत. रेड्याच्या खाली एक पाय असून त्यावरील पैंजणे दिसतात. कंबरेवर चांगला जाड कंबरपट्टा असून त्याच्या नक्षीदार साखळ्या, माळा वगैरे गुडघ्यापर्यंत लोंबतात. यामुळेच कंबरेभोवती एखादे नक्षीदार वस्त्र नेसल्यासारखे वाटते.

मूर्तीच्या चेहऱ्यावर चांदीचे डोळे बसवले आहेत. त्यामुळे मूर्ती उग्र वाटते. पण हे डोळे काढल्यावर ती कमालीची शांत वाटते. तिच्या हातून जी उग्र हिंसाचारी क्रिया घडत आहे त्याचा मागमूसही चेहऱ्यावर दिसत नाही. ही तटस्थता मूर्तिविज्ञानाच्या अभ्यासाच्या दृष्टीने फार महत्त्वाची आहे. महाबलिपुरम् व ऐहोळे येथील महिषासुरमर्दिनीच्या मूर्ती अशाच आहेत. अशा तऱ्हेची अलिप्तता ही मध्ययुगीन (इ.स. १००० ते १२००) यापूर्वीच्या वेरुळ व बदामी येथील मूर्तीत दिसत नाही. त्यामुळे या काळचे हे व्यवच्छेदक लक्षणच ठरते.[१२] मूर्तीचा काळ ठरविण्यास ही गोष्ट उपयोगी पडते. मूर्तीचे नाक सरळ असून ओठ पातळ आहेत. मधला ओठ थोडा पुढे आला आहे. मूर्तीचे शरीर अत्यंत प्रमाणबद्ध आहे. पण शरीर थोडेसे स्थूलत्वाकडे व प्रौढत्वाकडे झुकत आहे. कंबरेवरील प्रौढत्वाच्या वळ्याही दिसतात. स्तन चांगले पुष्ट व मोठे आहेत. अशा तऱ्हेचे शरीर असणे हे सौंदर्यलक्षण होय असे एतद्विषयक ग्रंथात सांगितलेले आहे. प्राचीन संस्कृत वाङ्मयातही स्त्री-सौंदर्याचा हाच आदर्श मानला आहे.[१३] पुढील काळातील म्हणजे गुप्तकाळानंतर हिंदुमूर्तिकामाबाबत हाच गुण किंवा अवगुण दिसतो.[१४]

यानंतर मुख्य मूर्तीखेरीज असलेल्या इतर मानव व प्राणी यांचा विचार करावयाचा आहे. पायाखाली रेडा आहे. या रेड्याच्या मानेवर एक मोठा घाव घातलेला दिसतो आहे. नंतर रेड्याच्या प्रथमदर्शनी भागात मत्स्याकार मोठी जखम आहे. या जखमेत एक चक्र घुसलेले दिसते. हे चक्र मूर्तीच्या डाव्या बाजूच्या क्रमांक दोनच्या हातातील असावे. कारण तेथे नुसतेच बोट वर केलेले दिसते. रेड्याचे मागचे व पुढचे असे चारी पाय मुडपले गेलेले आहेत. रेड्याचे एक शिंग स्पष्ट व दुसरे अस्पष्ट दिसत आहे. रेड्याच्या

मागच्या बाजूला सिंहमुख असावे. येथे मात्र गोंधळात पडायला होते. या सिंहाचा चेहरा बराचसा मानवासारखा आहे. एवढेच नव्हे तर डोक्यावर तात्कालीन पद्धती-प्रमाणे वस्त्रही दिसते.[१५] पण सिंहाप्रमाणे विरळ मिश्याही आहेत. शिवाय ज्या ठिकाणी चक्र घुसले आहे तेथेच खालून एक हातही आलेला दिसतो. मग हा हात त्या सिंहाचा पंजा समजायचा काय ? शिवाय या सिंहाचे किंवा सिंहरूपी मानवाचे कान सिंहासारखेच आहेत. बरे, हा सिंह नसला तर परंपरेने महालक्ष्मीचे वाहन सिंह येथे नाही असा अर्थ होतो. तेव्हा देवीच्या उजव्या पायाजवळील मुंडके हे सिंहाचे असावे असे वाटते.

याशिवाय देवीच्या दोन्ही बाजूंला दोन दैत्य आहेत. त्यांची उंची देवीपेक्षा खूप कमी–प्रमाणाबाहेर कमी आहे. त्या काळात आध्यात्मिक किंवा दैवी उंची दाखवण्या-करिता वास्तवाचा असा त्याग केला जाई. अजिंठ्यामध्ये एका चित्रात गौतम बुद्ध आपल्या पत्नी व पुत्रापेक्षा असाच खूप उंच दाखविला आहे. देवीच्या डाव्या बाजूकडील दैत्य एक गुडघा टेकून व दुसरा अर्धा मुडपून बसला आहे. देवीच्या एका शस्त्राने बहुधा बाण लागून त्याचे मुंडके तुटले असावे. एका हाताने तो बाण काढत आहे, तर दुसरा हात वर करून तो हातातील गदेचा प्रहार करणारा असावा. दुसरा दैत्य उभा आहे. डोके वर करून तो आपली तलवार देवीच्या पायात घुसविणार असतो. पण देवीने आपला भाला त्यांच्या तोंडात खुपसला आहे. या दैत्याच्या कानात वर्तुळाकार मोठी कुंडले आहेत. डोक्यावर रुमालासारखे वस्त्र गुंडाळले आहे व कंबरेला पंचेवजा वस्त्र आहे. दोघांच्याही दंडात मोठ्या मण्यांच्या माळा आहेत.

महालक्ष्मीच्या अंगावर वस्त्र नाही असे वर म्हटले परंतु डाव्या दैत्याच्या तेथे वस्त्राचा एक पदर मोठ्या गतीने पुढे आलेला दिसतो. असाच पदर दोन्ही खांद्यांच्या मागेही दिसतो. मग अंगावरील वस्त्र काय झाले ? या बाबतीत एक अंदाज असा. त्या काळात मूर्ती तयार करून त्यावर रंगकाम करीत. गुप्त व गुप्तोत्तर हिंदू मूर्तिकामावरही विलेपन करून ते रंगवीत असावे, असे समजण्यास जागा आहे.[१६] म्हणजे मूर्तीवरील वस्त्रे रंगविली असतील व कालांतराने रंग उडून गेला असेल. म्हणजे आज दिसणाऱ्या मूर्ती या एक-प्रकारे विकृतच म्हणाव्या लागतील.[१७]

मूर्तीचे खालील भाग खंडित स्वरूपात दिसतात. कपाळ, नाक, बाण धरलेला हात, वज्र घेतलेला हात, डावीकडील दैत्याचे मस्तक (ते मूळचेच नसावे असे मला वाटते), धनुष्य घेतलेला हात, तलवारीचा पुढील भाग, शंखाचा काही भाग, रेड्याचे मागचे पाय, गळ्यातील स्तनाखाली आलेली माळ, याबाबत मंदिरात राहणारे श्री. पुजारी यांची माहिती अशी की, ही मूर्ती मुस्लिम अत्याचारापासून वाचवण्यात आली, पण बरीच वर्षे / शतके ती पाण्यात होती. व ती नांगर लावून काढताना या मूर्तीला इजा झाली असावी. अर्थात याचा काही साक्षात पुरावा नाही.

२

वरीलप्रमाणे मूर्तीचे आज दिसणारे वर्णन झाल्यानंतर आता मूर्तीसंबंधाने उपस्थित होणाऱ्या काही प्रश्नांचा विचार या ठिकाणी करावयाचा आहे. हे प्रश्न साधारणपणे असे.

१. कऱ्हाडमधील निमजग्याच्या माळावर जे प्रचंड महालक्ष्मी मंदिर होते त्यातील ही मुख्य मूर्ती की उत्तरपूजेची मूर्ती ?

२. ही मूर्ती उत्तरेकडील नागरपद्धतीची की दक्षिणेकडील द्राविड पद्धतीची ?

३. मूर्तीचा काळ कोणता ?

वरील प्रश्नांचा क्रमाने विचार करू.

१. कऱ्हाडमध्ये निमजग्याच्या माळावर प्रचंड महालक्ष्मी मंदिर होते. त्यामधील महालक्ष्मी आज कोणत्याही अवस्थेत शिल्लक नाही. पण तिचे वर्णन सुदैवाने 'कऱ्हाड माहात्म्य' या पोथीच्या पहिल्याच अध्यायात आहे. त्यामधील संबंधित श्लोक असे—

तादृशः संगमः पक्षिन् नास्ति भूमंडले क्वचित् ।
यत्रोत्तरा महालक्ष्मी ब्रह्मविद्भिः सुसेविता ॥ १८ ॥
वर्तते पीठमध्यस्था देवी सर्वार्थदा नृणाम् ।
साध्वष्टगुणसम्राज्ञी सायुधा स्वगणैर्वृता ॥ १९ ॥
साम्राज्यहेमवलयं रत्नसानुविराजितम् ।
रथ्या चत्वर रम्यतेद्धेमसौधविराजितम् ॥ ४२ ॥
सुरत्नरचिताभित्तिदीप्तिजालसमुश्रिता ।
यस्मिन् रत्नमयास्तंभाः मंडपेषु विराजिताः ॥ ५० ॥
तस्मिन् रत्नमयी मूर्तिः कमलायाः सुव्यवस्थिता ।
देवी कणकवर्णा भा भुजैः षोडशैर्युता ॥ ५३ ॥
पीठमध्ये जगन्माता भक्तानां वरदास्थिता ।
तस्या वामे महादेवी रेणुका भक्तवत्सला ॥ ५५ ॥
तथा पुरो महादेवी साक्षान्महिषमर्दिनी ।
सायुधा प्राङ्मुखी पूज्या पीठप्राक्कोणगा प्रिये ॥ ५७ ॥
भक्तानां वरदा चण्डी ईश्वरी सिंहवाहना ।
ततो दक्षिणभागेऽपि दुरितस्यापहारिणी ॥ ५८ ॥ [१८]

कै. ग. ह. खरे अशा तऱ्हेच्या 'महात्म्या'बद्दल फारसे चांगले बोलत नाहीत. अनेक दृष्टीने अशी स्तोत्रे अविश्वसनीय असतात असे त्यांचे म्हणणे आहे.[१९] कऱ्हाड महात्म्यही मला संपूर्ण उपलब्ध झाले नाही. त्याचा लेखकही अज्ञात आहे. पण या स्तोत्राचे

वैशिष्ट्य असे की हे स्तोत्र महालक्ष्मीचे देऊळ असताना लिहिले आहे. मूळ मूर्ती व इतर मूर्ती यामध्ये कवीने फरक केला आहे. मूर्तींची जागा तो दाखवितो आहे. वरील श्लोक क्र.५३ व ५५ मध्ये मोठ्या देवीचे वर्णन आहे. ही मूर्ती कनकआभा-सुवर्णतेजाची असून सोळा हाताची आहे. तिच्या डाव्या बाजूला रेणुका आहे, तर ५७ व ५८ या श्लोकांत महिषासुरमर्दिनी अशा मूर्तीचा उल्लेख आहे. ती समोर कोपऱ्यात (प्राक्कोणगा) आहे. राज्याच्या दक्षिण भागावरील संकटाचे हरण करणारी 'सिंहवाहना' अशी ही देवता आहे म्हणजे मंदिरात दोन मूर्ती असून त्यातील दुसरी महिषमर्दिनी आहे. एवढे तरी या श्लोकावरून सिद्ध होते.

श्री. य. रा. गुप्ते यांनी 'कऱ्हाड' या पुस्तकात देवळाचे वर्णन केले आहे.[२०] त्यात ते म्हणतात की महालक्ष्मीची मूर्ती इदग्याजवळील तळ्यात सापडली व हीच मूर्ती बहिरोबाच्या गल्लीतील मंदिरात स्थापन केली गेली, हे मान्य करणे अवघड आहे. एवढ्या मोठ्या वैभवशाली मंदिरात (आजही २२८′ × ९०′ एवढा देवळाचा चौथरा दिसतो) मूर्ती अवघी २१ इंच, पाठीमागे काहीही पार्श्वनक्षी न कोरता केली असणे अशक्य आहे. याशिवाय ही मूर्ती १६ हातांची नाही व 'वरदास्थिता', 'सायुधा', व 'सिंहवाहना' अशी आहे. यावरून ही मुख्य मूर्ती नसून दुसरी आहे हे सिद्ध होते.

मात्र समज आहे त्याप्रमाणे ही मूर्ती उत्तरपूजेचीही नसावी. कारण उत्तरपूजेची मूर्ती मिरवण्यासारखी 'चल' स्वरूपाची असते. ही मूर्ती तशी जड आहे. हलवायची म्हटले तर दोन-तीन माणसे लागतात. शिवाय मूर्तीच्या खाली पक्की बसवण्यासाठी मूर्तीतूनच एक दगडी फाळ कोरला आहे. तो खालच्या पायात बसवला की मूर्ती पक्की बसते. आजकालचे पुतळे बसविण्यासाठी हीच युक्ती करतात. यावरून ही मूर्ती मुख्य मूर्ती किंवा उत्तरपूजेची नसून आजूबाजूच्या परिवारदेवतेपैकी असावी.

'कऱ्हाड' पुस्तकानंतर श्री. गुप्ते यांनी "Uttaralaxmi at Karad" या शीर्षकाचे एक पुनर्मुद्रण प्रसिद्ध केले आहे. मूळ लेख "New Indian Antiquary" Vol. VII Nos. 3 & 4 June-July 1944 मध्ये प्रसिद्ध झालेला आहे त्यात ते म्हणतात —

"It is very probable that she may have been called Uttara-Laxmi to distinguish her from the Mahalaxmi at Kolhapur, as Karhad was included in the northern boundaries of the Silaharas. She was the popular goddess of their boundaries.

... One legend is that the image was thrown into the ponds, the site was attacked by the Muhammudans and

another substituted. It was shifted to Bhairohachi Ali later on. Another story runs that it was buried in the sand by the worshippers near the confluence of the Krishna and Koyana and was instituted later on when the danger was past.

... The figure has much in common with the description given in Silparatna. The background is, however, peculiar having apparently a conventional lion's mouth."

वरील उताऱ्यावरून अनेक गोष्टी स्पष्ट होतात. देवळाचे पुजारी श्री. पुजारी यांच्या म्हणण्याप्रमाणे देवीला जी इजा झाली ती जमिनीतून वर काढण्याच्या वेळी आणि ते पटते. कारण मुस्लिम आक्रमकांच्या हाती ती सापडली असती तर एवढी थोडी इजा त्यांनी पोहोचवली नसती. सबंध मूर्तीच त्यांनी फोडली असती. मात्र ही देवी किती-काळ पृथ्वीमातेच्या पोटात होती हे सांगणे अवघड आहे. इ. स. १७२७ मध्ये सध्याचे देऊळ बांधण्यात आले. मूर्ती वर आल्यावर लगेच देऊळ बांधले असे मानले तर ही मूर्ती ३००–४०० वर्षे तरी जमिनीत होती असा अर्थ निघतो.

२. यानंतर मूर्तीचा प्रकार ठरविण्याचा आहे. महिषासुरमर्दिनी प्रकारच्या प्राचीन काळातील मूर्ती ऐहोळे, बदामी, कोल्हापूर, वेरुळ, महाबलिपुरम् अशा अनेक ठिकाणी आहेत. तुलना करताना मूर्तींच्या वर्णनाचे तीन स्वतंत्र भौगोलिक भाग कल्पावे लागतात.[२२] उत्तर व मध्यभारत यामध्ये देवगडसारखी गुप्तमंदिरे येतात. दुसरा कर्नाटक विभाग. यात ऐहोळे, बदामी व पट्टदकळ या तीन ठिकाणचे शिल्पकाम येते. तिसरा भाग तामिळनाडूचा. यात पल्लवकालीन महाबलिपुरम् येथील शिल्पाचा भाग येतो. वेरुळचा भागही काहीसा स्वतंत्र व नंतरच्या काळातील आहे.[२३] याशिवाय हळेबीड येथील होयसळेश्वराच्या मंदिरात एक अत्यंत सुंदर महिषासुरमर्दिनी आहे. " ही मूर्ती अष्टभुजा असून काही भुजा तुटलेल्या आहेत. तिच्या हातात परशु, खड्ग, चक्र व त्रिशूल आहे. डाव्या हातात धनुष्य आहे. डावा पाय महिषाच्या अंगावर ठेवून उजव्या पायावर भर देऊन तोल संभाळला आहे. त्रिशूल महिषाच्या छातीत रोवला आहे. ती अलंकाराने मढलेली आहे. मस्तकावर नक्षीदार मुकुट आहे. गळ्यातील एक माळ गळ्याबरोबर तर दुसरी स्तनांवरून पोटापर्यंत डौलदारपणे रुळत आहे. तिच्या बोटात अंगठी करून शिल्पकाराने आपल्या कसबाची परिसीमा गाठली आहे. विशिष्ट प्रकारच्या गोंडेदार कमरपट्ट्याने कंबर व मांड्या यांची शोभा वाढविली आहे. तिला वस्त्र नेसवलेले नाही. पण अलंकाराच्या योजनेमुळे ती विवस्त्र वाटत नाही. मूर्तीचा चेहरा शांत व गंभीर आहे. कंबरेच्या बाकदारपणामुळे तिच्या उभे राहण्यात डौल आला

आहे.[२४] हा थोडा मोठा उतारा देण्याचा हेतू असा की उत्तरालक्ष्मी व या मूर्तींमधील साम्य लक्षात यावे. भरपूर अलंकार असणे, विवस्त्रता, मुकुटाचे स्वरूप, शांत चेहरा व स्थूलता ही साम्ये सहज लक्षात येतात. महिषासुराचे पुराणातील स्थानदेखील आजचे दक्षिणेतील म्हैसूर किंवा तुंगभद्रेचे काठी असलेले माहिष्मती हे आहे. वास्तवात हा असुर व रेडा या दोन्ही कल्पना संकलित झालेल्या दिसतात.

होयसळ शिल्पाची वैशिष्टये अशी :— तपशिलाची अनिवार आवड, कोरीवकामातील कमालीचा बारकावा, घष्टपुष्ट शरीरे.[२५]

हळेबीड व बेलूर येथील मूर्ती 'तुलनेने लहान आहेत पण प्राधान्याने अलंकृत आहेत.'[२६]

"होयसळ वंशातील राजांच्या कारकीर्दीत (इ.स. १११० ते १२९५) म्हैसूरजवळ बांधली गेलेली बेलूर हळेबीडची मंदिरे, अलंकृत शिल्प, कौशल्यपूर्ण नक्षीकामासाठी विशेष प्रसिद्ध आहेत. . .शिल्पाकृती स्थूल व भरगच्च दागिन्यांनी मढवलेल्या आहेत."[२७]

अर्थात इतर पल्लव, चोळ किंवा राष्ट्रकूट या शैलीपेक्षा ही शैली फारशी निराळी नाही. पण तपशिलातला बारकावा, स्थूलपणा, भरपूर दागिने यामुळे ती निराळी दिसते. तसेच बहुतेक सर्वांनी ही शिल्पे अति तपशिलामुळे सुंदर असली तरी एक प्रकारची निर्जीव आहेत हे नोंदवून ठेवले आहे.

यावरून ही मूर्ती हळेबीड-बेलूर प्रकारात घ्यावयास हरकत नाही.

३. वरील विधान अजून अपूर्ण आहे. मूर्तीच्या काळाने देखील त्यास पाठिंबा दिला पाहिजे. काळ ठरविण्यासाठी त्या त्या काळच्या राजकीय घटना बघावयास पाहिजेत. हे करीत असताना त्या त्या काळाला मान्य झालेला कलेचा प्रकारही पाहावयास हवा. हे बघण्याचे आणखी एक कारण असे की बौद्ध लेणी बांधण्यासाठी राजे लोकांबरोबरच इतरांची म्हणजे व्यापारी, धनवान इत्यादींचीपण मदत होई, पण मंदिरे मात्र राजांनीच बांधली आहेत. विष्णुधर्मोत्तरात पुढील वचन आठवते.

देवतावेश्मपूर्वाणि नगराणि कलौ युगे ।
कर्तव्यानि महीपालैः स्वर्गलोकमभिप्सुभिः ॥[२८]

यासाठीच राजकीय इतिहास पाहणे आवश्यक आहे.

इ. स. पु. तिसऱ्या शतकापर्यंत महाराष्ट्र हा मौर्य साम्राज्याचा भाग होता. या काळात प्रामुख्याने बौद्ध व जैन धर्मांची लेणी, स्तूप वगैरे उभारण्यात आले. त्यानंतर त्याला खऱ्या अर्थाने महाराष्ट्रीय म्हणता येईल असा राजवंश महाराष्ट्रात प्रस्थापित झाला तो म्हणजे शालिवाहन किंवा सातवाहनांचा. इ. स. पू. २३६ ते इ. स. २२५ म्हणजे जवळ जवळ ४५० वर्षे सातवाहनांनी बलिष्ठपणे राज्य केले. त्यांच्याच काळात हिंदु-धर्माच्या

पुनरुज्जीवनाला सुरुवात झाली. मध्ये काही काळ म्हणजे इ स. १२५ च्या सुमारास कुशान, क्षत्रप यांनी पण राज्य केले. त्यांची नाणी पार कऱ्हाडपर्यंत सापडली आहेत.[२९] सातवाहनकालातील कलाविलास कोंढाणे, भाजे, पितळखोरे, अजंठा, नासिक, जुन्नर, कार्ले, बेडसे व नाणे घाटातील लेण्यांत पाहावयास मिळतो. पण नाणेघाट सोडला तर ही सर्व लेणी बौद्धांची आहेत. सातवाहनानंतर वाकाटकांचा काळ इ. स. २५० ते ५५० आहे. या काळात हळूहळू मंदिरे आकारास येऊ लागली. रामगिरीवरील रामगिरीस्वामीचे मंदिर, अश्वत्थखेटकातील विष्णुमंदिर, प्रवरसेनाने बांधलेले प्रवरपूर येथील श्रीरामचंद्राचे उत्तुंग देवालय ही त्याची काही उदाहरणे होत.[३०] वाकाटकांनंतर बदामी चालुक्य इ. स. ५५० ते ७५३, त्यानंतर मान्यखेटचे राष्ट्रकूट इ. स. ७५४ ते ९७३, नंतर कल्याणीचे चालुक्य इ. स. ९७३ ते ११८९ व नंतर देवगिरीचे यादव इ. स ११८९ ते १३१८ अशा राजवटी महाराष्ट्रात होऊन गेल्या. या सर्व राजवटी हिंदू शिल्पकलेला उत्तेजन देणाऱ्या होत्या. राष्ट्रकूटांच्या काळात सुप्रसिद्ध वेरुळचे कैलास लेणे कोरले गेले.

या सर्व राजवटी महाराष्ट्रातील जरी असल्या तरी त्यांचा प्रदेश वरती माळवा, गुजरातपासून खाली रामेश्वरपर्यंत पसरला होता. राष्ट्रकूट राजा ३ रा गोविंद याने तर हिमालय ते कन्याकुमारी असा सर्व भारतवर्ष जिंकला.[३१] चालुक्य हे महाराष्ट्रात राहिले असले तरी ते मूळचे महाराष्ट्राबाहेरील होते. याचा एक परिणाम असा झाला की, महाराष्ट्रात प्रगत झालेली कला ही काही निराळी नव्हती. उत्तरेकडील नागर कला व दक्षिणेतील द्राविडीकला यांचे मिश्रण महाराष्ट्रात आले. उत्तर महाराष्ट्रात साधारणपणे उत्तरेचा प्रभाव तर दक्षिण महाराष्ट्रात दक्षिणेचा प्रभाव पडला. विशेषतः चालुक्यांचा संबंध जास्तकरून दक्षिणेशीच दिसून येतो. लहान मांडलिक राजे मंदिरे बांधताना आपल्या शेजारच्या मोठ्या सम्राटांचेच अनुकरण करीत असले पाहिजेत.

या दृष्टीने कोल्हापूर–कऱ्हाड भागात मांडलिक सदृश एक राजवट होऊन गेली तिचाही उल्लेख करावयास हवा. ती म्हणजे शिलाहार हे होय. या घराण्याचा संस्थापक जतिग हा असून त्याचा काळ इ. स. ९१८ ते ९५८ हा ठरतो. हा म्हैसूरमधील गंगवंशी राजा पेर्मानडी याचा मामा व तिकडील एक किल्ला गोमथ याचा अधिपती होता. सर्व शिलाहार राजे लक्ष्मीभक्त होते.[३२] विवेचनासाठी महिषासुरमर्दिनी महालक्ष्मीची पूजा केव्हापासून आली असावी याची पण नोंद घेतली पाहिजे. शैव, वैष्णव, शाक्त हे निरनिराळे पंथ ही पुराणांची निर्मिती आहे. पुराणांचा काळ ६ वे, ७ वे शतक मानला जातो.[३३] म्हणजे त्यानंतर हे पंथ निर्माण झाले. बांधीव देवळे बदामी चालुक्य व राष्ट्रकूटांच्या काळात फार कमी होती.[३४] त्याचप्रमाणे देवगिरीचे यादव व त्यांचे मांडलिक शिलाहार यांच्या प्रोत्साहनाने महाराष्ट्रात बरीच देवळे बांधली गेली[३५] व

८ व्या – ९ व्या शतकापासून महाराष्ट्रात तांत्रिक पंथालाही बरेच महत्त्व मिळू लागले. या सर्व गोष्टी सदरहूची मूर्ती ९–१० व्या शतकानंतरची आहे ही गोष्ट सिद्ध करण्याकडे घेऊन जातात.

उत्तरालक्ष्मीचा विचार करताना कोल्हापूरच्या महालक्ष्मीचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे. शिलाहारांची सुभ्याची किंवा राज्याची उत्तरमर्यादा कऱ्हाड असावी व म्हणून या लक्ष्मीला उत्तरालक्ष्मी असे म्हणत असे श्री. गुप्ते त्यांच्या वर उल्लेख केलेल्या टिपेच्या पुनर्मुद्रणात म्हणतात.[३६] शिलाहार हे अत्यंत लक्ष्मीभक्त होते. बहुतेक सर्व शिलाहार स्वतःला 'महालक्ष्मीलब्धवरप्रसाद' असे म्हणवून घेत असत.[३७] तसेच कै. ग. ह. खरे यांनी अनेक तऱ्हेचे पुरावे देऊन कोल्हापूरचे लक्ष्मीमंदिर हे ८ व्या शतकानंतर बांधले आहे हे सिद्ध केले आहे.[३८]

कोल्हापूर व कऱ्हाड यांचे संबंध दाखवणारे आणखी काही पुरावे आहेत ते असे :

१. कोल्हापूरच्या लक्ष्मीने कोलासुर या दैत्याला मारले. याच कोलासुराचा शालक-मेहुणा दुरित हा कऱ्हाड येथे राज्य करीत होता.[३९].

२. "प्रथम कऱ्हाडक्षेत्री कोल्हाचा शालक दुरित यास ठार केले."[४०]

३. इ.स. ११०६ च्या एका कानडी शिलालेखाचा कै. ग. ह. खरे उल्लेख करतात. हा लेख सध्या औंध येथील श्रीमंत पंतप्रतिनिधी यांच्या वस्तुसंग्रहात आहे. हा लेख कऱ्हाड-जवळील कापील या ठिकाणी सापडला. या लेखात कल्याणचा चालुक्य राजा त्रिभुवनमल्ल याचा अधिकारी सोभनेय्य हा कोल्हापूरवर प्रभुत्व गाजवीत असताना, तो स्वतः, त्याची बायको, मुलगा व मुलगी यांनी कोल्हापूरच्या महालक्ष्मीसाठी कापील गावातील ४ मत्तर जमीन व एका घराची जागा कुबेरनामक नावाच्या गृहस्थास दान दिल्याचे नमूद केले आहे.[४१]

वरील माहिती देण्याचा उद्देश असा की, कोल्हापूरचा राजकीय व सांस्कृतिक दृष्ट्या कऱ्हाडवर प्रभाव होता व तेथील राज्यकर्त्यांनी निमजग्याच्या माळावरील मंदिर उभारले असावे व ही गोष्ट महालक्ष्मीमंदिर बांधणीनंतर म्हणजे ८–९ व्या शतकानंतर झाली असावी.

वर होयसळांच्या हळेबीड येथील महिषासुरमर्दिनीचे वर्णन दिले आहे. शिलाहारांचा म्हैसूरबरोबरील संबंधही वर स्पष्ट केला आहे. यावरून आपल्या या मूर्तीवरील होयसळांचा प्रभाव का पडला असावा हे स्पष्ट होते. याशिवाय होयसळांचा शिलाहारांच्या-मार्फत नव्हे तर प्रत्यक्ष प्रभाव कोल्हापूर-कऱ्हाड भागावर होता. याचाही एक पुरावा मिळाला तो असा.

कै. ग. ह. खरे पंढरपूरच्या विठोबाच्या संदर्भात लिहितात – " विठोबा व होयसळ-वंश यांचा विशेष संबंध होता असे समजण्यास हरकत नाही. या होयसळांपैकी पराक्रमी राजा विष्णुवर्धन किंवा बिट्टिदेव अथवा बिट्टींग (इ. स. १११७ ते ११३७) हा जैन-धर्माचा त्याग करून रामानुजांच्या उपदेशावरून वैष्णव पंथाचा एकनिष्ठ उपासक व प्रचारक बनला होता. त्याचा भाऊ वीरबल्लाळ याने पराक्रमाच्या जोरावर आपल्या राज्याची हद्द भीमेपर्यंत भिडविली होती." विष्णुवर्धनाच्या नावावरून (विठोबाला) विठ्ठले हे नाव दिले असावे असेही कै. खरे म्हणतात.[४२]

आता भीमेची हद्द म्हणजे त्यात कऱ्हाड-कोल्हापूर येतेच. म्हणजे याच काळात या भागावर होयसळ शैलीचा प्रभाव पडला असण्याची शक्यता आहे. सुरुवातीस म्हटल्या-प्रमाणे ही मूर्ती परिवार देवता असल्याने या राजांपैकी कोणी ती त्या म्हणजे म्हैसूर-भागातूनही आणली असल्याची शक्यता आहे. म्हणजे या मूर्तीचाही काळ आपोआप १२ व्या शतकापर्यंत जातो. श्री. य. रा. गुप्ते आपल्या इंग्रजी टिपणातही हाच काळ देतात.

अशा तऱ्हेने या लेखात खालील गोष्टी सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे.

१. कऱ्हाडच्या भैरोबाच्या आळीतील उत्तरालक्ष्मीची मूर्ती ही त्या भव्य मंदिरातील मुख्य मूर्ती नाही.
२. समज आहे त्याप्रमाणे ही मूर्ती उत्तरपूजेचीही नव्हे तर महालक्ष्मीच्या मंदिरातील ही परिवार देवता आहे.
३. मूर्ती अत्यंत शास्त्रशुद्ध पद्धतीने बनवली असून परंपरेने सांगितलेल्या लक्षणांनी युक्त आहे.
४. ही मूर्ती दक्षिणेतील द्राविडशैलीतील हळेबीड-बेलूर प्रकारातील आहे.
५. या मूर्तीचा काळ इ.स. १२ वे शतक हा असून ती उत्तरकालखंडातील आहे.

संदर्भ :

१. साहित्यिक कऱ्हाड : पु. पां. गोखले, पृ. १.
२. प्राचीन भारतीय कला : म. श्री. माटे, पृ. ७२.
३. भारतीय मूर्तिकला : पं. महादेवशास्त्री जोशी, पृ. २९.
४. तत्रैव, पृ. ९०.
५. कऱ्हाड : य. रा. गुप्ते, प्र. १९२९, पृ. १२.
६. साहित्यिक कऱ्हाड : पु. पां. गोखले, पृ. ४.
७. भारतीय मूर्तिकला : पं. महादेवशास्त्री जोशी, पृ. ९८

८. Reprint from 'New Indian Antiquary' Vol. VII, No. 3 & 4 June-July, 1944, By Y. R. Gupte.
९. भारतीय मूर्तिकला : पं. महादेवशास्त्री जोशी, पृ. १०१.
१०. संस्कृती कोश : पं. महादेवशास्त्री जोशी, भाग ७, पृ. २५६.
११. महाराष्ट्राची चार दैवते : ग. ह. खरे, १९५८, पृ. ४३.
१२. प्राचीन भारतीय कला : म. श्री. माटे, पृ. १२७ व १२९.
१३. तत्रैव, पृ. १२४.
१४. तत्रैव, पृ. १२४.
१५. मुसलमानपूर्व महाराष्ट्र : वा. कृ. भावे, खंड दुसरा, १९४७, पृ. २२९.
१६. प्राचीन भारतीय कला : म. श्री. माटे, पृ. १२२.
१७. तत्रैव, १२२.
१८. साहित्यिक कऱ्हाड : पु. पां. गोखले, पृ. ४७-४९.
१९. महाराष्ट्राची चार दैवते । ग. ह. खरे, १९५८, पृ. ५३.
२०. कऱ्हाड : य. रा. गुप्ते, १९२९, पृ. ११-१२.
२१. Report from "N. I A." Vol. VII, Nos. 3 & 4, June-July, 1944.
२२. प्राचीन भारतीय कला : म. श्री. माटे, पृ. १२५.
२३. तत्रैव, पृ. १२५.
२४. संस्कृती कोश : पं. महादेवशास्त्री जोशी, भाग ७, पृ. २५५.
२५. प्राचीन भारतीय कला : म. श्री. माटे, पृ. १३६.
२६. भारतीय मूर्तिकला : पं. महादेवशास्त्री जोशी, पृ १३२.
२७. कलेचा इतिहास–भारतीय व पाश्चात्त्य : र. ना. पाटकर, पृ. ३९.
२८. मुसलमानपूर्व महाराष्ट्र : वा. कृ. भावे, खंड २, पृ. ७.
२९. कऱ्हाड : य. रा. गुप्ते, १९२९, पृ. २९.
३०. महाराष्ट्र संस्कृती : पु. ग. सहस्रबुद्धे, पृ. २३६.
३१. तत्रैव, पृ. १०५.
३२. महाराष्ट्राची चार दैवते : ग ह. खरे, १९५८, पृ. ४९.
३३. महाराष्ट्र संस्कृती : पु. ग. सहस्रबुद्धे, पृ १७५.
३४. महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास संस्कृती : प्रा. द. बा. डिकसळकर, १९६४, पृ. ८५.
३५. तत्रैव, पृ. ९१.
३६. Report from "N. I. A." Vol. VII, Nos. 3 & 4, June-July, 1944.

३७. महाराष्ट्राची चार दैवते : ग. ह. खरे, १९५८, पृ. ४९.

३८. तत्रैव, पृ. ३७ ते ५१.

३९. साहित्यिक कऱ्हाड : पु. पां. गोखले, पृ. २.

